Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ७९, अंक ४६, ५ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १० + सहदैनिक ★

मुंबई, बुधवार, ११ मार्च २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

अग्रलेख
**कंपनीने कोलवले!**
ज्या मुद्द्यांवर मानवी विवेक, सारासार विचारबुद्धी आदींचा वापर होणे आवश्यक आहे ते आपल्या 'एआय' उत्पादनावर सोडण्याची मुभा सरकारला नाकारण्यावर 'अँथ्रोपिक' थांबली नाही...




क्रीडा
**'दिग्गजांच्या पंगतीत स्थान अभिमानाचे'**

Vencobb
Vencobb No.1 Tasted Chicken

| | |
|---|---|
| बॉयलर विक्रीचा दर (पोल्ट्री फार्मवर) | १३४ रु. प्रति किलो |
| किरकोळ विक्रीचा दर जिवंत कोंबडी | १६२ रु. प्रति किलो |
| ड्रेस्ड कोंबडी (स्किनसह) दर | २०२ रु. प्रति किलो |
| अंडी किरकोळ विक्री दर | ६१ रु. प्रति १२ अंडी |

## तापमान

कमाल ४०°से | किमान २४°से

हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.

## काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



काय? तुमचा देश तुमच्याच देशातील निष्पापांवर गोळीबार करतो? हे भयंकर आहे! आमचा देश फक्त दुसऱ्या देशातीलच निष्पापांवर गोळीबार करतो!!

## इंडिगोच्या प्रमुखाचा अखेर राजीनामा



**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या 'इंडिगो'चे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पीटर एल्बर्स यांनी तात्काळ प्रभावाने पदाचा राजीनामा दिला. तीन महिन्यांपूर्वी इंडिगो कंपनीला मोठ्या उड्डाण संकटाचा सामना करावा लागला होता. पान ५

## बिर्लाविरोधातील प्रस्तावावर चर्चा

**नवी दिल्ली :** लोकसभाध्यक्ष ओम बिर्लाविरोधातील अविश्वास प्रस्तावावरील चर्चेमध्ये संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधींवर तोंडसुख घेतले. लोकसभाध्यक्षांचा आदेश अंतिम असतो, पण, राहुल गांधी ऐकूनही घ्यायला तयार नव्हते. त्यांच्यापेक्षा प्रियंका गांधी चांगल्या विरोधीपक्ष नेत्या झाल्या असत्या. निदान त्या संसदेत येतात आणि ऐकून तरी घेतात, अशा शेलक्या शब्दांत रिजिजू यांनी टीका केली. पान ५

## विद्यार्थिनीची आत्महत्या

**मुंबई :** ॲटॉप हिल परिसरातील २४ वर्षीय विद्यार्थिनीने मंगळवारी गळफास लावून आत्महत्या केली. स्तुती सोनवणे असे या विद्यार्थिनीचे नाव असून खासगी महाविद्यालयात दंतचिकित्सक या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत होती. प्रियकराच्या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली असावी, असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे.

# उद्योग, हॉटेल गॅसवर

## युद्धामुळे व्यावसायिक गॅसचा तुटवडा; पेट्रोल-डिझेलबाबतही चिंता; सरकारकडून समिती

**लोकसत्ता ठिकठिकाणच्या प्रतिनिधींकडून**

**मुंबई :** इराण-इस्त्रायल युद्धाची झळ सामान्य नागरिकांना बसू लागली आहे. राज्यात व्यावसायिक गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यातच युद्ध आणखी आठवडाभर सुरू राहिले तर पेट्रोल-डिझेल मिळणे अवघड होणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरमध्ये 'एलएनजी', 'एलपीजी', 'मिथेनॉल' आणि 'पिचिंग आईल' याचा पुरवठा सुरळीत झाला नाही तर वाहन उद्योगासह औषधी निर्माण बंद पडेल. बहुतांश कंपन्यांमध्ये केवळ दोन दिवसांचा पुरवठा शिल्लक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी नवी दिल्लीत पेट्रोलियममंत्री हरदीप सिंग पुरी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याबरोबर उच्चस्तरीय बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच सरकारने तीन सदस्यीय समितीची स्थापना केली आहे.

राज्यातील हॉटेल व्यवसायासाठी गॅस सिलेंडरचा पुरवठा मागणीच्या तुलनेत कमी झाला आहे. युद्ध आणखी आठवडाभर सुरू राहिले तर पेट्रोल-डिझेल मिळणे अवघड होणार आहे. मुंबईत सुमारे ५३ लाख वाहने आहे. सध्या सीएनजी - पीएनजीच्या पुरवठ्यावर परिणाम झाला नसला तरी कपात होण्याची शक्यता असल्याचे महानगर गॅस लिमिटेडने स्पष्ट केले.

सीएनजी अभावी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडेल. मुंबई, ठाणे, नवी मंबई, पनवेलसह उरणमध्ये महानगर गॅस लिमिटेडतर्फे पीएनजीचा पुरवठा केला जातो. सुमारे ३० लाखांपेक्षा अधिक घरगुती आणि ५ हजार ६०० छोट्या व्यावसायिक - औद्योगिक आस्थापनांमध्ये घरगुती गॅस वापरला जातो. याशिवाय १२ लाखांपेक्षा जास्त वाहने सीएनजीवर धावतात. एमजीएलकडून ग्राहकांना गॅस पुरवठ्यात कपात होण्याची शक्यता असल्याची अटकळ आहे. सध्या एमजीएलला गॅस उपलब्धतेत कोणतीही कपात करावी लागलेली (पान ८ वर)

### फाऊंड्री उद्योगाला फटका

औद्योगिक गॅस पुरवठा जवळपास ठप्प झाल्याने फाउंड्री, इंजिनीअरिंग उद्योगातील प्रमुख केंद्र असलेल्या कोल्हापूरसह राज्य, देशातील उद्योगांना झळ बसली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुमारे ५०० वर फाउंड्री, इंजिनीअरिंग उद्योग असून त्यामध्ये दरमहा पावणे दोन लाख टन कास्टिंग तयार केले जाते. एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात २५ हजार कामगारांच्या रोजगारावर प्रश्नचिन्ह लागले आहे.



छत्रपती संभाजीनगरमध्ये ४ हजार ५०० उद्योग आहेत. यातील ९० टक्के उद्योगाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहेच. दोन किंवा तीन दिवस पुरेल एवढाच इंधनसाठा असल्याने उद्योगासमोर एक मोठे संकट उभे ठाकले आहे. गॅस पुरवठा सुरळीत झाला नाही तर मोठे नुकसान होईल.
**– उत्सव माचर,** अध्यक्ष, सीएमआयए

### तीन सदस्यीय समिती

पश्चिम आशियातील संघर्ष लक्षात घेता घरगुती स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा वाढवण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. त्या संदर्भात तीन सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती गॅस पुरवठ्यातील अडचणी तसेच हॉटेल व्यावसायिकांशी चर्चा करून समस्या दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे. या समितीमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (आयओसी) हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) आणि भारत पेट्रोलियन कार्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल)च्या कार्यकारी संचालकांचा समावेश आहे.

### 'एलपीजी'चे उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली :** इराणविरोधातील इस्त्रायल-अमेरिका संघर्षामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, देशातील 'एलपीजी' गॅसपुरवठ्यातील तुटवडा नियंत्रित करण्यात आल्याचा दावा केंद्र सरकारकडून केला जात आहे. 'एलपीजी'चे देशांतर्गत उत्पादन वाढवून घरगुती ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देण्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. पान ५



दोन दिवसांपासून होर्मुझची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी बंद करण्यात आली आहे. अनेक जहाजे समुद्रात अडकली आहेत. रशियाकडून इंधन पुरवठा सुरू आहे. परंतु त्याचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे युद्ध जर आणखी आठवडाभर सुरु राहिले, तर पेट्रोल-डिझेलची समस्या निर्माण होईल. **–रवी शिंदे,** माजी अध्यक्ष, पेट्रोल डीलर असोसिएशन, मुंबई.

# मुंबईत मार्चमध्येच तापमानाची चाळिशी

## हंगामातील सर्वाधिक नोंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गेले काही दिवस मुंबईच्या कमाल तापमानात वाढ होत होती. मंगळवारी मुंबईचा पारा थेट ४० अंशावर गेल्याने मागील काही वर्षांतील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. हवामान शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, गुजरात आणि महाराष्ट्राच्या काही भागांवर प्रतिचक्रवात स्थिती निर्माण झाल्याने प्रामुख्याने उत्तर कोकणातील मुंबई, ठाणे आणि पालघरमधील उष्णतेत वाढ झाली असून, यामुळे उत्तर कोकणवासीयांना मंगळवारी उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला.

मुंबई शहरात मंगळवारी या हंगामातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली. हवामान विभागाच्या सांताक्रूझ केंद्रातील कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस नोंदले गेले. सामान्य तापमानाहून ७.७ अंश सेल्सिअसने अधिक होते. तर कुलाबा केंद्रात ३५.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. मंगळवारी डहाणू येथे ४० अंश सेल्सिअस तर ठाणे आणि पालघर येथे ४१.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, कोकण पट्टीतील कमाल तापमानात कोणताही मोठा बदल होणार नसून त्यानंतर हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होईल, असा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. बुधवारी मुंबईत उष्ण आणि दमट हवामान कायम राहणार असून शहरातील कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ अंश राहील, असा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.



गुजरात आणि महाराष्ट्र राज्याच्या काही भागांवर प्रतिचक्रवात स्थिती निर्माण झाली असल्याने काही ठिकाणी उच्चांकी तापमानाची नोंद होत आहे. अशा परिस्थितीत वारा वाहत नाही. त्यामुळे तापमानात वाढ होते.
**– एस. डी. सानप,** शास्त्रज्ञ, हवामान विभाग, पुणे

### काही ठिकाणी पावसाची शक्यता

**पुणे :** भारतीय हवामानशास्त्र विभागाने दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. विदर्भात वेगवान वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याने 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

# समान नागरी कायद्यासाठी सर्वोच्च न्यायालय अनुकूल

## 'कायदेमंडळाने सद्विवेकाने निर्णय घ्यावा'

**अनंतकृष्णन जी, एक्स्प्रेस**

**नवी दिल्ली :** देशभरात समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्यास सर्वोच्च न्यायालयाने अनुकूलता दर्शवली आहे. १९३७ च्या शरियत कायद्यातील मुस्लिम महिलांबाबत भेदभाव करणाऱ्या तरतुदींवर हे प्रभावी उत्तर ठरू शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र याबाबतचा निर्णय कायदेमंडळाने घ्यावा, असेही न्यायालयाने नमूद केले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर मुस्लिम व्यक्तीगत कायदा (शरियत) १९३७ मधील काही तरतुदींना आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी झाली. या



तरतुदींमुळे वारसाहक्कांसारख्या बाबींमध्ये मुस्लिम महिलांच्या बाबतीत भेदभाव होतो असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

शरियत कायद्याच्या तरतुदी रद्द केल्यास अनावश्यक कायदेशीर पोकळी निर्माण होऊ शकते. त्यामुळे या विषयावर निर्णय घेणे, कायदेमंडळावर सोपवणे अधिक योग्य ठरेल, असे सूर्य कांत यांनी नमूद केले. न्यायमूर्ती बागची यांनी याला सहमती दर्शवली. वैयक्तिक कायद्याच्या तरतुदी थेट रद्द केल्यास वारसाहक्कासारख्या (पान ८ वर)

### समान नागरी कायदा का योग्य?

न्यायमूर्ती बागची यांनी नमूद केले की, या विषयाचा परिणाम केवळ मुस्लिम समाजावरच नाही तर हिंदू अविभाजित कुटुंबाच्या मालमत्तेतील हिस्सा आणि हक्कांवर होऊ शकतो. त्यामुळे सर्व समुदायांवर समानपणे लागू होणारा समान नागरी कायदा हा अधिक योग्य आणि शाश्वत उपाय ठरू शकतो.

## रेड्डी यांची अटक वैध

**मुंबई :** वसई विरार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे माजी उपसंचालक वाय. शिवा रेड्डी यांना गेल्या वर्षी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी केलेली अटक ही कायदेशीरच होती, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. तसेच, एखादी व्यक्ती लाच घेते म्हणजे ती गुन्ह्यातून पैसे कमावते, असे निरीक्षण देखील न्यायालयाने रेड्डी यांना दिलासा नाकारताना नोंदवले. ईडीने केलेली अटक बेकायदेशीर घोषित करण्याच्या आणि विशेष न्यायालयाने कोठडी सुनावण्याबाबत दिलेले आदेश रद्द करण्याच्या मागणीसाठी रेड्डी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने रेड्डी यांच्या याचिकेवर निकाल देताना रेड्डी यांना १३ ऑगस्ट २०२५ रोजी अटक करण्यापूर्वी ईडीने कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे पालन केले होते, असे नमूद केले व रेड्डी यांची याचिका फेटाळून लावली. पान ३




गुंतवणुकींना जीवनातील ध्येयांशी जोडल्याने तुमची ध्येये साध्य होण्यास मदत होऊ शकते.

म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक केल्याने तुमच्या संपत्ती निर्मितीच्या प्रवासात आर्थिक शिस्त येण्यास मदत होते.

आजच सुरुवात करा, तुमचा उद्या घडवा.

अधिक माहितीसाठी आपल्या आर्थिक सल्लागाराशी संपर्क साधा

म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांना "नो युअर कस्टमर (KYC)" प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे, जी पूर्ण KYC फॉर्म आणि आवश्यक कागदपत्रे कोणत्याही AMC च्या शाखा कार्यालयात किंवा अधिकृत स्वीकार केंद्रात सादर करून करता येते. KYC दस्तऐवजीकरणाच्या आवश्यकता, पत्ता, फोन नंबर, बँक तपशील इत्यादी बदलाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी कृपया भेट द्या: https://www.licmf.com/kyc-redressal. गुंतवणूकदारांनी फक्त SEBI नोंदणीकृत म्युच्युअल फंडांमध्येच गुंतवणूक करावी, ज्याचे तपशील SEBI च्या संकेतस्थळावरील 'Intermediaries/Market Infrastructure Institutions' (https://www.sebi.gov.in/intermediaries.html) अंतर्गत पडताळले जाऊ शकतात. कोणत्याही तक्रारी आणि तक्रार निवारणासाठी गुंतवणूकदार संबंधित AMC च्या गुंतवणूकदार संबंध अधिकारीशी संपर्क साधू शकतात, आणि AMC द्वारे दिलेल्या उपायाने समाधान न झाल्यास, ते SEBI च्या SCORES पोर्टलवर (https://scores.sebi.gov.in/) तक्रार नोंदवू शकतात आणि/किंवा ऑनलाइन वाद निवारण पोर्टलद्वारे (https://smartodr.in/login) तक्रार वाढवू शकतात.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींना अधीन आहे, सर्व योजना संबंधित कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.
MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

# लवकर या, लवकर जा!

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महानगर क्षेत्रात विविध सरकारी कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांसाठी 'लवकर या, लवकर जा', (कम अर्ली - गो अर्ली) अशी वेळेत सवलत देण्याच्या योजनेची घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विधिमंडळातील पहिल्याच भाषणात केली. तसेच प्रसूतीकालीन रजा एक वर्ष घेण्याची मुभा देण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने विधान परिषदेत चर्चेला उत्तर देताना सुनेत्रा पवार यांनी विविध घोषणा केल्या. मुंबईत गर्दीच्या वेळी महिला कर्मचाऱ्यांना प्रवासाचा होणारा त्रास लक्षात घेता लवकर या, लवकर जा, या योजनेची घोषणा सुनेत्रा पवार यांनी केली. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ९.४५ ते ६.१५ अशी कामाची वेळ आहे. ९.१५ ते ९.४५ पर्यंत जेवढी मिनिटे लवकर येतील अशा महिला कर्मचाऱ्यांना ३० मिनिटांची सवलत देण्यात येणार आहे.

राज्यात चौथे महिला धोरण लागू करण्यात आले असून, त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. हरवलेल्या मुलांचा (पान ८ वर)

**मुंबईतील सरकारी महिला कर्मचाऱ्यांना मुभा देण्याबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची विधिमंडळातील पहिल्याच भाषणात घोषणा.**



### वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय सवलत

प्रसूतीसाठी सहा महिन्यांची सुट्टी मिळते. प्रसूती रजेनंतर गरज भासल्यास कमाल एक वर्षापर्यंत वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय अर्ध वेतन रजा घेण्यासही परवानगी देण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जाहीर केले. यामुळे सरकारी सेवेतील महिला कर्मचाऱ्यांना यापुढील काळात एक वर्षापर्यंत सुट्टी घेणे शक्य होणार आहे.

# संकलित मूल्यमापन चाचणी २२ एप्रिलपर्यंत

## दुसरी ते आठवीसाठीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** इयत्ता दुसरी ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठीच्या 'संकलित मूल्यमापन चाचणी २'चे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण (एससीईआरटी) परिषदेने जाहीर केले असून त्यात ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, तृतीय भाषा या विषयांची परीक्षा घेतली जाणार आहे. सकाळ किंवा दुपारच्या सत्रात परीक्षा आयोजित करण्याचे स्वातंत्र्य शाळांना देतानाच वेळापत्रकात कोणताही बदल करू नये, अशीही सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील शाळा एप्रिलपर्यंत सुरू राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर यांनी याबाबत विभागीय उपसंचालक, विद्या प्राधिकरण, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, महापालिका अधिकारी, शिक्षण निरीक्षकांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांची प्रगती पडताळणे आणि त्यात वाढ करणे, अध्ययनात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम तयार करणे, या उद्देशाने ही चाचणी आयोजित केली जाते.

राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, तसेच खासगी अनुदानित शाळांतील इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा घेतली जाणार आहे. दुसरी, तिसरी, चौथी, सहावी, सातवीसाठी दुबार चाचणी होणार नाही. प्रत्येक तालुक्यात 'यूडायस प्लस'च्या विद्यार्थिसंख्येनुसार प्रश्नपत्रिका वितरण होतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# आरटीई प्रवेश नोंदणीसाठी मुदतवाढ

## एक किलोमीटरची अट रद्द केल्यानंतर उच्च न्यायालयाचे शासनाला निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सोमवारी आरटीईतील शाळांसाठीच्या एक किलोमीटर अंतराच्या अटीला स्थगिती दिली. या प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत मंगळवारी संपत असल्यामुळे विद्यार्थ्यांना मुबलक वेळ मिळावा यासाठी न्यायालयाने तीन दिवसांची मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले.



उच्च न्यायालयात आरटीई प्रवेशाबाबत दोन वेगवेगळ्या याचिकांवर सुनावणी सुरू आहे. शंकर आत्राम यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष तर आशीष फुलझेले यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर न्या. अनिल पानसरे आणि न्या. निवेदिता मेहता यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. रिट याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने बदललेल्या नियमांच्या पार्श्वभूमीवर प्रवेश प्रक्रियेसाठी तीन दिवसांची मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले. दुसरीकडे, न्या. अनिल पानसरे व न्या. निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने एक किमीची अट लादल्याबाबत शासनावर ताशेरे ओढले.

शासनाने एक किमी अटीचा बचाव करताना सांगितले की, हा निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताला बघून घेण्यात आला. विद्यार्थ्यांना घराच्या जवळ शिक्षण मिळावे यासाठी प्राथमिक वर्गात प्रवेशासाठी एक किमी तर माध्यमिक वर्गात प्रवेशासाठी तीन किमीची अट घालण्यात आली. मात्र राज्य शासनाच्या या युक्तिवादावर आश्चर्य व्यक्त करत न्यायालयाने शासनाची कानउघाडणी केली. जर एक किमीच्या परिक्षेत्रात शाळा नसेल तर काय करणार? तुम्ही केवळ शहरी भागाकरिता विचार करत आहात. शेकडो गावांच्या एक किमी परिक्षेत्रात शाळाच नाही. मग अशा वेळी विद्यार्थ्याने प्रवेश करायचा नाही का? असे न्यायालयाने म्हटले.

आरटीई कायद्याच्या मूळ उद्देशांना हरताळ फासणारा हा नियम आहे, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. याचिकेवर बुधवार, ११ मार्च रोजी पुन्हा सुनावणी होणार आहे. शंकर आत्राम यांच्या वतीने ॲड. दीपक चटप व ॲड. बोधी रामटेके यांनी तर आशीष फुलझेले यांच्या वतीने ॲड. पायल गायकवाड यांनी युक्तिवाद केला.

### शाळा कोणती हे सांगणारे तुम्ही कोण?

विद्यार्थ्यांना ज्या शाळेत प्रवेश करायचा आहे, त्याची मुभा देणे आवश्यक आहे. कुठल्या शाळेत प्रवेश करायचा, हे सांगणारे तुम्ही कोण?, असा परखड सवाल न्यायालयाने उपस्थित केला. सरकारी वकीलांनी शासनाच्या निर्णयाचा बचाव करताना जास्त प्रवास करणे विद्यार्थ्याला अडचणीचे ठरू शकते, असे म्हटले. न्यायालयाने लगेच हा युक्तिवाद खोडून काढला आणि विद्यार्थ्याला शिक्षण घेण्यासाठी बस सेवे आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे, असे स्पष्ट केले.







# गैरप्रकार रोखण्यासाठी 'सीईटी'ची सुधारित नियमावली

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** सीईटीदरम्यान होणाऱ्या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश कक्षाने (सीईटी कक्ष) सुधारित नियमावली जाहीर केली असून त्यात डिजिटल, सायबर व एआय तंत्रज्ञानाच्या वापराने होणाऱ्या गैरप्रकाराला अटकाव करण्यावर भर दिला आहे. सुधारित नियमावलीत गैरप्रकाराचे स्वरूप पाहून त्यांना योग्य शिक्षा व दंड करण्याची तरतूदही आहे.

सीईटी कक्षाकडून १७ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा घेण्यात येतात. त्यानुसार राबविण्यात आलेल्या नोंदणी प्रक्रियेत आतापर्यंत १२ लाख ९२ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. प्रथमच तीन अभ्यासक्रमांच्या सीईटीला दोन संधी दिल्यामुळे परीक्षार्थींची एकूण संख्या १७ लाख ३९ हजारांवर पोहोचली आहे. या परीक्षेसाठी जाहीर झालेल्या नियमावलीमध्ये एकूण १३ प्रकारचे गैरप्रकार नमूद असून ती २०२६ च्या परीक्षेसाठी लागू राहील.

यात स्मार्ट फोन, मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर, ब्लूटूथ डिव्हाइस, इअर फोन किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स बाळगणे किंवा वापरणे प्रतिबंधित करण्यात आले आहे. तसेच एआय टूल्स, लपविलेले कॅमेरे, स्क्रीन मिररिंग, रिमोट ॲक्सेस सॉफ्टवेअर किंवा अन्य डिजिटल साधनांचा वापर करण्यासही मनाई करण्यात आली आहे. तसेच संगणकाधारित परीक्षेमध्ये विविध स्वरूपाचे गैरव्यवहार, गैरवर्तन व काही अनुचित प्रकार घडल्यास त्याच्या गुन्ह्याच्या प्रकारानुसार प्रचलित कायद्यानुसार उमेदवाराला विविध प्रकारच्या शिक्षा व दंड करण्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

### परीक्षा केंद्रांसाठीही कडक नियम

परीक्षा केंद्रांनी सीसी टीव्ही कॅमेरे बसविणे, बायोमेट्रिक पडताळणी करणे व कडक देखरेख करणे महत्त्वाचे आहे. त्यात निष्काळजीपणा केल्यास, तसेच गैरवर्तन किंवा गैरकृत्यात सहभाग आढळल्यास, अशा परीक्षा केंद्राची मान्यता तात्पुरती किंवा कायमची रद्द होईल, तसेच संबंधित कर्मचाऱ्याचे निलंबन किंवा आर्थिक वा प्रशासकीय दंड आकारणी करण्यात येईल, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेच्या उत्तरसूचीवर आक्षेप नोंदवण्याची सुविधा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षांची तात्पुरती (अंतरिम) उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार आता परीक्षार्थी, पालक आणि शिक्षकांना या उत्तरसूचीवर ११ ते १७ मार्च या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने आक्षेप नोंदवता येणार आहेत. यात पालकांना संकेतस्थळावर, तर शाळांना त्यांच्या लॉग-इनमध्ये लिंक उपलब्ध आहे. ई-मेल किंवा प्रत्यक्ष स्वरूपात येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. प्राप्त आक्षेपांवर विषय तज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन त्यानंतर अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध केली जाणार आहे.

# शिष्यवृत्ती योजनांचे ९३ हजार अर्ज प्रलंबित

## ४९ हजार ५७ अर्जांवर कार्यवाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध १४ योजनांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देण्यात येत असून डिसेंबर २०२५ मध्ये या योजनांतील एकूण १ लाख ४२ हजार ३८३ अर्ज प्रलंबित होते. त्यापैकी ४९ हजार ५७ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली असून फेब्रुवारीअखेर डीबीटी पोर्टलवर पडताळणी अभावी ९३,३२६ अर्ज अजूनही प्रलंबित आहेत, अशी माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली.

विधान परिषदेत डॉ. मनिषा कायंदे, कृपाल तुमाने, भाई जगताप, सतेज पाटील आदींनी या बाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर चंद्रकात पाटील यांनी लेखी उत्तरात म्हटले की, विद्यार्थ्याने संगणकीय प्रणालीवर अर्ज सादर केल्यानंतर संस्थास्तरावर आणि विभागीय सहसंचालक स्तरावर अर्जांची पडताळणी करण्यात येते. पण, अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या अर्जासह आवश्यक कागदपत्रे जोडत नाहीत. अर्जाची मूळ कागदपत्रे महाविद्यालयास सादर करीत नाहीत. त्यामुळे अर्जांची पडताळणी करण्यात अडचणी येतात. डिसेंबर २०२५ मध्ये शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आल्यावर तातडीने अर्ज पडताळणी सुरू करण्यात आली. त्यानुसार प्रलंबित ४९,०५७ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली.

## दिनदर्शिका

बुधवार, ११ मार्च २०२६
भारतीय सौर २० फाल्गुन शके १९४७
मिती फाल्गुन कृष्णपक्ष
अष्टमी उ. प. ०४ : २० पर्यंत.
नक्षत्र : ज्येष्ठा २२ : ०० पर्यंत.
चंद्र : वृश्चिक २२ : ०० पर्यंत.
सूर्योदय : ०६ : ५२, सूर्यास्त : १८ : ४६

- **मेष :** अपेक्षा मर्यादित ठेवा.
- **वृषभ :** अनेक माध्यमांतून यश.
- **मिथुन :** संयम ठेवा.
- **कर्क :** नवीन ओळख होईल.
- **सिंह :** सवलत मिळेल.
- **कन्या :** नव्या क्षेत्रात पदार्पण.
- **तूळ :** गोडधोड जेवणाचा बेत.
- **वृश्चिक :** समाधान वाटेल.
- **धनू :** शांत राहणे उत्तम.
- **मकर :** आनंदी दिवस.
- **कुंभ :** कामात मन रमेल.
- **मीन :** उत्साह वाढेल.

शुभ राशी : कन्या, तूळ

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत







# यूपीएससी

## प्रभावी अभ्यास रणनीती

**यूपीएससी मुख्य** परीक्षेतील जनरल स्टडीज पेपर-३ हा अत्यंत गतिमान आणि विश्लेषणाधारित पेपर मानला जातो. या पेपरमध्ये अर्थव्यवस्था, शेती व कृषीविकास, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण व जैवविविधता, आपत्ती व्यवस्थापन आणि अंतर्गत सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या व समकालीन विषयांचा समावेश असतो. त्यामुळे हा पेपर केवळ सैद्धांतिक ज्ञानावर आधारित नसून उमेदवाराच्या चालू घडामोडींशी जोडून विचार करण्याची क्षमता, आकडेवारीचा योग्य वापर आणि उपाययोजना मांडण्याची कौशल्ये तपासतो.

मर्यादित पण दर्जेदार पुस्तकांवर लक्ष केंद्रित करून, त्यासोबत चालू घडामोडींचा अभ्यास, शासकीय अहवालांचा संदर्भ, आणि नियमित उत्तरलेखन सराव केल्यास या पेपरमध्ये उच्च गुण मिळवता येतात. हा पेपर विशेषतः डेटा, उदाहरणे, योजनांचा उल्लेख, आणि समस्या-उपाय पद्धतीने मांडणी यांवर भर देतो. त्यामुळे अभ्यास करताना केवळ माहिती पाठांतर न करता तिचे विश्लेषण, कारण-परिणाम संबंध, आणि शाश्वत उपाययोजना यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

### अर्थशास्त्रासाठी संदर्भ सूची

- **संकल्पना आणि स्टॅटिक पार्टसाठी**
  एनसीईआरटीचे अर्थशास्त्राचे अकरावी व बारावीचे पुस्तके. अर्थव्यवस्थेच्या मूलभूत संकल्पना, विकास, आर्थिक संरचना समजण्यासाठी उपयुक्त.
- **रमेश सिंग यांचे इंडियन इकॉनॉमी :**
  स्टॅटिक आणि चालू संदर्भासाठी वापरता येऊ शकते.
- **नितीन सिंघानिया यांचे इंडियन इकॉनॉमी**
  संकल्पना चांगल्या पद्धतीने सोपे करून सांगणारे पुस्तक.
- **मिश्रा आणि पुरी यांचे इंडियन इकॉनॉमी**
  अधिक विस्तृत इकॉनॉमिक थिअरी आणि पॉलिसी ॲनालिसिससाठी उपयुक्त.
- **इंडियन इकॉनोमी - दत्त मिश्रा -** अर्थविषयक संकल्पना समजून घेण्यासाठी, मूलभूत माहिती, शासकीय डेटा यावर आधारित उपयुक्त असा संदर्भग्रंथ.

**नोटः** एकच संदर्भग्रंथ वारंवार वाचून स्वतःच्या नोट्स काढण्याचा प्रयत्न करावा.

- **सरकारी दस्तऐवज :** आर्थिक पाहणी आणि केंद्रीय अर्थसंकल्प यांचा सारांश वाचणे अनिवार्य आहे. पीआयबी या वेबसाइटवरून अर्थसंकल्प आणि इकॉनोमिक सर्वे ऑफ इंडिया यांच्या सारांश रूपातील नोट्स वापराव्या.
- **मासिके :** योजना आणि कुरुक्षेत्र ही मासिके ग्रामीण विकास आणि कृषी विषयांच्या सखोल अभ्यासासाठी वापरा.
- **अहवाल :** धोरणात्मक माहितीसाठी नीती आयोग अहवाल वाचा.

### डायनामिक किंवा समसामायिक घडामोडींसाठी

**चालू वर्षातील आर्थिक सर्वेक्षण**

- भारताच्या आर्थिक परिस्थितीचा सर्वात विश्वासार्ह आणि सध्याचा रिपोर्ट. डायनॅमिक प्रश्नांमध्ये व्हॅल्यू एडिशनसाठी अत्यंत आवश्यक.
- **अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी :** नवीन धोरणे, खर्च, कर-व्यवस्था याचे अद्यावत माहिती मिळवण्यासाठी.
- **वर्तमानपत्रे आणि आर्थिक न्यूज :** द हिंदू, इंडियन एक्सप्रेस, पीआरएस इंडिया, मिंट यासारख्या वर्तमानपत्रांचा वापर.
- महत्त्वाच्या सरकारी अहवालांचा सारांश कोठे मिळेल?
- **PRS लेजिस्लेटिव्ह रिसर्च :** संसदेत मांडली जाणारी विधेयके, मंजूर झालेले कायदे आणि महत्त्वाच्या धोरणांवर सरकारी श्वेतपत्रिका आणि सविस्तर टिपणी मिळवण्यासाठी ही सर्वोत्तम वेबसाइट आहे.

### विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरण

- **पायाभूत ज्ञान :** चालू घडामोडी समजून घेण्यासाठी आधी मूळ तांत्रिक संकल्पना (उदा. नवीन लसींचा अभ्यास करण्यापूर्वी mRNA म्हणजे काय) समजून घ्या.
- **चालू घडामोडी :** व्हिजन आयएएस किंवा इनसाइट्स सारख्या संस्थांची मासिक संकलने.
- **अंतर्गत सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन :** आपत्ती व्यवस्थापनासाठी नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट अथॉरिटीची वेबसाइट किंवा संबंधित मंत्रालयाची कागदपत्रे पहा.
- **इतर :** अंतर्गत सुरक्षा प्रश्नांसाठी 'स्टडी आयक्यू' सारख्या प्लॅटफॉर्मवरील व्हिडीओ किंवा गुगल सर्चचा वापर करा.

### वाचण्याची रणनीती

- **आधी 'स्टॅटिक' मग 'करंट':** जनरल स्टडीज पेपर-३ हा जवळपास ५०% चालू घडामोडींवर आधारित आहे . मात्र, जोपर्यंत तुमच्या तांत्रिक संकल्पना स्पष्ट नसतील, तोपर्यंत तुम्हाला चालू घडामोडी समजणार नाहीत. आधी विषय समजून घ्या आणि मगच वर्तमानपत्रातील अपडेट्स त्यामध्ये जोडा.
- **संकल्पनात्मक स्पष्टतेवर भर :** 'पोटेन्शिअल जीडीपी' सारख्या विश्लेषणात्मक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सखोल समज विकसित करा. माहिती पाठ करण्यापेक्षा 'का' आणि 'कसे' यावर लक्ष द्या.
- **वन-पेज नोट्सचा वापर :** जनरल स्टडीज पेपर-३ मध्ये अनेक उप-विषय असल्याने उजळणी करणे कठीण जाते. अभ्यासानंतर प्रत्येक विषयाचे वन-पेज नोट्स काढा, जेणेकरून परीक्षेच्या आधी जलद उजळणी करता येईल.

**मुख्य परीक्षेतील** सामान्य अध्ययन पेपर-३ हा अर्थव्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण, कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर आधारित असतो. हा पेपर उमेदवाराची केवळ माहिती तपासत नसून विश्लेषणात्मक विचारसरणी, समकालीन घडामोडींशी विषय जोडण्याची क्षमता आणि प्रशासनिक दृष्टीकोन तपासतो. त्यामुळे या पेपरचा अभ्यास करताना संकल्पनांची स्पष्ट समज, चालू घडामोडींचे ज्ञान आणि योग्य संदर्भ पुस्तकांचा वापर करणे अत्यंत आवश्यक ठरते.

अर्थव्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण आणि कृषी यांसारख्या विषयांसाठी निवडक संदर्भ पुस्तकांचा अभ्यास करणे आवश्यक असते. अभ्यास करताना प्रत्येक विषयासाठी लघु आणि मुद्देसूद नोट्स तयार करणे, आकडेवारी व उदाहरणे लक्षात ठेवणे तसेच चालू घडामोडींशी विषय जोडणे ही प्रभावी तयारीची गुरुकिल्ली ठरते.

### विषयानुसार पुस्तकसूची

**भारतीय अर्थव्यवस्था आणि कृषी**

- **पायाभूत वाचन :** ११ वी एनसीईआरटी इंडियन इकॉनॉमी अँड डेव्हलपमेंट आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची बी.ए. स्तरावरील पुस्तके.
- **संदर्भ पुस्तके:** रमेश सिंग यांचे 'भारतीय अर्थव्यवस्था' (याचे मराठी भाषांतर बाजारात उपलब्ध आहे). रंजन कोळंबे किंवा देसले सरांची पुस्तके पूर्व परीक्षेसाठी उत्तम आहेत, परंतु मुख्य परीक्षेसाठी अधिक सखोल वाचन गरजेचे आहे.

### विज्ञान आणि तंत्रज्ञान

- **पायाभूत वाचन :** ६ वी ते १२ वी पर्यंतची एनसीईआरटी किंवा स्टेट बोर्डाची विज्ञानाची पुस्तके.
- **संदर्भ पुस्तके :** मराठीत भस्के सरांचे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे पुस्तक वापरावे . शक्य असल्यास नीरज सरांचे (इंग्रजी) पुस्तक संदर्भासाठी ठेवावे, कारण तंत्रज्ञान विषयातील संकल्पना इंग्रजीतून स्पष्ट होणे सोपे जाते.

# एमपीएससी

## तयारीची गुरुकिल्ली

### पर्यावरण आणि जैवविविधता

- **पायाभूत वाचन :** १२ वी एनसीईआरटी मधील जीवशास्त्र पुस्तकातील शेवटचे चार धडे
- **संदर्भ पुस्तकः** तुषार घोरपडे सरांचे पर्यावरणाचे पुस्तक.

### अंतर्गत सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन

- **संदर्भ पुस्तक :** अशोक कुमार (आयपीएस) यांचे चॅलेंजेस टू इंटरनल सिक्युरिटी. या विषयासाठी मराठीत दर्जेदार पुस्तकांचा अभाव असल्याने, इंग्रजी पुस्तकांचा मराठी अनुवाद किंवा त्यातील महत्त्वाच्या मुद्द्यांच्या नोट्स वापरणे श्रेयस्कर ठरेल.

### अभ्यासाची सविस्तर रणनीती

- **वृत्तपत्र वाचनाला महत्त्व :** जनरल स्टडी पेपर ३ या विषयाची तयारी करत असताना चालू घडामोडी चा संदर्भ देणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. दररोज ३ ते ४ वृत्तपत्रे (उदा. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, द हिंदू किंवा इंडियन एक्सप्रेस) वाचून त्यातील महत्त्वाच्या घडामोडींच्या नोट्स काढाव्यात. विविध एआय टूल्स चा वापर करून कमीत कमी वेळेत या घटकाची तयारी करता येऊ शकते.
- **शासकीय नियतकालिकांचा वापर:** 'योजना', 'कुरुक्षेत्र' आणि 'लोकराज्य' यांसारख्या मासिकांचा वापर करा. यातील माहिती अधिकृत असते आणि ती उत्तरे लिहिताना उपयोगी पडते.
- **इंग्रजी स्रोतांचा आधार :** विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतर्गत सुरक्षा या विषयांसाठी इंग्रजी संदर्भ पुस्तके अधिक दर्जेदार असतात. त्यामुळे मराठीतून अभ्यास करतानाही महत्त्वाच्या तांत्रिक शब्दांसाठी इंग्रजी पुस्तकांचा संदर्भ घेत राहा.
- **विषयानुसार वर्गीकरण :** वर्तमानपत्रांप्रमाणेच या नियतकालिकांमधील माहितीचे विषयानुसार विभाजन करा. उदा. कुरुक्षेत्रमधील ग्रामीण विकासाचे मुद्दे जीएस ३ (कृषी) मध्ये, तर योजनेमधील सामाजिक मुद्दे जीएस १ किंवा जीएस २ मध्ये समाविष्ट करा.
- **निवडक वाचन करा :** बाजारात अनेक मॅगझिन्स उपलब्ध असतात (उदा. वर्ल्ड फोकस, लोकराज्य, डाऊन टू अर्थ), परंतु सर्वच वाचत बसण्यापेक्षा तुमच्या परीक्षेसाठी जेवढे आणि जे आवश्यक आहे, तेवढेच निवडून त्याच्या नोट्स काढा.

मुख्य परीक्षेतील सामान्य अध्ययन पेपर ३ हा केवळ माहितीवर आधारित पेपर नसून उमेदवाराची समकालीन विषयांवरील समज, विश्लेषण क्षमता आणि समस्यांकडे प्रशासनिक दृष्टीने पाहण्याची वृत्ती तपासणारा पेपर आहे. त्यामुळे या पेपरची तयारी करताना फक्त जास्त पुस्तके वाचण्यापेक्षा मर्यादित पण दर्जेदार पुस्तकांचा सखोल अभ्यास करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

सातत्यपूर्ण वाचन, नियोजनबद्ध उजळणी आणि उत्तरलेखनाचा सराव यांच्या मदतीने या पेपरमध्ये केवळ चांगले गुण मिळवणेच नव्हे तर प्रशासनिक विचारसरणी विकसित करणे देखील शक्य होते. त्यामुळे योग्य दिशा, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि योग्य अभ्यास रणनीती यांच्या साहाय्याने सामान्य अध्ययन पेपर-३ हा पेपर मुख्य परीक्षेत यशाचा मजबूत पाया ठरू शकतो.

**- एस. वाय. संदे**
careerloksatta@gmail.com

# नकारात्मक व्यक्तींमुळे वृद्धत्वाला वेग

आरोग्य वार्ता

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक
गोल्ड लोन
@8.35%*
शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल द्या 8010 614 614
अर्जासाठी स्कॅन करा

**नवी दिल्ली :** माणूस किती वेगाने वृद्ध होत जाणार, हे त्याच्या जवळच्या लोकांवर अवलंबून असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. आपल्याजवळ त्रासदायक किंवा सतत तणाव निर्माण करणाऱ्या व्यक्ती असल्यास आपल्या जैविक वृद्धत्वाचा वेग वाढू शकतो, असे एका नव्या अभ्यासातून आढळून आले आहे.

अशा नकारात्मक मानसिकता निर्माण करणाऱ्या व्यक्तीमुळे वृद्धत्वाचा वेग सुमारे १.५ टक्क्यांनी वाढतो आणि संबंधित व्यक्तीचे जैविक वय नेहमीपेक्षा नऊ महिन्यांनी अधिक असते. त्यातही ही व्यक्ती कुटुंबातील असल्यास त्याचा परिणाम प्रकर्षाने दिसून येत असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे. 'प्रोसीडिंग्स ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या या शोधनिबंधानुसार, अभ्यासात सहभागी झालेल्या ३० टक्के व्यक्तींच्या आयुष्यात किमान एक तरी अशा प्रकारची त्रासदायक व्यक्ती असल्याचे नोंदवण्यात आले. अमेरिकेतील इंडियाना प्रांतातील २,३४५ नागरिकांच्या लाळेच्या नमुन्यांवर आधारित या अभ्यासात डीएनए मिथाइलेशन या प्रक्रियेचे विश्लेषण करण्यात आले. दीर्घकाळ टिकणारा मानसिक ताण जैविक वृद्धत्वाला गती देऊ शकतो, त्यामुळे निरोगी वृद्धत्वासाठी हानीकारक संबंध कमी करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

केस, त्वचा व सर्व आरोग्य तक्रारींवर
डॉ. मानसी Tanvi HERBALS क्लिनिक
डॉ. मानसी तन्वी हर्बल क्लिनिक
डॉ पुष्कराज 9833683021
रोज फ्री चेकअप (ठाणे)
स्पिरुलिनी+ कॅप्सूल्स, केशकलरा लेप, कुमकुमादी शतधौत घृत,
मंत्रचिकित्सानुभव पुस्तक व तन्वी हर्बल प्रॉडक्ट्स उपलब्ध...

# माजी अधिकारी रेड्डी यांची अटक वैध

## वसई -विरार पालिकेतील प्रकरणात न्यायालयाचा निर्वाळा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** वसई विरार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे माजी उपसंचालक वाय. शिवा रेड्डी यांना गेल्या वर्षी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी केलेली अटक ही कायदेशीरच होती, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. तसेच, एखादी व्यक्ती लाच घेते म्हणजे ती गुन्ह्यातून पैसे कमावते, असे निरीक्षण देखील न्यायालयाने यावेळी नोंदवले.

ईडीने केलेली अटक बेकायदेशीर घोषित करण्याच्या आणि विशेष न्यायालयाने कोठडी सुनावण्याबाबत दिलेले आदेश रद्द करण्याच्या मागणीसाठी रेड्डी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र रेड्डी यांना १३ ऑगस्ट २०२५ रोजी अटक करण्यापूर्वी ईडीने कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे पालन केले होते, असे नमूद करत मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने त्यांची याचिका फेटाळून लावली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अटक झाल्यापासून रेड्डी हे कारागृहात आहेत.

छाप्यात जप्त केलेली कथित रोख रक्कम आणि दागिने हे मूळ गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेतून मिळवले आहेत हे दाखविणारा कोणताही पुरावा नाही, असा दावा रेड्डी यांनी केला होता. मात्र न्यायालयाने त्यांचा दावा फेटाळून लावला. रेड्डी आणि इतर अधिकाऱ्यांनी २०१९ ते २०२३ दरम्यान सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) आणि कचराभूमीसाठी राखीव असलेल्या भूखंडावर बनावट परवानग्या व कागदपत्रांच्या आधारे विकासकांना ४१ इमारतींचे बेकायदेशीर बांधकाम करण्यास परवानगी देत आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

### ...म्हणून हस्तक्षेपास नकार



ईडीने रेड्डी यांच्या निवासस्थानांवर टाकलेल्या छाप्यांमध्ये ८.२३ कोटी रुपयांची बेहिशेबी रोकड आणि २३.२८ कोटी रुपयांचे दागिने जप्त केले. तपासादरम्यान रेड्डी यांनी सरकारी जमिनीवरील बेकायदेशीर बांधकामांना दिलेल्या परवानगीबाबतची भूमिका उघडकीस आल्याचेही न्यायालयाने नमूद केले. या पार्श्वभूमीवर, याप्रकरणी हस्तक्षेप करावा असे आम्हाला सकृतदर्शनी काहीच आढळून आलेले नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

# सौभाग्यलेण्याच्या आठवणींशी जोडून घेणारी 'तनिष्क'ची अनोखी स्पर्धा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** सौभाग्यलेणे म्हणून ओळखले जाणारे मंगळसूत्र प्रत्येक स्त्रीसाठी अनेकविध अर्थाने महत्त्वाचे असते. सोन्याचा दागिना यापलीकडे मंगळसूत्राशी असलेले स्त्रीचे नाते ओळखून 'तनिष्क' या टाटा समूहाच्या प्रतिष्ठित दागिन्यांच्या ब्रँडने 'माझ्या मंगळसूत्राची गोष्ट' या अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्त्रियांना भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे.

मंगळसूत्र हा स्त्रीच्या आयुष्यातला फक्त महत्वाचा दागिना नाही, तर तो घडवण्यामागे प्रत्येकीची एक वेगळी आठवण असते. कधी वाढले म्हणून नवीन मंगळसूत्र घेण्याची लगबग, कधी नवऱ्याच्या मागे लागून आवडीने आपल्याला हवे त्या डिझाईनचे करून घेतलेले मंगळसूत्र, कधी सासरच्या पारंपरिक पद्धतीचे मंगळसूत्र, कधी नवऱ्याने न सांगता दिलेली भेट तर कधी आयुष्यभर पै पै जोडत फार कष्टाने घडवलेला दागिना, अशा कित्येक आठवणी मंगळसूत्राशी जोडलेल्या असतात. तुमच्या मंगळसूत्राची तुमची अशी आठवण 'माझ्या मंगळसूत्राची गोष्ट' या तनिष्कच्या स्पर्धेसाठी पाठवायची आहे. तुमची मंगळसूत्राची गोष्ट response.mmg@gmail.com या ईमेलवर किंवा ९९२००९९९४३ या क्रमांकावर व्हॉट्स ॲपवर २०० ते २५० शब्दांत पाठवायची आहे. त्याबरोबरच स्वतःचे नाव, वय, पत्ता, संपर्क क्रमांक आणि तुमचा ईमेल आयडी आदी तपशीलही लिहून पाठवायचे आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख १६ मार्च २०२६ आहे. या स्पर्धेत विजेता ठरणाऱ्यांना 'तनिष्क'कडून प्रत्येकी १०,००० रुपयांचे २० व्हाउचर्स जिंकण्याची संधी मिळणार आहे.

# सफाई कर्मचाऱ्याची हत्या; नैराश्यात पत्नीची आत्महत्या

## उल्हासनगरात आरोपी अटकेत

लोकसत्ता प्रतिनिधी

**उल्हासनगर:** उल्हासनगर कॅम्प क्रमांक ३ मधील बॅरॅक क्रमांक ८९६ येथे सफाई कर्मचारी महादू जगताप यांच्यावर मद्यधुंद व्यक्तीने चाकूने वार करत त्यांची हत्या केली. पतीच्या मृत्यूचा धक्का सहन न झाल्याने काही तासांतच त्यांच्या पत्नीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

महादू जगताप हे उल्हासनगर कॅम्प १ मधील शहाड गावठाण परिसरात राहत होते. ते कोणार्क इन्व्हायरो कंपनीमध्ये सफाई कामगार म्हणून कार्यरत होते. सोमवारी सकाळी कामावर असताना कॅम्प क्रमांक ३ येथे मद्यधुंद व्यक्तीने त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.दुर्गेश कुमार गप्ता असे आरोपीचे नाव आहे. आरोपी हा जगताप यांना घरातून कचरा घेऊन नेण्याचे वारंवार सांगत होता. मात्र तुम्ही कचरा एका ठिकाणी गोळा करा मी घेऊन जाईन, असे जगताप सांगत होते. याच वादातून दुर्गेश गुप्ता याने त्यांची हत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे. सफाई कर्मचाऱ्यांनी या घटनेच्या निषेधार्थ कामबंद आंदोलन सुरू केले होते.

# मृत रेल्वे कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांनाही भरपाईस प्रशासनाचा नकार !

**मुंबई :** सोळा वर्षांपूर्वी म्हणजेच २०१० मध्ये विरारजवळ गर्दीमुळे लोकलमधून पडून रेल्वे कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असतानाही त्याच्या कुटुंबीयांना भरपाई नाकारणाऱ्या रेल्वे प्रशासनाच्या भूमिकेबाबत उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. तसेच, अशा प्रकरणांत तरी भारतीय रेल्वेने त्यांच्याच मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला भरपाईसाठी न्यायालयाचे दार ठोठावण्यास भाग पाडू नये, असे खडेबोल सुनावले. याप्रकरणी रेल्वे दावे न्यायाधिकरणने २०१५ मध्ये याचिकाकर्त्याला भरपाई नाकारली होती. त्या आदेशाला न्यायालयात आव्हान देण्यात आले.

# कळंबोलीत पोलीस भरतीवेळी चौघांकडून उत्तेजक द्रव्य जप्त

लोकसत्ता प्रतिनिधी

**पनवेल :** नवी मुंबईतील पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान चार उमेदवारांकडून उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन जप्त करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी चारही उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून कळंबोली पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना कळंबोली येथील पोलीस मुख्यालयात सोमवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारास उघडकीस आली.

मुंबईसह राज्यभरात पोलीस शिपाई आणि चालक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारांना उन्हाळ्याचा त्रास होऊ नये यासाठी कळंबोली (रोडपाली) येथील पोलीस मुख्यालयातील मैदानावर पहाटेपासूनच चाचणी सुरू करण्यात आली होती. यावेळी पोलीस शिपायांनी उमेदवारांची अंगझडती घेतल्यानंतर चौघांकडे उत्तेजक द्रव्य आढळून आल्यानंतर त्यांना तात्काळ कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले. यातील तिघे जण आहिल्यानगर जिल्ह्यातील, तर एक उमेदवार पुणे जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. या चारही उमेदवारांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहेत.

# प्रदीप शर्मांची दोषमुक्तीची मागणी फेटाळली

**मुंबई :** प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या ॲंटिलिया या निवासस्थानाबाहेर सापडलेल्या स्फोटकांचे प्रकरण आणि व्यावसायिक मनसुख हिरेन याच्या खून प्रकरणातून माजी चकमकफेम पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना दोषमुक्त करण्यास उच्च न्यायालयाने मंगळवारी नकार दिला.

एनआयए कायद्यांतर्गत स्थापन विशेष न्यायालयाने दोषमुक्तीची मागणी फेटाळल्यानंतर शर्मा यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने मंगळवारी सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर त्यांची याचिका फेटाळली. या प्रकरणी बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत (युएपीए) खटला दाखल आहे.

Maharashtra Airport Development Company Ltd.
(CIN U45203MH2002SGC136979)
MADC
Corrigendum - MADC RECRUITMENT - 2026
MADC RECRUITMENT NOTICE 2026 PUBLISHED ON MADC OFFICIAL WEBSITE ON 07/03/2026
With reference to the MADC Recruitment Notice 2026 published in the newspaper dated 07/03/2026, it is hereby informed that, the last date for submission of applications is hereby extended to 27/03/2026 and there are few other changes in advertisement.
For the details visit www.madcindia.org. Details will be available on the website from 11/03/2026 from 13.00 hours.
Sd/-
Vice Chairman and Managing Director

सिद्ध कॅल्सीयोग KALCIYOG®
आयुर्वेदिक कॅल्शियम टॅब्लेटस्
• हाडांचे आणि सांध्यांचे टॉनिक.
• हात, पाय, कंबर, गुडघे, पाठ, सांधे दुखणे यासाठी उत्तम.
• केस गळणे कमी होते.
• स्नायू, लिगामेंट दुखापतीवर प्रभावी.
Amazon वर कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध
डॉ. अभिजीत 9422011723
धौतीयोग चे प्रभावी उत्पादन

# सीबीएसईच्या प्रश्नपत्रिकेवर गाण्याचा क्यूआर कोड !

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) बारावीच्या गणित विषयाच्या प्रश्नपत्रिकेवर दिलेला क्यूआर कोड स्कॅन केल्यावर थेट गाण्याची ध्वनिचित्रफीत सुरू होत असल्याचा अजब प्रकार घडला आहे.

९ मार्च रोजी ही परीक्षा देऊन घरी गेल्यावर विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेवरील क्यूआर कोड स्कॅन केला असता थेट प्रसिद्ध गायक रिकी ॲस्टलेच्या 'नेव्हर गॉना गिव्ह यू अप' हे गाणे लागत होते. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. पेपर फुटीची प्रकरणे रोखण्यासाठी सीबीएसईने २०१९ पासून प्रश्नपत्रिकांवर क्यूआर कोड देण्याची पद्धत सुरू केली. मात्र क्यूआर कोड स्कॅन केल्यावर गाणे लागत असल्याने या पद्धतीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. दरम्यान, याबाबत सीबीएसईने मंडळाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार एका संचातील क्यूआर कोड स्कॅन केल्यावर संबंधित दुवा ध्वनिचित्रफितीकडे जात असल्याचे दिसून आले. यामुळे प्रश्नपत्रिका फुटल्याच्या वा परीक्षेच्या प्रक्रियेवर कोणताही परिणाम झाला नसून प्रश्नपत्रिका पूर्णपणे सुरक्षित आहेत.

# मुंबईच्या प्रादेशिक पारपत्र अधिकारीपदी स्वप्नील थोरात

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** मुंबईचे प्रादेशिक पारपत्र अधिकारी म्हणून स्वप्नील थोरात यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला. डॉ अर्जुन देवरा यांच्या जागी थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. थोरात हे २०१७ च्या तुकडीचे भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

स्वप्नील थोरात यांनी याआधी त्यांनी दक्षिण कोरियातील भारतीय दूतावास येथे व्यापार आणि गुंतवणूक तसेच मुसद्देगिरी विभागाचे प्रभारी म्हणून २०१८ ते २३ या दरम्यान काम पाहिले आहे. त्यानंतर ते नवी दिल्ली येथील परराष्ट्र मंत्रालयाच्या वित्त विभागात अडीच वर्षे कार्यरत होते. तसेच मागील तीन महिन्यांपासून मुंबई येथील परराष्ट्र मंत्रालयाच्या शाखा सचिवालयाचे प्रमुख म्हणूनही अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. थोरात हे मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असून जैवतंत्रज्ञान विषयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी नवी मुंबई येथील 'ॲडव्हान्स्ड कॅन्सर ट्रीटमेंट रिसर्च अँड एज्युकेशन सेंटर' येथे कर्करोगावरील संशोधन क्षेत्रातही काम केले आहे.

# कार खड्ड्यात पडून ठाण्यात तिघे जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** पाचपाखाडी भागात मंगळवारी शो-रुममधील नवीन कार चाचणीसाठी नेणाऱ्या चालकाचे त्यावरील नियंत्रण सुटल्याने कार २० फूट खोल खड्ड्यात पडून तीन जण जखमी झाले. यात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यावेळी कारची इतर तीन वाहनांनाही धडक बसल्याने त्यांचेही नुकसान झाले आहे. कुमारी प्रिया (३६), मिथिलेश पासवाण (४८) आणि चेतन देशमुख (३०) अशी जखमींची नावे आहेत.

कल्याण येथील मिथिलेश आणि कुमारी यांनी मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजता नवीन कारची चाचणी घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार शो-रुममधील कर्मचारी चेतन देशमुख यांनी कारने त्यांना फेरफटका मारण्यासाठी नेले. परंतु त्यांचे कारवरील नियंत्रण सुटले आणि इमारत बांधकामासाठी खणलेल्या २० फूट खड्ड्यात जाऊन कार पडली. यावेळी वाहनात सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित झाल्याने मिथिलेश व चेतन यांना किरकोळ दुखापत झाली.

Bank of Maharashtra
कॉर्पोरेट कार्यालय : 134/1, 'मॉन्ट क्लेयर', बाणेर-पाषाण लिंक रोड, पाषाण-411021.
मुख्य कार्यालय : 'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे 411005. टेली.: 020-71658139
ई-मेल: investor_services@bankofmaharashtra.bank.in, वेबसाईट : www.bankofmaharashtra.bank.in
बँकेच्या भागधारकांना सूचना
वैध नामांकनांची यादी
वरील विषयासंदर्भात दि. 24.02.2026 रोजी वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आलेली सूचना आणि त्यानंतर दिनांक 23.02.2026 रोजीच्या सूचनेनुसार, बँकेची विशेष सर्वसाधारण सभा केंद्र सरकार व्यतिरिक्त, बँकेच्या एका भागधारक संचालकाची निवड करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे, त्या विषयात, बँकेकडे पुढे नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांकडून नामांकने प्राप्त झाली आहेत, जी वैध आहेत, जे उमेदवारी अर्ज बँकेच्या संचालक मंडळास पात्र आणि योग्य आहेत असे वाटत आहे.

| अ. क्र. | नाव आणि पत्ते | वय | शैक्षणिक पात्रता | विशेष ज्ञान आणि अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1. | रीना झा त्रिपाठी 43, ब्ल्यू हेवन, 4 था मजला, भाऊसाहेब हिरे मार्ग, वर्षा बंगल्यासमोर, मलाबार हिल, मुंबई - 400006 | 61 वर्ष | एक्झिक्युटिव्ह एमबीए-आयआयएम बॅंगलोर ॲण्ड सायराक्यूज युनिव्हर्सिटी, यूएसए, बॅचलर ऑफ लॉ - मुंबई युनिव्हर्सिटी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन - युनिव्हर्सिटी ऑफ हल, युनायटेड किंग्डम, मास्टर्स इन ह्युमन राईटस् - पॉंडिचेरी युनिव्हर्सिटी सोबत टीआयएसएस, मुंबई, मास्टर्स ऑफ आर्ट्स - दिल्ली युनिव्हर्सिटी. | कर आकारणी, कायदा आणि वित्त |
| 2. | आलोक जैन एस-147, स्कूल ब्लॉक, शाकारपूर, दिल्ली - 110092 | 55 वर्ष | बॅचलर ऑफ कॉमर्स, चार्टर्ड अकाउंटंट, एसएपी सर्टिफिकेशन, नोंदणीकृत व्हॅल्यूअर (आयबीबीआय) | लेखापरीक्षण, करआकारणी, वित्तीय सल्लागार, मूल्यांकन, बॅंकिंग, एनबीएफसीज् आणि सल्लागार सेवा. |
| 3. | रुमा डे फ्लॅट नं. 1602, ट्रायसिटी नटराज, डॉ. सी गिडवानी मार्ग, चेंबूर पूर्व, मुंबई - 400071 | 60 वर्ष | कलकत्ता युनिव्हर्सिटीमधून बॅचलर ऑफ सायन्स (ऑनर्स), सीएआयआयबी, अन्टी मनी लॉंडरिंग स्पेशलिष्ट | बँकिंग आणि वित्त |
| 4. | प्रसेनजीत श्रीकृष्ण फडणवीस 31/34, रजनीगंधा हौसिंग सोसायटी, तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर नं. 2, पुणे - 411009 | 52 वर्ष | बॅचलर इन कॉम्प्युटर सायन्स, एल.एल.बी., डिप्लोमा इन सायबर लॉ | माहिती तंत्रज्ञान, सायबर लॉ, कायदा |

जसे की, निवडणूकीत एका रिक्त पदासाठी एकूण चार उमेदवार वैध असल्याने आणि बँक ऑफ महाराष्ट्र (शेअर्स अँड मिटींग्ज्) रेग्युलेशन, 2004 चे रेग्युलेशन 66 अनुसार 23 मार्च, 2026 रोजी सकाळी 11.00 वा. आयोजित करण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत (ईजीएम) निवडणूक प्रक्रिया करण्यात येईल. निवडणुकीसाठी रिमोट ई वोटिंग बुधवार, 18 मार्च, 2026 रोजी सकाळी 9.00, पासून रविवार, 22 मार्च, 2026 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत, त्याचप्रमाणे ईजीएम च्या वेळी करण्यात येईल.
बहुसंख्य मत प्राप्त करणाऱ्या उमेदवारास, बँकेचे भागधारक संचालक म्हणून निवडून आले आहे असे मानले जाईल.
बँक ऑफ महाराष्ट्र करीता,
विशाल सेठिया
कंपनी सचिव
दिनांक : 10.03.2026
ठिकाण : पुणे



गुंतवणूकसाक्षर नारी ती जगते उद्धारी
Nippon india Mutual Fund Wealth sets you free
प्रस्तुत
लोकसत्ता अर्थब्रह्म
सहप्रायोजक
लोकमान्य
RUNWAL REALTY
स्वयंपाकघरातल्या डब्यांपासून नव्या युगातल्या 'डीमॅट'पर्यंत स्त्रियांच्या गुंतवणुकीचा प्रवास गेल्या काही दशकांत झाला. अशा अर्थसाक्षर महिलांच्या गौरवाचा आणि अर्थसाक्षर नसलेल्यांना गुंतवणूक प्रवाहात आणण्याचा सुमुहूर्त म्हणजे आंतरराष्ट्रीय महिला दिन.
लोकसत्ता अर्थब्रह्म प्रकाशनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे सस्नेह निमंत्रण!

| वक्ते | विषय |
|---|---|
| कौस्तुभ जोशी (आर्थिक नियोजनकार) | सोने-चांदी, डिजिटल गुंतवणूक कशी? |
| तृप्ती राणे (सेबीसंलग्न गुंतवणूक सल्लागार) | गुंतवणुकीतून आर्थिक नियोजन |

नाव नोंदणीकरिता ९९२००९९९४३ / ०२२ - ६७४४०३७६ / ०२२ - ६७४४०२१५ येथे संपर्क साधा.
शनिवार, १४ मार्च २०२६ । दुपारी ३.३० वा.
बोडस सभागृह, लक्ष्मी निकेतन, रामनगर, पं. मालवीय रोड, डोंबिवली (पू.)
प्रवेश विनामूल्य. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य, काही जागा राखीव.
पॉवर्ड बाय
लग्नबंध
NISM National Institute of Securities Markets
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
इव्हेंट पार्टनर
वुई मुक्ता
लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती

## ८८ हजारांहून अधिक नागरिक मायदेशी परतले

**मुंबई :** पश्चिम आशियात संघर्ष सुरू असून या पार्श्वभूमीवर विमान उड्डाणे पुन्हा सुरू झाल्यानंतर ८८ हजारांहून अधिक नागरिक मायदेशी परतले. नागरी उड्डाण मंत्रालयाच्या माहितीनुसार २ मार्चपासून अडकलेल्या नागरिकांकरिता सुमारे ४५२ उड्डाणे चालविण्यात आली. यात इंडिगो, एमिरेट्स आणि एअर इंडियाचा समावेश आहे. तर २८ फेब्रुवारीपासून भारतीय विमान कंपन्यांनी २,६०० पेक्षा अधिक उड्डाणे रद्द केली आहेत.

## बांगलादेशला भारताकडून डिझेल पुरवठा

ढाका : पश्चिम आशियातील युद्धामुळे इंधनाची कमतरता निर्माण झाली असल्याने बांगलादेशला भारताने डिझेल पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारपर्यंत ५,००० टनांचा प्रारंभिक पुरवठा अपेक्षित आहे, असे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले. वायव्य बांगलादेशातील दिनाजपूर येथील पार्वतीपूर डेपोमध्ये बांगलादेश-भारत मैत्री तेलवाहिनीद्वारे आसाममधील नुमालीगड रिफायनरीमधील डिझेल पुरवण्यात आले आहे, असे बांगलादेश पेट्रोलियम कॉर्पोरेशनने सांगितले.

# देशांतर्गत उत्पादनाला प्राधान्य

## एलपीजी तुटवड्यासंदर्भात केंद्राकडून उपाययोजना

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** इराणविरोधातील इस्रायल-अमेरिका संघर्षामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, देशातील 'एलपीजी' गॅसपुरवठ्यातील तुटवडा नियंत्रित करण्यात आल्याचा दावा केंद्र सरकारकडून केला जात आहे. 'एलपीजी'चे देशांतर्गत उत्पादन वाढवून घरगुती ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देण्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानंतर देशातील तेल शुद्धीकरण प्रकल्पांनी (रिफायनरीज) 'एलपीजी'च्या उत्पादनात सुमारे १० टक्क्यांनी वाढ केली आहे. वार्षिक सुमारे २१ दशलक्ष टन 'एलपीजी' आयातीपैकी सुमारे ८० टक्के आयात पश्चिम आशियातील तणावामुळे प्रभावित झाली आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पादनाला प्राधान्य देण्यात आल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केंद्रीय पेट्रोलियममंत्री हरदीप सिंग पुरी आणि केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याबरोबर उच्चस्तरीय बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

### वितरणाचे नवे प्राधान्यक्रम

'एलपीजी' सिलिंडरच्या वितरणाचे नवे प्राधान्यक्रम ठरवण्यात आले आहेत. एकूण वापरापैकी घरगुती वापरासाठी सुमारे ८७ टक्के तर, हॉटेल, उपाहारगृह आणि उद्योग अशा व्यावसायिक क्षेत्रांसाठी १३ टक्के वितरण केले जाईल. वाहनांसाठी सीएनजी, घरांपर्यंत पोहोचणारा पाइप गॅस आणि खत उद्योग यांना नैसर्गिक वायूचा पूर्ण पुरवठा केला जात आहे. मात्र पेट्रोकेमिकल उद्योगासाठी पुरवठ्यात कपात करण्यात आली आहे.

'एलपीजी' सिलिंडरचा काळाबाजार होऊ नये व 'एलपीजी' तुटवड्याचा गैरफायदा घेतला जाऊ नये याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, केंद्र सरकारने अत्यावश्यक वस्तू कायदाही लागू केला असून निरीक्षणाचा कालावधी २१ दिवसांवरून २५ दिवसांपर्यंत वाढवण्यात आला आहे. सध्या देशातील सर्व रिफायनरीज पूर्ण क्षमतेने कार्यरत असून 'एलपीजी' सिलिंडरचा तुटवडा निर्माण होणार नसल्याचा सरकारचा दावा आहे.

## अमेरिकेचा इराणवर तीव्र हल्ल्यांचा इशारा




**एपी, दुबई**

**इराणने मंगळवारी** अरब देशांतील अमेरिकी तळांना पुन्हा लक्ष्य करतानाच होर्मुझ सामुद्रधुनीतील ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधांना आणि तेलवाहतुकीलाही लक्ष्य केले. यावरून संतापलेल्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर आतापेक्षा २० पटींनी अधिक तीव्रतेचे हल्ले करू, असा इशारा दिला. इराणने त्यांच्या इशाऱ्याला पोकळ धमकी म्हणून धुडकावून लावले.

इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून तेलवाहतुकीला लक्ष्य केले. मालवाहतूक करणाऱ्या एका नौकेला लक्ष्य केल्याने सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेने दिली. पर्शियाच्या आखातात अनेक नौका लक्ष्य झाल्याची भीती व्यक्त होत आहे. या सामुद्रधुनीतून जगातील २० टक्के तेलवाहतूक चालते. ती धोक्यात आल्याने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सामाजिक माध्यमामध्ये टिप्पणी करून इशारा दिला.




### अन्य घडामोडी

- इराणचे मंगळवारी इस्रायल आणि अरब देशांवर पुन्हा हल्ले
- दुबई, बहारीनमध्ये नागरी वस्त्या लक्ष्य झाल्याचा आरोप. हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू, तर आठ जण जखमी
- सौदी अरेबिया आणि कुवेतने इराणचे ड्रोन पाडल्याचा दावा केला.
- इस्रायलमध्ये तेल अवीव, जेरुसलेम येथेही इराणने हल्ले केले. इस्रायलनेही इराणवर पुन्हा हल्ले चढवले.
- इस्रायलच्या हल्ल्यात इराकमध्ये पाच ठार

### ट्रम्प-पुतिन यांची चर्चा

**मॉस्को:** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना सोमवारी रात्री उशिरा फोन केला. जागतिक ऊर्जापुरवठा विस्कळित झाल्यावर त्यांनी चर्चा केली. रशियाच्या परराष्ट्र खात्यातील अधिकारी युरी उशाकोव्ह यांनी सांगितले, की दोन्ही नेत्यांमध्ये तासभर चर्चा झाली. इराण युद्ध आणि युक्रेन युद्धासंदर्भातील त्रिस्तरीय चर्चा यांवर उभयतांत चर्चा झाली. ही चर्चा सकारात्मक झाली.

## स्वयंपाकासाठीच्या विद्युत उपकरणांच्या खरेदीत वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ झाल्याने अनेकांनी स्वयंपाकासाठी विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा पर्याय निवडला आहे. इलेक्ट्रिक कुकर, मायक्रोवेव्ह ओव्हन, ओटीजी-ओव्हन, टोस्टर, ग्रिल, मल्टी कुकर, इलेक्ट्रिक तवा, एअर फ्रायर, इलेक्ट्रिक स्टिमर, हॉट प्लेट यांच्या खरेदीत वाढ झाली आहे.

केंद्र सरकारने ७ मार्च रोजी घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये दरवाढ केली. त्यानंतर आता व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांनाही त्याचा फटका बसू लागला आहे. मुंबईत अनेक ग्राहकांना सिलिंडर आरक्षित करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे ग्राहकांनी सावध भूमिका घेऊन पर्यायी मार्गांचा शोध घेणे सुरू केले आहे. बाजारात स्वयंपाकासाठीच्या विजेवर चालणाऱ्या उपकरणांची मागणी वाढल्याचे निदर्शनास येत आहे.

पुढील आठवडाभरात स्थिती न बदलल्यास देशाला इंधन टंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत अनिश्चितता कायम असल्याने बाजारात विजेवर चालणाऱ्या स्वयंपाक उपकरणांची मागणी आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

### 'सीएनजी-पीएनजी पुरवठ्यात कपात होण्याची शक्यता'

मुंबई : पश्चिम आशियातील युद्धाचा परिणाम सध्या सीएनजी-पीएनजीच्या पुरवठ्यावर झाला नसला तरी कपात होण्याची शक्यता असल्याचे महानगर गॅस लिमिटेडने स्पष्ट केले. पीएनजीचा तुटवडा निर्माण झाल्यास सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागणार आहे, पण सीएनजीअभावी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडेल. मुंबई, ठाणे, नवी मंबई, पनवेलसह उरणमध्ये महानगर गॅस लिमिटेडतर्फे पीएनजीचा पुरवठा केला जातो. सुमारे ३० लाखांपेक्षा अधिक घरगुती आणि ५,६०० औद्योगिक आस्थापनांमध्ये पीएनजी वापरला जातो. याशिवाय १२ लाखांपेक्षा जास्त वाहने सीएनजीवर धावतात.

## मतदारयाद्यांतून नावे वगळलेल्यांच्या तक्रारींसाठी लवाद

**कोलकाता, पीटीआय**

**पश्चिम बंगालमधील** मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान मतदारयाद्यांतून नावे वगळण्याविरोधातील तक्रारींच्या सुनावणीसाठी स्वतंत्र लवादांची स्थापना करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. लवादाचे प्रमुख उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश असतील.

याशिवाय मतदार यादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेत दावे आणि आक्षेपांवर सुनावणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याच्या प्रयत्नांबद्दल सर्वोच्च न्यायालयाने कडक इशारा दिला आहे. तुम्ही असे अर्ज करण्याचे धाडस कसे करता, अशा शब्दात सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याचिकाकर्त्यांना फटकारले. अशी कृती न्यायव्यवस्थेचा अवमान असल्याचे नमूद करत तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

## 'इंडिगो'च्या प्रमुखाचा अखेर राजीनामा

**एएनआय, नवी दिल्ली**

**देशातील सर्वात** मोठी विमान कंपनी असलेल्या 'इंडिगो'चे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पीटर एल्बर्स यांनी तात्काळ प्रभावाने पदाचा राजीनामा दिला. तीन महिन्यांपूर्वी इंडिगो कंपनीला मोठ्या उड्डाण संकटाचा सामना करावा लागला होता. त्याची जबाबदारी घेऊन एल्बर्स यांनी राजीनामा दिला. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राहुल भाटिया यांनी सध्या या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

डिसेंबर महिन्यात या विमान कंपनीला मोठ्या प्रमाणात उड्डाणे अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. उड्डाणे रद्द केल्याने हजारो प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. देशातील अनेक विमानतळांवर प्रवाशांनी संताप व्यक्त केला होता. ३ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२५ या तीन दिवसांत २५०० हून अधिक



उड्डाणे रद्द झाली, तर १९०० विमान उड्डाणांना विलंब सहन करावा लागला. त्याची गंभीर दखल इंडिगो कंपनीच्या संचालक मंडळाने घेतली आणि एल्बर्स यांना सीईओ पदावरून पायउतार व्हावे लागले.

संचालक मंडळ पीटर यांचे संस्थेतील योगदान आणि सेवेबद्दल आभार मानले. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राहुल भाटिया हे बदली व्यक्तीची नियुक्ती होईपर्यंत कंपनीचे व्यवस्थापन करतील, असे संचालक मंडळाचे अध्यक्ष विक्रम सिंह मेहता यांनी सांगितले.

### हरिभाऊ बागडे रुग्णालयात

**जयपूर :** राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांना सोमवारी जयपूरमधील सवाई मानसिंग रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. बागडे यांना गेल्या दोन दिवसांपासून ताप येत होता, प्राथमिक वैद्यकीय तपासणीत मूत्रमार्गात संसर्ग झाल्याचे दिसून आले आहे, असे रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### 'एनसीईआरटी'कडून माफी

**नवी दिल्ली :** इयत्ता आठवीच्या सामाजिक विज्ञान पाठ्यपुस्तकात 'न्यायिक भ्रष्टाचार' या प्रकरणामुळे सर्वोच्च न्यायालयाची नाराजी ओढवून घेतल्यानंतर राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) मंगळवारी बिनशर्त माफी मागितली. हे पुस्तक मागे घेण्यात आले असून सध्या उपलब्ध नाही, असे एनसीईआरटी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## रिजिजूंच्या टोमण्यांवर प्रियंकांची टोलेबाजी

### लोकसभाध्यक्ष बिर्लांविरोधातील अविश्वास प्रस्तावावर चर्चा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** लोकसभाध्यक्ष ओम बिर्लाविरोधातील अविश्वास प्रस्तावावरील चर्चेमध्ये केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधींवर तोंडसुख घेतले. लोकसभाध्यक्षांचा आदेश अंतिम असतो, पण राहुल गांधी ऐकूनही घ्यायला तयार नव्हते. त्यांच्यापेक्षा प्रियंका गांधी-वढेरा चांगल्या विरोधी पक्षनेत्या झाल्या असत्या. निदान त्या संसदेत येतात आणि ऐकून तरी घेतात, अशा शब्दांत रिजिजू यांनी टीका केली.

रिजिजूंनी प्रियंका गांधींच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधींवर धरलेला नेम तितक्याच तत्परतेने प्रियंका यांनी परतवून लावला. या देशात गेल्या १२ वर्षांत सत्ताधाऱ्यांसमोर (भाजप) कधीही झुकला नाही अशी ही एकच व्यक्ती (राहुल गांधी) आहे. राहुल गांधी बोलत असलेले सत्य सत्ताधाऱ्यांना पचवता येत नाही, असे प्रत्युत्तर प्रियंका गांधी यांनी दिले. केंद्रीय मंत्री रिजिजू यांनी, माजी लोकसभाध्यक्ष ग.





वा. मावळणकर यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्तावावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी काय म्हटले होते, याचे उतारे वाचून दाखवले. त्यावरही टिप्पणी करताना प्रियंका गांधी यांनी रिजिजूंना शब्दांत पकडले. सत्ताधारी नेते सातत्याने पं. नेहरूंवर टीका करत असतात, आत्ता रिजिजूंना पं, नेहरूंचा आधार घ्यावा लागला आहे. त्यांच्याबद्दल चांगले बोलावे लागले आहे, असा टोमणा प्रियंका यांनी मारला.

बिर्लांच्या अविश्वास प्रस्तावावर मंगळवारी लोकसभेत चर्चा सुरू झाली. मात्र विरोधी पक्षनेते राहुल गांधी सभागृहात उपस्थित नव्हते. त्याचा संदर्भ घेऊन रिजिजू यांनी टीका केली. लोकसभाध्यक्षांच्या परवानगीशिवाय सदस्यांना बोलता येत नाही, हा नियम आहे. पण राहुल गांधी म्हणतात की, त्यांना परवानगीची गरज नाही. सभागृहात बोलणे हा त्यांचा अधिकार आहे. राहुल गांधींना नियमही माहीत नाहीत. पंतप्रधान, विरोधी पक्षनेते वा इतर सदस्य लोकसभाध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहात बोलू शकत नाही, असे रिजिजू म्हणाले.

### कृपा करा, पायउतार व्हा!

दहा तासांच्या या चर्चेची सुरुवात करताना, काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांनी, बिर्ला हे सभागृहाचे अध्यक्ष नव्हे तर सरकारचा 'आवाज' झाले आहेत. त्यांचा कारभार पक्षपाती असल्याचा आरोप केला. विरोधी पक्षनेते राहुल गांधींना बोलू दिले जात नाही. त्यांच्या भाषणात २० वेळा अडथळे आणले गेले., अशी टीका गोगोई यांनी केली. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी, तुम्ही आता या सभागृहाचे कामकाज चालवण्यास पात्र राहिलेला नाहीत, अशी टीका बिर्लांवर केली. आता तुम्ही कर्मापासून पळून जाऊ शकत नाही, असा संताप व्यक्त करत मोईत्रा यांनी, कृपा करा आणि पायउतार व्हा, असा थेट शाब्दिक प्रहार केला.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की क्र.१०८, बी विंग, प्लॉट नं.२१, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ महाराष्ट्र येथे त्यांच्या व्यवसायाचे प्रधान स्थान असलेल्या मे. कॉर्पोरेट लॉ असोसिएट्स या भागिदारी फर्ममधून पुढील भागिदार सेवानिवृत्त झाले आहेत:

**१. श्री. रोनाल्ड डिसोझा १८.१२.२०२३ पासून प्रभावाने भागिदारीतून निवृत्त झाले.**
**२. श्री. हवनी बसवराज सटप्पा १८.१२.२०२३ पासून प्रभावाने भागिदारीतून निवृत्त झाले.**
**३. श्री. जसबीर सिंग १०.०३.२०२६ पासून प्रभावाने भागिदारीतून निवृत्त झाले.**
**४. श्री. जी. बालकृष्णन १०.०३.२०२६ पासून प्रभावाने भागिदारीतून निवृत्त झाले.**

उक्त फर्मचा कारभार उर्वरित भागिदारांद्वारा मे. कॉर्पोरेट लॉ असोसिएट्स याच नावाने आणि त्याच पद्धतीने पुढे चालविण्यात येईल. फर्मशी व्यवहार करणाऱ्या सर्व व्यक्तींना कळविण्यात येते की उपरिनामित भागिदार, त्यांच्या आपापल्या निवृत्तींच्या तारखांनंतर करण्यात आलेल्या फर्मच्या कोणत्याही कृतीसाठी, ऋणांसाठी, दायित्वांसाठी किंवा उत्तरदायित्वांसाठी उपरिनामित भागिदार जबाबदार राहणार नाहीत.

**मे. कॉर्पोरेट लॉ असोसिएट्स करिता.**
**स्थळ : नवी मुंबई** **स्वाक्षरी/-**
**दिनांक : १०.०३.२०२६** **श्री. संगमेश्वर एम. चंदसुरे, भागिदार**

बँक ऑफ इंडिया Bank of India BOI
Relationship beyond banking

**मालमत्ता वसुली विभाग:** प्लॉट क्र. ३०, सेक्टर क्र. ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४.
ईमेल: ARD.NaviMumbai@bankofindia.bank.in

**मेगा समझोता मोहीम**

बँक ऑफ इंडिया आयोजित करत आहे
"मेगा समझोता मोहीम"
दि. १६ ते दि. २० मार्च - २०२६ दरम्यान देशभरातील त्यांच्या सर्व शाखा/ झोन आणि एफजीएमओ येथे वन टाईम सेटलमेंट (ओटीएस) अंतर्गत कर्जदारांच्या एनपीए कर्ज खात्यांचा निपटारा करण्यासाठी.

**समझौता दिन** हा विशेषतः अशा एनपीए कर्जदारांसाठी डिझाइन केला आहे जे व्यवसायातील अडचणी/कर्जदाराच्या वैद्यकीय स्थितीमुळे किंवा इतर कोणत्याही वास्तविक कारणामुळे वेळेवर कर्ज परत करू शकले नाहीत. आमच्या बँकेकडे लहान-मूल्याच्या आणि मध्यम आकाराच्या खात्यांचा निपटारा करण्यासाठी विशेष ओटीएस योजना आहेत, ज्याद्वारे एनपीए असलेल्या कर्जदारांना विशेष आणि चांगल्या सवलती दिल्या जातात.

ज्या कर्जदारांची खाती एनपीए आहेत त्यांनी सदर या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी पुढे यावे आणि या काळात एनपीए कर्ज खाती निकाली काढावीत, असे आवाहन आम्ही करतो.

"मेगा समझोता मोहीम"
दि. १६ ते दि. २० मार्च २०२६.

GTL INFRASTRUCTURE

**जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय:** ७वा मजला, बिल्डिंग नं. ए, प्लॉट नं इएल-२०७, एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०, महाराष्ट्र, भारत.
**ई-मेल:** gilshares@gtlinfra.com; **वेबसाइट:** www.gtlinfra.com
**सीआयएन:** L74210MH2004PLC144367

**जाहीर सूचना**

**बोली सादर करण्यासाठी आमंत्रण**

जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड इच्छुक खरेदीदारांकडून तिसरा मजला, पेनिन्सुला टॉवर १, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, जी.के. मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०००१३ येथे स्थित असलेली आपली कार्यालयाची जागा आणि त्यासोबतच्या १५ कार पार्किंगच्या जागेच्या (''प्रीमिसेस'') अधिग्रहणासाठी अधिकृत आर्थिक बोली मागवत आहे.

सदर जागा २७ जून २०१८ रोजीच्या लीव्ह अँड लायसन्स (भाडेतत्त्वावर) करारानुसार सध्या वापरात असून या जागेची प्रस्तावित विक्री सदर कराराच्या अटींच्या अधीन असून, ज्यामध्ये विद्यमान भाडेकरूला असलेला खरेदीचा पहिला हक्क (राईट ऑफ फर्स्ट रिफ्युजल) समाविष्ट असेल. ही जागा ''जशी आहे, जिथे आहे'' आणि ''ज्या स्थितीत आहे'' आणि ''जे काही आहे ते'' या तत्त्वानुसार विकली जाईल.

इच्छुक पक्ष १७ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या अंतिम किमतीचे प्रस्ताव सादर करू शकतात आणि त्या अर्जासोबत सादर केलेल्या किमतीच्या १० टक्के बयाणा रक्कम (इएमडी) ''जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'' च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे सादर करू शकतात.

कंपनीच्या संचालक मंडळाने बोली मंजूर केल्याशिवाय आणि सध्याच्या भाडेकरूच्या खरेदीचा पहिला हक्क (आरओएफआर) याच्या अधीन राहून डिमांड ड्राफ्ट वटवला जाणार नाही आणि यशस्वी बोलीदाराने बोली सादर केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत उर्वरित सर्व रक्कम भरावी.

सीलबंद बोली येथे सादर केल्या जाऊ शकतात:

**अलाथिया लॉ एलएलपी**
संपर्क: श्री. सुयश गद्रे / श्री. प्रसाद लोटलीकर
पत्ता: १२२, मित्तल टॉवर सी विंग,
नरिमन पॉइंट, मुंबई ४०००२१.
संपर्क क्रमांक: ०२२-३५६२९२०५ / ९९३०२१२७९४

कंपनी कोणतेही कारण न देता कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया मागे घेण्याचा/सुधारण्याचा अधिकार राखून ठेवते. कंपनीच्या संचालक मंडळाने मंजूर केल्याशिवाय कोणतीही बोली बंधनकारक राहणार नाही.

कागदपत्रे आणि/किंवा परिसराची प्राथमिक चौकशी आणि तपासणीसाठी, कृपया सुश्री श्वेता नेरुरकर (मोबाइल क्रमांक ९८३३२४५६८३) यांच्याशी संपर्क साधा.

दिनांक : ११ मार्च २०२६ **जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडसाठी**
ठिकाण : मुंबई

ALKYL **अल्काइल अमीन्स केमिकल्स लिमिटेड**
**सीआयएन: एल९९९९९एमएच१९७९पीएलसी०२१७९६**
**नोंदणीकृत कार्यालय :** ४०१-४०७, निर्माण व्यापार केंद्र, प्लॉट नं. १०, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३
**दूरध्वनी क्रमांक :** ०२२-६७९४६६१८ | **फॅक्स :** ०२२-६७९४६६६६ | **ईमेल:** legal@alkylamines.com | **वेब :** www.alkylamines.com

**वास्तविक भागधारकांना सूचना**
**अल्काइल अमीन्स केमिकल्स लिमिटेडच्या वास्तविक प्रतिभूतींच्या हस्तांतरणासाठी आणि डीमटेरीअलायजेशनसाठी विशेष खिडकी**

२ जुलै २०२५ दिनांकित सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/**एमआयआरएसडी/** एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ अनुसार ७ जुलै २०२५ पासून ६ जानेवारी २०२६ पर्यंत, मूलतः १ एप्रिल २०१९ पूर्वी सादर केलेल्या परंतु दस्तावेजांच्या कमतरतेमुळे परत पाठविण्यात आलेल्या वास्तविक भाग हस्तांतरण विनंतीपत्रांच्या पुनर्सादरीकरणासाठी एक विशेष खिडकी उघडण्यात आली होती.

भागधारकांना अधिक सुकर करण्यासाठी, ३० जानेवारी २०१६ दिनांकित सेबी परिपत्रक क्र.एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/I/३७५०/२०२६ अनुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी विकलेल्या / खरेदी केलेल्या वास्तविक प्रतिभूतींच्या हस्तांतरणासाठी व त्यांचे डीमटेरीअलायजेशन करण्यासाठी ५ फेब्रुवारी २०२६ पासून ४ फेब्रुवारी २०२७ पर्यंत एक वर्ष मुदतीकरिता सेबीने आणखी एक विशेष खिडकी सुरू केली आहे. ज्यापूर्वी सादर करण्यात आल्या होत्या आणि कागदपत्रांमधील / प्रक्रियेतील कमतरतेमुळे अथवा अन्यथा नाकारण्यात आल्या होत्या / परत देण्यात आल्या होत्या / त्यांची दखल घेण्यात आली नव्हती अशा हस्तांतरणासाठी केलेल्या विनंत्यांकरितासुद्धा उक्त विशेष खिडकी उपलब्ध राहील.

या खिडकीअंतर्गत हस्तांतरित केलेल्या प्रतिभूती हस्तांतरितींच्या खात्यात केवळ डीमॅट पद्धतीने अनिवार्यतः जमा करण्यात येतील आणि हस्तांतरणाच्या नोंदणीच्या तारखेपासून एक वर्ष कालावधीसाठी लॉक-इन राहतील, ज्या कालावधी दरम्यान अशा प्रतिभूती हस्तांतरित केल्या जाणार नाहीत, धारणाधिकार - चिन्हांकित अथवा तारणगहाण ठेवल्या जाणार नाहीत.

या संदर्भात, भागधारकांना विनंती करण्यात येते की अन्य आवश्यक कागदपत्रांसह मूळ भाग प्रमाणपत्र, हस्तांतरण विलेख कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए), एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रा. लि. यांच्याकडे सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०००८३ या त्यांच्या पत्त्यावर पाठवून किंवा investor.helpdesk@in.mpms.mufg.com वर इमेल करून या संधीचा लाभा घ्यावा.

अधिक माहितीकरिता भागधारकांनी इन्व्हेस्टर रिलेशन्स सेक्शनखाली कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेले पूर्वोक्त सेबी परिपत्रक वाचावे अथवा legal@alkylamines.com वर लेखी विनंती करावी.

**अल्काइल अमीन्स केमिकल्स लिमिटेड**करिता
स्वाक्षरी
स्थळ : नवी मुंबई **चिंतामणी डी. थत्ते**
दिनांक : १० मार्च २०२६ महा व्यवस्थापक (विधी) आणि कंपनी सचिव

**सुप्रिया लाईफसायन्स लिमिटेड**
**सीआयएन:** L51900MH2008PLC180452
**नोंदणीकृत कार्यालय:** २०७/२०८, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३
**ईमेल:** cs@supriyalifescience.com / **दूरध्वनी:** + ९१ २२ ४०३३ २७२७/ **वेबसाइट:** www.supriyalifescience.com

**पोस्टल बॅलट आणि ई-व्होटिंग माहितीची सूचना**

सूचना देण्यात येत आहे कि कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') च्या कलम ११०, कलम १०८ आणि इतर लागू तरतुदी, जर असतील तर, (सध्या लागू असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुर्नअधिनियमासह), कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि २२, ('नियम'), सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४४ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स') आणि द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया ('एसएस-२') द्वारे जारी केलेल्या जनरल मीटिंग्जवरील सेक्रेटरीअल स्टँडर्डसह वाचलेले, भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, सामान्य परिपत्रक क्रमांक १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, सामान्य परिपत्रक क्रमांक ११/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२, सामान्य परिपत्रक क्रमांक ९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३, सामान्य परिपत्रक क्रमांक ०९/२०२३ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ आणि सामान्य परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ सह वाचले जाईल (यापुढे एकत्रितपणे 'एमसीए परिपत्रके' म्हणून संदर्भित) आणि सर्व/किंवा इतर कोणतेही लागू कायदे, नियम आणि नियम (सध्या लागू असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुर्नअधिनियमांसह), ०९ फेब्रुवारी २०२६ ('पोस्टल बॅलट नोटिस') मध्ये समाविष्ट असलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी कंपनीच्या सदस्यांची मान्यता मिळविण्यासाठी, पोस्टल बॅलटद्वारे खालील व्यवसायांसाठी फक्त रिमोट ई-व्होटिंग प्रक्रियेद्वारे ठराव पारित करून:

| अ. क्र. | तपशील | रिझोल्यूशन प्रकार |
|---|---|---|
| १. | श्री. मनीष पांचाळ (DIN: ०८४३१४९२) यांची कंपनीचे गैर-कार्यकारी स्वतंत्र संचालक म्हणून ०९ फेब्रुवारी २०२६ ते ०८ फेब्रुवारी २०३१ पर्यंत सलग पाच (५) वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती. | विशेष |
| २. | श्री. कोठंडारामन हरी (DIN: ०८९०१६७४) यांची कंपनीचे गैर-कार्यकारी स्वतंत्र संचालक म्हणून ०९ फेब्रुवारी २०२६ ते ०८ फेब्रुवारी २०३१ पर्यंत सलग पाच (५) वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती. | विशेष |
| ३ | डॉ. नीलम अरोरा (DIN: ०१६०३०६८) यांची कंपनीच्या गैर-कार्यकारी स्वतंत्र संचालक म्हणून २५ मार्च २०२६ ते २४ मार्च २०३१ पर्यंत सलग पाच (५) वर्षांच्या दुसऱ्या टर्मसाठी पुनर्नियुक्ती | विशेष |

वर नमूद केलेल्या तरतुदी आणि एमसीए परिपत्रकांचे पालन करून, पोस्टल बॅलट नोटीस ('सूचना') मंगळवार, १० मार्च २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ई-व्होटिंगची प्रक्रिया आणि पद्धत दर्शविणारी, ज्या सदस्यांची नावे २७ फेब्रुवारी २०२६ रोजी ('कट-ऑफ डेट') सदस्यांच्या नोंदणीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीत आहेत आणि ज्यांचे ई-मेल आयडी आरटीए/कंपनी/ठेवींमध्ये नोंदणीकृत आहेत त्यांना पाठवण्यात आली आहे.

या पोस्टल मतदानासाठी सदस्यांना पोस्टल मतदान फॉर्म आणि प्री-पेड व्यवसाय उत्तर लिफाफ्यासह सूचनेची भौतिक प्रत पाठवली जात नाही. सदस्यांची संमती किंवा असहमती दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे कळवली जाईल.

सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ४४ चे पालन करून आणि नियमांसह वाचलेल्या कायद्याच्या कलम १०८ आणि कलम ११० च्या तरतुदींनुसार, कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा प्रदान करण्याच्या उद्देशाने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') च्या सेवा नियुक्त केल्या आहेत.

सर्व सदस्यांना कळविण्यात येते की:

(I) रिमोट ई-व्होटिंग बुधवार, ११ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि शुक्रवार, १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) संपेल. उपरोक्त तारीख आणि वेळेनंतर ई-व्होटिंगला परवानगी दिली जाणार नाही आणि त्यानंतर मतदानासाठी NSDLद्वारे ई-व्होटिंग मॉड्यूल अक्षम केले जाईल.
(II) सदस्यांचे मतदानाचे अधिकार कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमधील त्यांच्या शेअरच्या प्रमाणात असतील, जे कट-ऑफ डेट म्हणजेच २७ फेब्रुवारी २०२६ रोजीचे असेल. संबंधित तारखेला शेअरहोल्डर नसलेल्या व्यक्तीने ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने घ्यावी.
(III) कंपनीने सीएस सनम उंबरगीकर (एफसीएस ११७७७), मेसर्स डीएसएम अँड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरीजचे भागीदार (यापुढे 'प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी' किंवा 'पीसीएस') यांची ई-व्होटिंग प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी स्क्रूटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.
(IV) पोस्टल बॅलटच्या सूचनेच्या नोट्समध्ये ई-व्होटिंगची प्रक्रिया दिली आहे. कोणत्याही शंका असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या शेअरहोल्डर्ससाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि शेअरहोल्डर्ससाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक: १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० वर कॉल करू शकता किंवा evoting@nsdl.com वर वरिष्ठ व्यवस्थापक सुश्री पल्लवी म्हात्रे यांना विनंती पाठवू शकता.
(V) सदस्य कंपनीच्या वेबसाइट www.supriyalifescience.com वरून किंवा NSDL's च्या वेबसाइट www.evoting.nsdl.com वरून सूचना डाउनलोड करू शकतात. सूचनेची प्रत BSE च्या वेबसाइट www.bseindia.com आणि NSE च्या वेबसाइट www.nseindia.com वर देखील उपलब्ध आहे.
(VI) ई-मतदानाची अंतिम तारीख शुक्रवार, १० एप्रिल २०२६ आहे, ही एसएस-२ नुसार ठराव मंजूर करण्याची प्रभावी तारीख मानली जाईल.

सदस्यांना पोस्टल मतदानाच्या सूचनेतील सर्व नोंदी आणि विशेषतः रिमोट ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचण्याची विनंती आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**सुप्रिया लाईफसायन्स लिमिटेड करिता**
**स्वाक्षरी/-**
**दिनांक: मार्च १०, २०२६** **प्राची साठे**
**ठिकाण: मुंबई** **कंपनी सेक्रेटरी व कॉम्प्लायन्स ऑफिसर**

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### आता फार उशीर झाला!

**'शांततेच्या बाजूंचा** प्रश्न' हा अग्रलेख वाचला. या संघर्षात सर्वाधिक कोंडी कोणाची झाली असेल तर ती भारताची असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ज्यावेळी पहिल्याच हल्ल्यात इराणचे सर्वेसर्वा खामेनी यांची हत्या करण्यात आली त्यावेळी त्याबद्दल प्रतिक्रिया देण्यास आपण बराच विलंब केला. चीन आणि रशियाने भले इराणच्या बाजूने कोणतीही सामरिक भूमिका घेतली नसली, तरी त्यांनी या हल्ल्याचा निषेध केला. त्यामुळे होर्मूझ सामुद्रधुनीतून जाण्यास इराणने फक्त चीनच्या तेलवाहू नौकांना परवानगी दिली आणि आपल्यासाठी हा समुद्रीधुनी बंद झाला. आता रशियाकडून जरी तेल विकत घेण्याची 'मुभा' मिळाली असली तरी वाहतुकीचे अंतर वाढल्यामुळे तेल महागात पडणार आहे आणि याचा परिणाम आपल्याकडील इंधनाच्या किमतीवर होणार आहे. खामेनींच्या हत्येचा उशिराने निषेध केला गेला. इराणी नौका भारतीय समुद्रात अमेरिकी पाणबुड्यांनी बुडवली त्यावरही आपली प्रतिक्रिया आली नव्हती असे असताना संसदेत या युद्धावर 'आम्ही शांततेच्या बाजूने आहोत' ही भारताची प्रतिक्रिया आता फार उशीर झाला आहे, हेच दर्शविणारी आहे. खामेनींच्या हत्येवेळीच ही प्रतिक्रिया दिली असती तर फार बरे झाले असते.

■ **अनिरुद्ध बर्वे,** कल्याण

### 'मौनम् सर्वार्थ साधनम्' नीती सोडावी

**'शांततेच्या बाजूंचा** प्रश्न' हे संपादकीय वाचले. सध्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या गळ्यात घंटा बांधणार कोण, अशी परिस्थिती आहे. इस्रायलसारख्या युद्धखोर देशाबरोबर अमेरिका फरफटत चालली आहे, याचेच आश्चर्य वाटते. फक्त ३६ कोटी लोकसंख्या असलेल्या, सर्वच बाबतीत संपन्न अमेरिकेची जनता, साध्य काय करायचे आहे हेच निश्चित नसताना युद्ध ओढवून घेणाऱ्या ट्रम्प यांना कशी काय सहन करते, हा प्रश्नच आहे. भारतानेही 'मौनम् सर्वार्थ साधनम्' नीती सोडावी. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी इंधनपुरवठा हा रक्तपुरवठ्यासमान असताना, रशियाकडून बिनदिक्कत, कायमस्वरूपी, स्वस्त व मस्त, भारतीय चलनात इंधन खरेदी करावे, हेच हिताचे ठरणार आहे. येत्या नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होत आहेत, जनता आतातरी विचारपूर्वक निर्णय घेईल अशी आशा करू या.

■ **श्रीनिवास डोंगरे,** दादर (मुंबई)

### अमेरिका सर्वांनाच गृहीत धरणारा देश

**'शांततेच्या बाजूचा** प्रश्न' हा अग्रलेख आणि याविषयी याआधी प्रसिद्ध झालेले अग्रलेख वाचले. अमेरिकेने यापूर्वी जपान, व्हिएतनाम, इराक अशा अनेक देशांत नरसंहार केला, मात्र त्या देशाच्या स्वतःच्या भूमीवर कधीही युद्ध लढले गेले नाही. त्यामुळेच असेल कदाचित, पण त्या देशाच्या युद्धपिपासू राष्ट्राध्यक्षाला युद्ध किती क्रूर असते, याची जाणीव नाही. अमेरिका नेहमीच अन्य देशांच्या सार्वभौमत्वाला गृहीत धरत आली आहे. संयुक्त राष्ट्रांना त्या देशाने कधी खिजगणतीत धरले नाही. आज इराणने आशियातील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ले केल्यानंतर अमेरिकेला युद्धाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. डिझेल, पेट्रोल व गॅसच्या दरवाढीचे संकट घोंघावू लागले आहे. या साऱ्यात भारत मात्र आपली तटस्थता सोडून अमेरिकन दबावाखाली झुकलेला दिसत आहे. भारताने श्रीलंकेसारख्या लहानशा देशाइतकेसुद्धा धैर्य दाखवले नाही.

■ **भूषण पाटील,** उरण (रायगड)

### नैसर्गिक साधनसंपत्तीचा विध्वंस नको!

**अमेरिका-इस्रायल** विरुद्ध इराण युद्धाची व्याप्ती वाढत आहे. एकमेकांचे आणि त्यांच्या मित्रराष्ट्रांचे तेलसाठे लक्ष्य केले जात आहेत. ही अतिगंभीर बाब आहे. यात जगाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विध्वंस होत आहे. तेव्हा आता बाधित-अबाधित- अलिप्त राष्ट्रांनी मौल्यवान तेलसाठे उद्ध्वस्त न करण्याचे आवाहन दोन्ही पक्षांना करावे. संयुक्त राष्ट्रांनी यात महत्त्वाची भूमिका बजावणे अपेक्षित आहे. त्यांनी हस्तक्षेप करून जगाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या जागतिक संपत्तीचा विध्वंस न करण्याची ताकीद दिली पाहिजे.

■ **किरण चौधरी,** दहिसर (मुंबई)

### ...तर, आशियात चीनचे महत्त्व वाढेल

**'शांततेच्या बाजूंचा** प्रश्न' हा अग्रलेख (१० मार्च) वाचला. ट्रम्प महाशय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून जगाची घडीच विस्कटली आहे. इस्रायलच्या नादी लागून इराणवर हल्ला करणे ही चूक होती, हे अमेरिकेला एव्हाना कळून चुकले असावे. इराण भविष्यात अमेरिकेला धुडकावून लावेल, परिणामी आशियात अमेरिकेचे महत्त्व कमी होऊन रशिया व चीनचे वाढेल, असे दिसते. या पार्श्वभूमीवर आपण नेमके कुठे आहोत, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. इराणवरील हल्ला, पाणबुडीवरील हल्ला यावर निषेध करण्यासाठी वर्तमानपत्रात सोनिया गांधीचा लेख छापून यावा लागला. हे नक्कीच उशिरा आलेले शहाणपण आहे.

■ **संतोष वर्पे,** वावी (नाशिक)

### निवडणूक प्रचारात राष्ट्रपती?

**'आता याही** पदाचा राजकीय वापर...' हा 'अन्वयार्थ' (१० मार्च) वाचला. अशा घटनांमुळे अनुसूचित जाती-जमातींच्या व्यक्तींना सन्मान दिला जात नाही, अशी भावना निर्माण होते आणि त्याचाच गैरफायदा काही लोक घेऊ शकतात. असा गैरफायदा घेणे योग्य नसले, तरी त्याबाबत ताळतंत्र पाळले जात नाही. अनेक ठिकाणी महत्त्वाच्या पदावर अनुसूचित जाती-जमातीचे लोक असताना त्यांच्याकडून नियमबाह्य कार्य करून घेतले जाते आणि मग ते अनुसूचित जाती-जमातीचे आहेत म्हणून त्यांच्यावर आरोप करू नका अशीही अपेक्षा व्यक्त केली जाते. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना राष्ट्रपती केल्यानंतर प्रमोद महाजन यांनी- आम्ही त्यांना राष्ट्रपती केले- अशा आशयाचे विधान केले होते. त्यावेळी वरिष्ठ नेत्यांनी राष्ट्रपतीपदाबद्दल असे विधान करणे चुकीचे आहे असे स्पष्ट केले होते. डॉ. राजेंद्र प्रसाद राष्ट्रपती असताना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना- तुम्हाला मला भेटावेसे वाटेल त्यावेळी मला बोलवत जा. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांना भेटण्यास जाणे योग्य नाही- असे म्हटले होते. राष्ट्रपतींनीही राष्ट्रपतीपदाचा मान आणि प्रतिष्ठा जपणे, संकेत पाळणे आवश्यक आहे.

■ **युगानंद साळवे,** पुणे

### भरती राज्य आयोगाकडेच सोपवावी

**'प्राध्यापक भरतीची** भविष्यलक्ष्यी संधी' हा लेख वाचला. नव्या शासन निर्णयानुसार प्राध्यापक भरतीत आमूलाग्र बदल झाला आहे, हे चित्र वास्तवाला धरून नाही. संधी भविष्यलक्षी आहे जरूर पण निव्वळ ८०:२० चे ६०:२०:२० अशी गुणोत्तर फेरमांडणी करून एकूण 'व्यवस्थेचा' पेच सुटणार नाही. मुलाखतीला आता २० गुण असले तरी अध्यापन कौशल्याचे २० गुण अजूनही 'सब्जेक्टिव्ह'च आहेत. शिवाय इतर ६० गुणांच्या विभाजनाबाबतदेखील तीव्र मतभेद आहेत. सध्याच्या व्यवस्थेत जोपर्यंत संस्थाचालकांच्या 'मर्जीला' प्राधान्य आहे तोवर प्राध्यापक भरतीतल्या भ्रष्टाचाराला आळा घालणे अशक्य आहे. हा भ्रष्टाचार भयावह तर आहेच पण त्याचे दूरगामी परिणाम हे राज्याच्या एकूण उच्च शिक्षणावर होणार आहेत. प्राध्यापक भरतीच्या प्रश्नाकडे व्यापक 'व्यवस्थेचा' प्रश्न म्हणून बघितले गेले पाहिजे.

गेली अनेक वर्षे रखडलेली प्राध्यापक भरती राज्य म्हणून आपले प्राधान्य कशाला आहे हे अधोरेखित करते. उच्च शिक्षण आणि त्यातले प्रश्न आपल्या लेखी शुल्लक असल्याने त्याचे आपल्याला आकलन नसणे हेही ओघाने आलेच. सध्याची भरतीची व्यवस्था मुळातच भ्रष्ट आहे आणि म्हणून त्याच व्यवस्थेची कितीही फेररचना केली तरीही त्याचा परिणाम शून्यच असेल. इतर राज्यांनी भरती प्रक्रिया राज्य सेवा आयोगाकडे देऊन काही प्रमाणात समान संधी निर्माण केली आहे. प्राध्यापक भरतीच्या अशा केंद्रीकरणातून स्थानिक पातळीवरील प्रभाव मिटवता येईल शिवाय समान संधीही निर्माण करता येईल. असे करताना इतर राज्य आयोगांनी राबवलेल्या भरती प्रक्रियेचा अभ्यास करून आपल्याला नवी व्यवस्था उभी करता येणे शक्य आहे. अर्थात त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. अशी राजकीय इच्छाशक्ती 'संस्थाचालकां'शिवाय उभी राहणे अशक्यच असले तरीही महाराष्ट्राने प्राध्यापक भरती राज्य लोकसेवा आयोगाकडे सोपवून नवी वाट धरली पाहिजे. संस्थाचालकांनी गेल्या कित्येक दशकांत महाराष्ट्रातील शिक्षणाच्या एकूण संकल्पनेचाच नाश केला आहे. अशी व्यवस्था काळाच्या पडद्यामागे जाईल तेव्हाच आमूलाग्र बदल होईल, नाहीतर आपण निव्वळ ठिगळं लावत राहू!

■ **केतन शिंदे,** तिरकवाडी, फलटण (सातारा)

# 'धर्मस्वातंत्र्य अधिनियमा'ची गरज काय?

**प्रलोभने दाखवून, बळजबरीने, भीती निर्माण करून केलेले धर्मांतर हा अस्तित्वात असलेल्या गुन्हेगारी कायद्यांनुसार शिक्षापात्र अपराध आहेच. असे असताना हा नवा कायदा कशासाठी? या विधेयकावर त्याची पार्श्वभूमी, हेतू, संविधानात्मक आधार आणि अशा इतर काही बाबींच्या चौकटीत चर्चा होणे अपेक्षित आहे...**

**डॉ. शमसुद्दीन तांबोळी**
अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ
tambolimm@rediffmail.com

**महाराष्ट्र राज्य** मंत्रिमंडळाने ६ मार्च २०२६ रोजी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' या नव्या कायद्याच्या मसुद्याला मंजुरी दिली. या विधेयकाचा मसुदा अद्याप उपलब्ध झालेला नाही तथापि असे सांगण्यात येते की बळजबरीने, प्रलोभन दाखवून किंवा फसवणुकीने वा बेकायदा धर्मांतर रोखणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. असा अपराध करणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांपर्यंत कारावास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंडाची यात तरतूद आहे. मात्र स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला जिल्हा प्राधिकरणाकडे ६० दिवस आधी आगाऊ नोटीस देणे बंधनकारक असेल. तसेच, धर्मांतर झाल्यानंतर २५ दिवसांत सक्षम प्राधिकाऱ्याकडे त्याची नोंदणी करणे आवश्यक आहे, अन्यथा ते धर्मांतर अवैध मानले जाईल. या कायद्यांतर्गत दाखल होणारे गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असतील. धर्मांतरित व्यक्तीचा कोणताही जवळचा नातेवाईक धर्मांतर बेकायदा असल्याचा दावा करून पोलिसांत तक्रार दाखल करू शकतो. केवळ धर्मांतराच्या उद्देशाने केलेले असे विवाह कौटुंबिक न्यायालये रद्दबातल ठरवू शकतात. हे विधेयक सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळात मांडले जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सत्ताधारी भाजप या विधेयकास 'लव्ह जिहाद' विरोधातील कडक पाऊल म्हणत आहे.

'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६'चा उद्देश आणि स्वरूप असे असेल तर त्यात काय आक्षेपार्ह आहे? असा एक प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. परंतु या विधेयकावरून मोठ्या प्रमाणात वादविवाद, प्रतिवाद आणि वादंग उठणार यात शंका नाही. प्रस्तुत विधेयकाची पार्श्वभूमी, हेतू, संविधानात्मक आधार आणि अशा इतर काही बाबींच्या चौकटीत चर्चा होणे अपेक्षित आहे.

भारतीय संविधानात नमूद कलम २५ नुसार धर्मस्वातंत्र्य हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. अर्थात तो अमर्याद नाही. शांतता, सुव्यवस्था, सामाजिक आरोग्य यांना तडा जाऊ न देता आपल्या धर्मश्रद्धा बाळगणे, त्यांचे पालन व प्रचार करण्याचा तो अधिकार आहे. धर्मस्वातंत्र्याचा दुसरा अर्थ धर्मापासून स्वातंत्र्य तथा निधर्मी असाही आहे. प्रलोभने, बळजबरी, भीती इत्यादींचा वापर करून करण्यात आलेले धर्मांतर हा अस्तित्वात असलेल्या गुन्हेगारी कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहेच. मग हा नवा कायदा कशासाठी हा प्रश्न अगदी स्वाभाविक ठरतो.

मानवी जीवन अधिकाधिक सुसंस्कृत आणि सुसह्य करण्यासाठी तसेच सामाजिक परिवर्तनासाठी कायदे अनिवार्य असतात. सामाजिक परिवर्तनाचा एक अर्थ असाही घेता येईल की भारतीय संविधानास अपेक्षित असा समाज निर्माण करणे. प्राचीन देशाचे आधुनिक राष्ट्रात रूपांतर करणे हा संविधानात्मक कर्तव्याचाच भाग आहे. प्राचीनतेत वैभव असते तसेच विषमतावर्धक अनेक प्रथा, परंपरा आणि पद्धती असतात. त्यांचे निर्मूलन करून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य अशा आधुनिक मूल्यांचा पुरस्कार आणि अंगीकार करणे म्हणजेच आधुनिक मूल्यांवर आधारित समाज निर्माण करणे.

समाजात वर्षानुवर्ष चालत आलेल्या समाज व मानवहिताच्या अनेक इष्ट बाबी टिकवायच्या असतात तसेच ज्या बाबी अनिष्ट आहेत त्या टाकून द्यायच्या असतात आणि ज्यात त्रुटी किंवा दोष असतात त्यांत सुधारणा करायच्या असतात. नवे कायदे जन्मास घालताना हे आवर्जून पाहायचे असते. आधुनिक राष्ट्रात कायदे करण्याचा अधिकार जसा कायदेमंडळास असतो तसेच नवे कायदे संविधानाच्या मूलभूत चौकटीत बसतात की नाही याची चाचपणी किंवा पडताळणी उच्च/सर्वोच्च न्यायालयांकडून होते.

'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' सारखा कायदा भाजपप्रणीत इतर काही राज्यांत लागू करण्यात आला आहे. या कायद्याच्या सांविधानिकतेस सर्वोच्च न्यायालयात 'पीयूसीएल', 'सिटीझन्स फॉर पीस अँड जस्टीस' आणि 'नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया' अशा संघटनांनी आव्हान दिले आहे. परिणामी सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, राजस्थान, ओरिसा, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, झारखंड, अरुणाचल प्रदेश या १२ राज्यांना तसेच केंद्र सरकारच्या कायदा आणि न्याय मंत्रालयाला नोटीस बजावून त्यांचे स्पष्टीकरण मागवले आहे. याव्यतिरिक्त असा एक प्रश्न उपस्थित होतो की याच धर्तीवरच्या कायद्यांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असेल तर तसाच 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' अस्तित्वात आणण्यात अडचण नसणार का?

या विधेयकामुळे जसा अनुच्छेद २५ (धर्मस्वातंत्र्या)चा संकोच होतो तसाच अनुच्छेद १४ (समानाधिकार, समान संधी आणि न्याय) आणि अनुच्छेद २१ (अभिव्यक्तिस्वातंत्र्य, जोडीदाराची निवड) या मूलभूत हक्कांची पायमल्ली होते. शासन अमर्याद आणि अनियंत्रित अधिकाराचा गैरवापर करू शकेल अशी भीती समाजाला वाटत आहे. धर्मांतरासाठी दबाव, बळजबरी अशा वर्तनास प्रतिबंध करण्यासाठीचा हा कायदा अल्पसंख्याक समाजात भीती आणि असुरक्षिततेला निमंत्रण देत आहे. कोणताही पुरावा नसताना नातेवाईक किंवा त्रयस्थाने तक्रार केली तरी तथाकथित अपराध्यास/ निरपराध्यास अटक आणि तुरुंगवास होऊ शकतो. पुरावे देण्याची आणि निरपराधित्व सिद्ध करण्याची जबाबदारी अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची आहे. भारतातील काही राज्यांत गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात आल्यानंतर तथाकथित (धर्मस्वातंत्र्य) स्वयंघोषित गोरक्षकांनी निर्माण केलेले भीतीचे वातावरण अजून ताजे आहे. नैतिकता रक्षकांच्या टोळ्यांत (मॉरल पोलीस) आणि खोट्या तक्रारींत वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

लोकशाही देशात नवा कायदा अस्तित्वात आणताना काही संकेत अपेक्षित असतात. कायद्याचा मसुदा लोकांपुढे ठेवून त्यांचे मत किंवा सूचना लक्षात घ्यायच्या असतात, त्यावरील चर्चा, वादप्रतिवाद समजून घेणे अपेक्षित असते आणि सर्वांगीण विचारविनिमय करून निर्णय घ्यायचा असतो. परंतु या गंभीर आणि संवेदनशील विधेयकाबाबत असे काही होईल असे वाटत नाही म्हणून अधिक चिंता वाटते.

मुस्लीम समाजाबद्दलचा विश्वास कमी करून त्यांच्याबद्दल संशय आणि शत्रूभाव वाढवण्यात येत आहे. लव्ह जिहादसारख्या तथाकथित संकल्पनेचा वापर करून जनक्षोभ निर्माण करण्यात येत आहे, बहिष्काराची भाषा करण्यात येते.

अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या 'हेट स्पीच लॅब इंडिया' अहवालात भारतात वाढत्या द्वेषपूर्ण भाषणांची चिंताजनक स्थिती अधोरेखित करण्यात आली आहे. २०२५ मध्ये एक हजार ३१८ सत्यापित घटनांची नोंद आहे. २०२३ च्या तुलनेत २०२५ मध्ये ९७ टक्के वाढ झाली आहे. यापैकी बहुसंख्य घटनांमध्ये, ९८ टक्के मुस्लिमांना, तर १२ टक्के ख्रिस्त्यांना लक्ष्य करण्यात आले. २०२५ मधील ८८ टक्के घटना या भाजपशासित राज्यांमध्ये घडल्याचेही नमूद केले आहे.

भारत हा धर्मनिरपेक्ष लोकशाही असलेला देश असल्याचे मानण्यात येते. या धर्मनिरपेक्षतेला धर्मवर्चस्ववादी मानसिकतेने सर्जनशील चर्चेतून विकसित करण्याची संधी न देता त्यात अडथळेच आणले. धर्मनिरपेक्षता यशस्वी होऊ शकली नाही तरी भारत हा बहुधार्मिक देश राहिला आहे. आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांचीही येथे एक परंपरा आहे. महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर ते हमीद दलवाई यांनी आंतरधर्मीय विवाहांस प्रोत्साहन दिले आहे. १२ ऑगस्ट १९५० रोजी पंडित नेहरूंना लिहिलेल्या पत्रात सरदार वल्लभभाई पटेल म्हणतात, 'मी मुसलमान किंवा हिंदू संस्कृती मानत नाही. मनुष्याने कसे वागावे, हे निश्चितपणे सांगणारे एखादे पुस्तक या जगात असेल, यावर माझा विश्वास नाही. वेद किंवा कुराण हे मानवी तत्त्वज्ञानातील अखेरचा शब्द आहे, असे मी मानत नाही... गरजेप्रमाणे आवश्यक असलेली ठरावीक मर्यादेतील विविधता राखून साधता येईल तेवढी सर्वंकष एकजूट राखणे हा माझ्या मनातील सर्वांत महत्त्वाचा राजकीय विचार आहे. हिंदू-मुस्लीम विवाहांचा मी उघडपणे पुरस्कार करतो आणि तुम्हाला माहीतच आहे की, सनातन जातिव्यवस्थेला माझ्या जीवनात मी स्थान देत नाही.' हा विचार आजही प्रस्तुत का वाटत नाही?

बहुतेक आंतरधर्मीय विवाह हे धर्मांतर न करता विशेष विवाह कायद्यांतर्गत (१९५४) होत असतात. असे विवाह करणाऱ्यांच्या विरोधात काही धर्मवादी संघटना दबावतंत्र वापरतात आणि सामाजिक तणाव निर्माण करतात. समाजाची वाटचाल धर्मनिरपेक्षतेकडे होण्यासाठी मुस्लीम समाजालाही द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू करावा, मुस्लीम समाजातील घटस्फोट न्यायालयीन कक्षेत आणावेत आणि पर्यायाने पुरोगामी महाराष्ट्रात समान नागरी कायदा यावा. धर्मांतर विरोधी कायद्यापेक्षा असे बदल करणे स्वागतार्ह ठरेल. या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६'ची उपयुक्तता तपासली पाहिजे.

## कुतूहल

### मोबाइलला स्पर्शज्ञान कसं होतं?

**मोबाइलच्या म्हणजे** भ्रमणध्वनीच्या पडद्यावर (स्क्रीनवर) बोट टेकवलं की आपल्याला हवी ती क्रिया घडते हा आपला सर्वांचा रोजचा अनुभव आहे. पण कोणतंही बटन न दाबता, बोटाच्या नुसत्या स्पर्शाने हे कसं घडतं याचं आपल्याला नवल वाटतं.

प्रत्येक माणसाच्या बोटावर एक हलकासा विद्युतभार असतो. एक हलकासा विद्युतप्रवाह मोबाइल स्क्रीनच्या खालीसुद्धा वाहत असतो. जेव्हा आपण स्क्रीनवर बोट टेकवतो, तेव्हा आपल्या बोटातील विद्युतभारामुळे स्पर्श केलेल्या स्क्रीनच्या भागाखालील विद्युतप्रवाहात हलकासा बदल होतो. हा बदल आणि बदलाची अचूक जागा, नेमकेपणाने टिपण्यासाठी स्क्रीनच्या कोपऱ्यात संवेदक (सेन्सर्स) लावलेले असतात. हे संवेदक ज्या ठिकाणी स्पर्श झाला, ती जागा मोबाइलमधील प्रोसेसरला अचूक सांगतात. कोणत्या जागेवर स्पर्श झाला तर कोणती आज्ञा पाळायची, याचं ज्ञान या प्रोसेसरला आधीच दिलेलं असतं. जर तुम्ही व्हॉटसॲप चिन्हावर स्पर्श केला, तर तो व्हॉटसॲप उघडतो. तुम्ही डीपीवर बोट टेकवलं तर तो डीपी उघडतो. या तंत्रज्ञानाला 'कपॅसिटिव्ह टचस्क्रीन' म्हणतात.



पण एक प्रश्न पडतो की बोट लावल्यावरच मोबाइल आज्ञापालन कसे करतो? पेन, पेन्सिल किंवा हातमोजे घातलेल्या बोटाच्या स्पर्शाने आज्ञापालन का होत नाही? कारण मोबाइलच्या स्क्रीनखाली असलेल्या जाळीतील विद्युतप्रवाह भंग होण्यासाठी एखाद्या विद्युतभाराचा स्पर्शच स्क्रीनच्या वरच्या बाजूने व्हावा लागतो. तो हलकासा विद्युतभार आपल्या बोटांवरच असतो. पेन किंवा पेन्सिलवर नसतो. शिवाय, आपलं बोट ओलं किंवा ओलसरसुद्धा असता कामा नये. बोटावरील पाणी विद्युतवाहक असल्याने ओल्या बोटाच्या स्पर्शाने जाळीतील विद्युतप्रवाह भंग होईलच याची खात्री नसते.

एका बोटाच्या स्पर्शाने एक आज्ञापालन होतं. पण आपण अंगठा व तर्जनी किंवा कोणतीही दोन बोटं स्क्रीनवर टेकवून स्क्रीनवर दिसणारी प्रतिमा लहान किंवा मोठी करू शकतो. म्हणजेच अनुक्रमे झूम आऊट किंवा झूम इन करू शकतो. हे तंत्रज्ञानाचं पुढचं पाऊल आहे. एकाचवेळी दोन बोटं स्क्रीनवर दोन ठिकाणी टेकवून एकमेकांजवळ आणल्यास जाळीतील विद्युतप्रवाहाला ज्या दोन ठिकाणी अडथळा येतो ती ठिकाणे आणि विद्युतप्रवाहाला अडथळा येण्याच्या दिशेचीसुद्धा नोंद घेतली जाऊन स्क्रीनवरील प्रतिमा लहान केली जाते. जेव्हा स्क्रीनवर टेकवलेली बोटं एकमेकांपासून दूर होतात तेव्हा या उलट झालेल्या दिशेचीसुद्धा नोंद घेतली जाऊन स्क्रीनवरील प्रतिमा मोठी होते. काही मोबाइल्समध्ये तर तीन बोटं स्क्रीनच्या सर्वात वरील बाजूला टेकवून ओढत खालपर्यंत आणली तर स्क्रीनशॉट घेतला जातो.

आहे ना तंत्रज्ञानाची कमाल?

**– हेमंत साने**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

## व्यक्तिवेध

### के. एन. पणिक्कर



**केरळमधील 'कोची-मुझिरिस** बिएनाले' सध्या ३१ मार्चपर्यंत सुरू आहे. बहुतेकांना 'कोची-एर्नाकुलम' हे जोडनाव माहीत असते. मग, २०१२ पासून सुरू झालेल्या, दर दोन वर्षांनी भरणाऱ्या दृश्यकला महाप्रदर्शनाच्या नावात 'मुझिरिस' कुठून आले? - याचे उत्तर के. एन. पणिक्करांना टाळून देताच येणार नाही. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून इतिहासाच्या प्राध्यापकपदावरून निवृत्ती घेतल्यावर पणिक्कर केरळमध्ये परतले, तिथे 'केरला कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रीसर्च' या संस्थेच्या कामाला त्यांनी गती दिली आणि कोची बेटाजवळील मुझिरिस येथे उत्खननाची सुरुवात पुरातत्त्व खात्याच्या परवानगीने केली. प्रा. पणिक्करांचे नाव इतके मोठे की, त्यांचे मार्गदर्शन मिळणार म्हणून अनेक जण या कामाशी जुळले. मुझिरिस हे व्यापारी केंद्र होते, हा तोवर केवळ कयास होता आणि तोही (सध्या व्हिएन्ना येथील संग्रहालयात असलेल्या) 'मुझिरिस पपायरस' या एका रोमन दस्तावेजावर आधारलेला. पण २००७ ते ०९ या दोन वर्षांत या कयासाला अक्षरशः 'ग्राउण्ड रिॲलिटी'चा पुरावा मिळाला. या पणिक्कर यांचे निधन सोमवारी (९ मार्च) झाले, तेव्हा मात्र सुमारे तीन हजार वर्षांपूर्वीचे शहर शोधण्याच्या या प्रकल्पाला चालना देणारे म्हणून पणिक्कर यांची आठवण फार कमी जणांनी काढली.

याचे कारण, विशेषतः उत्तरेकडल्या अभ्यासकांना के. एन. पणिक्कर माहीत आहेत ते मोपल्यांच्या बंडाचा अभ्यास करणारे म्हणून. इतिहासकार हा इहवादी आणि धर्मनिरपेक्षही असायला हवा, अशा मताच्या पणिक्करांवर 'डावे' असा शिक्का मारण्यास दोन्ही बाजूचे हितसंबंधी उत्सुकच होते, तो शिक्काही अखेर याच अभ्यासाने पक्का झाला. मोपल्यांचे बंड हा वर्गलढाच होता, त्यात हिंदूंचा सहभाग नगण्य असल्याची कारणेही वर्गलढ्यास हिंदू कितपत तयार होते यात शोधावी लागतील, अशी मांडणी पणिक्करांनी केली होती. त्यावर वादही झाले, पण या वादांतून त्या बंडाचा वा 'मलबार क्रांती'चा अधिकाधिक सखोल अभ्यास करण्याच्या दिशा पणिक्करांनी शोधल्या. 'हिस्टरी ऑफ आयडियाज' हा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला, त्यात साहजिकच स्वातंत्र्य, समता, बंधुता, वसाहतवाद आणि उत्तरवसाहतवाद यांसह वर्ग, वर्गजाणीव अशा संकल्पना होत्या. त्यामुळे तर त्यांना 'मार्क्सवादी इतिहासकार'च ठरवले गेले. त्यात ते साधे. छानछोकी न करणारे, कुणाशीही सहजपणे बोलणारे... तेवढ्यावरून 'हे डावेच' असे लोकांनी ठरवून टाकले. पणिक्करही त्याचा प्रतिवाद करण्याच्या फंदात कधी पडले नाहीत. त्याऐवजी ते निवृत्तीनंतर केरळला परतले.

अभ्यासूपणा हाच पणिक्करांचा स्वभावधर्म होता. त्यावर कोणत्याही रंगाचे, डाव्या/उजव्या बाजूचे शिक्के मारता येत नाहीत, ही बाजू निवृत्तीनंतरच्या कार्याने झळाळून उठली. मुळात ते वसाहतवादाला विरोध करणारे. तो का, तर मानवी समानता आणि स्वातंत्र्य या मूल्यांवर विश्वास म्हणून. या संकल्पना 'युरोपीय' किंवा 'डाव्या' म्हणून फेकून देता येत नाहीत, कारण तीन हजार वर्षांपूर्वी आपले पूर्वज समतावादी आणि स्वातंत्र्यवादी नसते तर समुद्रापार व्यापार झालाच नसता, हे त्यांनी निवृत्तीनंतरच्या अभ्यासातून दाखवून दिले!

## राजवाडे विचारविश्व

### सहकार्याचा अनपेक्षित लाभ

**पुण्यातल्या दोन** मुद्रणालयांच्या सहकार्याने ऐतिहासिक साधनांवरचा ग्रंथ छापून प्रकाशित करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या कारणांनी फसल्यानंतरही राजवाड्यांनी धीर सोडला नाही. ते पुन्हा वाईला जाऊन राहिले आणि तिथल्या 'मोदवृत्त' छापखान्यात त्यांनी पुन्हा काम सुरू केले. त्या छापखान्याचे मालक होते, भाऊशास्त्री लेले. त्यांनी राजवाड्यांना शब्द दिला होता, 'छपाईच्या कामात जातीने लक्ष घालीन.' त्यांनी तो शब्द पाळला. प्रारंभापासूनच त्यांनी कच्ची मुद्रिते राजवाड्यांकडून तपासून आली की, त्या सगळ्या दुरुस्त्या आपल्या कामगारांकडून केल्या जातील, याबद्दल दक्षता घेतली. वेळप्रसंगी कामगारांना राजवाड्यांची भीती दाखवून, तर कधीतरी दिवसभरातल्या कामाबद्दलच्या अपेक्षांचे बंद सैल सोडून त्यांनी ते काम धिम्या गतीने पण सुयोग्य पद्धतीने चालू ठेवले.

मुद्रितांची दुसरी फेरी वाचण्याचे काम म्हणजे पहिल्या कच्च्या मुद्रितांमध्ये राजवाड्यांनी ज्या दुरुस्त्या दर्शवलेल्या असतील, त्या तशाच्या तशा झाल्या आहेत की नाहीत, याची खातरजमा करून घेण्याचे काम भाऊशास्त्र्यांनी स्वतःकडे घेतले. आपल्या छापखान्यामध्ये चाललेल्या इतर कामांपेक्षा हे काम मुळातच वेगळे आहे, हे ओळखण्याइतपत ते समंजस होते; त्यामुळे कामाच्या प्रारंभी राजवाड्यांना जसा दोन-तीन वेळा मुद्रिते तपासण्यासाठी वेळ खर्च करावा लागत होता, तसा नंतरच्या काळात करावा लागत नसे. राजवाड्यांनी तीन-चार वेळा दुसऱ्यांदा मुद्रिते तपासायला घेतली आणि त्यांना सुखद धक्का बसला. आधीच्या फेरीत दाखवलेल्या सगळ्याच चुका नीट दुरुस्त झालेल्या त्यांना आढळल्या. न राहवून त्यांनी शास्त्रीबुवांना विचारले, तेव्हा त्यांना समजले की, ती खरे म्हणजे दुसरी नसून तिसरी मुद्रिते आहेत. दुसऱ्या फेरीतले तपासणीचे काम शास्त्रीबुवांनी आपणहून पार पाडले होते आणि निघालेल्या किरकोळ दुरुस्त्यादेखील करवून घेतल्या होत्या. मग त्यांनी ती जबाबदारी विश्वासाने शास्त्रीबुवांवरच सोपवली.

हे अनपेक्षित सहकार्य छापखाना मालकांकडून मिळाल्यामुळे राजवाड्यांचे कष्ट वाचले खरे; पण त्यामुळे त्यांनी सुरू असणाऱ्या मोहिमेत अधूनमधून उसंत घेतली, असे मात्र झाले नाही. 'मोदवृत्त' छापखान्यातले काम धिम्या गतीने होत होते, याबद्दल त्यांची तक्रार नव्हती. ते दर्जेदार व निर्दोष स्वरूपात पुढे सरकते आहे, यावर ते समाधानी होते. मग त्यांनी विचार करून संहितेचा परीघ वाढवायचे ठरवले.

प्रारंभी ते केवळ पंडित-बोपर्डीकरांनी दाखवलेल्या दादासाहेब येरंडे यांच्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरील भिंतीच्या अंबारीतील पेटाऱ्यामधली ऐतिहासिक कागदपत्रेच प्रकाशित करण्याच्या विचारात होते. थोडी उसंत मिळाल्यावर राजवाड्यांची संपादकीय दृष्टी अधिक ताजीतवानी झाली. त्या पेटाऱ्यात एकूण पत्रे होती सुमारे ७००. दादासाहेबांचे पूर्वज जनार्दनपंत येरंडे यांना नानासाहेब पेशव्यांनी बुंदेलखंडातले त्यांचे मामलतदार गोविंद बल्लाळ यांच्यावर दरखदार म्हणजे तपासनवीस म्हणून पाठवले होते. १७५७ ते १७६१ या कालावधीत ते बुंदेलखंडात असताना ती पत्रे त्यांच्याजवळ जमा झाली होती. ती वाईला परत आल्यावर त्यांनी आपल्या वाड्यात जी ठेवून दिली, ती तशीच राहिली होती. १७६१ नंतर १८९७च्या एप्रिलपर्यंत ती कातड्याने मढवलेल्या एका पेटाऱ्यात कोरी करकरीत पडून होती. ती सगळीच्या सगळी प्रकाशित करण्याजोगी आहेत का, हा प्रश्न राजवाड्यांनी स्वतःच स्वतःला विचारला आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या निकषांवर नकारार्थी उत्तर मिळाल्यावर त्यांनी कागदपत्रांची निवड करण्याचे काम आरंभले. अखेरीस त्यांनी फक्त १८२ पत्रेच या प्रस्तावित खंडामध्ये समाविष्ट करण्याजोगी आहेत, असे ठरवले आणि पानिपतच्या मोहिमेसंबंधीच्या त्या पत्रांबरोबरच इतरही काही कागदपत्रे समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. एकूण ३०४ पत्रे निश्चित केल्यावरच संपादक राजवाड्यांनी 'हुश्श' म्हटले.

त्या 'इतर' कागदपत्रांत होती, पैठणला वाण्याच्या दुकानातल्या रद्दीतून राजवाड्यांनी शोधून काढलेली २३ पत्रे; मिरजेच्या इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे यांनी दिलेली २५ पत्रे आणि वाईच्याच गोविंदराव भानू यांच्याकडून मिळवलेली ७५ पत्रे. हे तीन निरनिराळे स्रोत राजवाड्यांनी आपल्या प्रस्तावनेत नोंदवले आणि शोधमोहिमेचा वाढता परीघही सूचित केला... त्या वाढत्या परिघाची त्यांनी 'केसरी'मधून सांगितलेली माहिती पुढील लेखात...

**– आनंद हर्डीकर**
anand47.hardikar@gmail.com

# कंपनीने कोलवले!

## ज्या मुद्द्यांवर मानवी विवेक, सारासार विचारबुद्धी आदींचा वापर होणे आवश्यक आहे ते आपल्या 'एआय' उत्पादनावर सोडण्याची मुभा सरकारला नाकारण्यावर 'अँथ्रोपिक' थांबली नाही...

**अवघ्या पाच-सहा** वर्षांच्या कंपनीने जगातील सर्वात बलाढ्य संरक्षण मंत्रालयावर खटला भरावा ही घटनाच मोठी अद्भुत. ती अमेरिकेसारख्या खऱ्या लोकशाहीवादी देशांतच घडू शकते. हा प्रकार 'संरक्षण', 'सामरिक हित' इत्यादी कारणे पुढे करत हवे ते रेटण्याची सोय यथेच्छ वापरणाऱ्या लोकशाहीची जननी इत्यादी असलेल्या आपल्यासारख्या देशांतील अनेकांस अविश्वसनीय वाटण्याचा धोका आहे. सबब त्याचा सविस्तर गोषवारा आणि त्यावर भाष्य गरजेचे.

'अँथ्रोपिक' हे अमेरिकेतील एक यशस्वी स्टार्टअप. कॅलिफोर्निया येथील ही कंपनी प्रामुख्याने कृत्रिम प्रज्ञा- म्हणजे आर्टिफिशल इंटलिजन्स (एआय)- क्षेत्रात काम करते. अलीकडे ती चर्चेत आली तिने विकसित केलेल्या 'क्लॉड' या एआय मदतनीसामुळे. जागतिक स्तरावर सर्वाधिक परिचित आहेत ते 'गूगल'चे 'जेमिनी' वा 'मायक्रोसॉफ्ट'चे 'चॅट जीपीटी' हे एआय साहाय्यक. हे दोन वा यातील किमान एक तरी पोराटोरांच्या मोबाइल वा संगणकात सर्रास आढळतो. त्यामुळे 'एआय' म्हटले की 'चॅट जीपीटी' वा 'जेमिनी' यांचाच उल्लेख होतो. पण 'अँथ्रोपिक'च्या 'क्लॉड'च्या तुलनेत 'चॅट जीपीटी' वा 'जेमिनी'हे अगदीच प्राथमिक बाळबोध आहेत. जेमतेम दहावी झालेल्यांच्या भाऊगर्दीत एखादा पीएचडीधारी असावा तसे या 'एआय'च्या भाऊगर्दीत 'क्लॉड'चे स्थान. तो बुद्धिमानांचा कृत्रिम बुद्धिमत्ता सल्लागार. त्याच्या क्षमतेच्या दिव्य दर्शनाने अलीकडेच जगातील बाजारपेठांचे डोळे दिपले आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील बहुसंख्यांहाती या 'क्लॉड'मुळे नारळ द्यावा लागणार या वास्तवाच्या जाणिवेने या क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग आपटले. जगभरातील भांडवली बाजारात या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या या 'क्लॉड' जखमा अद्याप भरून आलेल्या नाहीत. हे श्रेय स्थापनेस जेमतेम सहा वर्षे झालेल्या कंपनीच्या नव्या उत्पादनाचे. हे यश हा जगभर चर्चेचा विषय झाला. इतके दिवस मानवी हातांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या निर्मितीची सूत्रे होती. क्लॉडमुळे कृत्रिम बुद्धिमान यंत्रेच पुढच्या पिढीची कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करू शकतील.

सरकार कोणत्याही देशातील कोणत्याही पक्षाचे असो. प्रत्येक बाजारपेठीय यशाचा उपयोग स्वतःसाठी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकारही असेच. त्या सरकारला 'क्लॉड'वर मालकी प्रस्थापित करण्याचा मोह झाला. त्यातून संरक्षण मंत्रालयाने, म्हणजे पेंटागॉन, या कंपनीशी करार केला आणि त्याचा वापर सुरू केला. येथवर सर्व ठीक. तथापि या क्लॉडची क्षमता लक्षात आल्यावर त्याचा अधिकाधिक वापर करण्याची इच्छा संरक्षण मंत्रालयास झाली. यातून दोन मुख्य उपयोगांवर या मंत्रालयाने लक्ष केंद्रित केले. एक म्हणजे शत्रुदेशाच्या कोणत्या प्रदेशावर कोणते क्षेपणास्त्र कधी डागावे याचा निर्णय 'क्लॉड'ने करावा आणि दुसरी अधिक गंभीर बाब म्हणजे गर्दीतूनही हवे ते चेहरे ओळखून त्याबाबत मंत्रालयास या 'एआय'ने सूचित करावे अशी अपेक्षा 'पेंटागॉन'ने 'अँथ्रोपिक'कडे व्यक्त केली. यातील दुसरे काम म्हणजे स्वतःच्या देशातील नागरिकांवर हेरगिरी करणे होते आणि पहिल्यानुसार महत्त्वाचे संरक्षणविषयक निर्णयही या 'एआय'वर सोडण्याचा संरक्षण मंत्रालयाचा मानस होता. हे अयोग्य आणि भयंकर. याचे कारण ज्या मुद्द्यांना हाताळताना मानवी विवेक, सारासार विचारबुद्धी आदींचा वापर होणे आवश्यक होते ते निर्णय हे मंत्रालय सरळ कृत्रिम प्रज्ञेवर सोडत होते. यातून नव्याच समस्या निर्माण होण्याचा धोका होता. एक म्हणजे या सल्ल्यानुसार समजा खरोखरच क्षेपणास्त्रे डागली गेली तर होणाऱ्या संहाराची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न. आणि दुसरे म्हणजे अमेरिकी कायद्यानुसार त्या देशाच्या हेरगिरी यंत्रणांस देशबांधवांवर हवी तशी हेरगिरी करता येत नाही. असे काही करणे हा केवळ नियमभंगच नव्हे; तर सभ्यसंस्कृती भंग ठरला असता. म्हणून 'अँथ्रोपिक'ने संरक्षण मंत्रालयाची मागणी धुडकावली. आणि 'क्लॉड'वरील नियंत्रणे हटवण्यास नकार देऊन त्याचा निर्रगल वापर रोखण्याचा एक प्रयत्न केला.

> ...आता सरकारवर खटला भरण्यापर्यंत ती गेली... त्याचे जे होईल ते होईल; पण हा बाणा 'ॲपल'च्या टिम कुक यांची आठवण करून देणारा...

झाले! त्यावर अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतापले आणि संरक्षणमंत्री पीट हॅगसेथ यांनी या कंपनीवर जाहीर तोंडसुख घेतले. एक यःकश्चित कंपनी आपणास जाहीर नकार देते हे पाहून ट्रम्प यांचा तीळपापड झाला. आपणास हवी ती नियंत्रणे उठवणे कंपनीने नाकारल्याने देशाच्या सुरक्षा मुद्द्यांस तिने कमी लेखले असे संरक्षण मंत्रालयास वाटले. अध्यक्ष आणि संरक्षणमंत्र्यांच्या जाहीर तणतणाटानंतरही ही कंपनी बधली नाही. अखेर तीस 'काळ्या यादीत' टाकण्याचा इशारा सरकारने दिला. येथपर्यंत जे झाले ते एक वेळ समजून घेता येईल असे आहे. पण अमेरिकेच्या विद्यमान राजवटीस कोठे थांबावे हे कळण्याची मुदलात बोंब. त्यात त्यांना या लहानग्या कंपनीचा आत्मविश्वास सहन झाला नाही. त्यांनी या कंपनीस 'धोकादायक' (सप्लाय चेन रिस्क) यादीत टाकत असल्याचे जाहीर केले. त्याआधी या वादात 'अँथ्रोपिक'चा स्पर्धक असलेल्या 'ओपन एआय' कंपनीने उडी घेतली. आपल्या स्पर्धकांस संरक्षण मंत्रालयाची व्यवसाय संधी नाकारली जात असल्याचे पाहून ती साधण्यासाठी या कंपनीने मंत्रालयास जे हवे आहे ते देण्यास आम्ही तयार आहोत, अशी भूमिका घेतली. तीमुळे खरे तर अनेकांस धक्का बसला. 'ओपन एआय'ची कृती ही अनपेक्षित आणि संरक्षण मंत्रालयापुढे शरणागती पत्करणारी. तीस या कंपनीतूनच विरोध झाला आणि संरक्षण मंत्रालयाच्या दबावासमोर 'ओपन एआय'ने झुकण्याचा निषेध त्याच कंपनीतून झाला. या कंपनीच्या यंत्रमानव आणि संबंधित अभियांत्रिकी विभागातील ज्येष्ठ संशोधक केटलीन कालिनोवस्की हिने राजीनामा दिला. यामुळे 'अँथ्रोपिक'च्या भूमिकेलाच एक प्रकारे नैतिक पाठिंबा मिळाला. त्यामुळेही असेल पण या कंपनीने थेट 'पेंटागॉन'च्या कृतीला न्यायालयात आव्हान दिले. कॅलिफोर्निया न्यायालयात या कंपनीने आपल्याच देशाच्या संरक्षण मंत्रालयाविरोधात दोन खटले गुदरले असून आपल्या कंपनीस 'धोकादायक' संबोधणे हे अमेरिकी घटनेने दिलेल्या स्वातंत्र्याधिकारावर गदा असल्याचे म्हटले आहे.

ही ताजी घटना. त्यामुळे या खटल्यांचे भवितव्य काय यावर लगेच भाष्य करता येणे अवघड. पण एखाद्या कंपनीस असे स्वतःच्या सरकारविरोधात न्यायालयात जावे असे वाटणे आणि सरकारने हे औद्धत्य सहन करणे ही बाब त्या देशातील लोकशाहीची निकोपता दर्शवते. याआधीही ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी 'ॲपल' कंपनीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. मोबाइल कंपन्यांकडे त्यांची सेवा वापरणाऱ्यांचा संपूर्ण विदा- डेटा- जमा होत असतो. कोणी कोठून कोणाशी फोनवर संपर्क साधला येथपासून ते त्यांच्यात झालेल्या संदेशांच्या देवाणघेवाणीपर्यंत वाटेल ती माहिती या कंपन्यांच्या साठ्यात जमा होते. ट्रम्प यांना ती हवी होती. त्यांनीही त्यासाठी 'राष्ट्रीय सुरक्षा' असे कारण त्या वेळी पुढे केले. अमेरिकी नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही माहिती मिळणे गरजेचे आहे, असा त्यांचा दावा आणि पवित्रा होता. ट्रम्प यांच्या या अरेरावीस 'ॲपल'चे टिम कुक यांनी एका पैचीही किंमत दिली नाही आणि त्यांची मागणी फेटाळली. ''ही माहिती हा दूरसंचार सेवा उपभोक्ता आणि ती सेवा देणारा यांच्यातील करार आहे. त्याचे तपशील उघड करता येणार नाहीत'', अशी ठाम भूमिका घेण्याची हिंमत त्या वेळी 'ॲपल'ने दाखवली. अखेर ट्रम्प यांना माघार घ्यावी लागली.

'अँथ्रोपिक'बाबतही तसे काही झाल्यास आश्चर्य नसावे. सरकारने डोळे वटारले तरी कंबरेत लवलवू करणारे पाहावयाची सवय असल्याने दमनशाही करणाऱ्या सरकारला असे कोलवणाऱ्या कंपन्यांचे अप्रूप. हेच धैर्यधर लोकशाहीचा झेंडा फडकवत ठेवतात. म्हणून त्यांचे कौतुक.

# कागदोपत्री गुणवत्ता की वास्तवातील शिक्षण?

लेख

अक्षय अरुण शेळके
सहायक प्राध्यापक,
आर्या कृषी महाविद्यालय, मानेगाव (माढा)
akshay111shelake@gmail.com

**भारतीय शिक्षण** व्यवस्थेबद्दल बोलताना आपण अनेकदा अभिमानाने 'ज्ञानाची परंपरा' आणि 'जागतिक महासत्ता' यांसारख्या संकल्पना मांडतो आणि वेगवेगळ्या व्यासपीठांवरून त्या अभिमानाने मिरवताना दिसतो. एकीकडे महासत्तेची स्वप्ने पाहिली जात असताना दुसरीकडे भारतीय विद्यार्थ्यांचे जे लोंढे परदेशात उच्च शिक्षणासाठी जात आहेत ते थांबताना दिसून येत नाहीत. परराष्ट्र मंत्रालयाच्या २०२५ च्या आकडेवारीनुसार १.८ दशलक्षाहून अधिक म्हणजेच १८ लाखांपेक्षा जास्त भारतीय विद्यार्थी सध्या विदेशात शिक्षण घेत आहेत. ही गोष्ट अभिमानाने सांगण्याची आहे की लाजिरवाणी, यावर आपण विचार केला पाहिजे.

भारतात शिक्षण हा केवळ विकासाचा विषय नाही, तर सामाजिक परिवर्तनाचा मुख्य आधार मानला जातो. तरीही एक मूलभूत प्रश्न वारंवार पुढे येतो आपल्या देशात गुणवत्तापूर्ण शिक्षण खरोखर कधी शक्य होणार? प्रत्यक्षात शिक्षणाची गुणवत्ता कशी मोजली जाते, याचा विचार केला तर एक वेगळेच चित्र समोर येते. आज अनेक ठिकाणी शिक्षणाची किंवा शिक्षण संस्थांची गुणवत्ता ही अध्यापन, विद्यार्थ्यांची समज आणि संशोधन यावर न मोजता कागदपत्रे, अहवाल आणि छायाचित्रांवर मोजली जात असल्याचे दिसून येते.

भारतात राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद यांसारख्या मानांकन संस्थांचा उद्देश शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हा आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये ही प्रक्रिया दस्तावेजकेंद्रित बनलेली दिसते. प्रत्येक उपक्रमासाठी फोटो, उपस्थिती पत्रके, अहवाल आणि फाइल्स तयार करण्याचा प्रचंड ताण शिक्षकांवर येतो. दर महिन्याला येणारे विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियम आणि सरकार पुरस्कृत कार्यक्रम घेण्याची, जयंत्या साजऱ्या करण्याची बंधने विद्यापीठांवर आणि महाविद्यालयांवर लादली जात आहेत. त्यामुळे शिक्षकांचा खूप वेळ अध्यापनापेक्षा कागदोपत्री कामात आणि कार्यक्रमांचे अहवाल तयार करण्यात खर्च होतो. या सर्व कामांमुळे बौद्धिक गुणवत्ता शून्यावर आली आहे. याचबरोबर काही ठिकाणी शिक्षकांना मूलभूत सुविधा उपलब्ध नसतात, त्यांच्याकडून उत्कृष्ट अध्यापन आणि संशोधनाची अपेक्षा केली जाते. ही परिस्थिती केवळ विसंगत नाही, तर शिक्षणाच्या गुणवत्तेलाच बाधा आणणारी आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. परंतु शिक्षकांना अध्यापनासाठी आवश्यक वेळच मिळत नसेल, तर अपेक्षित गुणवत्ता कशी साध्य होणार? आपल्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यायचे असेल तर आपल्याला एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे अशा शिक्षणाचा पाया म्हणजे सक्षम शिक्षक. असे शिक्षक घडवण्यासाठी त्यांना योग्य प्रशिक्षण, सतत अद्ययावत ज्ञान आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे- त्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ मिळणे आवश्यक आहे. अध्यापन ही केवळ वर्गात उभे राहून शिकवण्याची प्रक्रिया नसून त्यासाठी अभ्यासक्रम समजून घेणे आणि त्याचे नियोजन करणे, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक पातळीप्रमाणे शिकवण्याच्या पद्धती तयार करणे, संदर्भग्रंथांचे वाचन या सर्व गोष्टींचा समावेश होतो. परंतु या गोष्टींकडे आपण पूर्णपणे डोळेझाक करून वरील गोष्टी प्रत्यक्ष कृतीत न आणता त्या कागदोपत्री दाखवण्याचा आपला अट्टहास असतो.

> आपल्याकडे शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा मुख्य आधार असला तरीही त्याची गुणवत्ता ही एक मोठी समस्या आहे. शिक्षकांवर शिक्षणबाह्य कामे लादून आपण त्यांना अध्यापनाच्या तयारीसाठी वेळच देत नाही. असे करून शिक्षकांची सगळी ऊर्जा वाया घालवली जात आहे. यातून होणारे नुकसान केवळ शिक्षण क्षेत्राचे नाही, तर संपूर्ण समाजाचे, देशाचे आहे.



इतर देशांमध्ये शिक्षकांना अध्यापनाबरोबरच नियोजन आणि तयारीसाठी भरपूर वेळ दिला जातो.

या संदर्भात काही महत्त्वाची सर्वेक्षणे आपल्याला वास्तव दाखवतात, 'असर'च्या अहवालानुसार ग्रामीण भारतातील इयत्ता पाचवीतील अनेक विद्यार्थ्यांना दुसरीचा मजकूर नीट वाचता येत नाही. याच्या पुढे जाऊन मला सांगावेसे वाटते की, पदवीच्या पहिल्या वर्षात शिकणाऱ्या काही मुलांना इंग्रजी वाचन जमत नाही. तसेच एनसीईआरटीद्वारे करण्यात आलेल्या नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हेमध्येही विद्यार्थ्यांचे लर्निंग आउटकम अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे दिसून आले आहे. विशेषतः संकल्पनात्मक समज कमी असल्यामुळे शिक्षण समजून घेण्याऐवजी पाठांतरावर आधारित होत आहे. हे सर्व्हे स्पष्टपणे दाखवतात की, कागदोपत्री गुणवत्ता आणि प्रत्यक्ष शिक्षण यामध्ये मोठी दरी आहे.

या संदर्भात आंतरराष्ट्रीय उदाहरणे पाहिली तर एक वेगळे चित्र दिसते. फिनलंडमध्ये शिक्षकांना अध्यापनाबरोबरच नियोजन आणि तयारीसाठी भरपूर वेळ दिला जातो. तेथे शिक्षक साधारण १८ तास अध्यापन करतात, तर उर्वरित वेळ ते अध्यापन नियोजन, मूल्यमापन आणि संशोधनासाठी वापरतात. म्हणजेच त्यांच्या कामकाजात सुमारे २५ ते ३५ टक्के वेळ हा तयारीसाठी राखीव असतो.

इंग्लंडमध्ये नियोजन, तयारी आणि मूल्यांकन वेळ हा शिक्षकांचा हक्क मानला जातो. त्यांच्या एकूण कामकाजातील किमान १० टक्के वेळ हा केवळ तयारीसाठी राखीव असतो आणि त्या वेळेत त्यांना इतर कोणतेही काम दिले जाऊ शकत नाही. शिक्षकांना नियोजनासाठी स्वतंत्र वेळ दिला जातो आणि प्रशासकीय कामांसाठी वेगळी यंत्रणा उपलब्ध असते.

याउलट भारतात शिक्षकांना अनेकदा अध्यापनाबरोबरच विविध अशैक्षणिक कामांमध्ये गुंतवले जाते. निवडणूक कामे, सर्वेक्षणे, प्रशासनिक जबाबदाऱ्या, कारकुनी कामे, विविध समित्या आणि अहवाल तयार करणे या सर्व गोष्टींमध्ये शिक्षकांचा खूप वेळ जातो. त्यामुळे अध्यापनासाठी आवश्यक तयारी करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा वेळ राहत नाही. परिणामी, अध्यापनाची गुणवत्ता कमी होते आणि विद्यार्थी 'समजून घेण्याऐवजी' केवळ 'पाठांतर' करण्याकडे वळतात.

संशोधनाच्या बाबतीतही अशीच परिस्थिती दिसून येते. भारतात संशोधनाची संख्या वाढत असली, तरी गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होते. अनेक वेळा संशोधन हे केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी केले जाते. काही ठिकाणी परदेशातील संशोधनाचे रूपांतर करून तेच स्वतःचे म्हणून सादर करण्याची प्रवृत्तीही दिसते. ही केवळ नैतिकदृष्ट्या चुकीची नाही, तर देशाच्या प्रगतीलाही अडथळा ठरणारी आहे. याउलट विकसित देशांमध्ये संशोधनात मौलिकतेला प्राधान्य दिले जाते. शिक्षक आणि संशोधकांना आवश्यक सुविधा, निधी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वातंत्र्य दिले जाते. त्यामुळे ते नवीन कल्पना आणि तंत्रज्ञान निर्माण करू शकतात.

या पार्श्वभूमीवर भारतासाठी काही महत्त्वाचे बदल आवश्यक आहेत. शिक्षकांना किमान ३० ते ४० टक्के वेळ अध्यापन तयारी आणि संशोधनासाठी देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अशैक्षणिक कामांचा ताण कमी करणे, मानांकन प्रक्रियेत कागदोपत्री कामांपेक्षा प्रत्यक्ष गुणवत्तेला प्राधान्य देणे आणि शिक्षकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न असा आहे की, आपण खरोखर शिक्षणाची गुणवत्ता वाढवत आहोत का, की केवळ तिचे प्रदर्शन करत आहोत? कारण काही काळासाठी आपण कागदोपत्री गुणवत्ता दाखवू शकतो, पण दीर्घकालीन प्रगतीसाठी मौलिक शिक्षण आणि संशोधन हाच एकमेव मार्ग आहे. आपण प्राध्यापकांना प्राध्यापक- संशोधक म्हणून वागणूक देत नाही आणि पालक/ विद्यार्थी केवळ ब्रँडिंगच्या झगमगाटावर विश्वास ठेवणे थांबवत नाहीत तोपर्यंत अशी असंख्य गलगोटिया विद्यापीठे आणि महाविद्यालये भविष्यात पाहायला मिळतील यात शंका नाही.

# 'आरटीई' प्रवेश प्रक्रियेची अंतरमर्यादा वादात का?

विश्लेषण

चिन्मय पाटणकर
chinmay.patankar@expressindia.com

> आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत २५ टक्के राखीव कोट्यातून खासगी शाळेत प्रवेश हवा असेल, तर ती शाळा विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरच्या परिसरातीलच असावी, असा नियम यंदा शिक्षण विभागाने केला. त्या विरोधात आंदोलनेही झाली. आता हा निर्णय न्यायालयाने रद्द केला आहे. त्या पार्श्वभूमीवर, हा नियम बदल, त्याला झालेला विरोध याचा आढावा...

**'आरटीई'अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशांबाबत नवा नियम काय होता?**

'आरटीई'च्या २५ टक्के कोट्यातील प्रवेश प्रक्रियेत कालानुरूप सुधारणा करण्यासाठी, तसेच नवीन नियम, आवश्यक बाबींचा समावेश करून शासनाला शिफारस करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली २९ जानेवारी २०२५ रोजी समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यावर नागरिकांचे अभिप्रायही विचारात घेण्यात आले. त्यानंतर समितीच्या शिफारशींनुसार, आरटीई २५ टक्के कोट्यातील (खासगी विनाअनुदानित शाळांतील) प्रवेशासाठीची सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली. त्यात दोन प्रमुख बदल करण्यात आले. नव्या नियमानुसार, 'आरटीई'अंतर्गत राज्यातील शाळांतील प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करताना पालकांना त्यांनी नोंदविलेल्या निवासस्थानाच्या एक किलोमीटर परिसरातीलच शाळा निवडणे बंधनकारक करण्यात आले, तसेच प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे जोडण्याची तरतूद करण्यात आली. पूर्वीच्या नियमानुसार तीन किलोमीटर अंतरातील शाळा निवडणे शक्य होते, तसेच कागदपत्रे प्रवेशावेळी सादर करण्याची तरतूद होती.

**नियमाला विरोध का करण्यात आला?**

विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटर परिसरातील शाळा निवडण्याची सक्ती २०१३ च्या कायद्याचे उल्लंघन करणारी असल्याचा आक्षेप सामाजिक, राजकीय संघटनांकडून नोंदवण्यात आला. या नियमामुळे साहजिकच पालकांना त्यांच्या निवासस्थानाच्या एक



किलोमीटर परिसरातीलच खासगी शाळा शोधाव्या लागतील, ज्यामुळे शाळांचे पर्याय कमी होतील, असा हा आक्षेप आहे. थोडक्यात, बऱ्याच खासगी शाळांत हा कोटा भरलाच जाणार नाही. यामागे खासगी शाळांना सरकारकडून देय असलेली सुमारे २२०० कोटी रुपयांची शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम हेही असल्याचा आरोप आहे. जागा कमी भरल्या, की ही रक्कम कमी होईल. त्यासाठीच शासनाने नवा नियम केल्याचा आरोप करण्यात आला.

**'आरटीई'च्या प्रवेश अर्जांवर परिणाम काय झाला?**

गेल्या काही वर्षांत 'आरटीई'च्या २५ टक्के कोट्याच्या प्रवेश प्रक्रियेतून अनेक विनाअनुदानित शाळा बाहेर पडत असल्याचे दिसत आहे. राज्य शासनाकडून वेळेत न मिळणारी शुल्क प्रतिपूर्ती हे त्यातील प्रमुख कारण. परिणामी, कोटा टाळण्यासाठी अनेक खासगी शाळांनी अल्पसंख्याक दर्जा घेण्यास सुरुवात केली. अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१८-१९ मध्ये आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी ८९८० शाळांमध्ये १ लाख २६ हजार १४० जागा होत्या. २०२६- २७ साठी ८६५५ शाळा, १ लाख १२ हजार ८८५ जागा नोंदवण्यात आल्या. त्यामुळे नऊ वर्षांत ३२५ शाळा, १३ हजार २५५ जागा कमी झाल्याचे दिसून येते.

**न्यायालयाचा निर्णय काय? पुढे काय?**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने शाळा नोंदणी पूर्ण करून विद्यार्थ्यांच्या अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच, पालकांना एक किलोमीटरच्या परिसरातीलच शाळा दिसाव्यात अशा प्रकारे प्रणालीमध्ये बदल करण्यात आले आहेत. मात्र, आता न्यायालयाने एक किलोमीटरची अट रद्द केल्याने पुढील प्रक्रियेबाबत काही प्रश्न निर्माण झाले आहेत. आतापर्यंत अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना अर्जांत दुरुस्तीची संधी दिली जाणार, की प्रवेश प्रक्रिया नव्याने राबवली जाणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार प्रवेश प्रक्रियेबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्टीकरण प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले.

**यापूर्वी आरटीई प्रवेशांमध्ये केलेल्या बदलांवेळी काय झाले?**

शिक्षण विभागाने २०२४ मध्येही आरटीई प्रवेशांच्या नियमावलीत बदल केला होता. त्यानुसार खासगी विनाअनुदानित शाळेच्या एक किलोमीटर परिसरात शासकीय किंवा अनुदानित शाळा असल्यास संबंधित खासगी विनाअनुदानित शाळा स्थानिक प्राधिकरणाकडून निवडण्यात येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे खासगी विनाअनुदानित, स्वयंअर्थसाहाय्यित शाळेऐवजी विद्यार्थ्यांना प्रामुख्याने अनुदानित किंवा शासकीय शाळेत प्रवेश घ्यावा लागणार होता. या निर्णयाविरोधातही न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्या वेळी न्यायालयाने संबंधित बदलांना स्थगिती दिली होती. त्यामुळे जुन्याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवावी लागली.

अन्वयार्थ

# महाभियोगाची वेळ का आली?

**लोकसभेत अध्यक्ष** ओम बिर्ला यांच्याविरोधातील अविश्वासाच्या ठरावावरील चर्चा सुरू झाली असतानाच, विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव मांडण्याची तयारी सुरू केली आहे. लोकसभा तसेच राज्यसभेत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) बहुमत असल्याने हा प्रस्ताव फेटाळला जाणार हे निश्चित; पण त्यातून सरकार व निवडणूक आयुक्तांचे वाभाडे काढण्याची संधी इंडिया आघाडीला मिळणार हेही नक्की. नियुक्तीपासूनच विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याबाबत वाद उपस्थित केले गेले. आधी निवडणूक आयोगावर आयुक्त म्हणून ते नेमले गेल्यानंतर, केंद्र सरकारने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीचा कायदाच बदलला. 'पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यांचा समावेश असलेली समिती' यापूर्वीच्या आयुक्तांची निवड करत असे, तर नव्या कायद्यात सरन्यायाधीशांना वगळून त्याऐवजी एका केंद्रीय मंत्र्याचा समावेश समितीत झाला. त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी ज्ञानेश कुमार यांना निवडले. राहुल गांधी यांनी आक्षेप घेतला, पण समितीत सत्ताधारी पक्षाचे बहुमत असल्याने विरोधाला काहीच अर्थ राहिला नाही. ज्ञानेश कुमार हे सनदी सेवेत असताना, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या जवळचे अधिकारी म्हणून त्यांची गणना होत असे. जम्मू आणि काश्मीर खोऱ्यास विशेषाधिकार देणारा अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या निर्णय प्रक्रियेत कुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. पुढे सचिवपदी बढती मिळाल्यावर अमित शहा यांच्याकडील सहकार खात्याचे ते सचिव होते. निवृत्तीनंतर लगेच त्यांना निवडणूक आयुक्तपद मिळाले.

निवडणुका निष्पक्ष आणि मोकळ्या वातावरणात पार पाडणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी. पण गेली दोन वर्षे प्रत्येक निवडणुकीत निवडणूक आयोगाच्या कारभारावर विरोधकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महाराष्ट्रात २०२४ च्या लोकसभा ते विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान मतदार संख्या ७० लाखांनी वाढल्यावरून विरोधकांनी सातत्याने आक्षेप घेतला. कर्नाटकातील एका विधानसभा मतदारसंघातील मतदारसंख्यावाढीचा मुद्दा राहुल गांधी यांनी उपस्थित केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे सत्ताधारी भाजपला अनुकूल अशी भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी सातत्याने केला असता, 'प्रतिज्ञापत्र सादर करून पुरावे द्या' अशी मागणी ज्ञानेश कुमार यांनी केली होती. निवडणूक आयोगाच्या वतीने विधानसभा निवडणूक होत असलेल्या राज्यांमध्येच राबवण्यात आलेल्या मतदारयाद्यांच्या सखोल फेरतपासणी मोहिमेवरूनही बराच गदारोळ झाला. ही मोहीम निवडणुकीच्या अगदी तोंडावर बिहारमध्ये राबवण्यात आली. लवकरच निवडणुका अपेक्षित असलेल्या तमिळनाडू, पश्चिम बंगाल व केरळच्या मुख्यमंत्र्यांनी मतदारयाद्यांच्या फेरतपासणी मोहिमेच्या वेळेबद्दल आक्षेप घेतला. मतदारयाद्यांमधील दुबार नावे किंवा मृत व्यक्तींची नावे वगळण्यास कोणाचाच आक्षेप नाही. पण पश्चिम बंगालमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर नावे वगळली कशी जातात, हा मुद्दा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लावून धरला. अखेर सर्वोच्च न्यायालयाला वगळलेल्या मतदारांच्या सुनावणीसाठी बाहेरचे न्यायाधीश त्या राज्यात नेमावे लागले. ज्ञानेश कुमार यांच्यावर पक्षपातीपणाचा ताजा आरोप करण्यात आणि त्यांच्यावर महाभियोग आणण्यात तृणमूल काँग्रेसनेच पुढाकार घेतला आहे.

टी. एन. शेषन मुख्य निवडणूक आयुक्तपदी असताना त्यांनी निवडणूक पद्धतीत सुधारणा करीत चांगला पायंडा पाडला होता. शेषन ते ज्ञानेश कुमार अशी तुलना केल्यास हा आलेख घसरल्याचेच दिसते. शेषन यांनी निवडणूक व्यवस्थेत बदल केला म्हणून ते टीकेचे धनी झाले होते. पण सामान्य नागरिकांनी शेषन यांच्या सुधारणांचे स्वागतच केले होते. मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील पक्षपातीपणाचा आरोप खरे तर अधिकच गंभीर. विरोधकांनी मांडलेला महाभियोगाचा प्रस्ताव दाखल करून घ्यायचा की नाही हे लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभेच्या सभापतींवर अवलंबून असते. मुख्य निवडणूक आयुक्तांसारख्या महत्त्वाच्या घटनात्मक पदावरील अधिकाऱ्याविरोधात महाभियोग मांडण्याची वेळ आल्याचे एखाद्या पक्षास वाटते आणि अन्य विरोधी पक्षांचा त्यास पाठिंबाही मिळतो, हीच या पदावरील अधिकाऱ्याच्या कारभारावरील टिप्पणी मानावी लागेल.



सेन्सेक्स: ७८,२०५.९८ ▲६३९.८२ (०.८२%)

निफ्टी: २४,२६१.६० ▲२३३.५५ (०.९७%)

तेल $: ९०.२६ (▼ -९.०३%)

डॉलर ₹: ९१.८५ (▼ -३६ पैसे)

सोने: १,६२,९७५ (▲२,६७६)

चांदी: २,७७,०८३ (▲९,८४०)

# गिफ्ट सिटीतील पहिला 'आयपीओ' लांबणीवर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** आखातात अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात भडकलेल्या युद्धाच्या वणव्यामुळे एक्सईडी एक्झिक्युटिव्ह डेव्हलपमेंटने प्रस्तावित केलेली प्रारंभिक समभाग विक्री (आयपीओ) पुढे ढकलली आहे.

गुजरातमधील गिफ्ट सिटीच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र अर्थात आयएफएससीमधून खुला होत असलेला हा पहिलावहिला आयपीओ ६ मार्चला बाजाराला धडक देणार होता. आता मात्र तो १६ मार्चपासून गुंतवणूकदारांसाठी खुला होत आहे. या आयपीओसाठी प्रति समभाग १० ते १०.५ डॉलरचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. २४ मार्चपर्यंत आयपीओसाठी बोली लावता येईल.

डॉलर-मूल्यांकित आयपीओ आयएफएससीअंतर्गत पात्र गुंतवणूकदारांसाठी खुला असेल, ज्यामध्ये अनिवासी भारतीय (एनआरआय), परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार (एफपीआय), संस्थात्मक गुंतवणूकदार आणि इतर परवानगी असलेल्या परदेशी संस्था/व्यक्तींचा समावेश असेल.

हे समभाग एनएसई इंटरनॅशनल एक्सचेंज आणि गिफ्ट सिटी येथील इंडिया इंटरनॅशनल एक्सचेंजवर सूचिबद्ध केले जातील आणि परदेशी गुंतवणूकदारांना लक्ष्य करून डॉलर-मूल्यांकित साधन म्हणून त्यात व्यवहार केले जातील.

**कंपनी काय करते?**

एक्सईडी एक्झिक्युटिव्ह डेव्हलपमेंट ही एक्झिक्युटिव्ह शिक्षणाची एक आघाडीची कंपनी आहे, जी २५ हून अधिक देशांमध्ये आस्थापनांतील वरिष्ठ व्यावसायिकांना सेवा देते. कंपनीचे कार्य भारत, आग्नेय आशिया आणि उत्तर अमेरिकेत पसरलेले आहे. व्यवस्थापकीय किंवा कार्यकारी स्तरावरील व्यावसायिकांसाठी किंवा त्या पदासाठी प्रयत्नशील असलेल्या व्यक्तींसाठी कंपनीने खास कार्यक्रम आणि अभ्यासक्रम तयार केले आहेत. कार्यकारी शिक्षण कार्यक्रम हे साधारणपणे अल्पकालीन, पदवी नसलेले अभ्यासक्रम असतात.

# चिनी गुंतवणुकीसाठी वाट खुली

## शेजारी राष्ट्रांसाठी 'एफडीआय'चे नियम शिथिल

**पीटीआय, नवी दिल्ली**

**केंद्र सरकारने** भारताशी सीमा भिडलेल्या चीनसह शेजारी राष्ट्रातून थेट विदेशी गुंतवणुकीसंदर्भात (एफडीआय) नियम शिथिल करण्याचा निर्णय मंगळवारी घेतला. यातून चीनमधून होणाऱ्या गुंतवणुकीवर गेल्या काही वर्षांपासून लागू असलेले निर्बंध हटविले जाण्याचे संकेत आहेत.

करोना साथीच्या काळात अडचणीत असलेल्या देशातील कंपन्यांना सावज करून, संधीसाधू ताबा आणि विलीनीकरण व्यवहारांना पायबंद घातला जावा, या उद्देशाने जून २०२० मध्ये सरकारने देशाशी सीमा भिडलेल्या शेजारील राष्ट्रांमधील गुंतवणूकदारांना कोणत्याही क्षेत्रात गुंतवणुकीपूर्वी सरकारची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य केले होते. आता या २०२० च्या 'प्रेस नोट ३'मधील कठोर तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भारताशी सीमा भिडलेल्या असलेल्या देशांमध्ये चीन, बांगलादेश, पाकिस्तान, भूतान, नेपाळ, म्यानमार आणि अफगाणिस्तान यांचा समावेश आहे. यापूर्वी पाकिस्तान आणि बांगलादेश या दोन शेजारील राष्ट्रांसाठी 'सरकारी परवानगी'चा नियम लागू होता. करोनाकाळात त्यात चीनचाही समावेश करण्यात आला.

एप्रिल २००० ते डिसेंबर २०२५ या 'प्रेस नोट ३' तरतुदी लागू असलेल्या काळात भारतात झालेल्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीच्या प्रवाहात चीनचा वाटा फक्त ०.३२ टक्के (२.५१ अब्ज अमेरिकी डॉलर) आहे. जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यामध्ये झालेल्या भीषण संघर्षानंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते, दोन्ही देशांदरम्यान सीमेवर लष्करी संघर्ष काही काळ सुरू होता. या तणावानंतर, भारताने टिकटॉक, वीचॅट आणि अलिबाबाच्या यूसी ब्राउझर सारख्या २०० हून अधिक चिनी मोबाइल ॲप्सवर बंदी घातली. तसेच चीनमधील गुंतवणुकीवरही निर्बंध आणले.

चीनकडून कमीत कमी थेट परकीय गुंतवणूक आली असली तरी, त्या देशाशी भारताचा द्विपक्षीय व्यापार या काळात अनेक पटीने वाढला आहे. चीन भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, भारताची चीनला होणारी निर्यात १४.५ टक्क्यांनी कमी होऊन १४.२५ अब्ज अमेरिकी डॉलर झाली, जी २०२३-२४ मध्ये १६.६६ अब्ज अमेरिकी डॉलर होती.



### यादीची प्रक्रिया कशी?

भारतात मोठ्या प्रमाणात येणारी थेट परदेशी गुंतवणूक स्वयंचलित मंजुरीच्या मार्गाने येते. गेल्या काही वर्षांत परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी नियम शिथिल केले गेले. काही क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारच्या परवानगीविना परदेशी मालकीच्या कंपन्यांना भारतीय कंपन्यांमध्ये थेट गुंतवणूक करता येते. तर संरक्षण, दूरसंचार, औषधनिर्मिती, अणुऊर्जा, अवकाश तंत्रज्ञान आदी १७ क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय थेट गुंतवणूक करता येत नाही.

# तेलातील नरमाईने बाजारांत चैतन्य

## सेन्सेक्सची ६४० अंशांची कमाई

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाच्या किमतीत झालेल्या घसरणीने जागतिक बाजारांमध्ये चैतन्य परतले. याचे सकारात्मक पडसाद देशांतर्गत बाजारावर उमटल्याने सेन्सेक्स आणि निफ्टी मंगळवारच्या सत्रात दमदार वाढीने बंद झाले.

आखाती देशांमधील युद्ध आणि त्या परिणामी उद्भवलेले इंधन संकट लवकरच संपुष्टात येण्याच्या अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या संकेतांमुळे खनिज तेलाच्या किमती जवळपास ७ टक्क्यांनी नरमल्या. सोमवारी पिंपामागे १२० डॉलरपर्यंत कडाडलेले तेल हे मंगळवारी ९२ डॉलरपर्यंत खाली आले. यातून वधारलेल्या जागतिक शेअर बाजारातील सकारात्मकतेचे स्थानिक बाजारातही प्रमुख निर्देशांकांत १ टक्क्यांनी वाढीचे प्रतिबिंब उमटले. मंगळवारच्या सत्रअखेर सेन्सेक्स ६३९.८२ अंशांनी म्हणजेच ०.८२ टक्क्यांनी वधारून ७८,२०५.९८ पातळीवर स्थिरावला. दिवसभरात त्याने ९६०.०९ अंशांची कमाई करत ७८,५२६.२५ पातळीवर बंद झाला. निफ्टी २३३.५५ अंशांनी वधारून २४,२६१.६० पातळीवर बंद झाला.



युद्धाच्या समाप्तीच्या शक्यतेचे संकेत देणाऱ्या ट्रम्प यांच्या टिप्पण्यांनंतर, खनिज तेलाच्या किमतीत झालेल्या तीव्र घसरणीने जागतिक स्तरावर गुंतवणूकदारांच्या भावनांमध्ये झालेल्या सुधारणेचे प्रतिबिंब दलाल स्ट्रीटवर पडले. देशांतर्गत आघाडीवर बहुतांश क्षेत्रांतील समभाग सकारात्मक पातळीवर बंद झाले, असे जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले.

सेन्सेक्समधील आघाडीच्या ३० कंपन्यांपैकी महिंद्र अँड महिंद्र, इंटरग्लोब एव्हिएशन, मारुती, आयसीआयसीआय बँक, एशियन पेंट्स आणि अल्ट्राटेक सिमेंट यांचे समभाग वधारून बंद झाले. तर इन्फोसिस, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि भारती एअरटेलमधील समभाग घसरणीने तेजीला मर्यादित केले. मुंबई शेअर बाजाराच्या आकडेवारीनुसार, सोमवारी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) ६,३४५.५७ कोटी रुपये मूल्याचे समभाग विक्री केले. तर, देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ९,०१३.८० कोटी रुपयांचे शेअर खरेदी केले.

# सोने-चांदी ईटीएफची चमक फिकी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** जागतिक पातळीवरील अस्थिरतेची झळ सोने-चांदी एक्स्चेंज ट्रेडेड फंड अर्थात ईटीएफला देखील बसली आहे. गुंतवणूकदारांनी नफावसुलीला सुरुवात केल्याने, सोने-चांदी ईटीएफमधील गुंतवणुकीचे प्रमाण सरलेल्या फेब्रुवारीमध्ये घटले आहे.

जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, सुरक्षित पर्याय म्हणून सोन्या-चांदीचे वाढलेल्या आकर्षणाने गेल्या काही महिन्यांत ईटीएफमधील ओघ विक्रमी प्रमाणात वाढल्याचे आढळून आले. तथापि, असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया अर्थात ॲम्फीच्या आकडेवारीनुसार, फेब्रुवारी २०२६ मध्ये गोल्ड ईटीएफमध्ये सुमारे ५,२५५ कोटी रुपयांचा ओघ नोंदवला गेला, जो जानेवारीमध्ये या श्रेणीत आलेल्या २४,०३९.९६ कोटी रुपयांच्या तुलनेत खूपच कमी आहे. त्याचप्रमाणे चांदीच्या किमतीत तीव्र वाढ आणि वाढत्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारीमध्ये भारतातील चांदीच्या ईटीएफमध्ये २७ महिन्यांत पहिल्यांदा गुंतवणूक काढून घेण्यात आली.



सरलेल्या महिन्यात चांदीच्या ईटीएफमध्ये ४,६२८ कोटी रुपयांचा एकूण निधी आला, तर ५,४५५ कोटी रुपयांच्या चांदीच्या ईटीएफची विक्री (रिडेम्पशन) झाली. ज्यामुळे ८२६.३ कोटी रुपयांचा निव्वळ निधी बाहेर पडला. नोव्हेंबर २०२३ नंतर पहिल्यांदाच गुंतवणुकीपेक्षा निधी काढून घेण्याचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. आधीच्या जानेवारी महिन्यांतही ९,४६३.४० कोटी रुपयांच्या सिल्व्हर ईटीएफची विक्री करण्यात आली.

गेल्या काही महिन्यांत चांदीच्या किमती वाढल्या आहेत. फेब्रुवारीमध्ये चांदीच्या किमती १० टक्क्यांनी वाढल्या, त्या आधी जानेवारीमध्ये १९ टक्के वाढ झाली आहे. २०२६ मध्ये आतापर्यंत चांदीच्या किमती सुमारे २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. डिसेंबर २०२५ मध्ये चांदी २७ टक्के आणि नोव्हेंबरमध्ये १६ टक्क्यांनी वाढली आहे.

# लोकमान्य सोसायटीचे बजाज जनरल इन्शुरन्ससोबत सामंजस्य

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**पुणे :** 'लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड'च्या पुणे विभागीय कार्यालयाचा दहावा वर्धापनदिन शनिवारी संपन्न झाला. वर्धापनदिनाचे औचित्य साधून लोकमान्य सोसायटीने आघाडीच्या बजाज जनरल इन्शुरन्ससोबत सामंजस्य करार करण्यात आला.

लोकमान्य सोसायटी सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्राहक, सभासदांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देते. त्याअनुषंगाने विमा कंपन्यांशी करार करण्यात आल्याचे लोकमान्य सोसीयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ किरण ठाकूर म्हणाले.

महिलादिनाच्या पूर्वसंध्येला लोकमान्य सोसायटीच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या असामान्य महिलांचा सन्मान सोहळाही आयोजित करण्यात आला होता.

लोकमान्य सोसायटीतर्फे संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर व विभागीय प्रमुख सुशील जाधव यांनी सर्वांचे स्वागत केले.

# इक्विटी फंडांतील ओघ ८ टक्क्यांनी वाढून २५,९७८ कोटींवर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** भारत-अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर, शेअर बाजारात वादळी अस्थिरता असताना फेब्रुवारीमध्ये इक्विटी म्युच्युअल फंडांनी २५,९७८ कोटी रुपयांचा निव्वळ ओघ आकर्षित केला, जो जानेवारीच्या तुलनेत ८ टक्क्यांनी वाढला आहे, असे उद्योग संघटना 'ॲम्फी'ने मंगळवारी आकडेवारीतून जाहीर केले.



फेब्रुवारीमध्ये म्युच्युअल फंड उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील मालमत्ता (एयूएम) जानेवारीतील ८१ लाख कोटी रुपयांवरून, सुमारे ८२ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. भारत-अमेरिका व्यापार करारामुळे समभागसंलग्न अर्थात इक्विटीमध्ये हा सकारात्मक ओघामुळे हे शक्य झाले, असे ॲम्फीचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेंकट एन चालसानी म्हणाले.

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे विद्यमान मार्च महिन्यात अस्थिरता दिसण्याची शक्यता आहे. मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेची घोडदौड कायम राहण्याची आशा आहे, अशी त्यांनी पुस्ती जोडली.

जाहीर आकडेवारीनुसार, फेब्रुवारीमध्ये इक्विटीचा ओघ २५,९७८ कोटी रुपयांवर पोहोचला, जो मागील महिन्यात दिसून आलेल्या २४,०२८ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. इक्विटी योजनांमध्ये, फ्लेक्सी कॅप फंडांनी सर्वाधिक ६,९२४.६५ कोटी रुपयांचा निव्वळ प्रवाह आकर्षित केला, त्यानंतर मिड-कॅप फंडांनी ४,००३ कोटी रुपयांचा आणि स्मॉल-कॅप फंडांमध्ये ३,८८१ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली.

### एसआयपीचा ओघ आटला?

फेब्रुवारीमध्ये 'एसआयपी'मधील (सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स) गुंतवणुकीचा प्रवाह मागील महिन्यातील ३१,००० कोटी रुपयांवरून किंचित कमी होऊन सुमारे २९,८४५ कोटी रुपयांवर घसरला. फेब्रुवारी हा २८ दिवसांचा महिना असल्याने एसआयपी संकलनावरही त्याचा परिणाम झाला आहे. ज्या गुंतवणूकदारांचे मासिक एसआयपीचे हप्ते हे २९, ३० आणि ३१ तारखेला जातात, ते मार्च महिन्याच्या सुरुवातीला जमा झाल्याने, त्याचा फेब्रुवारी महिन्यातील संकलनावर परिणाम झाला असण्याची शक्यता आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे**
**Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere**
(Established by Government of Maharashtra and Governed by Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act No. XXIX of 2024)
विद्याविहार, लोणेरे- रायगड ४०२१०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere-Raigad 402103 (Maharashtra)
Tel. (02140) 275142, Ph. Student Helpline : 02140-275212
Web site : www.dbatu.ac.in, E-mail : registrar@dbatu.ac.in

No. DBATU/Estt/Adv./Adhoc/2026/ Date : 10.03.2026

**WALK-IN-INTERVIEW**

**APPLICATIONS** are invited from eligible candidates for the various posts at Diploma/UG/PG programs. There are vacancies for the posts of Professor of Practice, Assistant Professor and Lecturer in various branches of Engineering & Technology, Science, The qualification will be as per AICTE, UGC and Maharashtra Government norms. Also there are some vacancies for non-teaching posts for which qualification will be as per the norms of Government of Maharashtra. These appointments will be purely on Contract basis for 11 months or till full time recruitment whichever is earlier. The written test will be conducted. if required, before the interview. For details, refer to the University web site **www.dbatu.ac.in**

Sd/-
**(Dr. Amit P. Shesh)**
I/c Registrar

**परिशिष्ट-२**
**वर्तमानपत्रातील जाहिरातीचा नमुना (परिच्छेद ४.४.२ पहावा)**

Directorate of Accounts & Treasuries, Finance Department, Government of Maharashtra

Notice for Tender - **Cyber Security Audit - Security and Compliance Audit for IFMS**

Directorate of Accounts & Treasuries, Finance Department, Government of Maharashtra, invites proposals from CERT-In Empanelled reputed and experienced companies/ Agencies to participate in the competitive bidding process to **Cyber Security Audit - Security and Compliance Audit for IFMS** Systems managed by Directorate of Accounts & Treasuries, Finance Department, Government of Maharashtra.

For the detailed Tender document, Interested bidders should visit Bid No. GeM/2026/B/7305041 on GeM Portal

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 25/03/2026 upto 4.00 p.m.

Sd/-
(Director)
Directorate of Accounts & Treasuries
Government of Maharashtra

डीजीआयपीआर २०२५-२६/६४६५

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्व.बांधकाम विभाग
मुदतवाढ सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर - ६ मधील मौजे मोघरपाडा व कावेसर येथील भूखंडावर ठाणे व्हिविंग टॉव्हर अँण्ड कन्व्हेंशन सेंटर व सिबीडी (विस्तारीत) चा विकास व बांधकामासाठी पीपीपी (Construction And Development) माध्यमातून करणेबाबतच्या एका कामाकरिता ऑनलाईन निविदा ठामपा/पिआरओ/पिडब्ल्युडी - मु/११८६/२०२५-२६ दि. १२/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामी ऑनलाईन निविदा स्विकारणेची मुदत दि. २९.१२.२०२५ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत होती. सदर कामी ऑनलाईन निविदा विक्रीची मुदत दि.१३/०३/२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत वाढविण्यात आली असून निविदा स्विकारणेची मुदत दि. १३/०३/२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत वाढविढण्यात येत आहे. सदर निविदा शक्य झाल्यास दि. १७/०३/२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजता उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/१२७८/२०२५-२६ सही/-
दि:१०.०३.२०२६ नगरअभियंता
Pls visit our oficial web-site ठाणेमहानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**मालमत्ता कर वेळेत भरा...कारवाईची अप्रिय घटना टाळा !**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
विद्युत विभाग
फेरनिविदा-१
निविदा सूचना क्रमांक: ठा.म.पा./विद्युत/नि.सु/१७/२०२५-२६

ठा.म.पा./पी.आर.ओ./जाहिरात/११५२/२०२५-२६ दि.०५/०२/२०२६ अन्वये विविध कामांसाठी निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा सुचनेतील काम क्र.१ ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ई-व्हेईकलसाठी PPP तत्वावर पब्लिक चार्जिंग स्टेशन (PCS) उभारणी करणे या कामी फेरनिविदा मागविणेत येत आहे. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.११/०३/२०२६ ते दि.२५/०३/२०२६ या कालावधीत मागविण्यात येत आहे. निविदा ई टेंडरींग पध्दतीने https://mahatenders.gov.in वर दि. २५/०३/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० या वेळेत स्विकारण्यात येतील व निविदा दि. २५/०३/२०२६ रोजी दुपारी ३.३० या वेळेत उघडण्यात येतील. निविदेतील इतर अटी शर्थी मूळ निविदा सुचना प्रमाणे राहतील.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/१२८५/२०२५-२६ सही/-
दि:१०.०३.२०२६ उपनगर अभियंता (विद्युत)
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**मालमत्ता कर वेळेत भरा...कारवाईची अप्रिय घटना टाळा**

**पश्चिम रेल्वे**
**विद्युत काम**

वरि. विभागीय विद्युत अभियंता (सब), पश्चिम रेल्वे, मुंबई सेन्ट्रल, मुंबई - ४०० ००८ **ई-निविदा सूचना क्र. डब्ल्यूआर-एमएमसीटीओईएसयूबी(ईएसओटी)/२४/२०२५** मागवीत आहेत. **कामाचे नाव: चर्चगेट - विरार अनुभाग :** रोड ओव्हर ब्रिज/ फूट ओव्हर ब्रिजेसखाली कंपोझिट हाय व्होल्टेज इंस्युलेशन कोटिंगचा पुरवठा आणि वापर. **कामाचे अंदाजे मूल्य:** रु. १,१९,५४,४५०/-. **बोली सुरक्षा:** रु. २,०९,८००/-. **सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ :** विहित स्वरूपात ०१.०४.२०२६ रोजी १५:०० वा. नंतर नाही. **उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** ०१.०४.२०२६ रोजी १५:३० वा. संकेतस्थळ तपशिलः निविदा **www.ireps.gov.in** संकेतस्थळाद्वारे पाहता आणि सादर करता येतील. 1199

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**मध्य रेल्वे**
**विविध कामे**

**खुली निविदा सूचना क्र. उप मुख्य अभि./जीसी/केव्हायएन-एएसओ/०१, दि. ०५.०३.२०२६.** उप सीई(सी) जीसी ह्यांचे कार्यालय, रिझर्व्हेशन ऑफिस मागे, जवाहर मार्ग, घाटकोपर (प), मुंबई ४०००७७ टेल/ फॅक्स: २५०१०३१५/ ६६००६ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने खालील कामासाठी नामांकित कंत्राटदारांकडून **"ई-निविदा"** मागवित आहेत: **कामाचे नाव :** कल्याण - आसनगाव प्रकल्पादरम्यान ४ थ्या लाईनच्या तरतूदीसंदर्भात सर्व्हिस बिल्डींग, निवासी क्वार्टर्स आणि विविध किरकोळ काम (दोन लिफाफा पद्धत). **अंदाजे मूल्य:** रु. ३७,९८,६४,०१९.८७. **इसारा रक्कम :** रु. २०,४९,३००.०० **पूर्तता कालावधी:** १२ (बारा) महिने पावसाळ्यासह. **निविदा अर्जाचे शुल्क:** रु. ०.०० **निविदा कागदपत्रांची उपलब्धता:** उपरोक्त कामासाठी निविदा कागदपत्रे **www.ireps.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. **निविदा सादरीकरण आणि उघडण्याचा दिनांक आणि वेळ :** सर्वार्थाने पूर्ण असलेल्या ई-निविदा उपरोक्त नमूद संकेतस्थळावर २७.०३.२०२६ रोजी ११.०० वा. पर्यंत अपलोड करावेत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. **निविदाकारांसाठी महत्वाच्या टीप:** (ए) (अ) संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांची ऑफर सादर करण्यापूर्वी, त्यांनी अटी आणि शर्ती, पात्रता निकष, ईएमडीची किंमत सादर करण्याची पद्धत आणि निविदाकृत कागदपत्रे यासंबंधी निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. (बी) मध्य रेल्वेने अलीकडेच "ई-निविदा" प्रणाली सुरू केली आहे. सर्व इच्छुक निविदाधारकांना प्रथम आयआरईपीएस संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर नोंदणी करणे आवश्यक आहे. (सी) वेळोवेळी जारी केलेले निविदा दस्तऐवज आणि शुद्धिपत्रक निविदा उघडण्याच्या किमान १५ दिवस आधी वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि ते या संकेतस्थळावर पाहता येतील.

**भारतीय विमानतळ आर्थिक नियामक प्राधिकरण (एईआरए)**
**भारत सरकार**
**तिसरा मजला, उडान भवन, सफदरजंग एअरपोर्ट्स नवी दिल्ली - ११०००३.**
**फोन - ०११-२४६९५०४४**

**जाहीर सूचना**

**प्रथम नियंत्रण कालावधीकरिता (०१.०४.२०२६ ते ३१.०३.२०३१) नॉएडा इंटरनॅशनल एअरपोर्ट, जेवार करिता वैमानिक सेवांकरिता दर निश्चित करण्याबाबत भागधारकांची सल्लामसलत सभा**

भारतीय विमानतळ आर्थिक नियामक प्राधिकरणाने (एईआरए) प्रथम नियंत्रण कालावधीकरिता (०१.०४.२०२६ ते ३१.०३.२०३१) पाच वर्षांच्या प्रथम नियंत्रण कालावधी दर चक्राकरिता नॉएडा इंटरनॅशनल एअरपोर्ट, जेवार वैमानिक सेवांकरिता दर निश्चित करण्याबाबत ०६.०३.२०२६ रोजी सल्लामसलत कागदपत्र क्र. ०७/२०२५-२६ (एईआरएची वेबसाइट युआरएल www.aera.gov.in यावर उपलब्ध आहे) निर्गमित केले आहे.

एईआरए ॲक्ट, २००८ च्या सेक्शन १३(४) च्या तरतुदींच्या अनुसार सल्लामसलत कागदपत्रात समाविष्ट प्राधिकरणाचे विविध दर प्रस्ताव भागधारकांच्या सल्लामसलतीकरिता पुढे ठेवण्यात आले आहेत. या संबधित हायब्रीड मोडमधील (प्रत्यक्ष / ऑनलाईन) भागधारकांची सल्लामसलत सभा **२३ मार्च, २०२६ रोजी (सोमवार) दु. ३.०० वा.** पुढील ठिकाणी घेण्याचे निर्धारित केले आहे :

**स्टेकहोल्डर्स रुम, तिसरा मजला, उडान भवन,**
**सफदरजंग एअरपोर्ट, नवी दिल्ली - ११०००३.**

प्रवासी/ प्रवाशांची संघटना, सामान्य जनता, एअरपोर्ट ऑपरेटर्स, एअरलाईन्स, औद्योगिक संघटना/ संस्था, कार्गोकरिता स्वतंत्र सेवा पुरवठाकार, ग्राऊंड हँडलिंग फ्युअल फार्म, इ. सारख्या सर्व भागधारकांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी उक्त सभेत हजर राहावे आणि नॉएडा इंटरनॅशनल एअरपोर्ट, जेवारच्या दर प्रस्तावावरील पूर्वोक्त सल्लामसलत कागदपत्रावर त्यांचे मौलिक सूचना/ प्रतिक्रिया/ मते द्यावीत.

व्यक्तीशः सहभागी होणारी व्यक्ती (director-ps@aera.gov.in & rajan.gupta1@aera.gov.in) ईमेलद्वारा नाव, ई-मेल पत्ता, मोबाईल नंबर, वाहन क्रमांक यासह २० मार्च, २०२६ पर्यंत "एईआरए"कडे त्यांचे निश्चितीकरण पत्र पाठवू शकतील. ऑनलाईन लिंक "एईआरए वेबसाइटवर (https://aera.gov.in) टॅब "न्यूज अँड अनाउंसमेंट्स" अंतर्गत भागधारकांच्या समोर शेअर केले जाईल.

स्वाक्षरी/-
CBC 03112/ 12/ 0014/ 2526 सचिव, एईआरए

**MAHAGENCO**
**E-Tender Notice**

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO(Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | CHP-B/ Rfx No. 3000066533/Work of rail line management for indoor railway track of CSTPS railway siding by mechanized means and other allied works at CSTPS Chandrapur. / Rs.16712456/- |
| 2 | C&I-III / Rfx No. 3000066592(Refloated) / Procurement of Turbovisory System spares of Main Turbine for C&I-III, Unit-8&9, CSTPS, Chandrapur / Rs.6663991/- |
| 3 | C&I-III/ Rfx No.3000066591(Refloated) /Procurement of Coplanar pressure transmitters for Generator Stator & Bushing Flow at C&I-III, Unit-8&9, CSTPS, Chandrapur/ Rs.813000/- |
| 4 | EM-I /Rfx No.3000066673/Annual contract for Work of rehabilitation of various Electrical Installations at EM-I for CSTPS, Chandrapur / Rs.982147.50/- |
| 5 | BM-I / Rfx No. 3000066675 / Annual maintenance contract for various ESP internal/external works in unit 3 to 4 for 2 years / Rs.2911732.82/- |
| 6 | FF/ Rfx No. 3000066681/Annual Maintenance Contract for Servicing of Vehicle Mounted & Portable Fire Pumps on Quarterly basis (1Quarter-3 Months) in CSTPS, Chandrapur / Rs.408769.36/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr.No.01 to 06)** For any query Contact No.8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

**कुळगांव बदलापूर नगर परिषद**
नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ, जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाइट : kbmc.gov.in.

जावक क्र.:/कुबनप/साबां/ २९६३/२०२५-२६ दिनांक : ०९.०३.२०२६

**जाहीर निविदा सूचना क्र. ९३/२०२५-२६**

कुळगांव-बदलापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत खालील ६ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांचे निविदा संच विक्री व स्वीकृतीचा कालावधी दि. ११.०३.२०२६ ते दि. २३.०३.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा शक्य झाल्यास दि. १४.०३.२०२६ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील. निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगर परिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

शिक्का

सही/-
**(मारुती गायकवाड)**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगर परिषद**
**कुळगांव**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
इंजिनिअरिंग हब बिल्डिंग, तळमजला, वरळी नाक्याजवळ, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८.
नं. उप प्रमुख अभि./ ९०८६/ वाहतूक दिनांकित ०९ मार्च, २०२६

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त याखाली दर्शविल्यानुसार कामाकरिता ई-निविदा मागवीत आहेत :-

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.त) | निविदा आयडी | पूर्तता कालावधी | इरठे रु. | छाननी शूल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शहरातील संलग्न कामे तसेच विविध मोठे व छोट्या रस्त्यांना थर्मोप्लास्टिक पेंट लावणे/ तरतूद करणे याकरिता द्वि-वार्षिक निविदा. | रु. ५०,००,००,०००/- | 2026_MCGM_1275025_01 | २ वर्षे | रु. ५०,००,०००/- | रु. ३०,२५०/- + १८% जीएसटी |
| २. | पूर्व उपनगरातील संलग्न कामे तसेच विविध मोठे व छोट्या रस्त्यांना थर्मोप्लास्टिक पेंट लावणे/ तरतूद करणे याकरिता द्वि-वार्षिक निविदा. | रु. ५०,००,००,०००/- | 2026_MCGM_1275030_01 | २ वर्षे | रु. ५०,००,०००/- | रु. ३०,२५०/- + १८% जीएसटी |
| ३. | पश्चिम उपनगरातील संलग्न कामे तसेच विविध मोठे व छोट्या रस्त्यांना थर्मोप्लास्टिक पेंट लावणे/ तरतूद करणे याकरिता द्वि-वार्षिक निविदा. | रु. ५०,००,००,०००/- | 2026_MCGM_1275032_01 | २ वर्षे | रु. ५०,००,०००/- | रु. ३०,२५०/- + १८% जीएसटी |

वरील बोलीकरिता, बोली सुरू होणारी तारीख - ११.०३.२०२६ रोजी स. ११.०० वा पासून व बोली विक्री बंद होणारी तारीख - २५.०३.२०२६ रोजी दु. १२.०० वा पर्यंत.

अधिक तपशीलाकरिता, कृपया https://mahatenders.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

स्वाक्षरी/-
पीआरओ/ ३२३०/ एडिव्हि/ २०२५-२६ येता कणकण तापाची, तपासणी करून घ्या रक्ताची. उप प्रमुख अभियंता (वाहतूक)

# दिग्गजांच्या पंगतीत स्थान अभिमानाचे!

## विश्वविजयी कर्णधारांत नाव जोडले जाण्याबाबत सूर्यकुमारची प्रतिक्रिया

पीटीआय, मुंबई

**भारताला ट्वेन्टी-२०** विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद मिळवून दिल्यानंतर दोन दिवसांनी कर्णधार सूर्यकुमार यादवला या ऐतिहासिक यशाची हळूहळू जाणीव होत असून त्यामुळे आपले नाव कपिल देव, महेंद्रसिंह धोनी आणि रोहित शर्मा यांसारख्या दिग्गजांच्या यादीत सामील झाल्याचा विशेष अभिमान वाटत असल्याचे त्याने सांगितले.

अहमदाबाद येथे रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा आणि एकूण तिसऱ्यांदा ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा जिंकली. अशी कामगिरी करणारा भारत हा पहिलाच संघ ठरला. या ऐतिहासिक कामगिरीनंतर भारताचा कर्णधार सूर्यकुमारचे मंगळवारी मुंबईत आगमन झाले. त्यानंतर त्याने वृत्तसंस्थेशी संवाद साधताना यशस्वी मोहिमेचा आणि पुढील ध्येयांचा आढावा घेतला.

''२०२४ आणि २०२६ असे सलग दोन विश्वचषक जिंकणे ही खूप खास भावना आहे. २०२४ मध्ये जेव्हा आम्ही जिंकलो, तेव्हा २०२६ मध्ये घरच्या मैदानावर पुन्हा हा पराक्रम करण्याची इच्छा होती. त्यात यशस्वी झालो याचा खूप आनंद आहे,'' असे सूर्यकुमारने सांगितले.

क्रिकेटच्या कोणत्याही प्रारूपात भारताला विश्वचषक जिंकवून देणारा सूर्यकुमार हा चौथा कर्णधार ठरला. यापूर्वी कपिल देव (१९८३ एकदिवसीय), धोनी (२००७ ट्वेन्टी-२०, २०११ एकदिवसीय) आणि रोहित (२०२४ ट्वेन्टी-२०) या कर्णधारांनी भारताला विश्वविजयी केले होते. या दिग्गजांच्या पंगतीत स्थान मिळणे आपल्यासाठी खूप खास आणि अभिमानाचे असल्याचे सूर्यकुमारने नमूद केले.

''दिग्गजांच्या यादीत आपले नाव घेतले जाते, ही खूप खास गोष्ट आहे. ही भावना हळूहळू उमजत आहे. पुढेही भारताला आणखी जेतेपदे मिळवून देण्यासाठी मी नक्कीच प्रयत्न करेन,'' असे सूर्यकुमार म्हणाला.

अंतिम लढतीनंतर भारतीय संघाने रात्रभर जल्लोष केल्याचे सूर्यकुमारने सांगितले. ''आम्ही सकाळी आठ वाजेपर्यंत जागे होतो आणि भरपूर आनंद साजरा केला.''

### ऑलिम्पिक ध्येयाचा पुनरुच्चार

अंतिम लढतीनंतरच्या पत्रकार परिषदेत सूर्यकुमारने ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणे हे आपले पुढील लक्ष्य असल्याचे सांगितले होते. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्याने याचा पुनरुच्चार केला. ''सध्या थोडा आराम करून मग 'आयपीएल'साठी तयारी करणार आहे. पुढील चक्रात २०२८ मध्ये लॉस एंजलिस ऑलिम्पिक स्पर्धा होणार आहे. त्याचीही आम्ही जोमाने तयारी करू. तिथे सुवर्णपदक जिंकणे हे आमचे ध्येय आहे. त्याच वर्षी होणारा ट्वेन्टी-२० विश्वचषक जिंकण्यात यश आले, तर ते आमच्यासाठी खूप मोठे यश असेल,'' असे सूर्यकुमारने सांगितले.




### धोनीचा मोलाचा सल्ला

यंदाच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेपूर्वी सूर्यकुमारने माजी विश्वविजेता कर्णधार धोनीशी चर्चा केली होती. त्याने दिलेले सल्ले आपल्यासाठी मोलाचे ठरल्याचे सूर्यकुमारने सांगितले. ''स्पर्धेपूर्वी मी धोनीभाईला भेटलो होतो. 'आयसीसी' स्पर्धेकडे कसे पाहायचे, त्याची तयारी कशी करायची याबद्दल त्याने मार्गदर्शन केले. 'आपल्याकडे चांगला संघ आहे, फक्त धाडसाने खेळा, आपण नक्की जिंकू,' असे त्याने मला सांगितले. विजय मिळाल्यानंतर त्याची प्रतिक्रिया खूपच छान होती,'' असे सूर्यकुमार म्हणाला.

### 'बीसीसीआय'कडून १३१ कोटींचे बक्षीस

■ भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ट्वेन्टी-२० विश्वविजेत्या संघाला १३१ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. १५ खेळाडू, प्रशिक्षकांचा चमू आणि अन्य साहाय्यकांना ही रक्कम विभागून दिली जाणार आहे.

■ अर्थात, खेळाडूंना सर्वांत मोठा हिस्सा मिळणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले आहे. प्रत्येक खेळाडूला ६ कोटी रुपये दिले जाणार आहेत. उर्वरित ४१ कोटी रुपये इतरांना विभागून देण्यात येतील.

■ रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२४ मध्ये ट्वेन्टी-२० विश्वचषक जिंकला होता, त्यावेळी 'बीसीसीआय'कडून १२५ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात आले होते. यंदा त्यात सहा कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

# बुमराबाबत विशेष खबरदारी?

## एकदिवसीय विश्वचषकापूर्वी ट्वेन्टी-२० सामन्यांतून विश्रांतीची शक्यता

पीटीआय, नवी दिल्ली

**तारांकित वेगवान** गोलंदाज जसप्रीत बुमराने आपली अलौकिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध करताना भारताच्या ट्वेन्टी-२० विश्वविजयात निर्णायक भूमिका बजावली. आता पुढील वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताला यश मिळवायचे झाल्यास बुमराला चमकदार कामगिरी करावी लागणार असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे. बुमरा या स्पर्धेसाठी उपलब्ध असणे महत्त्वाचे मानून संघ व्यवस्थापनाने आतापासूनच त्याच्या कार्यभार व्यवस्थापनेबाबत चर्चा करायला सुरुवात केली आहे. या स्पर्धेपर्यंत त्याचा केवळ एकदिवसीय सामन्यांसाठी विचार केला जाईल आणि ट्वेन्टी-२० सामन्यांतून विश्रांती मिळेल, असे समजते.

भारतीय संघातील अनेक प्रमुख खेळाडूंनी २०२८ लॉस एंजलिस ऑलिम्पिक स्पर्धेत खेळण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली आहे. ऑलिम्पिकमधील सामने टवेन्टी-२० प्रारूपाचे असणार आहेत. मात्र, त्यापूर्वी २०२७ मध्ये एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा होणार असल्यामुळे बुमरासाठी तोपर्यंत एकदिवसीय क्रिकेट हेच प्राधान्य राहील.



'आयपीएल'चा दोन महिन्यांचा हंगाम संपल्यानंतर भारतीय संघ एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीला सुरुवात करणार आहे. 'आयपीएल'मध्ये बुमरा मुंबई इंडियन्सचे प्रतिनिधित्व करतो. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तयारीसाठी 'आयपीएल'च्या अखेरच्या टप्प्यात राष्ट्रीय निवड समिती, सर्वोच्च कामगिरी केंद्राचे प्रमुख व्ही. व्ही. एस. लक्ष्मण, प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार शुभमन गिल यांचा सहभाग असलेले संघ व्यवस्थापन पुढील टप्प्यासाठीची एक रुपरेषा तयार करेल असा अंदाज असून, यामध्ये बुमराचे कार्यभार व्यवस्थापन हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा असणार आहे.

''आयसीसी स्पर्धेसाठी बुमराची तंदुरुस्ती अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळेच संघ व्यवस्थापन याबाबतीत अत्यंत सावधगिरी बाळगेल यात शंका नाही. जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेचे सामने बुमरा खेळेलच. याशिवाय ट्वेन्टी-२० आणि एकदिवसीयपैकी कोणत्या प्रारूपात अधिक खेळायचे हे ठरवावे लागेल. पुढील वर्षी एकदिवसीय विश्वचषक होणार आहे. त्यामुळे साहजिकच त्याला ट्वेन्टी-२० क्रिकेटपासून दूर ठेवून अधिक एकदिवसीय सामने कसे खेळता येतील याचा संघ व्यवस्थापनाला विचार करावा लागेल,'' असे 'बीसीसीआय'मधील सूत्राकडून सांगण्यात आले.

एकदिवसीय विश्वचषकापूर्वी भारतीय संघ साधारण ३० ते ३५ सामने खेळणार आहे. अशा वेळी संघ व्यवस्थापन बुमराबाबत अधिक खबरदारी बाळगणे अपेक्षित आहे.

### भारताचा व्यग्र कार्यक्रम

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा पुढील वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये आफ्रिकेत होणार आहे. तोपर्यंत द्विदेशीय मालिकांचे वेळापत्रक अत्यंत व्यग्र असले, तरी कार्यभार व्यवस्थापनाचा भाग म्हणून बुमराला ट्वेन्टी-२० सामन्यांपासून दूरच ठेवण्यात येईल. या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपान येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीही बुमराचा विचार होणार नसल्याचे समजते.

## महिला हॉकी संघाची आज वेल्सशी गाठ

**हैदराबाद :** महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेच्या पात्रता फेरीतील पहिल्या दोन सामन्यांत अपराजित राहिलेल्या भारतीय संघास उपांत्य फेरी गाठण्यासाठी आज, बुधवारी वेल्सविरुद्ध होणारा अखेरचा साखळी सामना बरोबरीत सोडवणे आवश्यक आहे.

भारतीय महिला संघ एक विजय आणि एका बरोबरीसह 'ब' गटातून चार गुणांसह अव्वल स्थानावर आहे. स्कॉटलंडचेही चारच गुण आहेत.

## दक्षिण आफ्रिका, विंडीजच्या खेळाडूंसाठी स्वतंत्र व्यावसायिक उड्डाणांची व्यवस्था

**कोलकाता :** पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतात अडकून राहिलेल्या वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघांसाठी नव्याने स्वतंत्र व्यावसायिक विमानांचे आरक्षण करण्यात आले आहे. यापूर्वी त्यांच्यासाठी आरक्षित केलेले खासगी विमान तांत्रिक आणि अन्य प्रवासाच्या अडचणींमुळे ऐनवेळी रद्द झाल्यामुळे 'आयसीसी'ला हा निर्णय घ्यावा लागला आहे. दोन्ही व्यावसायिक विमाने कोलकाता येथूनच सुटणार आहेत.

''खासगी विशेष विमानात दोन्ही संघांतील खेळाडूंना जागा मिळणे शक्य नव्हते, परंतु 'आयसीसी'ने प्रत्येकाची सोय केली आहे. 'आयसीसी'चे अध्यक्ष जय शाह यांनी वैयक्तिकरित्या खेळाडूंशी संवाद साधून त्यांना सुखरूप घरी पोहोचवण्याचे आश्वासन दिले आहे. विशेष म्हणजे वेस्ट इंडिजचे प्रशिक्षक डॅरेन सॅमी सोमवारी रात्रीच मायदेशी रवाना झाले आहेत,'' असे 'आयसीसी'मधील सूत्राकडून सांगण्यात आले.

वेस्ट इंडिजचे १२ खेळाडू आणि १० कर्मचारी, तर दक्षिण आफ्रिकेचे १२ खेळाडू आणि २ कर्मचारी सध्या भारतात आहेत.

## 'आयसीसी'कडून अर्शदीपवर दंडात्मक कारवाई

**दुबई :** ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम लढतीत न्यूझीलंडचा फलंदाज डॅरेल मिचेलवर चेंडू फेकल्याप्रकरणी भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. अर्शदीपकडून सामन्याच्या मानधनातील १५ टक्के रक्कम दंडाच्या स्वरूपात आकारली जाणार आहे.



अर्शदीपने 'आयसीसी'च्या कलम २.९ चे उल्लंघन केल्याचे अंतिम लढतीचे सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांच्या निदर्शनास आले. 'आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान चेंडू किंवा अन्य क्रिकेट साहित्य प्रतिस्पर्धी खेळाडू किंवा त्याच्या आजूबाजूला अनुचित आणि/किंवा धोकादायक पद्धतीने फेकणे,' असे या कलमात नमूद करण्यात आले आहे.

अंतिम लढतीत न्यूझीलंडच्या डावातील ११व्या षटकात हा प्रकार घडला. अर्शदीप टाकत असलेल्या या षटकातील दुसऱ्या आणि तिसऱ्या चेंडूवर मिचेलने षटकार मारला. त्यानंतर पाचव्या चेंडूवर दोघांमध्ये चकमक झाली. यावेळी मिचेलने समोरील दिशेला मारलेला चेंडू अर्शदीपने अडवला आणि चेंडू रागाने पुन्हा मिचेलच्या दिशेने फेकला. चेंडू मिचेलच्या पॅडला आदळला, परंतु अर्शदीपची ही कृती मिचेलला अजिबातच आवडली नाही. त्यानेही आपला राग व्यक्त केला. सामन्यानंतर अर्शदीपने मिचेलची माफी मागितली. मात्र, अर्शदीपच्या आधीच्या कृतीने 'आयसीसी'च्या आचारसंहितेतील नियमाचे उल्लंघन झाले होते. अर्शदीपच्या नावावर एक दोषांकही जमा झाला आहे.




हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दुरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर* (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.

बुधवार,
११ मार्च २०२६

# लोकसत्ता [मुंबई]

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### कर्जत स्थानकांसाठी पायपीट

**मुंबई :** मुंबई महानगरातील प्रवाशांसाठी पनवेल ते कर्जत नवीन दुहेरी रेल्वे मार्गिका तयार होत आहे. या मार्गातील कर्जत स्थानकाचे बांधकाम सुरू आहे. परंतु, सध्याचे कर्जत स्थानक आणि नव्या निर्माणधीन कर्जत स्थानकातील अंतर लांब असल्याने, प्रवाशांना जुन्या कर्जत स्थानकातून नव्या कर्जत स्थानकात जाण्यासाठी सुमारे अर्धा किमी पायपीट करावी लागणार आहे. वृत्त...४

### मुंबईच्या वेशीवर सर्व सुविधांयुक्त संकुल

**मुंबई :** मुंबईत प्रवेश करण्यासाठी असलेल्या चारही मार्गांच्या वेशींवर प्रवेशद्वार आणि क्लॉक टॉवर उभारण्याची सूचना महापौर रितू तावडे यांनी केली होती. या सूचनेची वेगाने अंमलबजावणी करावी यासाठी वाशी नाका, ऐरोली नाका आणि मुलुंड नाका या तीन ठिकाणी रितू तावडे यांनी मंगळवारी स्थळपाहणी केली. या वेळी येथे सर्व नागरी सेवा-सुविधायुक्त संकुल विकसित करण्याबाबत कालबद्ध आखणी करून प्रशासनाने कामकाजाला लागावे, अशी सूचना त्यांनी प्रशासनाला केली. वृत्त...४

### 'वांगणी-शेलू नको, मुंबईतच घरे हवी'

**मुंबई :** गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांसाठी वांगणी-शेलूत ८१ हजार घरे बांधली जात आहेत. मात्र या घरांना गिरणी कामगार व त्यांच्या वारसांचा विरोध असताना राज्य सरकार हा प्रकल्प पुढे रेटत आहे. गिरणी कामगारांना मुंबईबाहेर फेकण्याचा हा डाव आहे, असा आरोप करत गिरणी कामगार-वारसांनी मुंबईतच घर हवे, शेलू-वांगणी नको, अशी मागणी उचलून धरली आहे. वृत्त...४

### ठाण्याचा पारा ४१ अंशांवर

**ठाणे :** ठाणे शहरातील तापमानात मंगळवारी दोन अंशांनी वाढ होऊन ४१ अंशापर्यंत पोहोचले. तप्त झळांमुळे ठाणेकरांची काहिली झाली. या वर्षी मार्च ते मे या कालावधीत कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागानेही ९ व १० मार्च रोजी उष्णतेच्या लाटांचा अंदाज वर्तविला होता.

ठाणे शहरात १ मार्च रोजी कमाल तापमान ३३.४ तर किमान तापमान २२.१ अंश इतके होते. यानंतर मात्र तापमानात वाढ होण्यास सुरवात झाली. ५ मार्चला शहरातील तापमानाचा पारा ३९ अंशावर पोहचला. गेले चार दिवस हेच तापमान कायम होते. मात्र, १० मार्च रोजी शहरातील तापमानात दोन अंशाने वाढ होऊन ते कमाल तापमान ४१.१ अंशावर पोहचले.

# आता पावही दुरापास्त

## इंधन तुटवड्याचा स्वच्छ इंधनावरील बेकऱ्यांना फटका

**इंद्रायणी नार्वेकर, लोकसत्ता**

**मुंबई :** युद्धामुळे व्यावसायिक गॅसची टंचाई निर्माण झाल्याचा फटका पावनिर्मितीलाही बसणार आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबईतील कोळशावर चालणाऱ्या बेकऱ्या स्वच्छ इंधनावर म्हणजेच एलपीजी गॅसवर परावर्तित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नव्याने रुपांतरित झालेल्या या बेकऱ्या आता संकटात सापडल्या आहेत. जुन्या भट्ट्याही तोडून टाकल्यामुळे येत्या एक दोन दिवसांत पावही मिळणे मुश्कील होणार आहे. त्यामुळे वडापाव, बनमस्का हे पदार्थ देखील मुंबईकरांना मिळणे अवघड होणार आहे.

लाकूड व कोळसा यांचा इंधन म्हणून उपयोग करणा-या भट्टी (बेकरी), हॉटेल्स, उपाहारगृहे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्यामुळे उच्च न्यायालयाने गेल्यावर्षी जानेवारी महिन्यात सर्व बेकऱ्यांना स्वच्छ इंधनावर परावर्तित करण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाची अंमलबजावणी मुंबई महापालिका करीत आहे. मुंबई महापालिकेने या सर्व बेकऱ्यांना स्वच्छ इंधनावर रुपांतरित करण्यासाठी १५ जानेवारीपर्यंतची मुदत दिली होती. त्यामुळे आतापर्यंत जवळपास ८० ते ९० टक्के बेकऱ्या या स्वच्छ इंधनावर विशेषतः एलपीजी गॅसवर परावर्तित झाल्या आहेत. विजेवरील ओव्हनपेक्षा बहुतांशी बेकऱ्या या एलपीजी सिलेंडरवर चालतात. मात्र आखातातील युद्धामुळे देशात, राज्यात व्यावसायिक सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे बेकरी उद्योगालाही या युद्धाची झळ बसणार आहे.



### दुहेरी नुकसान

- मुंबई बेकर्स असोसिएशनचे मोहम्मद फारूख शाह यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे बहुतांशी बेकरी या स्वच्छ इंधनावर परावर्तित झाल्या आहेत. जुन्या भट्टी तोडून टाकण्यात आल्या आहेत. त्यातच आता सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्यामुळे बेकरी बंद ठेवण्यापलिकडे आम्हाला आता पर्याय नाही.
- येत्या एकदोन दिवसात पावाचीही टंचाई मुंबईत दिसेल. भट्टीवरील बेकरी होत्या तेव्हा जळणासाठी लाकूड, पुठ्ठा काहीही टाकून भट्टी पेटवता येत होती. आता तो पर्यायच उरला नाही. त्यातच स्वच्छ इंधन वापरण्यासाठी मुंबई महापालिकेने नोटिसा बजावल्या असतील तर पाव निर्मितीला दुहेरी फटका बसणार असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

**भट्ट्या थंड:** मुंबईतील लाकडावर चालणाऱ्या बेकऱ्या या अनेक दशकांपासून सुरू आहेत. काही बेकरी या शंभर वर्षे जुन्या आहेत. घुमटाकार आकाराच्या या भट्ट्या विटांपासून तयार केलेल्या असतात व त्या लाकूड जाळण्याच्या सुविधेप्रमाणेच बनवलेल्या होत्या. सुमारे दीडशे चौरस फूट जागेत बनवलेल्या या भट्ट्यांमध्ये लाकूड जाळले जात असे. लाकूड जळून पूर्ण झाले की त्याचा कोळसा होतो व त्या कोळशाच्या तापमानावर ही भट्टी गरम राहत असे. आता मात्र या भट्ट्या दोन दिवसात थंड होतील अशी भीती फारूक यांनी व्यक्त केली.

### १०२ बेकऱ्यांना नोटिसा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** इंधनासाठी लाकूड व कोळसा वापरून त्यावर चालणाऱ्या बेकऱ्या स्वच्छ इंधनावर रुपांतरित करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्यानंतरही गेल्या वर्षभरात त्यासाठी प्रयत्नही न करणाऱ्या १०२ बेकऱ्यांना मुंबई महापालिकेने 'स्टॉप वर्क' अर्थात काम थांबवण्याची नोटीस दिली आहे. लाकूड वा कोळसा वापरून चालणाऱ्या बेकऱ्यांमुळे वायू प्रदूषण होत असल्याच्या कारणास्तव या बेकऱ्यांना विद्युत वा एलपीजी गॅस यांसारख्या पर्यायी स्वच्छ इंधनावर परावर्तित करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र एक दीड वर्ष होऊनही बेकरी मालकांनी प्रयत्न न केल्यामुळे पालिकेने ही कारवाई केली आहे.

लाकूड व कोळसा यांचा इंधन म्हणून उपयोग करणाऱ्या भट्टी, हॉटेल, उपाहारगृहे हेही वायू प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्यामुळे उच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली होती. न्यायालयाने ९ जानेवारी २०२५ रोजी घेतलेल्या सुनावणीच्यावेळी सहा महिन्यांच्या मुदतीत लाकूड (पान ३वर)



### मूर्तिमंत धैर्य...

वाघ या एकमेव शब्दानेच शक्ती, चपळतेचे दर्शन होऊन डोळ्यांसमोर मूर्तिमंत भीती उभी राहते. याउपर त्याच्या सन्निध दर्शनाची तर कल्पनाच नको! परंतु, मंगळवारी भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयातील पारदर्शी पिंजऱ्यातील पाण्यात अंगाची काहिली शमवणाऱ्या या राजस प्राण्याच्या डोळ्याला डोळा भिडवून शालेय विद्यार्थ्यांनी मूर्तिमंत धैर्य अनुभवले. (छायाचित्र : अमित चक्रवर्ती)

# गिरणी कामगारांसाठी १० हजार घरे

## कल्याण तालुक्यातील 11 हेक्टर जागा लवकरच म्हाडाकडे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गिरणी कामगार, त्यांच्या वारसांच्या हक्काच्या घरांचा प्रश्न गंभीर असून अजूनही एक लाखांहून अधिक गिरणी कामगारांना घरे देण्याचे आव्हान राज्य सरकारसमोर आहे. सरकार मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) जागांचा शोध घेत आहे. कल्याण तालुक्यातील हेदुटणे व उत्तरशीव येथे ११ हेक्टर जागा निश्चित करण्यात आली आहे. जागा ताब्यात घेण्यासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. या दोन्ही जागांवर ३०० चौरस फुटांची दहा हजार घरे उपलब्ध होतील.

गिरणी कामगारांना बंद गिरण्यांच्या जागेवर हक्काची घरे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तीन टप्प्यांत मुंबई मंडळाकडे एक लाख ७५ हजार अर्ज दाखल झाले. त्यानुसार आतापर्यंत अंदाजे १६ हजार गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना घरे देण्यात आली. मात्र मुंबईत जागाच उपलब्ध नसल्याने उर्वरित गिरणी कामगारांना घरे कशी द्यायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, मुंबई मंडळाकडे सादर झालेल्या अर्जांची छाननी करून पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नेमक्या किती गिरणी कामगार - वारसांना घरे द्यावी लागतील याचा आढावा घेण्यात येत आहे. आतापर्यंत एक लाख ९ हजार गिरणी कामगार पात्र ठरले आहेत.

सरकारने ८१ हजार गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शेलू येथे ३१ हजार व वांगणी येथे ५० हजार, अशी एकूण ८१ हजार घरे बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे.

# पालिकेची आयबी संलग्न शाळा बंद

## पालकांची संमती घेण्याची प्रक्रिया सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** विलेपार्ले येथील महानगरपालिकेची आयबी मंडळाची शाळा सुरू ठेवणे आर्थिकदृष्ट्या परडवडत नसल्याने शाळा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई) संलग्न करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. शाळेचे आयबी मंडळ बंद करून सीबीएसई करण्याबाबत पालकांकडून संमतीपत्र लिहून घेतली जात आहेत. मात्र, काही पालकांनी त्यावर आक्षेप घेत निर्णयाला विरोध केला. आयबी मंडळ पाहूनच शाळेत मुलांसाठी प्रवेश घेतला होता. आता अचानक शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे पालकांची एकप्रकारे फसवणूक करण्यात आल्याचा आरोप काहींनी केला.

शिक्षण विभागातर्फे एकूण आठ माध्यमांच्या ९३१ शाळा सुरू आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई व आयबी मंडळाच्या शाळा सुरू केल्या. सद्यस्थितीत पालिकेच्या अन्य मंडळाशी संलग्नित शाळांमध्ये सीबीएसई मंडळाच्या १८, तर आयसीएसई, आयजीसीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी एक अशा एकूण २१ शाळा आहेत. मात्र, मोठा गाजावाजा करत सुरू करण्यात आलेली आयबी मंडळाची शाळा आर्थिक (पान ३वर)

### संमतीची सक्ती?

विलेपार्ले येथील आयबी मंडळाची शाळा सीबीएसई करण्यासाठी पालकांकडून संमतीपत्रावर स्वाक्षरी करून घेतली जात आहे. याबाबत शाळेत दोन ते तीन दिवसांपूर्वी पालकसभा घेण्यात आली होती. शाळेला शिक्षक उपलब्ध होत नसल्याचे कारण देत शाळेचे मंडळ बदलण्याचा विचार सुरु असल्याचे सांगण्यात आले. मात्र, ठोस कारण देण्यात आले नाही. आयबी मंडळाच्या शाळेत शिक्षण घेणे सोयीस्कर नसल्याने शाळा सीबीएसई करण्याबाबत कोणतीही हरकत नाही, अशा आशयाच्या संमतीपत्र स्वाक्षरीसाठी पालकांना पाठविण्यात आले आहे.

# २५ वर्षे सत्तेतील ठाकरे गटाला प्रभाग समितीच्या दोनच जागा

## चुकीच्या रकान्यात स्वाक्षरी करणाऱ्या दोन नगरसेवकांना लवकरच नोटीस

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महापालिकेत गेली पंचवीस - तीस वर्षे सत्तेत असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला यंदा १७ पैकी केवळ दोन प्रभाग समित्यांचे अध्यक्षपद मिळवता आले. तर भाजपने तब्बल नऊ प्रभाग समित्या पटकावल्या. ठाकरे यांच्या शिवसेनेने एक प्रभाग समिती मनसेला सोडली आहे. तर आणखी दोन प्रभाग समित्या जिंकणे ठाकरे यांच्या शिवसेनेला शक्य होते, मात्र राजकारणाचे गणित चुकल्यामुळे या समित्यांच्या अध्यक्षपदावर पाणी सोडावे लागले. तर चुकीच्या रकान्यात स्वाक्षरी करण्याची चूक करणाऱ्या दोन नगरसेवकांकडून स्पष्टीकरण मागवण्याचा निर्णय शिवसेना (ठाकरे) पक्षाने घेतला आहे. मातोश्री निवासस्थानी बोलवून या दोन नगरसेवकांची हजेरी घेण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेच्या १७ प्रभाग समित्यांपैकी सर्वाधिक ९ प्रभाग समित्यांवर भाजपने वर्चस्व राखले आहे. तर, शिवसेनेकडे (शिंदे) २ प्रभाग समित्या आल्या आहेत. त्यामुळे १७ पैकी ११ प्रभाग समित्यांवर महायुतीची सत्ता आहे. तर गेली २५ वर्षे महापालिकेवर सत्ता असलेल्या शिवसेना (ठाकरे) पक्षाला फक्त दोन प्रभाग समित्यांवर समाधान मानावे लागले आहे. मुंबई महापालिकेवर गेली २५ वर्षे सत्तेवर असलेल्या शिवसेनेत फूट पडल्यानंतर यावेळी (पान ३वर)

### तीन प्रभाग समित्या हातातून गेल्या

ठाकरे गटाला संख्यबळाच्या आधारे आणखी तीन प्रभाग समित्या मिळू शकल्या असत्या. मात्र लालबाग शिवडीचा भाग असलेल्या एफ दक्षिण प्रभाग समितीच्या निवडणुकीत समाजवादी व काँग्रेस नगरसेवक गैरहजर राहिल्याने शिवसेनेच्या माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेविका श्रद्धा जाधव यांचा एका मताने पराभव झाला. त्यामुळे ती प्रभाग समिती हातामधून गेली. दादर, माहीमचा भाग असलेली जी उत्तर प्रभाग समिती ठाकरेंच्या शिवसेनेने मनसेला सोडली आहे. त्यामुळे तीन प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदाच्या संधी गेल्या. तर भांडुप व मुलुंड प्रभाग समितीच्या निवडणुकीत, सत्ताधारी भाजप - शिवसेना (शिंदे) व ठाकरे गट मित्रपक्ष यांचे समसमान संख्याबळ असताना शिवसेनेचे उमेदवार सुरेश शिंदे व दीपमाला बढे यांनी भाजपच्या उमेदवार साक्षी दळवी यांच्या रकान्यात स्वाक्षरी केल्याने ठाकरे गटाची दोन मते बाद झाली. त्यामुळे भाजपच्या उमेदवार विजयी झाल्या. या प्रभाग समितीवरही ठाकरे गटाला पाणी सोडावे लागले.

# पावसाळ्यात उपसा पंप बसवावेत

## मुंबई महानगरपालिकेची मेट्रो प्रशासनाला सूचना

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** यंदा पावसाच्या पाण्याचा निचरा अधिक जलद गतीने व्हावा यासाठी मेट्रो प्रशासनानेही त्यांच्या स्तरावर पाणी उपसा करणारे पंप बसवावेत, असे निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले. हे पंप बसवताना प्रत्येक स्थानकाची भौगोलिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन व तेथील गरज लक्षात घेऊन योग्य त्या संख्येने व योग्यता क्षमतेचे पंप बसवावेत, असेही त्यांनी निर्देशात म्हटले आहे. गेल्या वर्षी मेट्रो ३ च्या वरळी येथील स्थानकात पाणी शिरल्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाली होती.

पावसाळ्याला अजून तीन-चार महिन्यांचा अवधी आहे. त्या काळात मुंबईत पाणी तुंबू नये म्हणून पालिकेने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. मुंबईतील विविध यंत्रणांमध्ये येत्या पावसाळ्यात समन्वय राहावा, याकरिता आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती (पान ३वर)

### वेळेत अंदाज वर्तवावे

भारतीय हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तवताना व त्याबाबत सूचना देताना; संबंधित यंत्रणांना त्यांच्या स्तरावरील कार्यवाही करण्यास पुरेसा वेळ मिळायला हवा, ही बाब लक्षात घेऊन पूर्वसूचना द्यावी, असेही निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

# म्हाडाचे वसतिगृह दिवाळीपर्यंत

## ९० टक्के काम पूर्ण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शिक्षण व रोजगाराच्या निमित्ताने राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत येणाऱ्या तरुण-तरुणींसाठी, विद्यार्थ्यांसाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून काळाचौकी, जिजामाता नगर येथे १८ मजली वसतिगृह बांधण्यात येत आहे. या वसतिगृहाचे काम २०२२ मध्ये सुरु झाले असून आतापर्यंत वसतिगृहाचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र या प्रकल्पास विलंब झाला आहे. प्रकल्पाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून दिवाळीपर्यंत प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्ण करून वसतिगृह खुले केले जाईल.

सामाजिक दायित्व म्हणून म्हाडाने सहा-सात वर्षांपूर्वी मुंबईत वसतिगृह बांधून विद्यार्थ्यांना आणि महिलांनाही तात्पुरता निवारा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पहिला प्रकल्प काळाचौकीतील जिजामाता नगर येथे राबविण्याचे निश्चित करून त्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली.

जिजामाता नगर येथील १५०० चौरस मीटर जागेवर वसतिगृहाची १८ मजली इमारत बांधण्याच्या कामास २०२२ मध्ये सुरुवात करण्यात आली.

शिक्षणासाठी आणि नोकरी-धंद्यासाठी राज्याच्या, तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या तरुण-तरुणींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

### वसतिगृह व्यवस्थापन

- हे वसतिगृह खुले झाल्यास मुंबईतील ते म्हाडाचे पहिले वसतिगृह ठरणार असून या वसतिगृहाद्वारे अंदाजे ७०० तरुण-तरुणींची राहण्याची सोय होईल.
- या वसतिगृहाचे व्यवस्थापन खासगी संस्था किंवा कंत्राटदार कंपनीच्या माध्यमातून केले जाणार आहे. त्यानुसार लवकरच यासाठी निविदा प्रक्रिया राबवून संस्थेची किंवा कंत्राटदाराची नियुक्ती केली जाईल.
- 18 मजली इमारतीच्या तळमजल्यापासून पाचव्या मजल्यापर्यंत व्यावसायिक गाळे आहेत. वसतिगृहातील तरुण-तरुणींना बँकेसह आवश्यक त्या सर्व सुविधा तिथेच उपलब्ध व्हाव्यात यासाठी या गाळ्यांची निर्मिती करण्यात आली आहे.
- गाळेही निविदा पद्धतीने भाड्याने दिले जातील. सहाव्या ते अठराव्या मजल्यापर्यंत ३७५ खोल्या असून येथे ७०० विद्यार्थ्यांची निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल.

# शिक्षण हक्क कायद्यातील नियमाला स्थगिती मिळूनही संभ्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) एक किलोमीटर अंतराच्या नियमाला स्थगिती दिल्यामुळे पालकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. परंतु, ज्या पालकांनी आधीच अर्ज भरले आहेत, त्यांना नव्याने अर्ज भरण्याची संधी मिळेल का, सुधारित अर्ज समाविष्ट करता येईल का, असे प्रश्न पालकांसमोर निर्माण झाले आहेत.

अर्ज भरण्यासाठी १० मार्च ही शेवटची मुदत होती. ही मुदत वाढविण्याबाबत संकेतस्थळावर कोणतिही सुचना देण्यात आलेली नाही, त्यामुळे नव्या नियमावलीला स्थगिती मिळाली असली तरी त्याची अंमलबजावणी कशी होणार याबाबत जिल्ह्यातील पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) प्रवेश प्रक्रियेला १७ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. १० मार्चपर्यंत पालकांना अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती. त्यानुसार, राज्यभरात १ लाखाच्या आसपास आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज दाखल आहेत. तर, ठाणे जिल्ह्यातून १९ हजाराच्या आसपास अर्ज दाखल झाले आहेत. यात सर्वाधिक शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या अर्जाचा समावेश आहे.

शिक्षण हक्क कायद्यात यंदाच्या वर्षी तीन किमीऐवजी एक किमी अंतराच्या आतील शाळा निवडाव्या, अशी नवीन नियम घालण्यात आला होता. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायदा प्रक्रियेपासून वंचित राहावे लागत होते. तर, शहरी भागातील विद्यार्थ्यांनाही शाळा निवडताना अडचण निर्माण होत होती. त्यामुळे या नव्या नियमावलीचा सर्वच स्तरातून विरोध होत होता. त्यामुळे त्या नियमाला स्थगिती देण्यात आली.

**ज्या पालकांनी आधीच अर्ज भरले आहेत, त्यांना नव्याने अर्ज भरण्याची संधी मिळेल का, सुधारित अर्ज समाविष्ट करता येईल का, असे प्रश्न निर्माण झाले आहेत.**




ज्या पालकांनी आधीच अर्ज भरला आहे त्यांच्यात सुधारित अर्ज पाठवायचा की, पुन्हा नव्याने अर्ज भरायचा का, तसेच आरटीई अर्ज भरण्याची १० मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती आता ती वाढवणार का, या बाबत कोणतेही अद्ययावत सूचना आरटीई अधिकृत संकेतस्थळावर मिळालेले नाहीत.

– प्रकाश दिलपाक, शिक्षण आरोग्य अधिकार मंच

शिकण्याची आवड निर्माण कराल, तर तुमचा विकास कधीही थांबणार नाही.
- ॲंथनी डि'ॲंजेलो, अमेरिकन व्यावसायिक

**स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात**
**एमपीएससी**
फारुक नाईकवाडे

### मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन - पेपर तीन

# अर्थव्यवस्था- साधनसंपत्तीचे एकत्रीकरण

**साधनसंपत्तीचे एकत्रीकरण हा अभ्यासक्रमातील शब्द इंग्रजीच्या 'रिसोर्स मोबिलायझेशन' शब्दाचे भाषांतर आहे. यात साधनसंपत्तीची उपलब्धता, तिचा परिणामकारक वापर, नियोजन या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यवस्थापन हा मराठी शब्द ही एकूण संकल्पना समजून घेण्यासाठी जास्त साजेसा आहे.**

**अर्थव्यवस्था घटकाच्या** साधनसंपतीचे एकत्रीकरण या उपघटकाच्या तयारीबाबत या लेखामध्ये पाहू.

या उपघटकामध्ये अभ्यासायचे ठळक मुद्दे सोबतच्या चौकटीमध्ये दिलेले आहेत. त्यांच्या आधारे तयारीची रणनीती पाहू. या उपघटकावर प्रत्यक्ष प्रश्न विचारले जाण्याची शक्यता कमी आहे. पण इतर गतिमान मुद्दे, चालू घडामोडींवर आधारित, विश्लेषणात्मक प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी या मुद्द्यांचा मूलभूत आणि संकल्पनात्मक अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात यांवर पारंपरिक प्रश्न कमी दिसणार असले तरी हा मुद्दा परीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

### साधनसंपत्तीचे एकत्रीकरण ठळक मुद्दे

- साधन संपत्तीचे प्रकार
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची संकल्पना
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची आवश्यकता
- साधन संपत्तीचे स्त्रोत - सार्वजनिक, खासगी / अंतर्गत, बाह्य गुंतवणूक
- साधन संपत्तीचे वितरण
- वित्त आयोग
- शासकीय उपक्रम
- वित्तीय धोरणांची भूमिका
- आव्हाने



**मुद्देनिहाय तयारी**

■ साधनसंपत्तीचे नैसर्गिक मानवनिर्मिती आणि मानवी असे तीन प्रकार, त्यांचे महत्त्व, त्यांची वैशिष्ट्ये, सर्वसाधारण उपलब्धता, भारतातील उपलब्धता, त्यांचा वापर आणि विकासातील आव्हाने, उपाय समजून घ्यायला हवेत.

■ साधन संपत्तीच्या एकत्रीकरणामध्ये वित्तीय आणि इतर सर्वच संसाधनांचा विचार होत असला तरी तयारी करताना वित्तीय संसाधनांवर भर देणे आवश्यक आहे. वित्तीय संसाधनांच्या एकत्रीकरणाचे महत्व समजून घ्यायला हवे. विशेषतः शासकीय अंदाजपत्रके, अर्थसंकल्प यांचेशी परस्पर संबंध अभ्यासायला हवा.

■ साधनसंपत्तीच्या एकत्रीकरणाची शासनाला आवश्यकता का आहे, हे लक्षात घ्यायला हवे. संसाधनांच्या एकत्रीकरणातून पुढील बाबी कशा साधल्या जातात ते समजून घ्यायला हवे - सर्व प्रकारच्या संसाधनांचा कमाल आणि परिणामकारक वापर, त्यांमध्ये वैविध्य राखणे, स्वतंत्र आणि आत्मनिर्भर अर्थसंकल्प तयार करणे, भारतामध्ये कल्याणाकारी शासन व्यवस्था असल्याने कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या म्हणून सामाजिक उपक्रमासाठी तरतूद करणे.

■ देशांतर्गत स्त्रोतांमध्ये बचत, गुंतवणूक आणि भांडवल निर्मिती, बाह्य गंतवणूक आणि कर्जे व अन्य स्त्रोत, सार्वजनीक स्त्रोतामधील कर, करेतर आणि अन्य उत्पन्न या बाबी विचारात घ्यायला हव्यात. यांची अद्ययावत आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालामधून पहायला हवी. बचतीचे प्रकार, सकल नियत भांडवल निर्मिती (GFCF), हे विश्लेषणात्मक मुद्दे संकल्पनात्मक तयारीसाठी महत्त्वाचे आहेत.

■ शासकीय स्त्रोतांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, करेतर महसूल, कर्ज आणि गुंतवणूक हे स्त्रोत व्यवस्थित समजून घ्यायला हवेत. कारण हे अर्थसंकल्पातील - शासकीय अंदाजपत्रकातील उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. यांच्या विश्लेषणातून अर्थव्यवस्थेवी वृद्धी आणि विकास यांच्यामधील समतोल समजून घेणे शक्य होणार आहे. कर महसूलामध्ये वस्तू व सेवा कराचे फायदे, आव्हाने, समस्या आणि विश्लेषणात्मक मूल्यमापन आवश्यक आहे.

■ करेतर महसूलामधील निर्गुंतवणुकीची संकल्पना समजून घेऊन तिचे फायदे - तोटे, समस्या, आव्हाने, परिणामकारकता आणि उपाययोजना या मुद्द्यांच्या आधारे विश्लेषण आवश्यक आहे.

■ परकीय गुंतवणुकींचे प्रकार व महत्त्व समजून घ्यावे. आर्थिक पाहणी अहवालामधून त्यांची आकडेवारी आणि ट्रेंड्स - कल लक्षात घ्यायला हवेत. परकीय संस्थांची कर्जे व त्यांचा वापर त्या-त्या वर्षीच्या चालू घडामोडींचा भाग म्हणून विचारात घ्यावेत.

■ वित्तीय संसाधनांच्या उपलब्धतेसाठी त्यांचे योग्य वितरण आवश्यक आहे. केंद्र व राज्यांमध्ये वित्तीय संसाधनांच्या वितरणासाठी वित्त आयोग धोरण व सूत्रे ठरवितो. यासाठीच्या घटनात्मक तरतूदी, वित्त आयोगाची रचना, कार्ये, भूमिका लक्षात घ्याव्यात. १५व्या आणि १६व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या तुलना आणि १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे मूल्यमापन लक्षात घ्यायला हवे. यामध्ये बँका, वित्तीय संस्था, पतसंस्था, सहकारी संस्था, विशेष प्रकारच्या वित्तीय संस्था व स्त्रोत उदा. इंडिया इनोव्हेशन फंड, आर्थिक विकास महामंडळे, तसेच एंजल गुंतवणूकदार संकल्पना माहीत हव्यात. त्यांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे योगदान, समस्या, कारणे, उपाय आणि महत्त्व हे मुद्दे विचारात घ्यावेत. यामध्ये प्रत्यक्ष लाभ वितरण (DBT), राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइन (NIP), राष्ट्रीय मौद्रीकरण पाइपलाइन (NMP), प्रधानमंत्री जन धन योजना या उपक्रमांची माहिती आवश्यक आहे.

■ वित्तीय धोरणांच्या माध्यमातून साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर कशा प्रकारे होतो ते समजून घ्यायला हावे. उदा. महसूलाचा वापर कल्याणकारी कामांकरीता निधी उभारणीसाठी करणे किंवा कररचनेच्या माध्यमातून समान संसाधन वितरण साधण्याचा प्रयत्न करणे (प्रगतीशील करांच्या माध्यमातून कमी उत्पन्न गटास संरक्षण).

■ साधन संपत्तीचे एकत्रीकरण करण्यातील अडचणी / आव्हाने स्वरूप, कारणे, परिणाम, उपाय अशा मुद्द्यांच्या आधारे विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये महसूलासठीचे नवे स्त्रोत शोधणे, करेतर महसूलावरील वाढते अवलंबित्व, शासकीय खर्चावरील अवलंबित्व, जागतिक कर सुधारणांमुळे भारतीय करवसूलीवर येणाऱ्या मर्यादा, निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणास मिळणारा अल्प प्रतिसाद अशा मुद्द्यांचा समावेश असला पाहिजे.

■ मूलभूत संकल्पना आणि या क्षेत्रातील बाबींचे परस्परसंबंध लक्षात घेतले तर चालू घडामोडींच्या आधारे चर्चा, वाचन आणि चिंतनातून आपली मते तयार करणे शक्य होते. संसाधनांबाबतची आव्हाने सोडविण्यासाठी अशा विश्लेषणाचा आधार घेऊन मुद्दे तयार करणे आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

**चौकटी-पल्याड**
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन



# संक्रमणातून जाणारे आयटी क्षेत्रातील शिक्षण

**आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक नियमित कामे स्वयंचलित करेल; परंतु त्याच वेळी नवे तांत्रिक आणि सामाजिक प्रश्नही निर्माण होतील. त्यामुळे भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील.**



**आज जगभरातील** माहिती तंत्रज्ञान (आयटी) शिक्षण एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत संगणकशास्त्रातील पारंपरिक शाखा म्हणजे प्रोग्रॅमिंग, डेटाबेस व्यवस्थापन किंवा नेटवर्किंग यांवर भर दिला जात होता. मात्र आता आयटी शिक्षण अधिक व्यापक आणि बहुआयामी आणी बहुविषयक बनत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये आयटी अभ्यासक्रमांची रचना आणि त्यामधील संशोधनाचे केंद्रबिंदू झपाट्याने बदलत आहेत.

आयटीमधील सध्या सर्वाधिक मागणी असलेली उप-क्षेत्रे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि रोबोटिक्स. आरोग्यसेवा, हवामान बदल, वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक), जैवतंत्रज्ञान आणि शहरी नियोजन अशा विविध क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढत असल्याने या शाखांतील तज्ज्ञांची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर एआय एथिक्स, रिस्पॉन्सिबल टेक्नॉलॉजी आणि ह्युमन-कॉम्प्युटर इंटरॅक्शन यांसारख्या विषयांनाही महत्त्व मिळत आहे.

अमेरिका आणि ब्रिटन ही आयटी शिक्षणाची पारंपरिक केंद्रे असली तरी आज इतर अनेक देशांतील विद्यापीठेही वेगाने पुढे येत आहेत. जर्मनीमधील टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक आणि आरडब्ल्यूटीएच आखेन येथे डेटा इंजिनीअरिंग व रोबोटिक्समध्ये मूलभूत संशोधन सुरू आहे. नेदरलँड्समधील डेल्फ्ट युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि आयंधोव्हन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी येथे स्मार्ट सिस्टीम्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर दिला जातो. कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो आणि युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू ही प्रत्यक्ष उद्योगांशी जोडलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आहेत.

ऑस्ट्रेलियामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न, ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साउथ वेल्स आणि मोनॅश युनिव्हर्सिटी येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटीमध्ये आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. चीनमधील त्सिंगहुआ युनिव्हर्सिटी, पेकिंग युनिव्हर्सिटी आणि शांघाय जिआओ टोंग युनिव्हर्सिटी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन चालते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीही या संधी खुल्या होत आहेत. या अभ्यासक्रमांसाठी केवळ संगणक अभियांत्रिकीचेच नव्हे तर गणित, सांख्यिकी, इलेक्ट्रॉनिक्स किंवा भौतिकशास्त्राची पार्श्वभूमी असलेले विद्यार्थीही अर्ज करू शकतात. विश्लेषण क्षमता, प्रोग्रॅमिंग कौशल्य, संशोधनवृत्ती मुख्यत्वे अपेक्षित असते.

आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील. मराठी विद्यार्थ्यांसाठी ही संधी केवळ करिअरची नाही, तर नव्या ज्ञानविश्वाशी जोडणाऱ्या आणि जागतिक तंत्रज्ञान परिसंस्थेत सहभागी होण्याच्या प्रवासाची सुरुवात ठरू शकते.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

### आयटीतील भविष्यवेधी उद्योजक : सुमित मोरे

भारतामधील अनेक आयटी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे हे मोठे स्वप्न असते. परंतु त्या स्वप्नासोबत आर्थिक अडचणी आणि शिक्षणासाठी कर्ज घेण्याची जोखीमही असते. सुमितची कथा मात्र वेगळी आहे. चिकाटी, योग्य नियोजन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव यामुळे त्याचा प्रवास प्रेरणादायी ठरतो.

सुमितने पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), येथून माहिती तंत्रज्ञान शाखेत बी.ई. पदवी पूर्ण केली. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षापासूनच त्याने आपल्या मित्रांप्रमाणे जीआरई आणि टॉफेल या परीक्षांची तयारी सुरू केली होती. मात्र परदेशी शिक्षणासाठी मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन कुटुंबावर आर्थिक ओझे टाकायचे नाही, असा त्याचा स्पष्ट निर्णय होता.

म्हणूनच सुमितने आधी नोकरी करून काही रक्कम साठवण्याचा मार्ग निवडला. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून त्याची निवड आयबीएममध्ये झाली. नोकरी करत असतानाच त्याने जीआरई आणि टॉफेल या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याला इंग्लंडमध्ये एका प्रकल्पासाठी काम करण्याची संधी मिळाली. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला.

यानंतर त्याने अमेरिकेतील पाच विद्यापीठांमध्ये आयटीमधील मास्टर्ससाठी अर्ज केले आणि त्याला युनिवर्सिटी ऑफ मेरीलॅन्ड येथे प्रवेश मिळाला. त्याच्या कामाच्या अनुभवामुळे त्याला शिक्षण शुल्कासाठी संपूर्ण शिष्यवृत्ती मिळाली. पहिल्या वर्षातच त्याला टीचिंग असिस्टंटशिप आणि नंतर रिसर्च असिस्टंटशिप मिळाली. स्टायपेंडही मिळू लागला. शिक्षण शुल्काव्यतिरिक्त असलेल्या खर्चाचाही प्रश्न यातून सुटला. उन्हाळ्यात त्याने सिलिकॉन वॅली मधील एका स्टार्टअपमध्ये तीन महिन्यांची इंटर्नशिप केली. हे सारे करीत असताना सुमितने आपला मास्टर्स अभ्यासक्रम थिसिस पद्धतीने पूर्ण केला. अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी असूनही सुमित भारतात परतला. प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या पुस्तकाने त्याला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. दरम्यान त्याने हेमलकसाला जाऊन लोकबिरादरीमध्ये एक वर्ष काम केले. तेथे आदिवासी मुलांना मराठी शिकण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्याने 'अक्षर' हे मोबाइल ॲप विकसित केले. या उपक्रमाला नॅसकॉमकडून सन्मान मिळाला. दहा वर्षांपूर्वी मित्राच्या मदतीने त्याने 'नॉन स्टॉप आयओ टेक्नॉलॉजीज' ही कंपनी सुरू केली आणि ती आज अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर प्रोडक्ट डेव्हलपमेंटचे काम करते आहे. आज या कंपनीत दीडशे पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

सामाजिक बांधिलकीची प्रेरणा आणि जागतिक शिक्षणाचा अनुभव यांचा संगम घडवत सुमित आज आपल्या कंपनीच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात नवे योगदान देत आहे.



# श्रम संहितेतील महत्त्वाच्या तरतुदी

**नवीन कामगार कायद्यांविषयी कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता व शंका आहेत. या कायद्यांचा आपल्यावर काय परिणाम होईल अशी बरेच जण विचारणा करत आहेत. त्यासंबंधी काही महत्त्वाच्या बाबींवर या लेखात चर्चा करूया.**



**कौशल्य तंत्र**
सलील चिंचोरे

**भारतामध्ये कामगार** कायदे अधिक सोपे, सुसंगत आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने पूर्वी अस्तित्वात असलेले २९ वेगवेगळे कामगार कायदे एकत्र करून चार नवीन श्रम संहितांची (Labour Codes) निर्मिती केली आहे. या श्रम संहितांचा मुख्य उद्देश म्हणजे कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, उद्योगांना नियमांचे पालन करणे सोपे करणे आणि भारतातील रोजगार व्यवस्थेला अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनवणे. नोव्हेंबर २०२५ पासून श्रम संहिता सरकारने लागू केल्या आहेत. या चार संहिता पुढील प्रमाणे आहेत:

वेतन संहिता, २०१९ (कोड ऑन वेजेस) - कामगारांना किमान वेतन, वेतनाची वेळेवर देयता आणि वेतनाशी संबंधित नियम निश्चित करते.

औद्योगिक संबंध संहिता, २०२० (इंडस्ट्रीयल रिलेशन्स कोड) - नियोक्ता-कर्मचारी संबंध, कामगार संघटना आणि औद्योगिक वाद यासंबंधी नियम स्पष्ट करते.

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या अटी संहिता, २०२० (ओएसएच कोड) -कामगारांचे कार्यस्थळावरील सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी सुधारण्यासाठी नियम ठरवते.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (सोशल सिक्युरिटी कोड) - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ), विमा, पेन्शन आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश करते.

श्रम संहितेमध्ये कर्मचाऱ्यांसंबंधी अनेक बाबींची फेरमांडणी केली आहे. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे पगार व वेतन यांची नव्याने केलेली व्याख्या. खासगी क्षेत्रात पगारातील सर्व घटकांना एकत्र करून येणाऱ्या रकमेला सीटीसी (कॉस्ट टू कंपनी) असे म्हणतात. यामध्ये मासिक पगार, बोनस, परफॉर्मन्स इन्सेंटिव्ह, प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी यांचा समावेश होतो. यातील प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी हे बेसिक वेतन व महागाई भत्त्याच्या कायद्यानुसार विशिष्ट टक्केवारी म्हणून मोजले जातात. या घटकांना अप्रत्यक्ष लाभ असेही म्हणतात. सीटीसीमध्ये बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण जितके जास्त तितक्या प्रमाणात अप्रत्यक्ष लाभ वाढतात. श्रम संहिता लागू होण्याआधी प्रत्येक कंपनीमध्ये सीटीसीमधील बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण वेगवेगळे होते.

श्रम संहितांमध्ये वेतन (वेज) मासिक पगाराच्या (मंथली सॅलरी) कमीत कमी ५० टक्के ठेवण्याचे बंधनकारक केले आहे. वेतनामध्ये समावेश असलेल्या व समावेश नसलेल्या घटकांची यादी दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या रचनेत अधिकाधिक स्पष्टता आणणे हा यामागचा हेतू आहे. आता मासिक पगाराच्या किमान ५० टक्के रकमेवर (वेतनावर) प्रॉव्हिडंट फंड, व ईएसआयसी कापले जाणार आहे. तसेच ही रक्कम ग्रॅच्युईटी मोजण्यासाठी वापरली जाणार आहे. ही रक्कम तुमच्या सध्याच्या पगारातील रकमेपेक्षा जास्त असल्यास तेवढ्या प्रमाणात तुमचे अप्रत्यक्ष लाभ वाढतील. मात्र त्यामुळे तुमच्या हाती येणाऱ्या निव्वळ पगारावर (टेक होम सॅलरीवर) परिणाम होईल.

कंपन्यांना निश्चित मुदतीचे कर्मचारी (फिक्स्ड टर्म एम्प्लॉईज) नेमण्याची तरतूद केली आहे. या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखे सर्व फायदे (रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा) द्यावे लागतील. हे कर्मचारी किमान एक वर्ष नोकरी केल्यानंतर ग्रॅच्युईटीसाठी पात्र ठरतील.



कंपनीतील सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांना (कायमस्वरूपी, निश्चित मुदतीचे, कंत्राटी) नेमणूकपत्र देणे बंधनकारक असेल. या नेमणूकपत्रात कामाचे स्वरूप, कामाचे ठिकाण व वेतनाचे तपशील द्यावे लागतील. महिला कर्मचाऱ्यांना नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची श्रम संहिता परवानगी देते. त्यासाठी कंपनीला महिला कर्मचाऱ्यांची लिखित पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. कर्मचाऱ्याने कंपनी सोडल्यास त्याची देय रक्कम (फायनल सेटलमेंट) कंपनीला दोन दिवसात द्यावी लागेल.

ई-कॉमर्स क्षेत्रात सध्या गिग कामगारांचा वापर होतो. हे कामगार एकाच वेळेस अनेक कंपन्यांबरोबर विशिष्ट काळासाठी किंवा कामासाठी काम करतात. श्रमसंहितेत अशा कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद केलेली आहे. त्यासाठी कंपन्यांना विक्रीचा एक टक्का रक्कम सामाजिक सुरक्षा फंडासाठी द्यावी लागेल.

याविषयी कंपनीतील तज्ज्ञांशी बोलून श्रमसंहितेविषयी तुम्ही अधिक माहिती जाणून घेऊ शकता व त्यातील नियमांचे काटक काटेकोरपणे पालन करू शकता.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत.)

### शब्दकोडे- ३६१

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | |
| १० | | ११ | | ■ | १२ | १३ | | ■ | |
| | ■ | १४ | | ■ | १५ | | | १६ | ■ |
| ■ | १७ | | ■ | १८ | | | ■ | १९ | २० |
| २१ | | | २२ | ■ | | ■ | २३ | | |
| २४ | | ■ | २५ | २६ | ■ | २७ | | | ■ |
| | ■ | २८ | ■ | २९ | | | | ■ | ३० |
| ३१ | ३२ | | ३३ | | ■ | | ■ | ३४ | |
| ■ | ३५ | | | ■ | ३६ | | | | |

**आडवी विधाने :** (१) जन्मभर, तहहयात (३) 'बाई पण भारी देवा' चित्रपटाचे दिग्दर्शक (फक्त नाव) (५) मित्र, सवंगडी (७) दिवस (८) मत्सर, द्वेष (९) शृंगारिक, रसप्रधान काव्यगायन प्रकार (१०) दाणादाण, फाटाफूट (१२) एक लोकप्रिय बैठा खेळ (१४) गाडीवरचे आच्छादन (१५) रंग, औषध वगैरे उडवण्याची नळी (१७) एक अधिक पाव (१८) घडलेली गोष्ट, प्रसंग (१९) चीर, भेग (२१) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस (२३) कूर्म, कच्छप (२४) खुबी, मर्म (२५) सुट्टी, परवानगी (२७) माकड, कपी (२९) वार्षिक नेमणूक (३१) पाहुणचार, बडदास्त (३४) लोखंडाचा चपटा, अरुंद लांब तुकडा (३५) एक सुगंधी वनस्पती (३६) वार्ताहर

**उभी विधाने :** (१) एखाद्या प्रदेशात मूळचे राहणारे लोक (२) आणीबाणीला विरोध करण्यासाठी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विविध विचारधारांच्या नेत्यांनी एकत्र येऊन हा पक्ष स्थापन केला होता (३) हा कापून वाढदिवस साजरा केला जातो (४) कार्ल मार्क्स यांचा प्रसिद्ध ग्रंथ (५) तालाच्या आरंभीची मुख्य जागा, सारखा (६) वाळलेला खजूर (८) ऊन, सूर्यप्रकाश (९) डौलात चालणे, नखऱ्याने चालणे (११) हेकेखोरपणा, आग्रहीपणा (१३) मांडणी, ठेवण (१६) नियमानुसार, रूढीला धरून (१७) सूर्योदयापासून दुपारपर्यंतचा काळ (२०) खेळाची पाळी, मोठी पळी (२१) गणपतीला वाहिल्या जाणाऱ्या दुर्वांची संख्या (२२) अशुद्ध रक्तवाहिनी (२३) अरण्य, जंगल (२६) मुलीचा नवरा (२७) सोक्षमोक्ष, फैसला (२८) ओटीपोटाच्या खालचा भाग, कटी (३०) मुघल साम्राज्याचा संस्थापक (३२) विदेशी मद्याचा एक प्रकार (३३) कीर, पोपट (३४) हा कंद चिरताना डोळ्यातून पाणी आणतो

**- चारू नानल**

### सुडोकू - ३६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९ | १ | ५ | |
| ६ | ८ | १ | | | | | ९ | |
| ४ | | | | ८ | | | २ | |
| २ | | | | ७ | | | | |
| | | ३ | ६ | | ८ | २ | | |
| | | | | ४ | | | | ६ |
| | ६ | | | २ | | | | ९ |
| | ९ | | | | | ८ | ७ | २ |
| | २ | ५ | ३ | | | | | |

### सुडोकू - ३६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ४ | ८ | १ | ९ | ५ | २ |
| ५ | १ | ८ | ६ | ९ | २ | ३ | ४ | ७ |
| ९ | ४ | २ | ५ | ३ | ७ | १ | ८ | ६ |
| १ | ८ | ४ | ९ | ६ | ३ | २ | ७ | ५ |
| ७ | ९ | ६ | ८ | २ | ५ | ४ | ३ | १ |
| २ | ५ | ३ | ७ | १ | ४ | ६ | ९ | ८ |
| ८ | २ | ५ | ३ | ४ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ७ | १ | २ | ५ | ९ | ८ | ६ | ३ |
| ३ | ६ | ९ | १ | ७ | ८ | ५ | २ | ४ |

### शब्दकोडे -३६०चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | ज | यं | ती | ■ | का | र्ल | स | न |
| म | सू | र | ■ | न | व | रा | ■ | जा | ■ |
| ला | ल | ■ | कै | वा | र | ■ | स | व | त |
| ■ | दा | स | ■ | र | ■ | त | र | ट | ■ |
| स | र | ब | त | ■ | मा | र | ळ | ■ | हू |
| ह | ■ | ब | ■ | मा | न | स | ■ | रं | क |
| न | भ | ■ | का | ल | व | ■ | जो | ग | ■ |
| ■ | ग | ण | प | ती | ■ | स | र | पं | च |
| दा | दा | ■ | रे | ■ | नि | त्य | ■ | च | ■ |
| म | ड | के | ■ | सं | धी | ■ | स | मी | प |

## गोरेगावमध्ये १३ अनधिकृत दुकानांवर कारवाई

**मुंबई :** गोरेगाव पश्चिम येथील १३ अनधिकृत दुकानांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'पी दक्षिण' विभागाने कारवाई केली. मुंबई महापालिकेने केलेल्या या तोडक कारवाईमुळे या भागातील रस्ते मोकळे झाले आहेत.

गोरेगाव (पश्चिम) येथील स्वामी विवेकानंद मार्ग आणि ५ डी रस्त्यावर अनधिकृत बांधकामे उद्भवल्याने पादचाऱ्यांना चालण्यास अडथळा निर्माण झाल्याच्या तक्रारी मुंबई महापालिकेकडे येत होत्या. त्यामुळे महानगरपालिकेच्या 'पी दक्षिण' प्रशासकीय विभाग (वॉर्ड) अंतर्गत कार्यरत परिरक्षण, अतिक्रमण निर्मूलन व अनुज्ञापन या विभागाने संयुक्तरित्या मोहीम हाती घेतली. या कारवाईदरम्यान, स्वामी विवेकानंद मार्गावरील ३ अनधिकृत बांधकामे हटवण्यात आली. तसेच, ५डी रस्त्यावरील १० दुकानांचे अनधिकृत वाढीव बांधकाम हटविण्यात आले. तसेच परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवरही निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

# कर्जत स्थानकांसाठी पायपीट

## निर्माणाधीन रेल्वे स्थानकाबाबत प्रवाशांमध्ये नाराजी

**कुलदीप घायवट, लोकसत्ता**

**मुंबई :** मुंबई महानगरातील प्रवाशांसाठी पनवेल ते कर्जत नवीन दुहेरी रेल्वे मार्गिका तयार होत आहे. या मार्गातील कर्जत स्थानकाचे बांधकाम सुरू आहे. परंतु, सध्याचे कर्जत स्थानक आणि नव्या निर्माणाधीन कर्जत स्थानकातील अंतर लांब असल्याने, प्रवाशांना जुन्या कर्जत स्थानकातून नव्या कर्जत स्थानकात जाण्यासाठी सुमारे अर्ध्या किमी पायपीट करावी लागण्याची चिन्हे आहेत. तसेच सामान घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अतिरिक्त पैसे मोजून रिक्षा किंवा इतर वाहनाने स्थानक गाठावे लागेल. त्यामुळे नव्या कर्जत स्थानकाबाबत प्रवाशांमध्ये नाराजी आहे.

मध्य रेल्वेच्या अखत्यारित असलेल्या पनवेल - कर्जत दुहेरी रेल्वे प्रकल्पाचे काम मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) करीत आहे. एमआरव्हीसीच्या 'मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३' (एमयूटीपी-३) अंतर्गत या प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पाला २०१८ मध्ये मंजुरी मिळाली. भूसंपादन, निधी व इतर सर्व बाबी पूर्ण करून, प्रकल्पाचे काम वेगात सुरू आहे. आजघडीला या प्रकल्पाचे ८६ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर, उर्वरित कामे पावसाळ्याआधी पूर्ण करण्याचा निर्धार एमआरव्हीसीने केला आहे. पायाभूत कामे पूर्ण झाल्यानंतर, हा प्रकल्प मध्य रेल्वेच्या स्वाधीन केला जाईल.




### प्रशासनाचे म्हणणे...

नव्या निर्माणधीन कर्जत रेल्वे स्थानकाला जुने कर्जत स्थानक जोडले जाईल. रेल्वे मार्गालगत सुमारे ५०० मीटर लांबीची आणि ३ मीटर रुंदीची पायवाट केली जाईल. यामुळे प्रवाशांना लवकर कर्जत स्थानक गाठता येईल. पायवाटचे काम एमआरव्हीसीतर्फे केले जाईल, असे एमआरव्हीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

पनवेल ते कर्जत लोकल मार्गिका मुंबई महानगरातील नागरिकांसाठी खूप फायदेशीर आहे. परंतु, दोन कर्जत स्थानकांतील अंतर जास्त असल्याने प्रवाशांना पर्यायी वाहनाने या स्थानकात जावे लागेल. रेल्वे प्रशासनाने या ठिकाणी पायाभूत सुविधा उभारून, प्रवाशांचा प्रवास सुकर करावा.

**– राजेश घनघाव,** अध्यक्ष, कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटना

पनवेल-कर्जत या नव्या २९.६ किमी लांबीच्या दुहेरी रेल्वे मार्गावर पनवेल, चिखले, पोयंजे, चौक, कर्जत अशी पाच स्थानके आहे. यापैकी कर्जत स्थानक हे जुन्या कर्जत स्थानकापासून खूप दूर आहे. सद्यस्थितीत या दोन्ही स्थानकांतील पायी अंतर १.५ किमी असून हे अंतर पार करण्यासाठी २१ मिनिटे लागतात. तर, दुचाकी किंवा चारचाकीने २.२ ते २.४ किमीचे अंतर असून हे अंतर पार करण्यासाठी ७ ते ८ मिनिटे लागतात. एमआरव्हीसीद्वारे ५०० मीटर लांबीची रेल्वे मार्गालगत पायवाट करण्यात येणार आहे. परंतु, सामान घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल होतील. त्यामुळे या ठिकाणी सरकता पदपथ (मुव्हिंग वॉकवे) केल्यास प्रवाशांना अधिक दिलासा मिळेल. त्यामुळे सरकता पदपथ आणि पायवाट दोन्ही करवे, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# मुंबईच्या वेशींवर लवकरच सर्व सुविधांयुक्त संकुल

## महसूल मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न; महापौरांनी केली स्थळपाहणी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईत प्रवेश करण्यासाठी असलेल्या चारही मार्गांच्या वेशीवर भव्य प्रवेशद्वार आणि क्लॉक टॉवर (घड्याळ मनोरा) उभारण्याची सूचना महापौर रितू तावडे यांनी केली होती. या सूचनेची वेगाने अंमलबजावणी करावी यासाठी वाशी नाका, ऐरोली नाका आणि मुलुंड नाका या तीन ठिकाणी रितू तावडे यांनी मंगळवारी स्थळपाहणी केली. या वेळी येथे सर्व नागरी सेवा-सुविधायुक्त संकुल विकसित करण्याबाबत कालबद्ध आखणी करून प्रशासनाने कामकाजाला लागावे, असा सूचना त्यांनी प्रशासनाला केल्या. तसेच या प्रकल्पाला गती देण्यासाठी लवकरच सर्व संबंधित विभागांसमवेत बैठक आयोजित करण्यात येईल, असे या दौऱ्यावेळी रितू तावडे यांनी नमूद केले.

### प्रशासनाला निर्देश

सर्व ठिकाणी स्थळ पाहणी पूर्ण झाली असून आता प्रस्ताव तयार करून त्याला गती देण्यासाठी सर्व संबंधित खात्यांची लवकरच बैठक आयोजित करणार आहे. कालबद्ध आखणी करून हा प्रकल्प पूर्ण करावयाचा आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी आपापल्या संकल्पना आणि परिपूर्ण माहितीसह उपस्थित रहावे, असे निर्देशही महापौर रितू तावडे यांनी या वेळी दिले.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून मुंबईला दररोज लाखो पर्यटक भेट देत असतात. मुंबईत प्रवेश करताना पर्यटकांना मुंबईची एक वेगळी ओळख निर्माण व्हावी, यासाठी मुंबईतील चारही प्रवेशद्वारांवर घड्याळ मनोरा उभारण्याची तरतूद २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात करावी, अशी मागणी महापौरांनी एका पत्राद्वारे महानगरपालिका आयुक्तांकडे केली होती.

महापौरांच्या या सूचनेचा आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात पालिका प्रशसनानेही उल्लेख केला आहे. महापौरांनी सुरुवातीला वाशी नाका, त्यानंतर ऐरोली नाका आणि अखेरीस मुलुंड नाका या ठिकाणी पाहणी केली. याप्रसंगी त्या म्हणाल्या की, यापूर्वी दहिसर नाका येथे पाहणी दौरा केला होता. त्यानंतर आज या तिन्ही ठिकाणी पाहणी केली. मुंबईतील चारही प्रवेश मार्गांवर प्रवेशद्वार आणि घड्याळ मनोरा उभारावयाचा आहे. पण ही संकल्पना फक्त कमानी उभारण्यापुरती मर्यादित नाही. मुंबईमध्ये प्रवेश करणारे नागरिक, अभ्यागत, पर्यटक यांना या प्रवेशद्वारांमधून मुंबईची ओळख जाणवली पाहिजे. त्यामुळे हे सर्व प्रवेशद्वार मुंबईशी संबंधित सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी संकल्पनांवर आधारित असतील, असे महापौरांनी नमूद केले.

# उद्योगजगताचे माध्यमांवर नियंत्रण नसावे

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** माध्यमांवर उद्योग जगताचे नियंत्रण कमी असावे किंवा काही मर्यादा याव्यात, असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले. पत्रकार व राजकीय विश्लेषक जयंत माईणकर यांच्या 'कटाक्ष' या लेखसंग्रहाचे प्रकाशन चव्हाण यांच्या हस्ते झाले. या वेळी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी खासदार व ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, 'देशोन्नती'चे मालक-संपादक प्रकाश पोहरे, माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी व साधना जाधव, सदामंगल प्रकाशनच्या प्रकाशक-संपादक प्रज्ञा जांभेकर उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले, अंबानी, अदानी, सुभाषचंद्र यांच्याकडे किती चॅनेल्स आहेत याचा अभ्यास केला, तर त्यांचा आवाका किती मोठा आहे हे लक्षात येईल. माध्यमांमध्ये केवळ एका कॉर्पोरेट हाऊसने प्रवेश करावा का, यावरही मर्यादा असाव्यात, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसा प्रयत्न एस. जयपाल रेड्डी माहिती व नभोवाणीमंत्री असताना करण्यात आल्याचा दाखलाही चव्हाण यांनी दिला. अनेक देशांत अशा प्रकारची बंधने आहेत. भारतात गेल्या दहा-बारा वर्षांत अशा प्रकारच्या बंधनांची अधिक गरज निर्माण झाली आहे, असेही मत त्यांनी मांडले.

# 'वांगणी-शेलू नको, मुंबईतच घरे हवी'

## आझाद मैदानावरील आंदोलनात गिरणी कामगारांचा निर्धार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांसाठी वांगणी-शेलूत ८१ हजार घरे बांधली जात आहेत. मात्र या घरांना गिरणी कामगार व त्यांच्या वारसांचा विरोध असताना राज्य सरकार हा प्रकल्प पुढे रेटत आहे. गिरणी कामगारांना मुंबईबाहेर फेकण्याचा हा डाव आहे, असा आरोप करत गिरणी कामगार-वारसांनी मुंबईतच घर हवे, शेलू-वांगणी नको, अशी मागणी उचलून धरली आहे.



आझाद मैदानावर मंगळवारी १६ संघटनांनी एकत्र येऊन धडक दिली. जोपर्यंत मुंबईत घरे देण्याची मागणी मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार या वेळी कामगारांनी व्यक्त केला.

राज्य सरकार आतापर्यंत अंदाजे १६ हजार गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना घरे देऊ शकले आहे. तर आजघडीला एक लाख ९ हजार गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न गंभीर आहे. मुंबईत गिरणी कामगारांच्या घरांसाठी जागाच नसल्याने आता मुंबई महानगर प्रदेशात घरांसाठी जागेचा शोध घेतला जात आहे. त्यानुसार वांगणी - शेलू येथे गिरणी कामगारांसाठी ८१ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यांची कार्यवाही सुरू आहे. तर आता कल्याणमध्ये आणखी ११ हेक्टर जागा शोधण्यात आली आहे. ही जागा लवकरच म्हाडाच्या मुंबई मंडळाला घरासाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या जागेवर १० हजार घरे बांधली जाण्याची शक्यता आहे. मात्र गिरणी कामगार, वारस आणि मोठ्या संख्येने गिरणी कामगार संघटनांचा वांगणी-शेलूतील घरांना विरोध आहे. हा प्रकल्प रद्द करून मुंबईतच घरे देण्याची मागणी होत आहे. मात्र ही मागणी डावलून कामगारांना मुंबईबाहेरच फेकण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप करीत १६ गिरणी कामगार संघटना आता आक्रमक झाल्या आहेत. १६ संघटनांनी एकत्र येऊन गिरणी कामगार संयुक्त लढा समितीच्या माध्यमातून मंगळवारी आझाद मैदानावर धडक दिली. या आंदोलनाचे नेतृत्व आमदार सचिन अहिर यांनी केले.

# शास्त्रीय संगीतातील पाच घराण्यांतील कलाकारांची मैफल

## वांद्रे येथे २२ मार्च रोजी 'अर्घ्य २०२६'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** भारतीय शास्त्रीय संगीतातील पाच वेगवेगळ्या घराण्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ३० कलाकारांची एकत्र भव्य ऐतिहासिक स्वरमैफल रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. 'अर्घ्य इंडियन क्लासिकल म्युझिक अँड फाईन आर्ट फाउंडेशन' या संस्थेच्या वतीने या संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. २२ मार्च रोजी 'अर्घ्य २०२६' ही अनोखी स्वरमैफल रंगणार आहे.

भारतीय शास्त्रीय संगीतातील गुरु-शिष्य परंपरेला अधिक बळकटी देणारी 'अर्घ्य २०२६' ही स्वरमैफल रविवार, २२ मार्च रोजी वांद्रे येथील प्रतिष्ठित बालगंधर्व रंगमंदिर येथे संध्याकाळी ६:३० वाजता होणार आहे. या मैफिलीत शास्त्रीय संगीतातील पाच वेगवेगळ्या घराण्यांचे प्रतिनिधित्व करणारे ३० कलाकार एकाच वेळी कला सादरीकरण करणार आहेत. या ऐतिहासिक मैफिलीत सतारचे जादूगार पंडित रवी चारी आणि त्यांचे शिष्य; प्रख्यात गायक पंडित राम देशपांडे आणि त्यांचे शिष्य; बासरीवादक पंडित रूपक कुलकर्णी आणि त्यांचे शिष्य; तबलामहर्षी पंडित योगेश साम्सी आणि त्यांचे शिष्य, तसेच पखवाजवादक कृष्णा साळुंके आणि त्यांचे शिष्य यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाला पद्मश्री तालयोगी पंडित सुरेश तळवलकर मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. 'ही अस्सल स्वरमैफल पवित्र गुरू-शिष्य परंपरेला अधिक बळकटी देणारी ठरणार असून गुरू आणि शिष्य एकाच व्यासपीठावर एकत्र सादरीकरण करणार आहेत. त्यातून ज्ञानसंक्रमणाची आणि कलात्मक वारशाची अखंडित परंपरा अधोरेखित होणार आहे. शास्त्रीय संगीताचा अस्सलपणा टिकवून ती भव्य आणि खिळवून ठेवणाऱ्या स्वरूपात नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा अनोखा प्रयत्न आहे' असे अर्घ्य फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. या कार्यक्रमाची तिकिटे बुक माय शोवर उपलब्ध आहेत.

# अडीच कोटींची फसवणूक

**मुंबई :** बाजारभावापेक्षा स्वस्त दरात सोने देण्याचे आमिष दाखवून एका महिलेने अडीच कोटी रुपयांची फसवणूक केल्याची घटना घाटकोपर घडली. याबाबत पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस याबाबत तपास करत आहेत. तक्रारदार महिला घाटकोपर पश्चिम येथे राहत असून याच परिसरात राहणाऱ्या महिलेने त्यांची फसवणूक केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.


## नाटक सिनेमा वाद्यवृंद














■ आसिफ बागवान

# मॅकबुक ७० हजारांत

**ॲपलने १३ इंचाचा लिक्विड रेटिना डिस्प्ले असलेल्या मॅकबुक निओची घोषणा केली असून अद्ययावत वैशिष्ट्ये असलेल्या या लॅपटॉपची किंमत ६९९९९ रुपये इतकी असणार आहे. जगभरातील बाजारात बुधवारपासून दाखल होत असलेला 'निओ' ॲपलच्या लॅपटॉप श्रेणीलाही भारतीय ग्राहकांच्या आवाक्यात आणणारा ठरेल.**

**भारतीय मोबाइल** ग्राहकाला आयफोनची सवय आणि ओढ लावून बाजारपेठेत मोठा हिस्सा कमावणाऱ्या ॲपलचा मॅकबुक आजवर बहुसंख्य भारतीयांसाठी खर्चीक विषयच राहिला आहे. दर्जेदार वैशिष्ट्ये असलेल्या ॲपलच्या लॅपटॉपबद्दल आकर्षण असले तरी लाखाच्या घरात असलेल्या किमतीमुळे मॅकबुकला भारतीय बाजारात अद्याप भक्कम स्थान मिळवता आले नव्हते. मात्र, हा अडथळा दूर करून मॅकबुकला भारतासह जगभरातील बाजारात मोठा ग्राहकवर्ग मिळवून देणारा 'मॅकबुक निओ' बुधवारपासून बाजारात दाखल होत आहे. सुमारे ७० हजार रुपये किंमत असलेल्या या मॅकबुकमुळे विंडोज आणि क्रोमबुकच्या उच्च श्रेणीतील लॅपटॉपसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

अमेरिकी बाजारात ४९९ डॉलरला असणारा 'मॅकबुक निओ' भारतीय विद्यार्थ्यांसाठी ५९९०० रुपयांत उपलब्ध होणार आहे. मात्र, किंमत हेच फक्त या लॅपटॉपचे वैशिष्ट्य नाही. मॅकबुक निओमध्ये ॲपलने ए१८ प्रो चिपचा प्रोसेसर म्हणून वापर केला आहे. सध्या आयफोन १६ प्रोमध्ये ही चिप वापरली जाते. पहिल्यांदाच ॲपलने आयफोन आणि मॅकबुक यांचा अशाप्रकारे संगम साधला आहे. इंटेल कोअर अल्ट्रा ५ प्रोसेसरपेक्षा ५० टक्के अधिक क्षमतेने ही चिप काम करते, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे हा लॅपटॉप विंडोज आणि क्रोमबुक ऑपरेटिंग सिस्टीम असलेल्या कंपन्यांच्या लॅपटॉपसाठी आव्हानात्मक स्पर्धा ठरेल, असे बोलले जात आहे.

### अन्य वैशिष्ट्ये

- १०८० पिक्सेलचा फेसटाइम एचडी कॅमेरा.
- स्पॅशियल ऑडिओ आणि डॉल्बी ॲटमस तंत्रज्ञान.
- यूएसबी सी पोर्टचा अंतर्भाव
- आयफोनशी संलग्न करून हाताळणी अधिक सुलभ.
- आठ जीबी रॅम, २५६ जीबी एसडीडी
- ॲपल इंटिलिजन्सचा अंतर्भाव (भारतीय भाषांत अद्याप नाही)



### 'मॅकबुक प्रो'ची घोषणा

ॲपलने एम५ प्रो आणि एम५ मॅक्स प्रोसेसर चिप असलेल्या मॅकबुक प्रोचीही घोषणा केली असून तोदेखील ११ मार्चपासून बाजारात उपलब्ध होणार आहे. यात आतापर्यंतचा अतिजलद जीपीयू असल्याचा कंपनीचा दावा आहे. वायफाय ७, ब्लुटुथ ६, तीन पोर्ट, आठ केपर्यंतचा एचडीएमआय सपोर्ट, लिक्विड रेटिना एक्सडीआर डिस्प्ले, २४ तास चालणारी बॅटरी अशी वैशिष्ट्ये असलेला हा लॅपटॉप १४ आणि १६ इंच आकारात उपलब्ध आहे. १४ इंचाच्या मॅकबुक्र प्रोची किंमत २४९००० इतकी असून १६ इंची मॅकबुक प्रोची किंमत २९९९०० इतकी आहे.

### पूर्णपणे ॲल्युमिनियम सांगाडा

मॅकबुक निओचा पूर्ण सांगाडा हा ॲल्युमिनियममध्ये बनवला असून त्यामुळे हा लॅपटॉप अधिक भक्कम बनला आहे. शिवाय तो वजनानेही हलका ठरतो. सिल्वर, ब्लश, इंडिगो आणि सायट्रस अशा चार रंगांत उपलब्ध असलेल्या या लॅपटॉपच्या कीबोर्डलाही बॉडीच्या रंगाचीच छटा देण्यात आली आहे.

### १३ इंची लिक्विड रेटिना डिस्प्ले



मॅकबुक निओला १३ इंचाचा रेटिना डिस्प्ले देण्यात आला असून त्याचे रेझोल्युशन २४०८ बाय १५०६ इतके आहे. याला 'ॲंटी रिफ्लेक्टीव्ह' अर्थात प्रतिबिंबरोधक 'कोटिंग' पुरवण्यात आल्यामुळे प्रखर प्रकाशातही लॅपटॉपवर व्यवस्थितपणे काम करता येते, असा कंपनीचा दावा आहे.



### मॅजिक कीबोर्ड

मॅकबुक निओमध्ये ॲपलने मॅजिक कीबोर्डचा अंतर्भाव केला आहे. अतिशय पातळ आणि कमी वजनाचा हा कीबोर्ड हाताळताना एक चांगला अनुभव देतो. त्यासोबतच मल्टी टच ट्रॅकपॅड पुरवण्यात आला आहे. याशिवाय या लॅपटॉपमध्ये टच आयडी पुरवण्यात आला आहे. त्यामुळे लॅपटॉप सुरु वा बंद करण्यासाठी किंवा ॲपल पेचा वापर करण्यासाठी सुरक्षित पर्याय उपलब्ध झाला आहे.

### मोबाइलसारखा लॅपटॉप

मॅकबुकमध्ये ए१८ प्रो चिप बसवण्यात आली असल्यामुळे ती आयफोनप्रमाणेच अतिशय सक्षमपणे 'निओ'लाही चालवते. एकाच वेळी व्हॉट्सअप, कॅन्व्हा, एक्सेल, सफारी चालवूनदेखील 'नियो'च्या कार्यक्षमतेत फरक पडत नाही, असा ॲपलचा दावा आहे.

### पूर्ण दिवस चालणारी बॅटरी

मॅकबुक निओच्या बॅटरीसाठी पूर्णपणे पुनर्प्रक्रिया केलेले कोबाल्ट वापरण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणदृष्ट्या ही बॅटरी सक्षम आहेच पण तीची कार्यक्षमताही वाढली आहे. एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर निओ १६ तास सलग चालू शकतो, असे कंपनीचे म्हणणे आहे.




बुधवार,
११ मार्च २०२६

लोकसत्ता महा मुंबई

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

तुम्हाला तुमच्या मुलांच्या लग्नासाठी बचत सुरू करायची आहे का?
आजच संपर्क करा!
Krushna Finserv
AMFI REGISTERED MUTUAL FUND DISTRIBUTOR ARN - 98014
18 & 19, Jai Jawan CHS, Sector 17, Vashi, Navi Mumbai
: +91 22 40953636 (30 lines)
म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

# बेकायदा जाहिरातबाजी?

## पर्यावरण विभागाच्या परवानगीविना पालिकेकडून डिजिटल फलक

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** पाम बीच मार्गावरील सर्व सिग्नलयंत्रणा अत्याधुनिक करण्याच्या नावाखाली रस्त्यांच्या मधोमध अवाढव्य डिजिटल जाहिरातींचे फलक उभारण्याची नवी मुंबई महापालिकेची योजना वादग्रस्त ठरण्याची चिन्हे आहेत. वाहतूक नियमांनुसार अशा फलकांना परवानगी नसताना करण्यात आलेली सांगाड्यांची उभारणी पर्यावरण मंजुरी न घेतल्यानेही अडचणीत आली आहे. राजकीय दबावाखाली झुकून महापालिकेकडून हे कंत्राट बहाल करण्यात आल्याची चर्चा आहे.

नवी मुंबई शहरात ६८ ठिकाणी 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' या तत्त्वावर इंटेलिजन्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) तंत्रज्ञानावर आधारित सिग्नल यंत्रणा उभारण्यात येत आहे. ही यंत्रणा उभारण्याच्या बदल्यात कंत्राटदाराला जाहिरातींचे हक्क देण्यात येणार असून त्यासाठी पाम बीच मार्गावरील सर्व सिग्नलवर रस्त्याच्या मधोमध अवाढव्य जाहिरात फलक उभारण्यात येत आहेत. मात्र, हा निर्णय आता वादात सापडला आहे. वाहतूक पोलिसांची परवानगी न घेताच हे जाहिरात फलक उभारण्यात येत आहेत. रस्ते वाहतूक संबंधी अशा स्वरूपाचे कोणतेही बांधकाम अथवा भौतिक संरचना उभारण्यापूर्वी वाहतूक पोलिसांचा अभिप्राय घेणे कायद्याने बंधनकारक आहे. असे असताना नवी मुंबई वाहतूक पोलिसांच्या 'ना हरकत' दाखल्याशिवाय शहरात जागोजागी जाहिरातींसाठी लोखंडी सांगाडे उभारण्याची कामे सुरू आहे. विशेष म्हणजे, पाम बीच मार्गावर अशा स्वरूपाचे कोणतेही फलक उभारण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची (एमसीझेडएमए) परवानगी आवश्यक ठरते. मात्र पोलीस, पर्यावरण विभागाला वाकुल्या दाखवत या महत्त्वाच्या मार्गावर जाहिरातींसाठी अजस्त्र असे सांगाडे उभारण्याची कामे सध्या जोरात सुरू झाली आहेत.



### चालकांचे लक्ष विचलित होण्याची भीती

वाहतूक कायद्यातील तरतुदींनुसार चालकांचे लक्ष विचलित होईल, अशा प्रकारे लखलखणारे दिवे वा डिजिटल जाहिराती प्रदर्शित करण्यास मनाई आहे. असे असताना नवी मुंबईत रस्त्याच्या मधोमध प्रत्येक सिग्नलजवळ फलक उभारणी केली जात आहे. ज्या सिग्नलवर लाल दिवा लागेल तेथे या डिजिटल जाहिराती सुरू होतील. त्यामुळे अपघात होणार नाहीत असा दावा करण्यात येत आहे. मात्र तरीही हे नियमांचे उल्लंघन असल्याचे बोलले जात आहे.

### प्रकल्प काय?

नवी मुंबई महापालिका निवडणुकांची धामधूम सुरू होण्यापूर्वी महापालिका प्रशासनाने शहरात वेगवेगळ्या ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असलेली ही सिग्नल यंत्रणा उभारण्यासाठी कंत्राट काढले होते. 'पाम बीच' मार्गासह शहरातील महत्त्वाच्या ६८ सिग्नल ठिकाणी वाहतूक नियंत्रकाप्रमाणे ही यंत्रणा काम करेल अशी आखणी करण्यात आली. वाहतुकीचा भार पाहून सिग्नलच्या वेळा कमी अधिक करणे, अत्यावश्यक वाहने दिसताच वाट करून देणे अशी कामे स्वयंचलित पद्धतीने करणारी ही यंत्रणा आहे. याशिवाय एखादा अपघात झाला तर त्याच वेळी वाहतूक पोलिसांना माहिती मिळावी अशी यंत्रणाही याद्वारे विकसित केली जाणार आहे. राज्यात प्रथमच अशास्वरुपाची यंत्रणा उभी केली जात असल्याचा महापालिकेचा दावा आहे.

### पर्यावरण परवानग्यांना वाकुल्या?

'पाम बीच' मार्ग हा खाडी किनाऱ्यापासून हाकेच्या अंतरावर आहे. या मार्गाच्या अलीकडे आणि पलीकडे कोणतीही संरचना उभारणी करायची असेल तर महाराष्ट्र सागरी किनारा नियामक प्राधिकरणाची (एमसीझेडएमए) परवानगी घेणे बंधनकारक ठरते. या मार्गावर मोराज सर्कल अथवा इतरत्र यापूर्वी उभारण्यात आलेल्या मोठ्या डिजिटल होर्डिंग्जना संबंधित प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. असे असताना या नव्या यंत्रणेसाठी 'एमसीझेडएम'ची कोणतीही परवानगी मिळाली नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

वाहन चालकांचे लक्ष विचलित होईल अशा ठिकाणी चलचित्र जाहिराती इलेक्ट्रॉनिक फलकाद्वारे प्रदर्शित करणे हे नियमबाह्य आहे. नवी मुंबईतील काही मार्गावर अशा जाहिराती प्रदर्शित होत असतील तर त्याचा अभ्यास केला जात आहे. यासंबंधी वाहतूक विभागाची हरकत लवकरच संबंधित विभागाला कळविण्यात येईल.
**– तिरुपती काकडे,** उपायुक्त, वाहतूक विभाग, नवी मुंबई

लाल सिग्नल असतानाच जाहिराती सुरू असणार आहेत. त्यामुळे लक्ष विचलित होणार नाही. मात्र तरीही वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत योग्य ती पावले उचलली जातील. –
**– प्रवीण गाढे,** कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, नमुंमपा

## अंतरंग

### पाम बीचवर भुयारी मार्ग

**नवी मुंबई :** शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता पाम बीच मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सानपाडा सेक्टर १९ येथे भुयारी मार्ग उभारण्यात येणार आहे. वृत्त...४

### 'फॉर्म्युला-४ रेसिंग ट्रॅक'ला विरोध

**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर २६ येथील बामणदेव (झोटींगदेव) मैदानावर प्रस्तावित 'फॉर्म्युला-४' कार रेसिंग ट्रॅक उभारण्याच्या नियोजनाला स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला आहे. वृत्त...४

### शेतजमिनीत घातक रसायनांची विल्हेवाट

**पनवेल :** तळोजा परिसरातील धानसर गावाजवळील शेतजमिनीत घातक रसायनांची बेकायदेशीर विल्हेवाट लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वृत्त...४



पश्चिम आशियाई युद्धाचा परिणाम मालाच्या निर्यातीवर होत असल्याने शेकडो कंटेनर जेएनपीएत अडकून पडले आहेत.

# दर्जेदार कांद्याला बाजारात कवडीमोल दर

## निर्यात अडकल्याने जेएनपीएहून कांद्याचे चार कंटेनर माघारी

प्रथमेश गडकरी, लोकसत्ता

**नवी मुंबई :** युद्धपरिस्थितीचा परिणाम कांद्याच्या व्यापारावर दिसू लागला आहे. निर्यातीसाठी पाठविण्यात आलेले कांद्याचे चार कंटेनर दीर्घकाळ बंदरात अडकून राहिल्यानंतर अखेर एपीएमसी कांदा-बटाटा घाऊक बाजारात विक्रीसाठी आणण्यात आले. निर्यात थांबल्याने हा दर्जेदार कांदा स्थानिक बाजारात येत असून त्याला सध्या अतिशय कमी दर मिळत आहे.

निर्यातीसाठी तयार करण्यात आलेला हा कांदा जेएनपीए बंदरातून दुबई आणि इतर आखाती देशांकडे पाठविण्यात येणार होता. मात्र युद्धामुळे काही देशांतील व्यापार आणि वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाल्याने हा माल बंदरातच अडकून पडला. प्रत्येकी ३० टन वजनाचे चार कंटेनर पाच दिवस बंदरात थांबून राहिल्यानंतर निर्यात होण्याची शक्यता कमी झाल्याने निर्यातदारांनी हा कांदा स्थानिक बाजारात (पान ३वर)



निर्यात थांबल्याने एपीएमसीत कलिंगडाची आवक वाढली आहे.

## फळ बाजारातही संभ्रमाची स्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** आखाती देशांकडे जाणाऱ्या फळांच्या निर्यातीवर तात्पुरती बंदी लागू झाल्याने एपीएमसीत आलेला माल अडकून पडत आहे. परिणामी शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये पुढील व्यवहाराबाबत अनिश्चितता आहे.

बाजारात मंगळवारी कलिंगडाची सुमारे ९६१५ क्विंटल आवक झाली असून त्याला १५ ते २० रुपये प्रतिकिलो असा दर मिळत आहे. त्याचप्रमाणे खरबुजचा दर २० ते २५ रुपये किलो दरम्यान आहे.

एपीएमसीतील कलिंगड व्यापारी अब्दुल करीम म्हणाले, ''रमजानच्या सुरुवातीला कलिंगडाचे दर ३५-४० रुपये होते ते आता १५ ते २० रुपये किलोवर आले आहेत. निर्यात बंद असल्याने निर्यातदारांनी आपला शेतमाल मुंबई एपीएमसी आणि स्थानिक बाजारात विक्रीस वळवला आहे.''

■ सुक्यामेव्याच्या दरात २० टक्क्यांनी वाढ ... वृत्त ३

# नवी मुंबईच्या अर्थसंकल्पाला संघर्षाची धार

## महापालिका आयुक्तांच्या अनुपस्थितीत अर्थसंकल्पाची मांडणी

जयेश सामंत, लोकसत्ता

**नवी मुंबई :** शिक्षण, आरोग्य आणि वाहतूक व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी ठोस अशी तरतूद करत वर्षभरापूर्वी शहराच्या विकासासाठी अभिनव असे संकल्प सोडणारे विद्यमान महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या अनुपस्थितीत यंदाचा अर्थसंकल्प सादर होईल असे संकेत आता मिळू लागले आहेत.

महापालिका निवडणुकीनंतर महापालिकेतील प्रशासकीय व्यवस्थेवर एकहाती अंमल मिळविण्याचा प्रयत्न सत्ताधारी भाजप नेत्यांनी सुरू केला असून आयुक्त शिंदे जपानच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या अनुपस्थितीत बुधवारी होणाऱ्या स्थायी समिती सभेत नव्या वर्षात अर्थसंकल्प सादर करण्याचे आदेश प्रशासकीय व्यवस्थेला दिले गेल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. असे झाल्यास महापालिकेच्या इतिहासात प्रथमच आयुक्तांच्या अनुपस्थितीत अर्थसंकल्प सादर होईल.

नवी मुंबई महापालिकेच्या इतिहासात आजवर कधीही आयुक्तांच्या अनुपस्थितीत अर्थसंकल्प सादर झालेला नाही. महापालिकेतील प्रशासकीय व्यवस्थेबरोबर जुळवून घेत त्यात्या वेळच्या महापौर आणि स्थायी समिती सभापतींनी प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनाच आर्थिक वर्षाचा संकल्प सादर करण्याचा मान दिला. त्यासाठी आयुक्त आणि राजकीय व्यवस्थेत समन्वय दिसायचा. महापालिका निवडणुकांनंतर सत्तेत आलेल्या भाजप नेत्यांनी मात्र यंदा मुंबई प्रातिक अधिनियमातील वेगवेगळ्या तरतूदींचा आधार घेत नवे पायंडे पाडण्यास सुरुवात केली असून याचा फटका यावेळी खुद्द आयुक्तांनाच बसेल असे सध्याचे चित्र आहे.

साधारणपणे फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अथवा मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महापालिकेचा अर्थसंकल्प सादर होत असतो. नवी मुंबई महापालिकेच्या (पान ३वर)

### आयुक्त नॉट रिचेबल; सभापतींकडून समर्थन

बुधवारी अर्थसंकल्पाचा मसुदा स्थायी समितीकडे सादर केला जाईल. हा संकल्प प्रशासकीय असला तरी त्यावर रितसर अभ्यास करुन तो स्थायी समिती महासभेपुढे सादर करेल, अशी माहिती स्थायी समिती सभापती अशोक पाटील यांनी 'लोकसत्ता'ला दिली. महापालिकेचा कारभार पुर्णपणे नियमाने सुरू आहे, असेही ते म्हणाले. दरम्यान आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही तो होऊ शकला नाही.

### प्रियकराने 'ब्लॉक' केल्याने तरुणीची वाशी खाडीत उडी

**नवी मुंबई :** प्रियकराने ब्लॉक केल्याने संपर्क तुटून नैराश्य आले म्हणून प्रेयसीने आत्महत्येचा प्रयत्न केला. वाशी खाडी पुलावरून या युवतीने खाडीत उडी मारली. मात्र काही मच्छीमारांनी तिला पाहिल्याने त्यांनी तिला वाचवले.

मंगळवारी सकाळी ही घटना घडली. युवतीच्या पाठीवर सॅक असल्याने ती काही वेळ तरंगत राहिली. त्यात तिला थोडेफार पोहता येत असल्याने तिने हात पाय मारणे सुरू केले. मच्छीमार महेश सुतार यांनी मुलीच्या दिशेने बोट वळवली आणि पाण्यात उतरून तिला वाचवले.

दरम्यान, युवती मुंबईची रहिवासी आहे. काही दिवसांपूर्वी तिचा प्रियकराशी वाद झाला. त्याने तिचा मोबाइल क्रमांक ब्लॉक केला. त्याच्याशी संपर्क होत नसल्याने तिला नैराश्य आले. वाशीच्या दिशेने लोकल येत असताना खाडी संपताच वाशी रेल्वे स्थानक असल्याने पुलावर लोकलचा वेग खूप कमी होत असतो. हीच संधी साधून तिने खाडीत उडी मारली होती.






# करिअर वृत्तांत

शिकण्याची आवड निर्माण कराल, तर तुमचा विकास कधीही थांबणार नाही.
- अँथनी डि'अँजेलो, अमेरिकन व्यावसायिक

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
फारुक नाईकवाडे

## मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन - पेपर तीन

# अर्थव्यवस्था- साधनसंपत्तीचे एकत्रीकरण

**साधनसंपत्तीचे एकत्रीकरण हा अभ्यासक्रमातील शब्द इंग्रजीच्या 'रिसोर्स मोबिलायझेशन' शब्दाचे भाषांतर आहे. यात साधनसंपत्तीची उपलब्धता, तिचा परिणामकारक वापर, नियोजन या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यवस्थापन हा मराठी शब्द ही एकूण संकल्पना समजून घेण्यासाठी जास्त साजेसा आहे.**

### साधनसंपत्तीचे एकत्रीकरण ठळक मुद्दे

- साधन संपत्तीचे प्रकार
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची संकल्पना
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची आवश्यकता
- साधन संपत्तीचे स्रोत - सार्वजनिक, खासगी / अंतर्गत, बाह्य गुंतवणूक
- साधन संपत्तीचे वितरण
- वित्त आयोग
- शासकीय उपक्रम
- वित्तीय धोरणांची भूमिका
- आव्हाने



**अर्थव्यवस्था घटकाच्या** साधनसंपत्तीचे एकत्रीकरण या उपघटकाच्या तयारीबाबत या लेखामध्ये पाहू.

या उपघटकामध्ये अभ्यासायचे ठळक मुद्दे सोबतच्या चौकटीमध्ये दिलेले आहेत. त्यांच्या आधारे तयारीची रणनीती पाहू. या उपघटकावर प्रत्यक्ष प्रश्न विचारले जाण्याची शक्यता कमी आहे. पण इतर गतिमान मुद्दे, चालू घडामोडींवर आधारित, विश्लेषणात्मक प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी या मुद्द्यांचा मूलभूत आणि संकल्पनात्मक अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात यांवर पारंपरिक प्रश्न कमी दिसणार असले तरी हा मुद्दा परीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

### मुद्देनिहाय तयारी

- साधनसंपत्तीचे नैसर्गिक मानवनिर्मिती आणि मानवी असे तीन प्रकार, त्यांचे महत्त्व, त्यांची वैशिष्ट्ये, सर्वसाधारण उपलब्धता, भारतातील उपलब्धता, त्यांचा वापर आणि विकासातील आव्हाने, उपाय समजून घ्यायला हवेत.
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणामध्ये वित्तीय आणि इतर सर्वच संसाधनांचा विचार होत असला तरी तयारी करताना वित्तीय संसाधनांवर भर देणे आवश्यक आहे. वित्तीय संसाधनांच्या एकत्रीकरणाचे महत्व समजून घ्यायला हवे. विशेषतः शासकीय अंदाजपत्रके, अर्थसंकल्प यांचेशी परस्पर संबंध अभ्यासायला हवा.
- साधनसंपत्तीच्या एकत्रीकरणाची शासनाला आवश्यकता का आहे, हे लक्षात घ्यायला हवे. संसाधनांच्या एकत्रीकरणातून पुढील बाबी कशा साधल्या जातात ते समजून घ्यायला हवे - सर्व प्रकारच्या संसाधनांचा कमाल आणि परिणामकारक वापर, त्यांमध्ये वैविध्य राखणे, स्वतंत्र आणि आत्मनिर्भर अर्थसंकल्प तयार करणे, भारतामध्ये कल्याणाकारी शासन व्यवस्था असल्याने कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या म्हणून सामाजिक उपक्रमासाठी तरतूद करणे.
- देशांतर्गत स्रोतांमध्ये बचत, गुंतवणूक आणि भांडवल निर्मिती, बाह्य गंतवणूक आणि कर्जे व अन्य स्रोत, सार्वजनीक स्रोतामधील कर, करेतर आणि अन्य उत्पन्न या बाबी विचारात घ्यायला हव्यात. यांची अद्ययावत आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालामधून पहायला हवी. बचतीचे प्रकार, सकल नियत भांडवल निर्मिती (GFCF), हे विश्लेषणात्मक मुद्दे संकल्पनात्मक तयारीसाठी महत्त्वाचे आहेत.
- शासकीय स्रोतांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, करेतर महसूल, कर्ज आणि गुंतवणूक हे स्रोत व्यवस्थित समजून घ्यायला हवेत. कारण हे अर्थसंकल्पातील - शासकीय अंदाजपत्रकातील उत्पन्नाचे स्रोत आहेत. यांच्या विश्लेषणातून अर्थव्यवस्थेवी वृद्धी आणि विकास यांच्यामधील समतोल समजून घेणे शक्य होणार आहे. कर महसूलामध्ये वस्तू व सेवा कराचे फायदे, आव्हाने, समस्या आणि विश्लेषणात्मक मूल्यमापन आवश्यक आहे.
- करेतर महसूलामधील निर्गुंतवणुकीची संकल्पना समजून घेऊन तिचे फायदे - तोटे, समस्या, आव्हाने, परिणामकारकता आणि उपाययोजना या मुद्द्यांच्या आधारे विश्लेषण आवश्यक आहे.
- परकीय गुंतवणुकींचे प्रकार व महत्त्व समजून घ्यावे. आर्थिक पाहणी अहवालामधून त्यांची आकडेवारी आणि ट्रेंड्स - कल लक्षात घ्यायला हवेत. परकीय संस्थांची कर्जे व त्यांचा वापर त्या-त्या वर्षीच्या चालू घडामोडींचा भाग म्हणून विचारात घ्यावेत.
- वित्तीय संसाधनांच्या उपलब्धतेसाठी त्यांचे योग्य वितरण आवश्यक आहे. केंद्र व राज्यांमध्ये वित्तीय संसाधनांच्या वितरणासाठी वित्त आयोग धोरण व सूत्रे ठरविते. यासाठीच्या घटनात्मक तरतूदी, वित्त आयोगाची रचना, कार्ये, भूमिका लक्षात घ्याव्यात. १५व्या आणि १६व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या तुलना आणि १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे मूल्यमापन लक्षात घ्यायला हवे. यामध्ये बँका, वित्तीय संस्था, पतसंस्था, सहकारी संस्था, विशेष प्रकारच्या वित्तीय संस्था व स्रोत उदा. इंडिया इनोव्हेशन फंड, आर्थिक विकास महामंडळे, तसेच एंजल गुंतवणूकदार संकल्पना माहीत हव्यात. त्यांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे योगदान, समस्या, कारणे, उपाय आणि महत्त्व हे मुद्दे विचारात घ्यावेत. यामध्ये प्रत्यक्ष लाभ वितरण (DBT), राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइन (NIP), राष्ट्रीय मौद्रीकरण पाइपलाइन (NMP), प्रधानमंत्री जन धन योजना या उपक्रमांची माहिती आवश्यक आहे.
- वित्तीय धोरणांच्या माध्यमातून साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर कशा प्रकारे होतो ते समजून घ्यायला हावे. उदा. महसूलाचा वापर कल्याणकारी कामांकरीता निधी उभारणीसाठी करणे किंवा कररचनेच्या माध्यमातून समान संसाधन वितरण साधण्याचा प्रयत्न करणे (प्रगतीशील करांच्या माध्यमातून कमी उत्पन्न गटास संरक्षण).
- साधन संपत्तीचे एकत्रीकरण करण्यातील अडचणी / आव्हाने स्वरूप, कारणे, परिणाम, उपाय अशा मुद्द्यांच्या आधारे विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये महसूलासठीचे नवे स्रोत शोधणे, करेतर महसूलावरील वाढते अवलंबित्व, शासकीय खर्चावरील अवलंबित्व, जागतिक कर सुधारणांमुळे भारतीय करवसूलीवर येणाऱ्या मर्यादा, निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणास मिळणारा अल्प प्रतिसाद अशा मुद्द्यांचा समावेश असला पाहिजे.
- मूलभूत संकल्पना आणि या क्षेत्रातील बाबींचे परस्परसंबंध लक्षात घेतले तर चालू घडामोडींच्या आधारे चर्चा, वाचन आणि चिंतनातून आपली मते तयार करणे शक्य होते. संसाधनांबाबतची आव्हाने सोडविण्यासाठी अशा विश्लेषणाचा आधार घेऊन मुद्दे तयार करणे आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

# श्रम संहितेतील महत्त्वाच्या तरतुदी

**नवीन कामगार कायद्यांविषयी कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता व शंका आहेत. या कायद्यांचा आपल्यावर काय परिणाम होईल अशी बरेच जण विचारणा करत आहेत. त्यासंबंधी काही महत्त्वाच्या बाबींवर या लेखात चर्चा करूया.**

कौशल्य तंत्र
सलील चिंचोरे

**भारतामध्ये कामगार** कायदे अधिक सोपे, सुसंगत आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने पूर्वी अस्तित्वात असलेले २९ वेगवेगळे कामगार कायदे एकत्र करून चार नवीन श्रम संहितांची (Labour Codes) निर्मिती केली आहे. या श्रम संहितांचा मुख्य उद्देश म्हणजे कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, उद्योगांना नियमांचे पालन करणे सोपे करणे आणि भारतातील रोजगार व्यवस्थेला अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनवणे. नोव्हेंबर २०२५ पासून श्रम संहिता सरकारने लागू केल्या आहेत. या चार संहिता पुढील प्रमाणे आहेतः

वेतन संहिता, २०१९ (कोड ऑन वेजेस) - कामगारांना किमान वेतन, वेतनाची वेळेवर देयता आणि वेतनाशी संबंधित नियम निश्चित करते.

औद्योगिक संबंध संहिता, २०२० (इंडस्ट्रीयल रिलेशन्स कोड) - नियोक्ता-कर्मचारी संबंध, कामगार संघटना आणि औद्योगिक वाद यासंबंधी नियम स्पष्ट करते.

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या अटी संहिता, २०२० (ओएसएच कोड) -कामगारांचे कार्यस्थळावरील सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी सुधारण्यासाठी नियम ठरवते.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (सोशल सिक्युरिटी कोड) - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ), विमा, पेन्शन आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश करते.

श्रम संहितेमध्ये कर्मचाऱ्यांसंबंधी अनेक बाबींची फेरमांडणी केली आहे. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे पगार व वेतन यांची नव्याने केलेली व्याख्या. खासगी क्षेत्रात पगारातील सर्व घटकांना एकत्र करून येणाऱ्या रकमेला सीटीसी (कॉस्ट टू कंपनी) असे म्हणतात. यामध्ये मासिक पगार, बोनस, परफॉर्मन्स इन्सेंटिव्ह, प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी यांचा समावेश होतो. यातील प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी हे बेसिक वेतन व महागाई भत्त्याच्या कायद्यानुसार विशिष्ट टक्केवारी म्हणून मोजले जातात. या घटकांना अप्रत्यक्ष लाभ असेही म्हणतात. सीटीसीमध्ये बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण जितके जास्त तितक्या प्रमाणात अप्रत्यक्ष लाभ वाढतात. श्रम संहिता लागू होण्याआधी प्रत्येक कंपनीमध्ये सीटीसीमधील बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण वेगवेगळे होते.

श्रम संहितांमध्ये वेतन (वेज) मासिक पगाराच्या (मंथली सॅलरी) कमीत कमी ५० टक्के ठेवण्याचे बंधनकारक केले आहे. वेतनामध्ये समावेश असलेल्या व समावेश नसलेल्या घटकांची यादी दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या रचनेत अधिकाधिक स्पष्टता आणणे हा यामागचा हेतू आहे. आता मासिक पगाराच्या किमान ५० टक्के रकमेवर (वेतनावर) प्रॉव्हिडंट फंड, व ईएसआयसी कापले जाणार आहे. तसेच ही रक्कम ग्रॅच्युईटी मोजण्यासाठी वापरली जाणार आहे. ही रक्कम तुमच्या सध्याच्या पगारातील रकमेपेक्षा जास्त असल्यास तेवढ्या प्रमाणात तुमचे अप्रत्यक्ष लाभ वाढतील. मात्र त्यामुळे तुमच्या हाती येणाऱ्या निव्वळ पगारावर (टेक होम सॅलरीवर) परिणाम होईल.

कंपन्यांना निश्चित मुदतीचे कर्मचारी (फिक्स्ड टर्म एम्प्लॉईज) नेमण्याची तरतूद केली आहे. या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखे सर्व फायदे (रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा) द्यावे लागतील. हे कर्मचारी किमान एक वर्ष नोकरी केल्यानंतर ग्रॅच्युईटीसाठी पात्र ठरतील.



कंपनीतील सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांना (कायमस्वरूपी, निश्चित मुदतीचे, कंत्राटी) नेमणूकपत्र देणे बंधनकारक असेल. या नेमणूकपत्रात कामाचे स्वरूप, कामाचे ठिकाण व वेतनाचे तपशील द्यावे लागतील. महिला कर्मचाऱ्यांना नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची श्रम संहिता परवानगी देते. त्यासाठी कंपनीला महिला कर्मचाऱ्यांची लिखित पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. कर्मचाऱ्याने कंपनी सोडल्यास त्याची देय रक्कम (फायनल सेटलमेंट) कंपनीला दोन दिवसात द्यावी लागेल.

ई-कॉमर्स क्षेत्रात सध्या गिग कामगारांचा वापर होतो. हे कामगार एकाच वेळेस अनेक कंपन्यांबरोबर विशिष्ट काळासाठी किंवा कामासाठी काम करतात. श्रमसंहितेत अशा कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद केलेली आहे. त्यासाठी कंपन्यांना विक्रीचा एक टक्का रक्कम सामाजिक सुरक्षा फंडासाठी द्यावी लागेल.

याविषयी कंपनीतील तज्ज्ञांशी बोलून श्रमसंहितेविषयी तुम्ही अधिक माहिती जाणून घेऊ शकता व त्यातील नियमांचे काटक काटेकोरपणे पालन करू शकता.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत.)

# संक्रमणातून जाणारे आयटी क्षेत्रातील शिक्षण

चौकटी-पल्याड
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

**आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक नियमित कामे स्वयंचलित करेल; परंतु त्याच वेळी नवे तांत्रिक आणि सामाजिक प्रश्नही निर्माण होतील. त्यामुळे भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील.**



**आज जगभरातील** माहिती तंत्रज्ञान (आयटी) शिक्षण एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत संगणकशास्त्रातील पारंपरिक शाखा म्हणजे प्रोग्रॅमिंग, डेटाबेस व्यवस्थापन किंवा नेटवर्किंग यांवर भर दिला जात होता. मात्र आता आयटी शिक्षण अधिक व्यापक आणि बहुआयामी आणी बहुविषयक बनत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये आयटी अभ्यासक्रमांची रचना आणि त्यामधील संशोधनाचे केंद्रबिंदू झपाट्याने बदलत आहेत.

आयटीमधील सध्या सर्वाधिक मागणी असलेली उप-क्षेत्रे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि रोबोटिक्स. आरोग्यसेवा, हवामान बदल, वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक), जैवतंत्रज्ञान आणि शहरी नियोजन अशा विविध क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढत असल्याने या शाखांतील तज्ज्ञांची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर एआय एथिक्स, रिस्पॉन्सिबल टेक्नॉलॉजी आणि ह्युमन-कॉम्प्युटर इंटरॅक्शन यांसारख्या विषयांनाही महत्त्व मिळत आहे.

अमेरिका आणि ब्रिटन ही आयटी शिक्षणाची पारंपरिक केंद्रे असली तरी आज इतर अनेक देशांतील विद्यापीठेही वेगाने पुढे येत आहेत. जर्मनीमधील टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक आणि आरडब्ल्यूटीएच आखेन येथे डेटा इंजिनीअरिंग व रोबोटिक्समध्ये मूलभूत संशोधन सुरू आहे. नेदरलँड्समधील डेल्फ्ट युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि आयंधोव्हन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी येथे स्मार्ट सिस्टीम्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर दिला जातो. कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो आणि युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू ही प्रत्यक्ष उद्योगांशी जोडलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आहेत.

ऑस्ट्रेलियामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न, ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साउथ वेल्स आणि मोनॅश युनिव्हर्सिटी येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटीमध्ये आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. चीनमधील त्सिंगहुआ युनिव्हर्सिटी, पेकिंग युनिव्हर्सिटी आणि शांघाय जिआओ टोंग युनिव्हर्सिटी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन चालते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीही या संधी खुल्या होत आहेत. या अभ्यासक्रमांसाठी केवळ संगणक अभियांत्रिकीचेच नव्हे तर गणित, सांख्यिकी, इलेक्ट्रॉनिक्स किंवा भौतिकशास्त्राची पार्श्वभूमी असलेले विद्यार्थीही अर्ज करू शकतात. विश्लेषण क्षमता, प्रोग्रॅमिंग कौशल्य, संशोधनवृत्ती मुख्यत्वे अपेक्षित असते.

आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील. मराठी विद्यार्थ्यांसाठी ही संधी केवळ करिअरची नाही, तर नव्या ज्ञानविश्वाशी जोडणाऱ्या आणि जागतिक तंत्रज्ञान परिसंस्थेत सहभागी होण्याच्या प्रवासाची सुरुवात ठरू शकते.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

### आयटीतील भविष्यवेधी उद्योजक : सुमित मोरे

भारतामधील अनेक आयटी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे हे मोठे स्वप्न असते. परंतु त्या स्वप्नासोबत आर्थिक अडचणी आणि शिक्षणासाठी कर्ज घेण्याची जोखीमही असते. सुमितची कथा मात्र वेगळी आहे. चिकाटी, योग्य नियोजन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव यामुळे त्याचा प्रवास प्रेरणादायी ठरतो.
सुमितने पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), येथून माहिती तंत्रज्ञान शाखेत बी.ई. पदवी पूर्ण केली. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षापासूनच त्याने आपल्या मित्रांप्रमाणे जीआरई आणि टॉफेल या परीक्षांची तयारी सुरू केली होती. मात्र परदेशी शिक्षणासाठी मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन कुटुंबावर आर्थिक ओझे टाकायचे नाही, असा त्याचा स्पष्ट निर्णय होता.
म्हणूनच सुमितने आधी नोकरी करून काही रक्कम साठवण्याचा मार्ग निवडला. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून त्याची निवड आयबीएममध्ये झाली. नोकरी करत असतानाच त्याने जीआरई आणि टॉफेल या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याला इंग्लंडमध्ये एका प्रकल्पासाठी काम करण्याची संधी मिळाली. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला.
यानंतर त्याने अमेरिकेतील पाच विद्यापीठांमध्ये आयटीमधील मास्टर्ससाठी अर्ज केले आणि त्याला युनिवर्सिटी ऑफ मेरीलॅन्ड येथे प्रवेश मिळाला. त्याच्या कामाच्या अनुभवामुळे त्याला शिक्षण शुल्कासाठी संपूर्ण शिष्यवृत्ती मिळाली. पहिल्या वर्षातच त्याला टीचिंग असिस्टंटशिप आणि नंतर रिसर्च असिस्टंटशिप मिळाली. स्टायपेंडही मिळू लागला. शिक्षण शुल्काव्यतिरिक्त असलेल्या खर्चाचाही प्रश्न यातून सुटला. उन्हाळ्यात त्याने सिलिकॉन व्हॅली मधील एका स्टार्टअपमध्ये तीन महिन्यांची इंटर्नशिप केली. हे सारे करीत असताना सुमितने आपला मास्टर्स अभ्यासक्रम थिसिस पद्धतीने पूर्ण केला.



अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी असूनही सुमित भारतात परतला. प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या पुस्तकाने त्याला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. दरम्यान त्याने हेमलकसाला जाऊन लोकबिरादरीमध्ये एक वर्ष काम केले. तेथे आदिवासी मुलांना मराठी शिकण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्याने 'अक्षर' हे मोबाइल ॲप विकसित केले. या उपक्रमाला नॅसकॉमकडून सन्मान मिळाला.
दहा वर्षापूर्वी मित्राच्या मदतीने त्याने 'नॉन स्टॉप आयओ टेक्नॉलॉजीज' ही कंपनी सुरु केली आणि ती आज अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर प्रोडक्ट डेव्हलपमेंटचे काम करते आहे. आज या कंपनीत दीडशे पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.
सामाजिक बांधिलकीची प्रेरणा आणि जागतिक शिक्षणाचा अनुभव यांचा संगम घडवत सुमित आज आपल्या कंपनीच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात नवे योगदान देत आहे.

## शब्दकोडे- ३६१

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | |
| १० | | ११ | | ■ | १२ | १३ | | ■ | |
| | ■ | १४ | | ■ | १५ | | | १६ | ■ |
| ■ | १७ | | ■ | १८ | | | ■ | १९ | २० |
| २१ | | | २२ | ■ | | ■ | २३ | | |
| २४ | | ■ | २५ | २६ | ■ | २७ | | | ■ |
| | ■ | २८ | ■ | २९ | | | | ■ | ३० |
| ३१ | ३२ | | ३३ | | ■ | | ■ | ३४ | |
| ■ | ३५ | | | ■ | ३६ | | | | |

**आडवी विधाने :** (१) जन्मभर, तहहयात (३) 'बाई पण भारी देवा' चित्रपटाचे दिग्दर्शक (फक्त नाव) (५) मित्र, सवंगडी (७) दिवस (८) मत्सर, द्वेष (९) शृंगारिक, रसप्रधान काव्यगायन प्रकार (१०) दाणादाण, फाटाफूट (१२) एक लोकप्रिय बैठा खेळ (१४) गाडीवरचे आच्छादन (१५) रंग, औषध वगैरे उडवण्याची नळी (१७) एक अधिक पाव (१८) घडलेली गोष्ट, प्रसंग (१९) चीर, भेग (२१) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस (२३) कूर्म, कच्छप (२४) खुबी, मर्म (२५) सुट्टी, परवानगी (२७) माकड, कपी (२९) वार्षिक नेमणूक (३१) पाहुणचार, बडदास्त (३४) लोखंडाचा चपटा, अरुंद लांब तुकडा (३५) एक सुगंधी वनस्पती (३६) वार्ताहर

**उभी विधाने :** (१) एखाद्या प्रदेशात मूळचे राहणारे लोक (२) आणीबाणीला विरोध करण्यासाठी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विविध विचारधारांच्या नेत्यांनी एकत्र येऊन हा पक्ष स्थापन केला होता (३) हा कापून वाढदिवस साजरा केला जातो (४) कार्ल मार्क्स यांचा प्रसिद्ध ग्रंथ (५) तालाच्या आरंभीची मुख्य जागा, सारखा (६) वाळलेला खजूर (८) ऊन, सूर्यप्रकाश (९) डौलात चालणे, नखऱ्याने चालणे (११) हेकेखोरपणा, आग्रहीपणा (१३) मांडणी, ठेवण (१६) नियमानुसार, रूढीला धरून (१७) सूर्योदयापासून दुपारपर्यंतचा काळ (२०) खेळाची पाळी, मोठी पळी (२१) गणपतीला वाहिल्या जाणाऱ्या दुर्वांची संख्या (२२) अशुद्ध रक्तवाहिनी (२३) अरण्य, जंगल (२६) मुलीचा नवरा (२७) सोक्षमोक्ष, फैसला (२८) ओटीपोटाच्या खालचा भाग, कटी (३०) मुघल साम्राज्याचा संस्थापक (३२) विदेशी मद्याचा एक प्रकार (३३) कीर, पोपट (३४) हा कंद चिरताना डोळ्यातून पाणी आणतो

– चारू नानल

## सुडोकू - ३६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९ | १ | ५ | |
| ६ | ८ | १ | | | | | ९ | |
| ४ | | | | ८ | | | २ | |
| २ | | | | ७ | | | | |
| | | ३ | ६ | | ८ | २ | | |
| | | | | ४ | | | | ६ |
| | ६ | | | २ | | | | ९ |
| | ९ | | | | | ८ | ७ | २ |
| | २ | ५ | ३ | | | | | |

## सुडोकू - ३६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ४ | ८ | १ | ९ | ५ | २ |
| ५ | १ | ८ | ६ | ९ | २ | ३ | ४ | ७ |
| ९ | ४ | २ | ५ | ३ | ७ | १ | ८ | ६ |
| १ | ८ | ४ | ९ | ६ | ३ | २ | ७ | ५ |
| ७ | ९ | ६ | ८ | २ | ५ | ४ | ३ | १ |
| २ | ५ | ३ | ७ | १ | ४ | ६ | ९ | ८ |
| ८ | २ | ५ | ३ | ४ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ७ | १ | २ | ५ | ९ | ८ | ६ | ३ |
| ३ | ६ | ९ | १ | ७ | ८ | ५ | २ | ४ |

## शब्दकोडे -३६०चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | ज | यं | ती | ■ | का | र्ल | स | न |
| म | सू | र | ■ | न | व | रा | ■ | जा | ■ |
| ला | ल | ■ | कै | वा | र | ■ | स | व | त |
| ■ | दा | स | ■ | र | ■ | त | र | ट | ■ |
| स | र | ब | त | ■ | मा | र | ळ | ■ | हू |
| ह | ■ | ब | ■ | मा | न | स | ■ | रं | क |
| न | भ | ■ | का | ल | व | ■ | जो | ग | ■ |
| ■ | ग | ण | प | ती | ■ | स | र | पं | च |
| दा | दा | ■ | रे | ■ | नि | त्य | ■ | च | ■ |
| म | ड | के | ■ | सं | धी | ■ | स | मी | प |

# पाम बीचवर भुयारी मार्ग

## सानपाडा, जुईनगरमधील वाहतूक कोंडीवर महापालिकेचा तोडगा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता पाम बीच मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सानपाडा सेक्टर १९ येथे भुयारी मार्ग उभारण्यात येणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई महानगरपालिकेकडून हाती घेण्यात आला असून यामुळे सानपाडा आणि जुईनगर परिसरातील नागरिकांना शहराबाहेर पडताना भेडसावणाऱ्या कोंडीतून दिलासा मिळणार आहे.

वाहतूक कोंडीची समस्या मार्गी लावण्यासाठी हा पर्यायी मार्ग महत्त्वाचा ठरणार असल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. सानपाडा सेक्टर १९ येथील केसर सोलिटेअर इमारतीजवळ हा भुयारी मार्ग प्रस्तावित असून, स्थानिक नागरिकांकडूनही या मार्गाची सातत्याने मागणी करण्यात येत होती. सध्या संपूर्ण सानपाडा नोडमध्ये पाम बीच मार्गावर प्रवेश करण्यासाठी मोराज सर्कलजवळील एकमेव मार्ग उपलब्ध आहे.

वाढती वाहतूक, जवळच उभारला जाणारा आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी बंदराचे विस्तारीकरण आणि नियोजित 'तिसरी मुंबई' या प्रकल्पांमुळे भविष्यात पाम बीच मार्गावरील वाहतुकीवर मोठा ताण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ३२९ वृक्षांचे पुनर्रोपण

- या प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या पाहणीत परिसरात एकूण ८०८ वृक्षांची नोंद झाली होती. त्यापैकी ३६८ वृक्ष जसेच्या तसे जतन करण्यात येणार आहेत, तर ४४० वृक्षांपैकी ३२९ वृक्षांचे शास्त्रीय पद्धतीने त्याच परिसरात पुनर्रोपण करण्यात येणार आहे.
- आंबा, चिंच, आवळा, जांभूळ, रामफळ, पुत्रनजिवा आणि गुलमोहर अशा विविध प्रजातींचा यात समावेश आहे. केवळ १११ वृक्ष हटवावे लागणार असून त्यापैकी ९२ झाडे 'सुबाभूळ' या जैवविविधतेच्या दृष्टीने तुलनेने कमी महत्त्वाच्या प्रजातीची असल्याचे वृक्षतज्ज्ञांनी नमूद केले आहे.
- या वृक्षांबाबतची प्रक्रिया पार पाडताना वृक्ष प्राधिकरणाने नागरिकांकडून हरकती मागवल्या होत्या. एकूण ४७ हरकती प्राप्त झाल्यानंतर त्यावर वृक्ष अधिकारी (तुर्भे) यांच्या उपस्थितीत सुनावणी घेण्यात आली. यावेळी अशा कोणत्याही हरकती नोंदवल्या नसल्याचे सांगितल्याने काही बाबतीत संभ्रम असल्याचेही निदर्शनास आले आहे.



### प्रवासाचा वेळ कमी, इंधनाचीही बचत

महापालिकेच्या मते, सानपाडा येथील हा भुयारी मार्ग पूर्ण झाल्यानंतर नागरिकांचा प्रवासाचा वेळ कमी होण्यासोबतच इंधनाचीही बचत होईल. विकासकामांसोबत पर्यावरण संवर्धनाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला जात असून, अफवांवर विश्वास न ठेवता शहराच्या विकासासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

# धानसरच्या शेतजमिनीत घातक रसायनांची विल्हेवाट

## माती, जलस्रोतांना प्रदूषणाचा धोका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पनवेल :** तळोजा परिसरातील धानसर गावाजवळील शेतजमिनीत घातक रसायनांची बेकायदेशीर विल्हेवाट लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तक्रारीनंतर तळोजा पोलिसांनी कारवाई करत दोन जणांविरोधात गुन्हा दाखल केला. यामुळे माती व जलस्रोतांच्या प्रदूषणाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयाचे क्षेत्र अधिकारी शिवानंद बसवदे यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. ६ मार्च रोजी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास धानसर गावाबाहेरील मोकळ्या शेतजमिनीत तपासणी करण्यात आली असता घातक रसायनांची बेकायदेशीर विल्हेवाट लावण्यात आल्याचे आढळून आले. पासादरम्यान संबंधित शेतजमिनीत खड्डे करून त्यामध्ये घातक रसायने ओतण्यात आल्याचे उघड झाले. या रसायनांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याची तरतूद असतानाही ती पाळण्यात आली नसल्याचे स्पष्ट झाले.

परिणामी, ही रसायने जलस्रोतांमध्ये मिसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



### परिसरातील शेतीवर गंभीर परिणाम

- पोलिसांनी केलेल्या पाहणीत त्या ठिकाणी सुमारे २०० प्लास्टिक आणि लोखंडी पिंपांमध्ये रसायने भरलेली आढळली. तसेच सुमारे ४० गोण्यांमध्ये घातक घनकचरा साठवून ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले.
- तळोजा पोलिसांनी कारखान्याच्या नाल्यात टँकरने घातक रसायने टाकणाऱ्याला रंगेहाथ अटक केली होती. भंगार व्यावसायिक असेच प्रकार करून रसायनांची विल्हेवाट लावतात.
- कारखान्यातून निघणाऱ्या घातक रसायने कायदेशीररीत्या विघटन करण्यासाठी हजारो रुपये कारखानदारांना लागतात, त्यामुळे कारखानदार विल्हेवाटासाठी प्रति पिंपदराने भंगार व्यावसायिकांच्या मदतीने मिळेल त्या जमिनीत विघटनाचा गैरधंदा कमी दरात करत असल्याने हे प्रकार घडत आहेत.
- आतापर्यंत तळोजा व कळंबोली पोलिसांनी असे बेकायदेशीर विघटनाचे अनेक प्रकार उघड केले आहेत.
- घातक रसायने विघटनासाठी बेकायदेशीर देणाऱ्या कारखानदारांवर कठोर शिक्षा करण्याची मागणी होत आहे.

# करावे भुयारी मार्गाची साफसफाई

**नवी मुंबई :** पामबीच मार्ग ओलांडताना करावे येथील स्थानिकांच्या सुरक्षेसाठी भुयारी मार्ग तयार केला आहे. या मार्गात पाणी साचत असल्याने दुर्गंधी, चिखलामुळे होणाऱ्या अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत होती. 'लोकसत्ता' मध्ये याबाबत वृत्त प्रसिद्ध होताच महापालिकेच्या बेलापूर विभाग कार्यालयामार्फत भुयारी मार्गाची तत्काळ स्वच्छता केली.

दरवर्षी या भुयारी मार्गात पाणी साठते. त्यामुळे पालिकेने येथे पंप बसवले आहेत. या भुयारी मार्गात मोठी भरती आल्यानंतर समुद्राचे पाणी जमिनीखालुन भुयारात येते. त्यामुळे सर्वत्र घाण साचून दुर्गंधी येत असल्याने पालिकेने तात्काळ याबाबत उपाययोजना करावी अशी मागणी करण्यात येत होती. याच भुयारी मार्गाचा वापर करत दररोज पहाटे करावी गावातील मासेमारी करण्यासाठी ग्रामस्थ समुद्राकडे जातात. बामणदेव भुयारी मार्गाच्या स्वच्छतेबाबत पालिकेने तत्काळ कार्यवाही केली. भुयारी मार्गाबाबत व तेथील स्वच्छतेबाबत संबंधित स्वच्छता अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे करावी भुयारी मार्गाची तात्काळ स्वच्छता करण्यात आल्याची माहिती सहाय्यक आयुक्त प्रशांत नेरकर यांनी दिली.

# 'फॉर्म्युला-४ रेसिंग ट्रॅक'ला स्थानिकांचा विरोध

## दोन्ही शिवसेनांचाही आक्षेप, पर्यायी जागेची मागणी; वृक्षतोडीबाबतही चिंता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर २६ येथील बामणदेव (झोटींगदेव) मैदानावर प्रस्तावित 'फॉर्म्युला-४' कार रेसिंग ट्रॅक उभारण्याच्या नियोजनाला स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. नेरूळ ग्रामविकास मंडळासह परिसरातील नागरिकांनी मैदान क्रीडांगण म्हणून कायम ठेवण्याची मागणी केली असून या प्रकल्पासाठी पर्यायी जागेचा विचार करावा, असे सांगितले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात दोन्ही शिवसेना गटांनीही वेगवेगळ्या स्तरावर आक्षेप नोंदवत प्रशासनाकडे दाद मागितली आहे.

इंडियन रेसिंग फेस्टिव्हल अंतर्गत देशातील विविध शहरांमध्ये 'फॉर्म्युला-४' कार रेसिंग स्पर्धा आयोजित केल्या जात असून त्यातील एक स्पर्धा नवी मुंबईत आयोजित करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी नेरूळ सेक्टर २६ मधील बामणदेव मैदानावर तात्पुरता रेसिंग ट्रॅक उभारण्याची तयारी सुरू असल्याची माहिती समोर आल्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांच्या मते, बामणदेव मैदान हे परिसरातील मुला-मुलींसाठी महत्त्वाचे क्रीडांगण आहे. येथे नियमितपणे क्रिकेट, फुटबॉल तसेच इतर खेळांचा सराव केला जातो. त्यामुळे अशा मैदानाचा वापर कार रेसिंगसारख्या उपक्रमासाठी केल्यास स्थानिक खेळाडूंना मोठा फटका बसेल, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. मैदान परिसरातील सुमारे ४५-५० झाडांची तोड होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने पर्यावरणीय परिणामांबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर युवासेना जिल्हाप्रमुख व नगरसेवक अनिकेत म्हात्रे, नगरसेविका ऐश्वर्या सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक ग्रामस्थांनी महापौर सुजाता पाटील यांची भेट घेऊन निवेदन दिले. या वेळी शिवसेना (शिंदे) गटनेते मनोज हळदणकर, नगरसेवक जगदीश गवते, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रेवेंद्र पाटील, अंकुश सोनावणे उपस्थित होते. मैदानाचा वापर केवळ क्रीडा उपक्रमांसाठीच राखून ठेवावा आणि रेसिंग ट्रॅकसाठी पर्यायी जागेची मागणी केली आहे.

दरम्यान, या प्रस्तावित 'एफ-४ स्ट्रीट सर्किट' कार रेस संदर्भात शिवसेना (उबाठा) गटानेही आक्षेप घेतला आहे. उपशहरप्रमुख समीर बागवान यांनी या प्रकरणात पर्यावरणीय परिणाम, सार्वजनिक निधीचा संभाव्य खर्च तसेच विविध परवानग्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करत नवी मुंबई महापालिका प्रशासनाकडे निवेदन दिले आहे. यासोबतच या प्रकल्पामुळे परिसरातील झाडांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करत राष्ट्रीय हरित लवादाच्या पुणे खंडपीठाकडेही तक्रार पाठविण्यात आली आहे.




### फॉर्म्युला-४ स्पर्धा देशातील विविध शहरांत

'इंडियन रेसिंग फेस्टिव्हल' अंतर्गत देशातील विविध शहरांमध्ये 'फॉर्म्युला-४' शर्यती आयोजित केल्या जात आहेत. चेन्नई येथील मद्रास इंटरनॅशनल सर्किट, कोयंबतूरमधील कारी मोटर स्पीडवे तसेच गोव्यातील मोपा विमानतळ परिसरात रेसिंग ट्रॅक विकसित करण्यात आले आहेत. या मालिकेची अंतिम फेरी २०२६ मध्ये नवी मुंबईत होणार असल्याची माहिती आहे.

> शहरातील क्रीडांगणे आणि हरित क्षेत्रांचे संरक्षण झाले पाहिजे. प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणीय परिणाम होण्याची शक्यता असल्याने या प्रकरणाची चौकशी व्हावी.
> – **समीर अमीन बागवान,** उपशहरप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

> 'फॉर्म्युला ४ कार रेसिंग' स्पर्धेला आमचा विरोध नाही. मात्र, बामणदेवसारख्या खेळाच्या मैदानावर ट्रॅक उभारू नये. प्रशासनाने पर्यायी जागेचा विचार करून प्रकल्प अन्यत्र हलवावा, जेणेकरून स्थानिक खेळाडूंचे मैदान कायम राहील.
> – **अनिकेत म्हात्रे,** नगरसेवक व युवासेना जिल्हाप्रमुख

> कोणत्याही क्रीडा स्पर्धांना विरोध नाही. मात्र, स्थानिक खेळाडूंच्या हक्काची मैदाने जपली गेली पाहिजेत. संबंधित ठिकाणी सुरू असलेल्या कामाबाबत प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत.
> – **सुजाता पाटील,** महापौर, नवी मुंबई

# विद्यार्थ्यांकडून सव्वा चार लाखांचे अमली पदार्थ जप्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पनवेल :** तळोजा येथे दोन आठवड्यांनी एका इमारतीमध्ये हेरॉइनचा मोठा साठा जप्त करण्याची घटना ताजी असतानाच कळंबोलीतही दोन विद्यार्थ्यांकडून सव्वाचार लाख रुपयांचा अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी या दोन्ही विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली आहे.

'नशा मुक्त नवी मुंबई' ही घोषणा नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केल्यानंतर नवी मुंबई पोलीस दलाच्या अमलीपदार्थविरोधी कक्ष आणि सर्वच पोलीस ठाण्यांनी अमलीपदार्थ नष्ट करण्यासाठी कंबर कसली आहे. दोन आठवड्यांपूर्वी तळोजातील घोटकॅम्प येथील इमारतीमधून १ कोटी रुपयांचे हेरॉइन व इतर अमली पदार्थ जप्त केल्यानंतर याच कारवाईचा पुढील भाग म्हणून पंजाब राज्यातून तस्करी करणाऱ्या टोळीने कळंबोली व तळोजा येथील दोन विद्यार्थ्यांना या तस्करीत ओढले होते. याच विद्यार्थ्यांना कळंबोली पोलिसांनी सोमवारी मुंब्रा पनवेल महामार्गावर कळंबोली गावासमोरील लहान उड्डाणपुलाखाली ४ लाख ३७ हजार ५०० रुपयाच्या अमली पदार्थासह पकडले. या विद्यार्थ्यांचे वय २० व २५ वर्षे आहे. सहा हजार रूपयांची रोकड आणि वजनकाटा, प्लास्टीक पिशव्या सापडल्या. अटकेत असलेला एक विद्यार्थी तळोजातील मारवा सोसायटीत, कळंबोलीतील जंक्शन सोसायटीत केएल ५ या टाईपमध्ये राहतो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई केली.

# कळंबोलीमध्ये घरफोडी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पनवेल :** कळंबोली येथील सेक्टर १६ मधील पृथ्वी या इमारतीतील बंद घर फोडून चोरांनी अवघ्या दीड तासांत तब्बल १३ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना सोमवारी सायंकाळी घडली या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी रात्री उशिरा चोरीचा गुन्हा नोंदवला. कळंबोली उपनगरातील सेक्टर १६ येथील पृथ्वी या इमारतीमध्ये राहणाऱ्या ४९ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीत त्यांच्या बंद घराचे लॅच तोडून शयनकक्षातील लोखंडी कपाटात ठेवलेल्या सोन्या-चांदीचे दागिन्यांवर तसेच रोखरकमेवर डल्ला मारला आहे. या घटनेबाबत संबंधित महिलेने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## नाटक सिनेमा वाद्यवृंद












## टेकचक्र

आसिफ बागवान

# मॅकबुक ७० हजारांत

**ॲपलने १३ इंचाचा लिक्विड रेटिना डिस्प्ले असलेल्या मॅकबुक निओची घोषणा केली असून अद्ययावत वैशिष्ट्ये असलेल्या या लॅपटॉपची किंमत ६९९९९ रुपये इतकी असणार आहे. जगभरातील बाजारात बुधवारपासून दाखल होत असलेला 'निओ' ॲपलच्या लॅपटॉप श्रेणीलाही भारतीय ग्राहकांच्या आवाक्यात आणणारा ठरेल.**

**भारतीय मोबाइल** ग्राहकाला आयफोनची सवय आणि ओढ लावून बाजारपेठेत मोठा हिस्सा कमावणाऱ्या ॲपलचा मॅकबुक आजवर बहुसंख्य भारतीयांसाठी खर्चीक विषयच राहिला आहे. दर्जेदार वैशिष्ट्ये असलेल्या ॲपलच्या लॅपटॉपबद्दल आकर्षण असले तरी लाखाच्या घरात असलेल्या किमतीमुळे मॅकबुकला भारतीय बाजारात अद्याप भक्कम स्थान मिळवता आले नव्हते. मात्र, हा अडथळा दूर करून मॅकबुकला भारतासह जगभरातील बाजारात मोठा ग्राहकवर्ग मिळवून देणारा 'मॅकबुक निओ' बुधवारपासून बाजारात दाखल होत आहे. सुमारे ७० हजार रुपये किंमत असलेल्या या मॅकबुकमुळे विंडोज आणि क्रोमबुकच्या उच्च श्रेणीतील लॅपटॉपसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

अमेरिकी बाजारात ४९९ डॉलरला असणारा 'मॅकबुक निओ' भारतीय विद्यार्थ्यांसाठी ५९९०० रुपयांत उपलब्ध होणार आहे. मात्र, किंमत हेच फक्त या लॅपटॉपचे वैशिष्ट्य नाही. मॅकबुक निओमध्ये ॲपलने ए१८ प्रो चिपचा प्रोसेसर म्हणून वापर केला आहे. सध्या आयफोन १६ प्रोमध्ये ही चिप वापरली जाते. पहिल्यांदाच ॲपलने आयफोन आणि मॅकबुक यांचा अशाप्रकारे संगम साधला आहे. इंटेल कोअर अल्ट्रा ५ प्रोसेसरपेक्षा ५० टक्के अधिक क्षमतेने ही चिप काम करते, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे हा लॅपटॉप विंडोज आणि क्रोमबुक ऑपरेटिंग सिस्टीम असलेल्या कंपन्यांच्या लॅपटॉपसाठी आव्हानात्मक स्पर्धा ठरेल, असे बोलले जात आहे.

### पूर्णपणे ॲल्युमिनियम सांगाडा

मॅकबुक निओचा पूर्ण सांगाडा हा ॲल्युमिनियममध्ये बनवला असून त्यामुळे हा लॅपटॉप अधिक भक्कम बनला आहे. शिवाय तो वजनानेही हलका ठरतो. सिल्वर, ब्लश, इंडिगो आणि सायट्रस अशा चार रंगांत उपलब्ध असलेल्या या लॅपटॉपच्या कीबोर्डलाही बॉडीच्या रंगाचीच छटा देण्यात आली आहे.

### अन्य वैशिष्ट्ये

- १०८० पिक्सेलचा फेसटाइम एचडी कॅमेरा.
- स्पॅशियल ऑडिओ आणि डॉल्बी ॲटमस तंत्रज्ञान.
- यूएसबी सी पोर्टचा अंतर्भाव
- आयफोनशी संलग्न करून हाताळणी अधिक सुलभ.
- आठ जीबी रॅम, २५६ जीबी एसडीडी
- ॲपल इंटिलिजन्सचा अंतर्भाव (भारतीय भाषांत अद्याप नाही)



### 'मॅकबुक प्रो'ची घोषणा

ॲपलने एम५ प्रो आणि एम५ मॅक्स प्रोसेसर चिप असलेल्या मॅकबुक प्रोचीही घोषणा केली असून तोदेखील ११ मार्चपासून बाजारात उपलब्ध होणार आहे. यात आतापर्यंतचा अतिजलद जीपीयू असल्याचा कंपनीचा दावा आहे. वायफाय ७, ब्लुटुथ ६, तीन पोर्ट, आठ केपर्यंतचा एचडीएमआय सपोर्ट, लिक्विड रेटिना एक्सडीआर डिस्प्ले, २४ तास चालणारी बॅटरी अशी वैशिष्ट्ये असलेला हा लॅपटॉप १४ आणि १६ इंच आकारात उपलब्ध आहे. १४ इंचाच्या मॅकबुक्र प्रोची किंमत २४९००० इतकी असून १६ इंची मॅकबुक प्रोची किंमत २९९९०० इतकी आहे.

### १३ इंची लिक्विड रेटिना डिस्प्ले

मॅकबुक निओला १३ इंचाचा रेटिना डिस्प्ले देण्यात आला असून त्याचे रेझोल्युशन २४०८ बाय १५०६ इतके आहे. याला 'ॲंटी रिफ्लेक्टीव्ह' अर्थात प्रतिबिंबरोधक 'कोटिंग' पुरवण्यात आल्यामुळे प्रखर प्रकाशातही लॅपटॉपवर व्यवस्थितपणे काम करता येते, असा कंपनीचा दावा आहे.





### मॅजिक कीबोर्ड

मॅकबुक निओमध्ये ॲपलने मॅजिक कीबोर्डचा अंतर्भाव केला आहे. अतिशय पातळ आणि कमी वजनाचा हा कीबोर्ड हाताळताना एक चांगला अनुभव देतो. त्यासोबतच मल्टी टच ट्रॅकपॅड पुरवण्यात आला आहे. याशिवाय या लॅपटॉपमध्ये टच आयडी पुरवण्यात आला आहे. त्यामुळे लॅपटॉप सुरू वा बंद करण्यासाठी किंवा ॲपल पेचा वापर करण्यासाठी सुरक्षित पर्याय उपलब्ध झाला आहे.

### मोबाइलसारखा लॅपटॉप

मॅकबुकमध्ये ए१८ प्रो चिप बसवण्यात आली असल्यामुळे ती आयफोनप्रमाणेच अतिशय सक्षमपणे 'निओ'लाही चालवते. एकाच वेळी व्हॉट्सअप, कॅन्व्हा, एक्सेल, सफारी चालवूनदेखील 'नियो'च्या कार्यक्षमतेत फरक पडत नाही, असा ॲपलचा दावा आहे.

### पूर्ण दिवस चालणारी बॅटरी

मॅकबुक निओच्या बॅटरीसाठी पूर्णपणे पुनर्प्रक्रिया केलेले कोबाल्ट वापरण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणदृष्ट्या ही बॅटरी सक्षम आहेच पण तीची कार्यक्षमताही वाढली आहे. एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर निओ १६ तास सलग चालू शकतो, असे कंपनीचे म्हणणे आहे.

**TENDER NOTICE**

(Issued without Prejudice)

Re-development of society plot of **MAULI CO-OP. HSG. SOCIETY LTD.** Registration No.THA/H.S.G/1078-1981 situated at **Plot No. 29C, Sector-4, Vashi, Navi Mumbai - 400 703.** Detailed Tender will be available at MAULI CO-OP. HSG. SOCIETY LTD. Plot no. 29C, Sector - 4, Vashi, Navi Mumbai 400 703 on payment of **Rs. 25,000/-**(non-refundable basis through **DD/Pay order in favour of ' MAULI CO-OP HSG SOCIETY LTD.'**) till **25th March 2026** from the date of publication of the this notice, between **11.00 AM to 5.30 PM.**

**Note :** For Developers who had participated in the previous tender floated by the society, the society has resolved that the revised tender document shall be issued to them upon payment of a nominal fee of Rs.500/-

Sd/-
Hon. Chairman / Hon. Secretary
For, **Mauli Co. Op. Housing. Soc. Ltd.**
Mobile No.: 9594018148 / 9820549950



बुधवार,
११ मार्च २०२६

# लोकसत्ता पालघर

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### ओहोळालाही संरक्षण भिंत

**वाडा :** वाडा नगरपंचायत हद्दीत संरक्षण भिंतींच्या कामांचा धडाका सुरू असून मनाला येईल त्या ठिकाणी भिंती उभारून शासनाचा कोट्यवधींचा निधी खर्च केला जात आहे. सिद्धेश्वरी रोड परिसरात एका ओहोळाच्या कडेला लांबच लांब संरक्षण भिंत उभारण्याचे काम सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वृत्त...४

### तहसील कार्यालयावर 'लाल बावटा'चा मोर्चा

**डहाणू :** पालघर जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजना आणि घरकुल योजनेच्या लाभार्थींची सुमारे ५२ कोटी ५४ लाख रुपयांची मजुरी मागील काही महिन्यांपासून शासनदरबारी प्रलंबित आहे. या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी मार्क्सवादी लेनिनवादी पक्षाच्या मार्गदर्शनाखाली मस्तान नाका ते विक्रमगड तहसीलदार कार्यालयापर्यंत 'लाँग मार्च' काढण्यात आला. वृत्त...४

### तुकडे बंदी कायदा दुरुस्तीचा लाभ

**पालघर :** राज्यात छोट्या जमीनधारकांना आपल्या जमिनीचा व्यवहार करता येत नव्हता. तुकडाबंदी कायद्यामुळे १० गुंठ्यांपेक्षा कमी जमीन असणाऱ्या नागरिकांना आपली जमीन विकता येत नव्हती किंवा कोणाला ती खरेदी देखील करता येत नव्हती. पूर्वी लोकसंख्या कमी होती. वृत्त...४

# शिक्षण, आरोग्य, पर्यटन विकासाला चालना

## पालघर जिल्हा परिषदेचा १३.१५ कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** पालघर जिल्हा परिषदेने गेल्या आर्थिक वर्षात असणाऱ्या ६१ कोटी रुपयांची आर्थिक आवक सात कोटी रुपयांनी (११ टक्के) वाढवून जिल्हा परिषदेचा १३.१५ कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प मंगळवारी सादर करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मनोज रानडे यांनी त्याला मंजुरी दिली. शिक्षण, आरोग्य, पर्यटन विकास ग्रामकल्याण कृषी जलसंधारण सारख्या विभागांमध्ये नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या सन २०२५-२६चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक मंजुरीसाठी जिल्हा परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेत रानडे यांच्या अध्यक्षतेखाली सादर करण्यात आले. सन २०२६-२७ या वर्षामध्ये जिल्हा परिषदेची अपेक्षित महसुली खर्च ६८.५५ कोटी रुपये आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, वित्त अधिकारी सचिन कवठे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित होते.

विविध विभागांकडून प्रस्तुत झालेल्या योजनांसाठीची मागणी, त्यांची गरज व उत्पन्नाचे स्रोत लक्षात घेऊन यापूर्वी कार्यरत योजना कायम ठेवून नाविन्यपूर्ण व वैविध्यपूर्ण योजनांचा समावेश या अर्थसंकल्पात करण्यात आला. विविध विभागांना आर्थिक आरक्षण कायम ठेवण्यात आल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली. विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाला वैविध्यपूर्ण योजनांसाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीबद्दल समाधान व्यक्त केले.

ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी सांगितले. जिल्ह्यात अंतर्गत रस्त्यांच्या उभारणीसाठी तसेच गावपाड्यांच्या जोडणीसाठी जिल्हा परिषदेने बांधकाम विभागामार्फत १.४० कोटी रुपयांची तरतूद करून बारामाही रस्ते बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. अनुदानित वस्तीगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सौर वॉटर हीटर पुरवणे व बंक बेड, गाद्या व इतर साहित्य पुरवण्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून वस्तीगृहातील सोयीसुविधा, लोकर, पेटी, कपाट यासाठी ३५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद पालघरच्या सर्व विभागांचा समतोल विकास साधत ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. शिक्षण, आरोग्य, कृषी व ग्रामीण पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला असून या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार आहे.

**-मनोज रानडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद पालघर.




**पालघर जिल्हा परिषदेचा शिलकी अर्थसंकल्प मंगळवारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली सादर करण्यात आला.**

### पर्यटनाला चालना



जिल्ह्यातील गडकिल्ले संवर्धन करणे, त्या ठिकाणी सोयी सुविधा करणे दिशादर्शक फलक बसवणे यासाठी ३० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून गाव तलावांची दुरुस्ती करून सुशोभीकरण करणे व पक्के बंधारे दुरुस्त करण्याकामी प्रत्येकी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यासह कोल्हापुरी बंधाराची दुरुस्ती करणे त्यांचे पावसाळ्यापूर्वी गेट काढणे व पावसाळा संपल्यानंतर गेट बसवणे या कामासाठी दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून या सर्व लघु पाटबंधारे विभागाच्या योजनांवर पर्यटनाला चालना मिळणे अपेक्षित आहे.

### ॲनिमिया तपासणी योजना

जिल्ह्यातील मुली १२ वर्षाच्या होईपर्यंत त्यांचे हिमोग्लोबिन १२ पर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने किशोरवयीन मुलींसाठी १२ x १२ योजना गेल्या वर्षी हाती घेण्यात आली होती. योजना यांना कायम ठेवण्यात येणार (४० लाख रुपयांची तरतूद) असून कर्करोग, ॲनिमिया प्रतिबंध व निदान करण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न



निपुण गुणवत्ता विकास अभियानांतर्गत शिक्षकांसाठी कृती पुस्तिका तयार करण्यात आली असून आगामी वर्षात हे अभियान सुरू ठेवण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यासाठी तीन कोटी रुपये मंजूर करण्यात आले. ई-लर्निंग व इतर विद्युत गरजा लक्षात घेता शाळांमध्ये एक ते दोन किलोवॅट क्षमतेचे सौरऊर्जा संचासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद आहे.

### इतर विभागांकरिता योजना

अपंग कल्याण महिला व बालकल्याण , कृषी, पशुसंवर्धन विभागांसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली असून यामध्ये भटक्या श्वानांचा बंदोबस्त व निर्बीजीकरण तसेच ग्रामीण भागात दहन दफनभूमीची व्यवस्था नव्याने करणे व अनुषंगिक सोयी सुविधा पुरवण्याकरिता निधीची उपलब्धता करण्यात आली आहे.

### विभागनिहाय प्रमुख तरतुदी (रुपयांमध्ये)

- सामान्य प्रशासन विभागः ३ कोटी ५८ लाख ११ हजार
- बांधकाम विभागः १२ कोटी ५९ लाख २७ हजार
- प्राथमिक शिक्षण विभागः ९ कोटी ७६ लाख २ हजार
- आरोग्य विभागः ५ कोटी ४ लाख
- ग्रामीण पाणीपुरवठा विभागः ५ कोटी ५६ लाख ८० हजार
- समाज कल्याण विभागः ५ कोटी ६० लाख
- अपंग कल्याण विभागः २ कोटी १९ लाख ८७ हजार
- महिला व बालकल्याण विभागः ३ कोटी ९७ लाख ५ हजार
- कृषी विभागः ८ कोटी २ लाख
- पशुसंवर्धन विभागः ४ कोटी ५३ लाख १९ हजार
- लघुपाटबंधारे विभागः ४ कोटी ५० लाख १ हजार
- वनेः १० लाख
- संकीर्ण खर्चः ३ कोटी ९३ लाख १ हजार
- ग्रामपंचायत विभागः ३ कोटी १६ लाख

### तारापूर औद्योगिक क्षेत्रात आग

**बोईसर :** तारापूर औद्योगिक क्षेत्रातील मोकळ्या जागी असलेला कचरा आणि गवताला आग लागल्यामुळे परिसरातील कारखान्यांना धोका निर्माण झाला होता. मात्र अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवल्याने निर्माण झालेला धोका टळला.

तारापूर औद्योगिक क्षेत्रात सोमवार आणि मंगळवार असे सलग दोन दिवस मोकळ्या जागेतील कचरा आणि गवताला आग लागली. मंगळवारी लागलेल्या आगीमुळे जवळच असलेल्या प्लॉट क्रमांक एन १९८ वरील रासायनिक कारखान्याला धोका निर्माण झाला. सोमवारी देखील औद्योगिक क्षेत्राच्या मध्यभागी असलेल्या मोकळ्या भूखंडावरील गवताला आग लागली होती. मार्च महिन्यात तापमानात मोठी वाढ झाल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात मोकळ्या जागी टाकलेला कचरा आणि रासायनिक पदार्थांना वारंवार आग लागल्याच्या घटना घडत असल्याची शक्यता वर्तवण्यात आली.

# वसई, विरारमध्ये पर्यावरणपूरक बससेवा

## महापालिकेच्या परिवहन विभागाचा ८३ कोटींचा अर्थसंकल्प

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई-विरार महापालिकेच्या परिवहन विभागाचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा ८३.५५ कोटींचा अर्थसंकल्प परिवहन विभागाचे व्यवस्थापक धैर्यशील जाधव यांनी स्थायी समितीला सादर केला. या अर्थसंकल्पात नागरिकांना चांगली परिवहन सेवा, अपंग, ज्येष्ठ नागरिक, कर्करोग पीडित रुग्ण अशा सर्व सोयीसुविधांच्या योजना अशा विविध तरतुदींचा यात समावेश करण्यात आला आहे. तसेच पर्यावरणपूरक सेवेच्या दृष्टीनेही पालिकेकडून या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.

सोमवारी वसई-विरार महापालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. याचवेळी परिवहन विभागाचा अर्थसंकल्प ही स्थायी समितीकडे करण्यात आला. सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प १ कोटी ५९ लाख शिलकीचा आहे. यात कोणत्याही प्रकारची भाडेवाढ करण्यात आली नाही. याआधीच परिवहन भवनासाठी आणि त्यावर असलेल्या पालिका मुख्यालयासाठी पालिकेने मोठ्या प्रमाणावर खर्च केला असून त्याची इमारत तयार झाली आहे. मात्र आता त्याचे अंतर्गत कार्यालय दुरुस्ती, नूतनीकरणासाठी पाच कोटींची तरतूद केली आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या पी एम ई-बस योजनेतून १०० बस उपलब्ध (पान ३ वर)



### लवकरच वातानुकूलित बस

वसई-विरार महापालिकेला केंद्र शासनाच्या पंतप्रधान अनुदान योजनेतून आणखीन १०० ई-बस मिळणार आहेत. या बस वातानुकूलित स्वरूपाच्या असणार आहेत. एप्रिलच्या अखेरपर्यंत विविध मार्गावर ही बससेवा पुरविण्यास मदत होणार आहे. नागरिकांना चांगली परिवहन सेवा मिळावी याच अनुषंगाने परिवहन विभागाच्या अर्थसंकल्पात तरतुदी केल्या आहेत, असे परिवहन विभागाचे व्यवस्थापक धैर्यशील जाधव यांनी सांगितले.

### महिला प्रवास सवलत योजनेसाठी केवळ एक लाख

महापालिकेच्या परिवहन सेवेच्या बसमधून प्रवास करणाऱ्या महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलतीसाठी होणारा खर्च महापालिकेकडून कंत्राटदाराला दिला जातो. मात्र, चालू आर्थिक वर्षात योजनेसाठी लागणाऱ्या निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. पण, शासनाकडून मंजुरी प्राप्त न झाल्यास सदर योजना राबवण्यासाठी येणारा खर्च गृहीत धरून २०२६-२७ या वर्षाकरिता केवळ एक लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

# बडतर्फ ६० कर्मचारी पुन्हा सेवेत

## प्रशासनाचे आदेश, 'धुलाई आंदोलना'ला यश

**लोकसत्ता वार्ताहर**

**बोईसर :** जव्हार येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर भूमीपुत्र एल्गार संघटनेच्या वतीने पुकारण्यात आलेल्या लक्षवेधी 'धुलाई आंदोलना'ला यश मिळाले आहे. बडतर्फ सर्व ६० स्थानिक महिला धुलाई कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर रुजू करून घेण्याचा निर्णय प्रशासनाने जाहीर केला. मागील सात ते आठ महिन्यांपासून थकीत वेतनही तातडीने अदा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आश्रमशाळांमध्ये गेली २० वर्षे सेवा देणाऱ्या ६० महिलांना आदिवासी विकास प्रकल्प विभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कामावरून कमी केले होते. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी भूमिपुत्र एल्गार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद पवार यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जव्हार येथील राजीव गांधी मैदानापासून शेकडो कार्यकर्त्यांच्या आणि महिलांच्या उपस्थितीत भव्य मोर्चा काढण्यात आला. मोर्चा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर धडकला. तेथे पोहोचताच महिलांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे कपडे आणि चादरी धुण्यास सुरुवात करून 'धुलाई आंदोलन' केले. महिलांनी तिथेच चुली मांडून स्वयंपाक केला आणि सर्वांनी तिथेच जेवण करत प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला. तब्बल सात तास हे आंदोलन चालले. धुलाई आंदोलनाचे नेतृत्व भूमीपुत्र एल्गार संघटनेचे सरचिटणीस नवनाथ भोये, कार्याध्यक्ष सुनील लोणे आणि अध्यक्ष प्रमोद पवार यांनी केले.

### विधिमंडळात आंदोलनाचे पडसाद

आंदोलनाची धग थेट मुंबईतील विधीमंडळात पोहोचली. विधान परिषदेच्या आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'द्वारे हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सभागृहात तातडीने मांडला. यावर आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी तत्काळ दखल घेतली. आंदोलनाने प्रशासन खडबडून जागे झाले. प्रशासनाने या सर्व ६० महिलांना पुन्हा कामावर घेण्याचे आणि त्यांचे थकीत वेतन देण्याचे लेखी आश्वासन दिले.

# महिलेला मारहाणप्रकरणी पोलीस ठाण्याला घेराव

**डहाणू :** शहराच्या सोमवारी बाजार परिसरात भाजी विक्री करणारया स्थानिक महिलेला केलेल्या मारहाणीमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. याप्रकरणी सुरुवातीला अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाल्यामुळे महिलेच्या कुटुंबीयांचा रोष वाढला. मंगळवारी त्यांनी पोलीस ठाण्याला घेराव घातला. डहाणू पोलिसांनी अखेर या प्रकरणात गांभीर्याने दखल घेत संबंधित तरुणावर कठोर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रशासनाकडून शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले. डहाणू पोलिसांनी सतर्कतेचा भूमिका घेत परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आणली.

# कैदेतील मच्छीमारांच्या कुटुंबीयांना ८.८० लाख

## राज्य शासनाचा तिसरा हप्ता वितरित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** भारताची सीमा ओलांडून पाकिस्तानच्या हद्दीमध्ये प्रवेश केल्याच्या आरोपाखाली अटकेत असणाऱ्या पालघर जिल्ह्यातील १८ मच्छीमारांच्या कुटुंबीयांना राज्य शासनाने मदतीचा ८.८० लाख रुपयाचा तिसरा हप्ता वितरित करण्यात आला. कुटुंबीयांना एकंदरीत ७२.१६ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यातील किमान १० हजार नागरिक हे गुजरातमधील मासेमारी बोटीवर खलाशी म्हणून काम करीत असून नौकानी भारतीय हद्द ओलांडण्याच्या आरोपाखाली पाकिस्तान तटरक्षक दलाने त्यांना अटकेत ठेवले आहे. भारतातील २०० खलाशांपैकी पालघर जिल्ह्यातील पालघर जिल्ह्यातील १९ खलासी होते.

त्यापैकी एकाचा मार्च २०२४ मध्ये मृत्यू झाला. गेल्या काही महिन्यात जिल्ह्यातील एक खलाशी नव्याने पाकिस्तान तटरक्षक दलाने अटक केल्याने सध्या जिल्ह्यातील पाकिस्तान अटकेत असणाऱ्या खलाशांची संख्या १९ वर पोहोचली आहे.

जून २०२५ मध्ये राज्य सरकारने १६.१९ लाख रुपयांचे पहिला अनुदानापोटीचा हप्ता तसेच नोव्हेंबर २०२५ मध्ये ४७.१६ कोटी रुपयांचा हप्ता मत्स्य व्यवसाय विभागाकडे दिला होता. अशाप्रकारे बाधित कुटुंबीयांना ६५.३५ लक्ष रुपये अदा करण्यात आले आहे.

पाकिस्तानच्या तुरुंगामध्ये मृत्यू झालेल्या खलाशाच्या कुटुंबीयांना त्यांच्या निधनापर्यंतच्या पूर्ण रक्कमेसह इतर अटकेत खलाशांना एकूण ६३.३६ लाख रुपये अदा करण्यात आले होते. आठ लाख ८० हजार २०० रुपये ही रक्कम पुढील काही दिवसांत वारसाच्या बँक खात्यात जमा होईल, असे मत्स्य व्यवसाय विभागाचे सहआयुक्त दिनेश पाटील यांनी सांगितले.

ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ दरम्यानच्या थकीत रकमेसाठी राज्य सरकारकडे मागणी करण्यात येणार असून ही रक्कम देखील कालांतराने प्राप्त होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

# संस्कृती, कला, श्रद्धेचा 'बोहाडा' उत्सव उत्साहात

**लोकसत्ता वार्ताहर**

**डहाणू :** पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या ऐतिहासिक जगदंबा 'बोहाडा' उत्सवाची मंगळवारी उत्साहात सांगता झाली. आदिवासी संस्कृती, कला आणि अढळ श्रद्धेचा एक अनुपम संगम आणि सुमारे २५० वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवात टेंभ्याच्या प्रकाशात नाचणारी सोंग पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी उसळली होती.

होळीनंतरच्या धुळवडीपासून सुरू होणाऱ्या या उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे अतिशय सुबक आणि रेखीव असलेले देवदेवतांचे मुखवटे, ऊंबर आणि सागाच्या लाकडातून साकारलेले मुखवटे परिधान करून संबळच्या तालावर नृत्य, नाट्यांचे सादरीकरण. विशेष म्हणजे यातील काही मुखवटे तर २०० वर्षांहून अधिक जुने असून ते पिढ्यानपिढ्या जतन केले जात आहेत, असे सांगितले जाते.

उत्सवाच्या शेवटच्या टप्प्यात सादर करण्यात आलेले भीम-बकासुर युद्ध आणि पहाटेच्या सुमारास निघालेली दशमुखी रावणाची मिरवणूक प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरली. रावणाचे रौद्र रूप आणि त्याचे लयबद्ध नृत्य पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सर्व स्तरातील नागरिक या सोहळ्यात एकरूप झाले होते.

मंगळवारी जगदंबा देवीची भव्य महापूजा आणि अभिषेक पार पडला. त्यानंतर देवी आणि महिषासुर तसेच शुंभ-निशुंभ यांच्यातील युद्धाचा थरारक प्रसंग जिवंत करण्यात आला. अनिष्टावर इष्टाचा विजय मिळवत जेव्हा जगदंबेची विजयी मिरवणूक निघाली, तेव्हा अवघ्या मोखाड्यातील रस्ते सडा-रांगोळीने सजले होते. घराघरातून देवीवर फुले आणि अक्षतांची उधळण करण्यात येत होती. साई मंदिराजवळील मैदानात जंगी कुस्त्यांचा आखाडा रंगला, ज्यामध्ये अनेक मल्लांनी आपले कसब दाखवले. रोजगारासाठी बाहेरगावी गेलेला नोकरदार वर्ग आणि आदिवासी बांधव एकत्र आले होते.

**सुमारे २५० वर्षांची परंपरा लाभलेला हा 'बोहाडा' उत्सव आहे. देव-दैत्यांचे मुखवटे परिधान करून, संबळच्या तालावर सोंगे (नाट्य) या उत्सवात सादर केली जातात.**



### नाशिक, गुजरातचे भाविक

आदिवासी कला-संस्कृतीचे दर्शन घडवणारा बोहाडा उत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता आता गुजरातसह इतर राज्यांतील अभ्यासक आणि पर्यटकांनाही भुरळ घालत आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जगदंबा मातेच्या' जयघोषात या सोहळ्याची सांगता झाली. पालघरसह नाशिक आणि गुजरातमधील भाविक सहभागी झाले होते. उत्सवात लाखो रुपयांची उलाढाल झाली.

> शिकण्याची आवड निर्माण कराल, तर तुमचा विकास कधीही थांबणार नाही.
> - अँथनी डि'अँजेलो, अमेरिकन व्यावसायिक

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
फारुक नाईकवाडे

मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन - पेपर तीन

## अर्थव्यवस्था- साधनसंपत्तीचे एकत्रीकरण

**साधनसंपत्तीचे एकत्रीकरण हा अभ्यासक्रमातील शब्द इंग्रजीच्या 'रिसोर्स मोबिलायझेशन' शब्दाचे भाषांतर आहे. यात साधनसंपत्तीची उपलब्धता, तिचा परिणामकारक वापर, नियोजन या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यवस्थापन हा मराठी शब्द ही एकूण संकल्पना समजून घेण्यासाठी जास्त साजेसा आहे.**

**अर्थव्यवस्था घटकाच्या** साधनसंपत्तीचे एकत्रीकरण या उपघटकाच्या तयारीबाबत या लेखामध्ये पाहू.

या उपघटकामध्ये अभ्यासायचे ठळक मुद्दे सोबतच्या चौकटीमध्ये दिलेले आहेत. त्यांच्या आधारे तयारीची रणनीती पाहू. या उपघटकावर प्रत्यक्ष प्रश्न विचारले जाण्याची शक्यता कमी आहे. पण इतर गतिमान मुद्दे, चालू घडामोडींवर आधारित, विश्लेषणात्मक प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी या मुद्द्यांचा मूलभूत आणि संकल्पनात्मक अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात यांवर पारंपरिक प्रश्न कमी दिसणार असले तरी हा मुद्दा परीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

### साधनसंपत्तीचे एकत्रीकरण ठळक मुद्दे

- साधन संपत्तीचे प्रकार
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची संकल्पना
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची आवश्यकता
- साधन संपत्तीचे स्रोत - सार्वजनिक, खासगी / अंतर्गत, बाह्य गुंतवणूक
- साधन संपत्तीचे वितरण
- वित्त आयोग
- शासकीय उपक्रम
- वित्तीय धोरणांची भूमिका
- आव्हाने



### मुद्देनिहाय तयारी

■ साधनसंपत्तीचे नैसर्गिक मानवनिर्मिती आणि मानवी असे तीन प्रकार, त्यांचे महत्त्व, त्यांची वैशिष्ट्ये, सर्वसाधारण उपलब्धता, भारतातील उपलब्धता, त्यांचा वापर आणि विकासातील आव्हाने, उपाय समजून घ्यायला हवेत.

■ साधन संपत्तीच्या एकत्रीकरणामध्ये वित्तीय आणि इतर सर्वच संसाधनांचा विचार होत असला तरी तयारी करताना वित्तीय संसाधनांवर भर देणे आवश्यक आहे. वित्तीय संसाधनांच्या एकत्रीकरणाचे महत्व समजून घ्यायला हवे. विशेषतः शासकीय अंदाजपत्रके, अर्थसंकल्प यांचेशी परस्पर संबंध अभ्यासायला हवा.

■ साधनसंपत्तीच्या एकत्रीकरणाची शासनाला आवश्यकता का आहे, हे लक्षात घ्यायला हवे. संसाधनांच्या एकत्रीकरणातून पुढील बाबी कशा साधल्या जातात ते समजून घ्यायला हवे - सर्व प्रकारच्या संसाधनांचा कमाल आणि परिणामकारक वापर, त्यांमध्ये वैविध्य राखणे, स्वतंत्र आणि आत्मनिर्भर अर्थसंकल्प तयार करणे, भारतामध्ये कल्याणाकारी शासन व्यवस्था असल्याने कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या म्हणून सामाजिक उपक्रमासाठी तरतूद करणे.

■ देशांतर्गत स्त्रोतांमध्ये बचत, गुंतवणूक आणि भांडवल निर्मिती, बाह्य गंतवणूक आणि कर्जे व अन्य स्त्रोत, सार्वजनीक स्त्रोतामधील कर, करेतर आणि अन्य उत्पन्न या बाबी विचारात घ्यायला हव्यात. यांची अद्ययावत आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालामधून पहायला हवी. बचतीचे प्रकार, सकल नियत भांडवल निर्मिती (GFCF), हे विश्लेषणात्मक मुद्दे संकल्पनात्मक तयारीसाठी महत्त्वाचे आहेत.

■ शासकीय स्त्रोतांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, करेतर महसूल, कर्ज आणि गुंतवणूक हे स्त्रोत व्यवस्थित समजून घ्यायला हवेत. कारण हे अर्थसंकल्पातील - शासकीय अंदाजपत्रकातील उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. यांच्या विश्लेषणातून अर्थव्यवस्थेवी वृद्धी आणि विकास यांच्यामधील समतोल समजून घेणे शक्य होणार आहे. कर महसूलामध्ये वस्तू व सेवा कराचे फायदे, आव्हाने, समस्या आणि विश्लेषणात्मक मूल्यमापन आवश्यक आहे.

■ करेतर महसूलामधील निर्गुंतवणुकीची संकल्पना समजून घेऊन तिचे फायदे - तोटे, समस्या, आव्हाने, परिणामकारकता आणि उपाययोजना या मुद्द्यांच्या आधारे विश्लेषण आवश्यक आहे.

■ परकीय गुंतवणुकींचे प्रकार व महत्त्व समजून घ्यावे. आर्थिक पाहणी अहवालामधून त्यांची आकडेवारी आणि ट्रेंड्स - कल लक्षात घ्यायला हवेत. परकीय संस्थांची कर्जे व त्यांचा वापर त्या-त्या वर्षीच्या चालू घडामोडींचा भाग म्हणून विचारात घ्यावेत.

■ वित्तीय संसाधनांच्या उपलब्धतेसाठी त्यांचे योग्य वितरण आवश्यक आहे. केंद्र व राज्यांमध्ये वित्तीय संसाधनांच्या वितरणासाठी वित्त आयोग धोरण व सूत्रे ठरवितो. यासाठीच्या घटनात्मक तरतुदी, वित्त आयोगाची रचना, कार्ये, भूमिका लक्षात घ्याव्यात. १५व्या आणि १६व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या तुलना आणि १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे मूल्यमापन लक्षात घ्यायला हवे. यामध्ये बँका, वित्तीय संस्था, पतसंस्था, सहकारी संस्था, विशेष प्रकारच्या वित्तीय संस्था व स्रोत उदा. इंडिया इनोव्हेशन फंड, आर्थिक विकास महामंडळे, तसेच एंजल गुंतवणूकदार संकल्पना माहीत हव्यात. त्यांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे योगदान, समस्या, कारणे, उपाय आणि महत्त्व हे मुद्दे विचारात घ्यावेत. यामध्ये प्रत्यक्ष लाभ वितरण (DBT), राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइन (NIP), राष्ट्रीय मौद्रीकरण पाइपलाइन (NMP), प्रधानमंत्री जन धन योजना या उपक्रमांची माहिती आवश्यक आहे.

■ वित्तीय धोरणांच्या माध्यमातून साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर कशा प्रकारे होतो ते समजून घ्यायला हावे. उदा. महसूलाचा वापर कल्याणकारी कामांकरीता निधी उभारणीसाठी करणे किंवा कररचनेच्या माध्यमातून समान संसाधन वितरण साधण्याचा प्रयत्न करणे (प्रगतीशील करांच्या माध्यमातून कमी उत्पन्न गटास संरक्षण).

■ साधन संपत्तीचे एकत्रीकरण करण्यातील अडचणी / आव्हाने स्वरूप, कारणे, परिणाम, उपाय अशा मुद्द्यांच्या आधारे विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये महसूलासठीचे नवे स्त्रोत शोधणे, करेतर महसूलावरील वाढते अवलंबित्व, शासकीय खर्चावरील अवलंबित्व, जागतिक कर सुधारणांमुळे भारतीय करवसूलीवर येणाऱ्या मर्यादा, निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणास मिळणारा अल्प प्रतिसाद अशा मुद्द्यांचा समावेश असला पाहिजे.

■ मूलभूत संकल्पना आणि या क्षेत्रातील बाबींचे परस्परसंबंध लक्षात घेतले तर चालू घडामोडींच्या आधारे चर्चा, वाचन आणि चिंतनातून आपली मते तयार करणे शक्य होते. संसाधनांबाबतची आव्हाने सोडविण्यासाठी अशा विश्लेषणाचा आधार घेऊन मुद्दे तयार करणे आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

---



चौकटी-पल्याड
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

## संक्रमणातून जाणारे आयटी क्षेत्रातील शिक्षण

**आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक नियमित कामे स्वयंचलित करेल; परंतु त्याच वेळी नवे तांत्रिक आणि सामाजिक प्रश्नही निर्माण होतील. त्यामुळे भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील.**



**आज जगभरातील** माहिती तंत्रज्ञान (आयटी) शिक्षण एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत संगणकशास्त्रातील पारंपरिक शाखा म्हणजे प्रोग्रॅमिंग, डेटाबेस व्यवस्थापन किंवा नेटवर्किंग यांवर भर दिला जात होता. मात्र आता आयटी शिक्षण अधिक व्यापक आणि बहुआयामी आणी बहुविषयक बनत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये आयटी अभ्यासक्रमांची रचना आणि त्यामधील संशोधनाचे केंद्रबिंदू झपाट्याने बदलत आहेत.

आयटीमधील सध्या सर्वाधिक मागणी असलेली उप-क्षेत्रे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि रोबोटिक्स. आरोग्यसेवा, हवामान बदल, वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक), जैवतंत्रज्ञान आणि शहरी नियोजन अशा विविध क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढत असल्याने या शाखांतील तज्ज्ञांची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर एआय एथिक्स, रिस्पॉन्सिबल टेक्नॉलॉजी आणि ह्युमन-कॉम्प्युटर इंटरॅक्शन यांसारख्या विषयांनाही महत्त्व मिळत आहे.

अमेरिका आणि ब्रिटन ही आयटी शिक्षणाची पारंपरिक केंद्रे असली तरी आज इतर अनेक देशांतील विद्यापीठेही वेगाने पुढे येत आहेत. जर्मनीमधील टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक आणि आरडब्ल्यूटीएच आखेन येथे डेटा इंजिनीअरिंग व रोबोटिक्समध्ये मूलभूत संशोधन सुरू आहे. नेदरलँड्समधील डेल्फ्ट युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि आयंधोव्हन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी येथे स्मार्ट सिस्टीम्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर दिला जातो. कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो आणि युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू ही प्रत्यक्ष उद्योगांशी जोडलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आहेत.

ऑस्ट्रेलियामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न, ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साउथ वेल्स आणि मोनॅश युनिव्हर्सिटी येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटीमध्ये आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. चीनमधील त्सिंगहुआ युनिव्हर्सिटी, पेकिंग युनिव्हर्सिटी आणि शांघाय जिआओ टोंग युनिव्हर्सिटी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन चालते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीही या संधी खुल्या होत आहेत. या अभ्यासक्रमांसाठी केवळ संगणक अभियांत्रिकीचेच नव्हे तर गणित, सांख्यिकी, इलेक्ट्रॉनिक्स किंवा भौतिकशास्त्राची पार्श्वभूमी असलेले विद्यार्थीही अर्ज करू शकतात. विश्लेषण क्षमता, प्रोग्रॅमिंग कौशल्य, संशोधनवृत्ती मुख्यत्वे अपेक्षित असते.

आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील. मराठी विद्यार्थ्यांसाठी ही संधी केवळ करिअरची नाही, तर नव्या ज्ञानविश्वाशी जोडणाऱ्या आणि जागतिक तंत्रज्ञान परिसंस्थेत सहभागी होण्याच्या प्रवासाची सुरुवात ठरू शकते.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

### आयटीतील भविष्यवेधी उद्योजक : सुमित मोरे

भारतामधील अनेक आयटी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे हे मोठे स्वप्न असते. परंतु त्या स्वप्नासोबत आर्थिक अडचणी आणि शिक्षणासाठी कर्ज घेण्याची जोखीमही असते. सुमितची कथा मात्र वेगळी आहे. चिकाटी, योग्य नियोजन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव यामुळे त्याचा प्रवास प्रेरणादायी ठरतो.
सुमितने पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), येथून माहिती तंत्रज्ञान शाखेत बी.ई. पदवी पूर्ण केली. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षापासूनच त्याने आपल्या मित्रांप्रमाणे जीआरई आणि टॉफेल या परीक्षांची तयारी सुरू केली होती. मात्र परदेशी शिक्षणासाठी मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन कुटुंबावर आर्थिक ओझे टाकायचे नाही, असा त्याचा स्पष्ट निर्णय होता.
म्हणूनच सुमितने आधी नोकरी करून काही रक्कम साठवण्याचा मार्ग निवडला. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून त्याची निवड आयबीएममध्ये झाली. नोकरी करत असतानाच त्याने जीआरई आणि टॉफेल या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याला इंग्लंडमध्ये एका प्रकल्पासाठी काम करण्याची संधी मिळाली. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला.
यानंतर त्याने अमेरिकेतील पाच विद्यापीठांमध्ये आयटीमधील मास्टर्ससाठी अर्ज केले आणि त्याला युनिवर्सिटी ऑफ मेरीलॅन्ड येथे प्रवेश मिळाला. त्याच्या कामाच्या अनुभवामुळे त्याला शिक्षण शुल्कासाठी संपूर्ण शिष्यवृत्ती मिळाली. पहिल्या वर्षातच त्याला टीचिंग असिस्टंटशिप आणि नंतर रिसर्च असिस्टंटशिप मिळाली. स्टायपेंडही मिळू लागला. शिक्षण शुल्काव्यतिरिक्त असलेल्या खर्चाचाही प्रश्न यातून सुटला. उन्हाळ्यात त्याने सिलिकॉन वॅली मधील एका स्टार्टअपमध्ये तीन महिन्यांची इंटर्नशिप केली. हे सारे करीत असताना सुमितने आपला मास्टर्स अभ्यासक्रम थिसिस पद्धतीने पूर्ण केला.



अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी असूनही सुमित भारतात परतला. प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या पुस्तकाने त्याला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. दरम्यान त्याने हेमलकसाला जाऊन लोकबिरादरीमध्ये एक वर्ष काम केले. तेथे आदिवासी मुलांना मराठी शिकण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्याने 'अक्षर' हे मोबाइल ॲप विकसित केले. या उपक्रमाला नॅसकॉमकडून सन्मान मिळाला. दहा वर्षापूर्वी मित्राच्या मदतीने त्याने 'नॉन स्टॉप आयओ टेक्नॉलॉजीज' ही कंपनी सुरू केली आणि ती आज अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर प्रोडक्ट डेव्हलपमेंटचे काम करते आहे. आज या कंपनीत दीडशे पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.
सामाजिक बांधिलकीची प्रेरणा आणि जागतिक शिक्षणाचा अनुभव यांचा संगम घडवत सुमित आज आपल्या कंपनीच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात नवे योगदान देत आहे.

---

## श्रम संहितेतील महत्त्वाच्या तरतुदी

**नवीन कामगार कायद्यांविषयी कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता व शंका आहेत. या कायद्यांचा आपल्यावर काय परिणाम होईल अशी बरेच जण विचारणा करत आहेत. त्यासंबंधी काही महत्त्वाच्या बाबींवर या लेखात चर्चा करूया.**



कौशल्य तंत्र
सलील चिंचोरे

**भारतामध्ये कामगार** कायदे अधिक सोपे, सुसंगत आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने पूर्वी अस्तित्वात असलेले २९ वेगवेगळे कामगार कायदे एकत्र करून चार नवीन श्रम संहितांची (Labour Codes) निर्मिती केली आहे. या श्रम संहितांचा मुख्य उद्देश म्हणजे कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, उद्योगांना नियमांचे पालन करणे सोपे करणे आणि भारतातील रोजगार व्यवस्थेला अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनवणे. नोव्हेंबर २०२५ पासून श्रम संहिता सरकारने लागू केल्या आहेत. या चार संहिता पुढील प्रमाणे आहेतः

वेतन संहिता, २०१९ (कोड ऑन वेजेस) - कामगारांना किमान वेतन, वेतनाची वेळेवर देयता आणि वेतनाशी संबंधित नियम निश्चित करते.

औद्योगिक संबंध संहिता, २०२० (इंडस्ट्रीयल रिलेशन्स कोड) - नियोक्ता-कर्मचारी संबंध, कामगार संघटना आणि औद्योगिक वाद यासंबंधी नियम स्पष्ट करते.

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या अटी संहिता, २०२० (ओएसएच कोड) -कामगारांचे कार्यस्थळावरील सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी सुधारण्यासाठी नियम ठरवते.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (सोशल सिक्युरिटी कोड) - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ), विमा, पेन्शन आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश करते.

श्रम संहितेमध्ये कर्मचाऱ्यांसंबंधी अनेक बाबींची फेरमांडणी केली आहे. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे पगार व वेतन यांची नव्याने केलेली व्याख्या. खासगी क्षेत्रात पगारातील सर्व घटकांना एकत्र करून येणाऱ्या रकमेला सीटीसी (कॉस्ट टू कंपनी) असे म्हणतात. यामध्ये मासिक पगार, बोनस, परफॉर्मन्स इन्सेंटिव्ह, प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी यांचा समावेश होतो. यातील प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी हे बेसिक वेतन व महागाई भत्त्याच्या कायद्यानुसार विशिष्ट टक्केवारी म्हणून मोजले जातात. या घटकांना अप्रत्यक्ष लाभ असेही म्हणतात. सीटीसीमध्ये बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण जितके जास्त तितक्या प्रमाणात अप्रत्यक्ष लाभ वाढतात. श्रम संहिता लागू होण्याआधी प्रत्येक कंपनीमध्ये सीटीसीमधील बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण वेगवेगळे होते.

श्रम संहितांमध्ये वेतन (वेज) मासिक पगाराच्या (मंथली सॅलरी) कमीत कमी ५० टक्के ठेवण्याचे बंधनकारक केले आहे. वेतनामध्ये समावेश असलेल्या व समावेश नसलेल्या घटकांची यादी दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या रचनेत अधिकाधिक स्पष्टता आणणे हा यामागचा हेतू आहे. आता मासिक पगाराच्या किमान ५० टक्के रकमेवर (वेतनावर) प्रॉव्हिडंट फंड, व ईएसआयसी कापले जाणार आहे. तसेच ही रक्कम ग्रॅच्युईटी मोजण्यासाठी वापरली जाणार आहे. ही रक्कम तुमच्या सध्याच्या पगारातील रकमेपेक्षा जास्त असल्यास तेवढ्या प्रमाणात तुमचे अप्रत्यक्ष लाभ वाढतील. मात्र त्यामुळे तुमच्या हाती येणाऱ्या निव्वळ पगारावर (टेक होम सॅलरीवर) परिणाम होईल.

कंपन्यांना निश्चित मुदतीचे कर्मचारी (फिक्स्ड टर्म एम्प्लॉईज) नेमण्याची तरतूद केली आहे. या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखे सर्व फायदे (रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा) द्यावे लागतील. हे कर्मचारी किमान एक वर्ष नोकरी केल्यानंतर ग्रॅच्युईटीसाठी पात्र ठरतील.



कंपनीतील सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांना (कायमस्वरूपी, निश्चित मुदतीचे, कंत्राटी) नेमणूकपत्र देणे बंधनकारक असेल. या नेमणूकपत्रात कामाचे स्वरूप, कामाचे ठिकाण व वेतनाचे तपशील द्यावे लागतील. महिला कर्मचाऱ्यांना नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची श्रम संहिता परवानगी देते. त्यासाठी कंपनीला महिला कर्मचाऱ्यांची लिखित पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. कर्मचाऱ्याने कंपनी सोडल्यास त्याची देय रक्कम (फायनल सेटलमेंट) कंपनीला दोन दिवसात द्यावी लागेल.

ई-कॉमर्स क्षेत्रात सध्या गिग कामगारांचा वापर होतो. हे कामगार एकाच वेळेस अनेक कंपन्यांबरोबर विशिष्ट काळासाठी किंवा कामासाठी काम करतात. श्रमसंहितेत अशा कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद केलेली आहे. त्यासाठी कंपन्यांना विक्रीचा एक टक्का रक्कम सामाजिक सुरक्षा फंडासाठी द्यावी लागेल.

याविषयी कंपनीतील तज्ज्ञांशी बोलून श्रमसंहितेविषयी तुम्ही अधिक माहिती जाणून घेऊ शकता व त्यातील नियमांचे काटक काटेकोरपणे पालन करू शकता.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत.)

---

### शब्दकोडे- ३६१

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | |
| १० | | ११ | | ■ | १२ | १३ | | ■ | |
| | ■ | १४ | | ■ | १५ | | | १६ | ■ |
| ■ | १७ | | ■ | १८ | | | ■ | १९ | २० |
| २१ | | | २२ | ■ | | ■ | २३ | | |
| २४ | | ■ | २५ | २६ | ■ | २७ | | | ■ |
| | ■ | २८ | ■ | २९ | | | | ■ | ३० |
| ३१ | ३२ | | ३३ | | ■ | | ■ | ३४ | |
| ■ | ३५ | | | ■ | ३६ | | | | |

**आडवी विधाने :** (१) जन्मभर, तहहयात (३) 'बाई पण भारी देवा' चित्रपटाचे दिग्दर्शक (फक्त नाव) (५) मित्र, सवंगडी (७) दिवस (८) मत्सर, द्वेष (९) शृंगारिक, रसप्रधान काव्यगायन प्रकार (१०) दाणादाण, फाटाफूट (१२) एक लोकप्रिय बैठा खेळ (१४) गाडीवरचे आच्छादन (१५) रंग, औषध वगैरे उडवण्याची नळी (१७) एक अधिक पाव (१८) घडलेली गोष्ट, प्रसंग (१९) चीर, भेग (२१) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस (२३) कूर्म, कच्छप (२४) खुबी, मर्म (२५) सुट्टी, परवानगी (२७) माकड, कपी (२९) वार्षिक नेमणूक (३१) पाहुणचार, बडदास्त (३४) लोखंडाचा चपटा, अरुंद लांब तुकडा (३५) एक सुगंधी वनस्पती (३६) वार्ताहर

**उभी विधाने :** (१) एखाद्या प्रदेशात मूळचे राहणारे लोक (२) आणीबाणीला विरोध करण्यासाठी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विविध विचारधारांच्या नेत्यांनी एकत्र येऊन हा पक्ष स्थापन केला होता (३) हा कापून वाढदिवस साजरा केला जातो (४) कार्ल मार्क्स यांचा प्रसिद्ध ग्रंथ (५) तालाच्या आरंभीची मुख्य जागा, सारखा (६) वाळलेला खजूर (८) ऊन, सूर्यप्रकाश (९) डौलात चालणे, नखऱ्याने चालणे (११) हेकेखोरपणा, आग्रहीपणा (१३) मांडणी, ठेवण (१६) नियमानुसार, रूढीला धरून (१७) सूर्योदयापासून दुपारपर्यंतचा काळ (२०) खेळाची पाळी, मोठी पळी (२१) गणपतीला वाहिल्या जाणाऱ्या दुर्वांची संख्या (२२) अशुद्ध रक्तवाहिनी (२३) अरण्य, जंगल (२६) मुलीचा नवरा (२७) सोक्षमोक्ष, फैसला (२८) ओटीपोटाच्या खालचा भाग, कटी (३०) मुघल साम्राज्याचा संस्थापक (३२) विदेशी मद्याचा एक प्रकार (३३) कीर, पोपट (३४) हा कंद चिरताना डोळ्यातून पाणी आणतो

- चारू नानल

### सुडोकू - ३६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९ | १ | ५ | |
| ६ | ८ | १ | | | | | ९ | |
| ४ | | | | ८ | | | २ | |
| २ | | | | ७ | | | | |
| | | ३ | ६ | | ८ | २ | | |
| | | | | ४ | | | | ६ |
| | ६ | | | २ | | | | ९ |
| | ९ | | | | | ८ | ७ | २ |
| | २ | ५ | ३ | | | | | |

### सुडोकू - ३६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ४ | ८ | १ | ९ | ५ | २ |
| ५ | १ | ८ | ६ | ९ | २ | ३ | ४ | ७ |
| ९ | ४ | २ | ५ | ३ | ७ | १ | ८ | ६ |
| १ | ८ | ४ | ९ | ६ | ३ | २ | ७ | ५ |
| ७ | ९ | ६ | ८ | २ | ५ | ४ | ३ | १ |
| २ | ५ | ३ | ७ | १ | ४ | ६ | ९ | ८ |
| ८ | २ | ५ | ३ | ४ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ७ | १ | २ | ५ | ९ | ८ | ६ | ३ |
| ३ | ६ | ९ | १ | ७ | ८ | ५ | २ | ४ |

### शब्दकोडे - ३६०चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | ज | यं | ती | ■ | का | र्ल | स | न |
| म | सू | र | ■ | न | व | रा | ■ | जा | ■ |
| ला | ल | ■ | कै | वा | र | ■ | स | व | त |
| ■ | दा | स | ■ | र | ■ | त | र | ट | ■ |
| स | र | ब | त | ■ | मा | र | ळ | ■ | हू |
| ह | ■ | ब | ■ | मा | न | स | ■ | रं | क |
| न | भ | ■ | का | ल | व | ■ | जो | ग | ■ |
| ■ | ग | ण | प | ती | ■ | स | र | पं | च |
| दा | दा | ■ | रे | ■ | नि | त्य | ■ | च | ■ |
| म | ड | के | ■ | सं | धी | ■ | स | मी | प |

# भाजी विक्रेत्या महिलेला मारहाण, तरुणावर गुन्हा

**डहाणू :** शहरातील सोमवार बाजार परिसरात एका उत्तर भारतीय व्यावसायिक तरुणाने स्थानिक भाजी विक्रेत्या महिलेला मारहाण केली. याप्रकरणी सुरुवातीला अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाल्यामुळे महिलेच्या कुटुंबीयांमधील रोष अधिकच वाढला मंगळवारी त्यांनी पोलीस ठाण्याला घेराव घातला. त्यानंतर पोलिसांनी संबंधित तरुणावर गुन्हा दाखल केला. मात्र, मंगळवारी पीडित महिलेच्या समर्थनार्थ शेकडो स्थानिक नागरिक आणि नातेवाइकांनी डहाणू पोलीस ठाण्यात ठिय्या दिला. जोपर्यंत महिलेला मारहाण करणाऱ्या उत्तर भारतीय तरुणावर कठोर कायदेशीर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत पोलीस ठाण्यातून न हलण्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतला. संतापलेल्या जमावाने डहाणू रेल्वे स्थानक परिसरातील मुख्य बाजारपेठेतून मोर्चा काढत घोषणाबाजी केली. नागरिकांच्या मागणीनुसार, डहाणू पोलिसांनी अखेर या प्रकरणात गांभीर्याने दखल घेत संबंधित तरुणावर गुन्हा दाखल केला.

# कोट्यवधींच्या निधीचा अपव्यय

## वाड्यात आता ओहोळाला संरक्षण भिंत; नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**लोकसत्ता वार्ताहर**

**वाडा :** वाडा नगरपंचायत हद्दीत संरक्षण भिंतींच्या कामांचा धडाका सुरू असून मनाला येईल त्या ठिकाणी भिंती उभारून शासनाचा कोट्यवधींचा निधी खर्च केला जात आहे. सिद्धेश्वरी रोड परिसरात एका ओहोळाच्या कडेला लांबच लांब संरक्षण भिंत उभारण्याचे काम सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नैसर्गिकरीत्या वाहणाऱ्या ओहोळाला संरक्षण भिंत बांधण्याची नेमकी गरज काय, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरात अनेक ठिकाणी मूलभूत सुविधा अपुऱ्या असताना, रस्ते, गटारी, पिण्याच्या पाण्याच्या समस्या प्रलंबित असताना अशा अनावश्यक कामांवर कोट्यवधींचा निधी खर्च केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. संरक्षण भिंती व गटार ही आवश्यक पायाभूत कामे असली तरी अनाठायी ठिकाणी उभारल्या जाणाऱ्या भिंती नेमक्या कोणाचे संरक्षण करतात, असा सवालही उपस्थित होत आहे.

सिद्धेश्वरी रोडवरील संबंधित ओहोळ परिसरातील तलाव आणि शेतांमधून येणारे पाणी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वाहत येते. मात्र, आता या ओहोळाच्या कडेला उभारण्यात येणाऱ्या भिंतीमुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होण्याची भीती व्यक्त होत आहे. परिणामी पावसाळ्यात पाणी तुंबून राहण्याचा धोका निर्माण होऊन परिसरातील शेतकऱ्यांना याचा फटका बसू शकतो, असेही स्थानिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, वाडा शहरात यापूर्वी उभारलेल्या काही संरक्षण भिंतींच्या दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाच्या कामांची उदाहरणे दिसून येत असताना अशा प्रकारच्या नव्या कामांना परवानगी कशी दिली जाते, याबाबत नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वाडा शहरातील सर्व संरक्षण भिंतींची स्थळपाहणी करून प्रत्यक्ष परीक्षण करावे व अनाठायी कामांवर तात्काळ लगाम घालावा, तसेच वाडा शहरात प्रशासकीय कालावधीत झालेल्या कामांची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र अगिवले यांच्या समवेत नागरिकांकडून केली जात आहे.



सिद्धेश्वरी रोड परिसरात ओहोळालगत शेती असल्यामुळे पावसाळ्यात पाणी शेतात शिरून शेतीचे बांध ढासळतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार, शेतीचे नुकसान टाळण्यासाठी संरक्षण भिंती बांधण्यात आल्या आहेत. या कामासाठी सुमारे एक कोटी रुपयांचा खर्च केला आहे. पुढे निधी उपलब्ध होत गेल्यास ही संरक्षण भिंत गांधरे हद्दीपर्यंत टप्प्याटप्प्याने बांधण्यात येईल.

– **मनोज पष्टे,** मुख्याधिकारी, वाडा नगरपंचायत

# विक्रमगड तहसील कार्यालयावर ‘लाल बावटा’चा मोर्चा

## मजुरांच्या प्रलंबित मागण्यांसाठी २२ किमीचा ‘लॉंग मार्च’

**लोकसत्ता वार्ताहर**



**डहाणू :** पालघर जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजना आणि घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची सुमारे ५२ कोटी ५४ लाख रुपयांची मजुरी मागील काही महिन्यांपासून शासनदरबारी प्रलंबित आहे. हातावर पोट असणाऱ्या या मजुरांचे वेतन वेळेवर न मिळाल्याने ऐन सणासुदीच्या काळात त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून, या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी मार्क्सवादी लेनिनवादी (लाल बावटा) पक्षाच्या मार्गदर्शनाखाली मस्तान नाका ते विक्रमगड तहसीलदार कार्यालयापर्यंत २२ किलोमीटर पायी ‘लॉंग मार्च’ काढण्यात आला.

शिमगा (होळी) सण उलटून गेला तरी हक्काचे पैसे खात्यावर जमा न झाल्याने मजुरांमध्ये तीव्र संताप आहे. पालघरसह राज्यातील अमरावती, गोंदिया, गडचिरोली यांसारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्येही हीच स्थिती आहे. मजुरी मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे मजुरांना नाईलाजास्तव स्थलांतर करावे लागत असून यातूनच वेठबिगारी आणि आर्थिक संकटासारख्या समस्या उद्भवत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

नियमानुसार मजुरांना काम पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत मजुरी मिळणे आवश्यक असून तसे न झाल्यास १६ व्या दिवसांपासून प्रतिदिन ०.०५ टक्के दराने विलंब भत्ता मिळण्याचा त्यांना कायदेशीर अधिकार आहे. मात्र, येथे मागील ३ ते ४ महिन्यांपासून मूळ वेतनच थकले असल्याने प्रशासनाने थकीत वेतनासह हा विलंब भत्ताही तातडीने अदा करावा, अशी मागणी पक्षाचे जिल्हा सह सेक्रेटरी कॉ. शेरू वाघ यांनी केली. मजुरीच्या मुख्य प्रश्नासह घरकुल, जलजीवनमधील भ्रष्टाचार, रेशन कार्डवर ३५ किलो धान्य मिळणे आणि वन जमिनीचे प्रलंबित प्रश्न मांडण्यासाठी मजूर या आंदोलनात सहभागी झाले होते. पुढील १५ दिवसांत मजुरी मजुरांच्या खात्यावर जमा झाली नाही तर संपूर्ण जिल्हाभर ‘पोस्त’ आंदोलन छेडण्याचा इशारा पक्षाचे विक्रमगड तालुका सेक्रेटरी कॉ. काशिनाथ कोकेरा यांनी दिला आहे.

# ‘प्रभागसंघ व्यवस्थापक’साठी १२ मार्चपर्यंत अर्जाची संधी

**पालघर:** ‘उमेद’ - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये ‘आदर्श प्रभागसंघ व्यवस्थापक’ पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील ३१ प्रभाग संघांसाठी ही निवड केली जाणार असून, यासाठी अर्ज करण्यास आता केवळ दोन दिवस उरले आहेत. १२ मार्च २०२६ ही अर्ज करण्याची अंतिम तारीख आहे.

पालघर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार, पालघर तालुका १७ पदे, जव्हार ३ पदे, तलासरी, वसई, विक्रमगड, वाडा, डहाणू प्रत्येकी २ पदे, मोखाडा १ पद रिक्त पद आहेत. हे पद पूर्णतः समुदाय स्तरावरील असून ११ महिन्यांच्या करार तत्त्वावर ही भरती केली जाईल.

# जिल्ह्यातील पशुवैद्यकांचे ‘अहवाल बंद’ आंदोलन

## ३१ पशुधन विकास अधिकाऱ्यांचा समावेश

**लोकसत्ता वार्ताहर**

**पालघर :** राज्यभरातील पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ‘महाव्हेट’ संघटनेने पुकारलेल्या ‘अहवाल बंद’ आंदोलनात पालघर जिल्ह्यातील ३१ पशुधन विकास अधिकाऱ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर तांत्रिक सेवा सुरू ठेवून केवळ प्रशासकीय अहवाल रोखून धरण्याचे धोरण संघटनेने अवलंबले आहे.

गेल्या काही दिवसांपासून पशुवैद्यकांनी आंदोलनाचे विविध टप्पे यशस्वीपणे पार पाडले आहेत. २ मार्च रोजी व्हॉट्सॲप ग्रुपमधून बाहेर पडणे, ४ मार्च रोजी काळ्या फिती लावून निषेध नोंदवणे आणि ५ मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदने देणे, अशा मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्यात आले. जिल्ह्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, सचिव आणि सदस्यांनी या आंदोलनात एकजुटीने सहभाग नोंदविला आहे. तसेच मागण्या पूर्ण होईपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार आहे.

### शेतकरी हित जपणार, पण अहवाल देणार नाही

महाव्हेट संघटनेने सदस्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, पशुपालक आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी पशुवैद्यकीय उपचार आणि तांत्रिक सेवा सुरू ठेवाव्यात. परंतु, या कामांचा कोणताही ऑनलाइन किंवा ऑफलाइन अहवाल प्रशासनाला सादर करू नये. कोणत्याही स्तरावरून दबाव आल्यास ‘अहवाल बंद’ आंदोलन मागे घेऊ नये.

# ‘स्वच्छ पालघर’चा संदेश कचऱ्यात

## नगरपरिषदेच्या आदेशाला केराची टोपली

**लोकसत्ता वार्ताहर**

**पालघर :** पालघर नगरपरिषदेने शहरात ठिकठिकाणी ‘स्वच्छ पालघर, सुंदर पालघर’ अभियानाचे मोठे फलक लावून नागरिकांना कचरा न टाकण्याचे आवाहन केले. मात्र, प्रत्यक्षात बिडको रोडवरील भरवाड पाडा आणि इन्कम टॅक्स ऑफिस परिसरात ज्या ठिकाणी ‘‘कचरा टाकताना आढळल्यास दंडात्मक कारवाई होईल’’ आशा फलकाच्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे चित्र आहे.

नगरपरिषदेच्या फलकावर ‘कचरा घंटागाडीतच द्यावा’ अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. मात्र, दंडात्मक कारवाईची कोणतीही प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने नागरिक बिनधास्तपणे फलकाखालीच कचरा फेकतात. यामुळे नगरपरिषदेचे हे आदेश कागदावरच आहेत का, असा प्रश्न मनसेच अनिकेत होडारकर यांनी उपस्थित केला आहे.



### मुक्या जनावरांचा जीव धोक्यात

कचरा टाकलेल्या या ठिकाणी मोकाट गुरे-ढोरे आणि कुत्र्यांचा मोठा वावर असतो. अन्नाच्या शोधात ही जनावरे कचऱ्याचे ढीग उपसतात. अनेकदा अन्नासह प्लास्टिकच्या पिशव्या आणि इतर घातक कचरा त्यांच्या पोटात जात आहे. यामुळे जनावरांना गंभीर आजार होण्याचा किंवा त्यांचा मृत्यू होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पालघर शहरात यापूर्वीही अशाच प्रकारे बंदी असलेल्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे प्रकार उघडकीस आले, मात्र, प्रशासनाला अद्याप यावर कायमस्वरूपी तोडगा काढता आला नाही.

पालघरमधील बिडको रोडवर नगरपरिषदेने लावलेल्या शिस्तीच्या आणि दंडात्मक कारवाईच्या आदेशाला नागरिकांनी केराची टोपली दाखवली आहे. फलकावर ‘कायदेशीर कारवाई’चा इशारा असताना, प्रत्यक्षातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे जनावरांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

– **अनिकेत होडारकर,** रहिवासी

# तुकडे बंदी कायदा दुरुस्तीचा पालघरवासींना लाभ

## ‘महाराजस्व’ शिबिरातून अर्ज नियमित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** राज्यात छोट्या जमीनधारकांना आपल्या जमिनीचा व्यवहार करता येत नव्हता. तुकडाबंदी कायद्यामुळे १० गुंठ्यांपेक्षा कमी जमीन असणाऱ्या नागरिकांना आपली जमीन विकता येत नव्हती किंवा कोणाला ती खरेदी देखील करता येत नव्हती. पूर्वी लोकसंख्या कमी होती. त्यामुळे जमिनीचे तुकडे कमी व्हायचे. पण लोकसंख्या वाढल्याने जमिनीचे तुकडे पडत आहेत. त्यामुळे राज्य सरकारने नोव्हेंबर २०२५मध्ये तुकडा बंदी कायद्यात सुधारणा केली. त्याचा लाभ आता वसई, पालघर व डहाणू तालुक्यातील नागरिकांना होणार आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानात जागा नावे करण्याची संधी मंडळस्तर व इतर शहरी भागात मिळणार आहे.

तुकडे बंदी कायद्यानुसार पूर्वी बारमाही कृषी उत्पन्न घेणाऱ्या बागायती क्षेत्रामध्ये १० गुंठ्यांपेक्षा कमी तर पावसाळी शेती होणाऱ्या जिरायत क्षेत्रामध्ये २० गुंठे व वरकस जमिनीसाठी ८० गुंठ्यांपेक्षा कमी आकाराचे तुकडे करण्यावर बंदी लादण्यात आली होती. या अधिनियमाच्या तरतुदी विरुद्ध करण्यात आलेल्या व्यवहारांच्या नोंदी अधिकार अभिलेखात घेण्यात आल्या नाही किंवा घेतल्या असल्यास त्या इतर हक्कांमध्ये नोंदवल्या गेल्याचे प्रकार घडले होते. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रमाणभूत सीमेपेक्षा कमी क्षेत्रात जमीन खरेदी विक्री व्यवहार व हस्तांतरण बाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे दंडात्मक रक्कम भरून वसई तालुक्यातील १६५, पालघर तालुक्यातील ३२ तर मोखाडा तालुक्यातील पाच प्रकरणाची नोंदी केल्या आहे. पालघर जिल्ह्यात ७ मार्च रोजी आठ मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर राबवण्यात आले. मेपर्यंत जिल्ह्यातील ४५ महसुली मंडळ क्षेत्रात व आठ शहरी भागात हे शिबीर राबवले जाणार असून याचा लाभ घेऊन अर्ज करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी केले आहेत.

### लाभ कोणाला ?

वसई, पालघर व डहाणू तालुक्यात औद्योगिक विकासामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. अशावेळी अकृषिक जागांवर निवासस्थाने बांधण्याऐवजी बागायती व इतर प्रकारच्या जागांवर गुंठेवारी जमीन, शेत जमीन विकत घेतली आहे. वसई, नालासोपारा, विरार, पालघर, बोईसर उमरोळी, डहाणू परिसरात व जिल्ह्यातील इतर शहरी भागात कमी आकाराच्या अनेक जागा मालकांना या अध्यादेश व अधिनियमनाचा लाभ होणार आहे.


## नाटक सिनेमा वाद्यवृंद













## टेकचक्र

■ आसिफ बागवान

# मॅकबुक ७० हजारांत

**ॲपलने १३ इंचाचा लिक्विड रेटिना डिस्प्ले असलेल्या मॅकबुक निओची घोषणा केली असून अद्ययावत वैशिष्ट्ये असलेल्या या लॅपटॉपची किंमत ६९९९९ रुपये इतकी असणार आहे. जगभरातील बाजारात बुधवारपासून दाखल होत असलेला ‘निओ’ ॲपलच्या लॅपटॉप श्रेणीलाही भारतीय ग्राहकांच्या आवाक्यात आणणारा ठरेल.**

**भारतीय मोबाइल** ग्राहकाला आयफोनची सवय आणि ओढ लावून बाजारपेठेत मोठा हिस्सा कमावणाऱ्या ॲपलचा मॅकबुक आजवर बहुसंख्य भारतीयांसाठी खर्चीक विषयच राहिला आहे. दर्जेदार वैशिष्ट्ये असलेल्या ॲपलच्या लॅपटॉपबद्दल आकर्षण असले तरी लाखाच्या घरात असलेल्या किमतीमुळे मॅकबुकला भारतीय बाजारात अद्याप भक्कम स्थान मिळवता आले नव्हते. मात्र, हा अडथळा दूर करून मॅकबुकला भारतासह जगभरातील बाजारात मोठा ग्राहकवर्ग मिळवून देणारा ‘मॅकबुक निओ’ बुधवारपासून बाजारात दाखल होत आहे. सुमारे ७० हजार रुपये किंमत असलेल्या या मॅकबुकमुळे विंडोज आणि क्रोमबुकच्या उच्च श्रेणीतील लॅपटॉपसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

अमेरिकी बाजारात ४९९ डॉलरला असणारा ‘मॅकबुक निओ’ भारतीय विद्यार्थ्यांसाठी ५९९०० रुपयांत उपलब्ध होणार आहे. मात्र, किंमत हेच फक्त या लॅपटॉपचे वैशिष्ट्य नाही. मॅकबुक निओमध्ये ॲपलने ए१८ प्रो चिपचा प्रोसेसर म्हणून वापर केला आहे. सध्या आयफोन १६ प्रोमध्ये ही चिप वापरली जाते. पहिल्यांदाच ॲपलने आयफोन आणि मॅकबुक यांचा अशाप्रकारे संगम साधला आहे. इंटेल कोअर अल्ट्रा ५ प्रोसेसरपेक्षा ५० टक्के अधिक क्षमतेने ही चिप काम करते, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे हा लॅपटॉप विंडोज आणि क्रोमबुक ऑपरेटिंग सिस्टीम असलेल्या कंपन्यांच्या लॅपटॉपसाठी आव्हानात्मक स्पर्धा ठरेल, असे बोलले जात आहे.

### अन्य वैशिष्ट्ये

- १०८० पिक्सेलचा फेसटाइम एचडी कॅमेरा.
- स्पॅशियल ऑडिओ आणि डॉल्बी ॲटमस तंत्रज्ञान.
- यूएसबी सी पोर्टचा अंतर्भाव
- आयफोनशी संलग्न करून हाताळणी अधिक सुलभ.
- आठ जीबी रॅम, २५६ जीबी एसडीडी
- ॲपल इंटिलिजन्सचा अंतर्भाव (भारतीय भाषांत अद्याप नाही)



### ‘मॅकबुक प्रो’ची घोषणा

ॲपलने एम५ प्रो आणि एम५ मॅक्स प्रोसेसर चिप असलेल्या मॅकबुक प्रोचीही घोषणा केली असून तोदेखील ११ मार्चपासून बाजारात उपलब्ध होणार आहे. यात आतापर्यंतचा अतिजलद जीपीयू असल्याचा कंपनीचा दावा आहे. वायफाय ७, ब्लुटुथ ६, तीन पोर्ट, आठ केपर्यंतचा एचडीएमआय सपोर्ट, लिक्विड रेटिना एक्सडीआर डिस्प्ले, २४ तास चालणारी बॅटरी अशी वैशिष्ट्ये असलेला हा लॅपटॉप १४ आणि १६ इंच आकारात उपलब्ध आहे. १४ इंचाच्या मॅकबुक्र प्रोची किंमत २४९००० इतकी असून १६ इंची मॅकबुक प्रोची किंमत २९९९०० इतकी आहे.

### पूर्णपणे ॲल्युमिनियम सांगाडा

मॅकबुक निओचा पूर्ण सांगाडा हा ॲल्युमिनियममध्ये बनवला असून त्यामुळे हा लॅपटॉप अधिक भक्कम बनला आहे. शिवाय तो वजनानेही हलका ठरतो. सिल्वर, ब्लश, इंडिगो आणि सायट्रस अशा चार रंगांत उपलब्ध असलेल्या या लॅपटॉपच्या कीबोर्डलाही बॉडीच्या रंगाचीच छटा देण्यात आली आहे.

### १३ इंची लिक्विड रेटिना डिस्प्ले

मॅकबुक निओला १३ इंचाचा रेटिना डिस्प्ले देण्यात आला असून त्याचे रेझोल्युशन २४०८ बाय १५०६ इतके आहे. याला ‘ॲंटी रिफ्लेक्टीव्ह’ अर्थात प्रतिबिंबरोधक ‘कोटिंग’ पुरवण्यात आल्यामुळे प्रखर प्रकाशातही लॅपटॉपवर व्यवस्थितपणे काम करता येते, असा कंपनीचा दावा आहे.





### मॅजिक कीबोर्ड

मॅकबुक निओमध्ये ॲपलने मॅजिक कीबोर्डचा अंतर्भाव केला आहे. अतिशय पातळ आणि कमी वजनाचा हा कीबोर्ड हाताळताना एक चांगला अनुभव देतो. त्यासोबतच मल्टी टच ट्रॅकपॅड पुरवण्यात आला आहे. याशिवाय या लॅपटॉपमध्ये टच आयडी पुरवण्यात आला आहे. त्यामुळे लॅपटॉप सुरू वा बंद करण्यासाठी किंवा ॲपल पेचा वापर करण्यासाठी सुरक्षित पर्याय उपलब्ध झाला आहे.

### मोबाइलसारखा लॅपटॉप

मॅकबुकमध्ये ए१८ प्रो चिप बसवण्यात आली असल्यामुळे ती आयफोनप्रमाणेच अतिशय सक्षमपणे ‘निओ’लाही चालवते. एकाच वेळी व्हॉट्सअप, कॅन्व्हा, एक्सेल, सफारी चालवूनदेखील ‘नियो’च्या कार्यक्षमतेत फरक पडत नाही, असा ॲपलचा दावा आहे.

### पूर्ण दिवस चालणारी बॅटरी

मॅकबुक निओच्या बॅटरीसाठी पूर्णपणे पुनर्प्रक्रिया केलेले कोबाल्ट वापरण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणदृष्ट्या ही बॅटरी सक्षम आहेच पण तीची कार्यक्षमताही वाढली आहे. एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर निओ १६ तास सलग चालू शकतो, असे कंपनीचे म्हणणे आहे.




बुधवार,
११ मार्च २०२६

# लोकसत्ता [ठाणे]

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### डोंबिवलीत मनसे गटनेतेपदाविना?

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीनंतर भाजपला शह देण्यासाठी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाशी जवळीक करणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची महापालिकेच्या राजकारणात कोंडी झाली आहे. मनसेच्या नगरसेवकांचा स्वतंत्र गट स्थापन न झाल्याने पालिकेतील गटनेतेपद आणि पक्ष कार्यालय मिळणे अवघड झाले आहे. वृत्त...४

### स्वीकृतांची निवड लांबणीवर?

**ठाणे :** स्वीकृत नगरसेवक तसेच विशेष समिती सदस्यांची निवड करण्यासाठी ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेली सभा रद्द करण्यात आल्याने इच्छुकांच्या आनंदावर विरजण पडले होते. त्यानंतर आता १८ मार्च रोजी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. मात्र या सभेच्या पटलावर स्वीकृत नगरसेवक, परिवहन समिती आणि पाच विशेष समिती सदस्यांची निवडीचे विषय नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. वृत्त...४

### काळू धरणाला निकराचा विरोध

**बदलापूर :** काळू धरणाविरुद्ध शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार मुरबाडच्या शेतकरी महिलांनी केला आहे. 'आंतरराष्ट्रीय महिला किसान वर्ष २०२६' आणि जागतिक महिला अधिकार दिनानिमित्त मुरबाड तालुक्यातील चासोळे येथील श्री क्षेत्र हटकेश्वर मंदिर परिसरात 'शेतकरी महिला हक्क मेळावा' आयोजीत करण्यात आला होता. या मेळाव्यात काळू धरणाच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या शेतीक्षेत्रातील महिला शेतकऱ्यांनी हजेरी लावली. वृत्त...४

# घरखर्च नियोजनापासून शेअर गुंतवणुकीपर्यंत... स्त्रीच्या स्मार्ट निर्णयांचा जागर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** कुटुंबाच्या जमा-खर्चाचे अर्थकारण समर्थपणे सांभाळणाऱ्या महिलांचा आता गुंतवणूक जगतातही सहजतेने वावर सुरू आहे. याच स्त्रीशक्तीच्या गौरवासाठी व अर्थसाक्षरतेचा जागर करण्यासाठी येत्या शनिवारी दुपारी डोंबिवलीत विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

गुंतवणुकीच्या बदलत्या जगाचे दिशादर्शन म्हणून गेली १२ वर्षे 'लोकसत्ता अर्थब्रह्म' हा वार्षिक अंक नियमितपणे प्रसिद्ध होत आला आहे. या अंकाच्या प्रकाशनानिमित्त

**'लोकसत्ता अर्थब्रह्म'च्या निमित्ताने डोंबिवलीत शनिवारी दुपारी गुंतवणूक परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.**

व आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून होत असलेला हा कार्यक्रम महिलांच्या गुंतवणूक जाणीवा वाढवणारा नक्कीच ठरेल. शनिवार, १४ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता, बोडस सभागृह, लक्ष्मी निकेतन, रामनगर, पं. मालवीय रोड, डोंबिवली (पूर्व) येथे हा कार्यक्रम होईल. जगभर युद्धाचा भडका उडाला असताना, स्वयंपाकाच्या गॅसच्या दरवाढीने एकीकडे कुटुंबाचे अर्थकारण बिघडण्याचा धोका आहे. शेअर बाजार हेलकावे खात आहे, तर वादळी चढ-उतार हे सोने-चांदी यांसारख्या धातूंच्या किमतीतही सुरू आहेत. पेचात पाडणारी ही अस्थिरता धोक्याची घंटा आहे की संधी? याचा भविष्यवेध यानिमित्ताने आर्थिक नियोजनकार कौस्तुभ जोशी यांच्याकडून घेतला जाईल. सध्याच्या अस्थिरतेत गुंतवणुकीची नौका बुडणार नाही व त्यासाठी आवश्यक शिस्तबद्ध नियोजनाचे गणित सोपे करणारी मांडणी सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार सीए तृप्ती राणे या करतील. उपस्थितांना आर्थिक नियोजनाविषयी तज्ज्ञांना प्रश्न विचारता येतील.

- मुख्य प्रायोजक : निप्पॉन इंडिया म्युच्युअल फंड
- सहप्रायोजक : लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लिमिटेड, रुणवाल रिॲल्टी
- पॉवर्ड बाय : लागू बंधू, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स, टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
- इव्हेंट पार्टनर : व्ही. मुक्ता इव्हेंट्स

Nippon india Mutual Fund
Wealth sets you free
प्रस्तुत
लोकसत्ता अर्थब्रह्म
सहप्रायोजक
लोकमान्य | RUNWAL REALTY

**लोकसत्ता अर्थब्रह्म : गुंतवणुकीचा कल्पवृक्ष**

वक्ते

**कौस्तुभ जोशी**
(आर्थिक नियोजनकार)

**तृप्ती राणे**
(सेबीसंलग्न गुंतवणूक सल्लागार)

**कधी :** शनिवार, १४ मार्च २०२६, दुपारी ३.३० वाजता

**कुठे:** बोडस सभागृह, लक्ष्मी निकेतन, रामनगर, डोंबिवली (पूर्व)

**कार्यक्रमासाठी प्रवेश सर्वांसाठी खुला असून, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असेल.**

इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी - ९९२००९९९४३ अथवा (०२२) ६७४४०३९०/ ६७४४०२१५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

अस्वीकरण: म्युच्युअल फंड गुंतवणूक ही बाजारातील जोखमीच्या अधीन आहे, सर्व योजनांसंबंधित कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.

# प्रकल्पपूर्तीसाठी तीन वर्षे प्रतीक्षा

## राज्याच्या २०२५-२६ आर्थिक पाहणी अहवालातील माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी 'एमएमआरडीए'कडून महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची उभारणी सुरू आहे. मेट्रो मार्गिका, नवे रस्ते व रेल्वे मार्गांमुळे ठाणे जिल्हा मुंबईसह इतर जिल्ह्यांशी जोडला जाईल. मात्र, राज्याच्या २०२५-२६ आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारीनुसार प्रकल्पपूर्तीसाठी किमान दोन ते तीन वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

काही प्रकल्पांच्या कामांच्या प्रगतीची टक्केवारी पाहता दोन वर्षेही प्रकल्प पूर्णत्वासाठी कमी पडतील. त्यात तिसरी-चौथी मार्गिका, साकेत उन्नत मार्ग, ठाणे-बोरिवली भुयारी मार्ग, मेट्रो-४, मेट्रो १२ व मेट्रो ५ या प्रमुख प्रकल्पांचा समावेश आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या चार ते पाच वर्षांच्या कालावधीत विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची पायाभरणी झाली. त्यात जिल्ह्यातील सर्व शहरांमध्ये मेट्रो मार्गिका, रेल्वे मार्गिकांचा विस्तार, उन्नत मार्गांची उभारणी तसेच बुलेट ट्रेन प्रकल्प, मालवाहतूक विशेष रेल्वे मार्गिका या प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पांची जिल्ह्यात विविध ठिकाणी कामे सुरू आहेत.

२०२५ मध्ये जाहीर झालेल्या या आर्थिक पाहणी अहवालात ठाणे जिल्ह्यातील अनेक वाहतूक प्रकल्पांच्या पूर्णत्वाचा अंदाजित कालावधी जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर २०२६च्या आर्थिक पाहणी अहवालात या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेत त्यांच्या सुधारित पूर्णत्व तारखांचा समावेश करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या, वाहनसंख्या व दैनंदिन प्रवासातील तुडुंब गर्दी लक्षात घेता मेट्रो मार्गिका, नवे रस्ते, उड्डाणपूल व रेल्वे मार्गिका हे प्रकल्प महत्त्वाचे आहेत. ते पूर्ण झाल्यानंतर ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, मिरा-भाईंदर व इतर परिसरांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच मुंबई व पालघर यांसारख्या शेजारच्या जिल्ह्यांशी संपर्क अधिक वेगवान होईल.

दरम्यान, या प्रकल्पांच्या कामांना वेग देण्याचे प्रयत्न सुरू असले तरी भूसंपादन, तांत्रिक प्रक्रिया व प्रशासकीय टप्पे यामुळे काही प्रकल्पांचा कालावधी वाढला आहे.

### या प्रकल्पांचा समावेश

(२०२५-२६ राज्य आर्थिक पाहणी अहवालानुसार प्रकल्पांची माहिती)



**रस्ते प्रकल्प**
- ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गाचे काम - २०२८ मध्ये पूर्ती
- बाळकुम ते गायमुख ठाणे रस्ता - २०२८ मध्ये पूर्ती
- आनंदनगर ते साकेत उन्नत मार्ग - २०२८ मध्ये पूर्ती

**रेल्वे मार्गिका**
- कल्याण-बदलापूर तिसरी-चौथी मार्गिका - मार्च २०२७ मध्ये पूर्ती (३० टक्के पूर्ण)
- कल्याण-आसनगाव चौथी मार्गिका - डिसेंबर २०२६ मध्ये पूर्ती (१६ टक्के काम पूर्ण)



**मेट्रो मार्गिका**
- ठाणे- भिवंडी- कल्याण मेट्रो - जून २०३० मध्ये पूर्ती
- वडाळा- घाटकोपर- ठाणे- कासारवडवली मेट्रो - नोव्हेंबर २०२७ मध्ये पूर्ती
- गायमुख ते शिवाजी चौक (मिरा रोड) - मार्च २०३० मध्ये पूर्ती
- कल्याण-तळोजा - डिसेंबर २०२७ मध्ये पूर्ती



गॅस पुरवठादारांकडील सिलिंडरचा साठा संपत चालला आहे.

# ठाण्यात ८०० हॉटेल बंद होण्याच्या मार्गावर

**निखिल अहिरे/ निलेश पानमंद, लोकसत्ता**

**ठाणे :** ठाण्यात लहान-मोठी मिळून सुमारे ८०० हून अधिक हॉटेल, उपाहारगृहे व खाद्य व्यवसाय सुरू आहेत. मात्र पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅसपुरवठ्याबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने या व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. सर्व हॉटेलचालकांकडे पुढील पाच ते सहा दिवस चालेल इतकाच साठा असल्याची माहिती ठाणे हॉटेल संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे. दरम्यान, काळ्या बाजारात सिलिंडरची विक्री केली जात असून त्यासाठी चारशे रुपये जास्त घेतले जात असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले.

इराणवरील लष्करी कारवाईमुळे खनिज तेल, एलपीजी, सीएनजी गॅसपुरवठा विस्कळीत झाला आहे. घरगुती गॅस सिलिंडरही एका ठरावीक कालावधीनंतरच ग्राहकांना मिळणार आहेत. तर हॉटेल व्यावसायिकांना लागणारे व्यावसायिक गॅस सिलिंडर पुरवठा लवकर बंद होण्याची शक्यता आहे.

गॅस पुरवठादारांकडून ''कधीही पुरवठा थांबू शकतो'' अशी सूचना देण्यात आल्याने अनेक हॉटेल व्यावसायिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून अतिरिक्त गॅस सिलिंडरचा साठा करून ठेवण्यास सुरुवात केली आहे. मात्र सध्या बहुतांश हॉटेलकडे केवळ पुढील पाच ते सहा दिवस चालेल इतकाच गॅससाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, ठाणे शहरातील हॉटेल व्यवसायाशी संबंधित विविध संघटनांनीही या स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. गॅसपुरवठा दीर्घकाळ बंद राहिला तर शहरातील अनेक हॉटेलना तात्पुरते बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते, अशी माहितीही हॉटेल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. शहरातील हॉटेल, उपाहारगृहे आणि भोजनालयांवर हजारो नागरिकांचे रोजचे जेवण अवलंबून असते. त्यामुळे गॅसपुरवठ्यात अडथळा निर्माण झाल्यास त्याचा परिणाम केवळ हॉटेलच नव्हे तर सर्वसामान्यांच्या जीवनावरही होण्याची शक्यता आहे.

**हॉटेल व्यवसायासाठी गॅसची गरज किती?**

हॉटेलना दिवसाला सरासरी दोन व्यावसायिक सिलिंडर गॅसची आवश्यकता भासते. तर लहान हॉटेल व भोजनालयांमध्ये ग्राहकांची संख्या तुलनेने कमी असल्याने एक सिलिंडर साधारण दोन दिवस पुरतो, असे हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

> सध्या पाच-सहा दिवस जाईल इतका गॅस काही हॉटेलचालकांकडे आहे. मात्र त्यानंतर पुरवठा नाही झाला तर हॉटेल बंद होतील. याबाबत उपाययोजना राबविणे गरजेचे आहे.
> **-रघुनाथ शेट्टी,** सचिव, ठाणे हॉटेल असोसिएशन

> चार ते पाच दिवस पुरेल इतका गॅससाठा हॉटेल व्यावसायिकांकडे उपलब्ध आहे. आधीच गॅस दरात वाढ झाली आहे, तर गॅस विक्री करणारे काही जण काळ्या बाजारात चारशे रुपये जास्त घेऊन सिलिंडरची विक्री करत आहेत.
> **- रत्नाकर शेट्टी,** उपाध्यक्ष, ठाणे हॉटेल असोसिएशन

## ठाण्याचा पारा ४१ अंशांवर

**ठाणे :** ठाणे शहरातील तापमानात मंगळवारी दोन अंशांनी वाढ होऊन ४१ अंशापर्यंत पोहोचले. तप्त झळांमुळे ठाणेकरांची काहिली झाली. या वर्षी मार्च ते मे या कालावधीत कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागानेही ९ व १० मार्च रोजी उष्णतेच्या लाटांचा अंदाज वर्तविला होता.

ठाणे शहरात १ मार्च रोजी कमाल तापमान ३३.४ तर किमान तापमान २२.१ अंश इतके होते. यानंतर मात्र तापमानात वाढ होण्यास सुरवात झाली. ५ मार्चला शहरातील तापमानाचा पारा ३९ अंशावर पोहचला. गेले चार दिवस हेच तापमान कायम होते. मात्र, १० मार्च रोजी शहरातील तापमानात दोन अंशाने वाढ होऊन ते कमाल तापमान ४१.१ अंशावर पोहचले.

# भिवंडीत बाह्यरुग्ण कक्ष आता सहा दिवस सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**ठाणे :** एकीकडे भिवंडी-निजामपूर शहर महापालिकेमार्फत ५० खाटांच्या क्षमतेचे रुग्णालय सुरू करण्याची प्रक्रिया सुरू असली तरी, दुसरीकडे आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालिकेने गेल्यावर्षी या रुग्णालयात दवाखाना सुरू केला. शहराच्या मध्यवर्ती भागातील या दवाखान्यात सर्वच आरोग्य तपासण्या एकाच ठिकाणी होत असून यामुळे येथे रुग्ण संख्येत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे. यामुळे पालिका प्रशासनाने आता पाचऐवजी सहा दिवस हा कक्ष सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

भिवंडी शहराच्या मध्यवर्ती भागातील बाजारपेठ परिसरात बीजीपी रुग्णालय सुरू करण्याचे काम सुरू आहे. याठिकाणी ५० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रुग्णालयाची वास्तु तयार आहे. परंतु रुग्णालय मान्यतेच्या काही प्रक्रिया पुर्ण झालेल्या नसल्यामुळे हे रुग्णालय अद्याप सुरू झालेले नाही.

नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालिकेने गेल्यावर्षी मार्च महिन्यात येथे बीजीपी दवाखाना सुरू करून बाह्य रुग्णांची तपासणी सुरू केली. वाढत्या नागरी वस्त्या लक्षात घेऊन नागरिकांना वैद्यकीय पायाभूत सुविधा तसेच आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा दवाखाना सुरू करण्यात आला. अतिजोखमेची मातांची तपासणी, लहान बाळांचे नियमित लसीकरण, दैनंदिन ओ.पी डी., साथरोग आजारांची तपासणी, व उपचार केले जातात.



# राष्ट्रीय उद्यानात चार दिवसांत दोनदा वणवे

**किशोर कोकणे, लोकसत्ता**

**ठाणे :** ठाण्यात दिवसेंदिवस तापमानवाढ होत असताना दुसरीकडे मुबलक निसर्गसंपदा असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात गेल्या चार दिवसांत दोन ठिकाणी लागलेल्या आगीमुळे एक हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले. मुंब्रा येथील पारसिक डोंगरावरील वणवा काही व्यक्तींनी लावलेल्या आगीतून पसरल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अतिक्रमण, शिकार, शेती वा दुर्घटना यामागील कारणे आहेत, असे पर्यावरणवाद्यांचे म्हणणे आहे.

ठाणे शहरात वृक्षतोडीला बिनदिक्कत परवानग्या मिळत असताना दुसरीकडे ठाणे व मुंबई शहराचे फुफ्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वणवे लागत आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात हॉटेल, ढाबे, बंगले बांधून (पान ३वर)

> जंगलात आगी लावल्या जातात. प्रशासनाकडे वणव्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पुरेशी यंत्रणा व मनुष्यबळ नाही. त्यासाठी सरकारने सक्षम संसाधने उभी करावीत.
> **- रोहित जोशी,** पर्यावरणवादी कार्यकर्ते.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ५२४ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. तर, उर्वरित शाळांमध्ये देखील एप्रिल २०२६ अखेर पर्यंत सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण होईल, असे जिल्हा परिषदेच्या वतीने सांगण्यात आले आहे. (पान ३वर)

> विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम सुरु आहे. पहिल्या टप्प्यात ५२४ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आले असून उर्वरित शाळांत सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येत आहे. शाळांमधील वातावरण अधिक सुरक्षित व शिस्तबद्ध राहण्यास मदत होईल.
> **- बाळासाहेब राक्षे,** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ठाणे जिल्हा परिषद

# शिक्षण हक्क कायद्यातील नियमाला स्थगिती मिळूनही संभ्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) एक किलोमीटर अंतराच्या नियमाला स्थगिती दिल्यामुळे पालकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. परंतु, ज्या पालकांनी आधीच अर्ज भरले आहेत, त्यांना नव्याने अर्ज भरण्याची संधी मिळेल का, सुधारित अर्ज समाविष्ट करता येईल का, असे प्रश्न पालकांसमोर निर्माण झाले आहेत.

अर्ज भरण्यासाठी १० मार्च ही शेवटची मुदत होती. ही मुदत वाढविण्याबाबत संकेतस्थळावर कोणतिही सुचना देण्यात आलेली नाही, त्यामुळे नव्या नियमावलीला स्थगिती मिळाली असली तरी त्याची अंमलबजावणी कशी होणार याबाबत जिल्ह्यातील पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

**ज्या पालकांनी आधीच अर्ज भरले आहेत, त्यांना नव्याने अर्ज भरण्याची संधी मिळेल का, सुधारित अर्ज समाविष्ट करता येईल का, असे प्रश्न निर्माण झाले आहेत.**

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) प्रवेश प्रक्रियेला १७ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. १० मार्चपर्यंत पालकांना अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती. त्यानुसार, राज्यभरात १ लाखाच्या आसपास आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज दाखल आहेत. तर, ठाणे जिल्ह्यातून १९ हजाराच्या आसपास अर्ज दाखल झाले आहेत. यात सर्वाधिक शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या अर्जाचा समावेश आहे.

शिक्षण हक्क कायद्यात यंदाच्या वर्षी तीन किमीऐवजी एक किमी अंतराच्या आतील शाळा निवडाव्या, अशी नवीन नियम घालण्यात आला होता. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायदा प्रक्रियेपासून वंचित राहावे लागत होते. तर, शहरी भागातील विद्यार्थ्यांनाही शाळा निवडताना अडचण निर्माण होत होती. त्यामुळे या नव्या नियमावलीचा सर्वच स्तरातून विरोध होत होता. त्यामुळे त्या नियमाला स्थगिती देण्यात आली.




> ज्या पालकांनी आधीच अर्ज भरला आहे त्यांच्यात सुधारित अर्ज पाठवायचा की, पुन्हा नव्याने अर्ज भरायचा का, तसेच आरटीई अर्ज भरण्याची १० मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती आता ती वाढवणार का, या बाबत कोणतेही अद्ययावत सूचना आरटीई अधिकृत संकेतस्थळावर मिळालेले नाहीत.
> **- प्रकाश दिलपाक,** शिक्षण आरोग्य अधिकार मंच

# करिअर वृत्तांत

शिकण्याची आवड निर्माण कराल, तर तुमचा विकास कधीही थांबणार नाही.
- ॲंथनी डि'ॲंजेलो, अमेरिकन व्यावसायिक

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
फारुक नाईकवाडे

## मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन - पेपर तीन

# अर्थव्यवस्था- साधनसंपत्तीचे एकत्रीकरण

**साधनसंपत्तीचे एकत्रीकरण हा अभ्यासक्रमातील शब्द इंग्रजीच्या 'रिसोर्स मोबिलायझेशन' शब्दाचे भाषांतर आहे. यात साधनसंपत्तीची उपलब्धता, तिचा परिणामकारक वापर, नियोजन या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यवस्थापन हा मराठी शब्द ही एकूण संकल्पना समजून घेण्यासाठी जास्त साजेसा आहे.**

**अर्थव्यवस्था घटकाच्या** साधनसंपत्तीचे एकत्रीकरण या उपघटकाच्या तयारीबाबत या लेखामध्ये पाहू.

या उपघटकामध्ये अभ्यासायचे ठळक मुद्दे सोबतच्या चौकटीमध्ये दिलेले आहेत. त्यांच्या आधारे तयारीची रणनीती पाहू. या उपघटकावर प्रत्यक्ष प्रश्न विचारले जाण्याची शक्यता कमी आहे. पण इतर गतिमान मुद्दे, चालू घडामोडींवर आधारित, विश्लेषणात्मक प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी या मुद्द्यांचा मूलभूत आणि संकल्पनात्मक अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात यांवर पारंपरिक प्रश्न कमी दिसणार असले तरी हा मुद्दा परीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

### साधनसंपत्तीचे एकत्रीकरण ठळक मुद्दे

- साधन संपत्तीचे प्रकार
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची संकल्पना
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची आवश्यकता
- साधन संपत्तीचे स्रोत - सार्वजनिक, खासगी / अंतर्गत, बाह्य गुंतवणूक
- साधन संपत्तीचे वितरण
- वित्त आयोग
- शासकीय उपक्रम
- वित्तीय धोरणांची भूमिका
- आव्हाने



### मुद्देनिहाय तयारी

■ साधनसंपत्तीचे नैसर्गिक मानवनिर्मिती आणि मानवी असे तीन प्रकार, त्यांचे महत्त्व, त्यांची वैशिष्ट्ये, सर्वसाधारण उपलब्धता, भारतातील उपलब्धता, त्यांचा वापर आणि विकासातील आव्हाने, उपाय समजून घ्यायला हवेत.

■ साधन संपत्तीच्या एकत्रीकरणामध्ये वित्तीय आणि इतर सर्वच संसाधनांचा विचार होत असला तरी तयारी करताना वित्तीय संसाधनांवर भर देणे आवश्यक आहे. वित्तीय संसाधनांच्या एकत्रीकरणाचे महत्व समजून घ्यायला हवे. विशेषतः शासकीय अंदाजपत्रके, अर्थसंकल्प यांचेशी परस्पर संबंध अभ्यासायला हवा.

■ साधनसंपत्तीच्या एकत्रीकरणाची शासनाला आवश्यकता का आहे, हे लक्षात घ्यायला हवे. संसाधनांच्या एकत्रीकरणातून पुढील बाबी कशा साधल्या जातात ते समजून घ्यायला हवे - सर्व प्रकारच्या संसाधनांचा कमाल आणि परिणामकारक वापर, त्यांमध्ये वैविध्य राखणे, स्वतंत्र आणि आत्मनिर्भर अर्थसंकल्प तयार करणे, भारतामध्ये कल्याणाकारी शासन व्यवस्था असल्याने कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या म्हणून सामाजिक उपक्रमासाठी तरतूद करणे.

■ देशांतर्गत स्रोतांमध्ये बचत, गुंतवणूक आणि भांडवल निर्मिती, बाह्य गंतवणूक आणि कर्जे व अन्य स्रोत, सार्वजनीक स्रोतामधील कर, करेतर आणि अन्य उत्पन्न या बाबी विचारात घ्यायला हव्यात. यांची अद्ययावत आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालामधून पहायला हवी. बचतीचे प्रकार, सकल नियत भांडवल निर्मिती (GFCF), हे विश्लेषणात्मक मुद्दे संकल्पनात्मक तयारीसाठी महत्त्वाचे आहेत.

■ शासकीय स्रोतांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, करेतर महसूल, कर्ज आणि गुंतवणूक हे स्रोत व्यवस्थित समजून घ्यायला हवेत. कारण हे अर्थसंकल्पातील - शासकीय अंदाजपत्रकातील उत्पन्नाचे स्रोत आहेत. यांच्या विश्लेषणातून अर्थव्यवस्थेवी वृद्धी आणि विकास यांच्यामधील समतोल समजून घेणे शक्य होणार आहे. कर महसूलामध्ये वस्तू व सेवा कराचे फायदे, आव्हाने, समस्या आणि विश्लेषणात्मक मूल्यमापन आवश्यक आहे.

■ करेतर महसूलामधील निर्गुंतवणुकीची संकल्पना समजून घेऊन तिचे फायदे - तोटे, समस्या, आव्हाने, परिणामकारकता आणि उपाययोजना या मुद्द्यांच्या आधारे विश्लेषण आवश्यक आहे.

■ परकीय गुंतवणुकींचे प्रकार व महत्त्व समजून घ्यावे. आर्थिक पाहणी अहवालामधून त्यांची आकडेवारी आणि ट्रेंड्स - कल लक्षात घ्यायला हवेत. परकीय संस्थांची कर्जे व त्यांचा वापर त्या-त्या वर्षीच्या चालू घडामोडींचा भाग म्हणून विचारात घ्यावेत.

■ वित्तीय संसाधनांच्या उपलब्धतेसाठी त्यांचे योग्य वितरण आवश्यक आहे. केंद्र व राज्यांमध्ये वित्तीय संसाधनांच्या वितरणासाठी वित्त आयोग धोरण व सूत्रे ठरवितो. यासाठीच्या घटनात्मक तरतूदी, वित्त आयोगाची रचना, कार्ये, भूमिका लक्षात घ्याव्यात. १५व्या आणि १६व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या तुलना आणि १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे मूल्यमापन लक्षात घ्यायला हवे. यामध्ये बँका, वित्तीय संस्था, पतसंस्था, सहकारी संस्था, विशेष प्रकारच्या वित्तीय संस्था व स्रोत उदा. इंडिया इनोव्हेशन फंड, आर्थिक विकास महामंडळे, तसेच एंजल गुंतवणूकदार संकल्पना माहीत हव्यात. त्यांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे योगदान, समस्या, कारणे, उपाय आणि महत्त्व हे मुद्दे विचारात घ्यावेत. यामध्ये प्रत्यक्ष लाभ वितरण (DBT), राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइन (NIP), राष्ट्रीय मौद्रीकरण पाइपलाइन (NMP), प्रधानमंत्री जन धन योजना या उपक्रमांची माहिती आवश्यक आहे.

■ वित्तीय धोरणांच्या माध्यमातून साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर कशा प्रकारे होतो ते समजून घ्यायला हावे. उदा. महसूलाचा वापर कल्याणकारी कामांकरीता निधी उभारणीसाठी करणे किंवा कररचनेच्या माध्यमातून समान संसाधन वितरण साधण्याचा प्रयत्न करणे (प्रगतीशील करांच्या माध्यमातून कमी उत्पन्न गटास संरक्षण).

■ साधन संपत्तीचे एकत्रीकरण करण्यातील अडचणी / आव्हाने स्वरूप, कारणे, परिणाम, उपाय अशा मुद्द्यांच्या आधारे विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये महसूलासठीचे नवे स्रोत शोधणे, करेतर महसूलावरील वाढते अवलंबित्व, शासकीय खर्चावरील अवलंबित्व, जागतिक कर सुधारणांमुळे भारतीय करवसूलीवर येणाऱ्या मर्यादा, निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणास मिळणारा अल्प प्रतिसाद अशा मुद्द्यांचा समावेश असला पाहिजे.

■ मूलभूत संकल्पना आणि या क्षेत्रातील बाबींचे परस्परसंबंध लक्षात घेतले तर चालू घडामोडींच्या आधारे चर्चा, वाचन आणि चिंतनातून आपली मते तयार करणे शक्य होते. संसाधनांबाबतची आव्हाने सोडविण्यासाठी अशा विश्लेषणाचा आधार घेऊन मुद्दे तयार करणे आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

# श्रम संहितेतील महत्त्वाच्या तरतुदी

**नवीन कामगार कायद्यांविषयी कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता व शंका आहेत. या कायद्यांचा आपल्यावर काय परिणाम होईल अशी बरेच जण विचारणा करत आहेत. त्यासंबंधी काही महत्त्वाच्या बाबींवर या लेखात चर्चा करूया.**

कौशल्य तंत्र
सलील चिंचोरे

**भारतामध्ये कामगार** कायदे अधिक सोपे, सुसंगत आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने पूर्वी अस्तित्वात असलेले २९ वेगवेगळे कामगार कायदे एकत्र करून चार नवीन श्रम संहितांची (Labour Codes) निर्मिती केली आहे. या श्रम संहितांचा मुख्य उद्देश म्हणजे कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, उद्योगांना नियमांचे पालन करणे सोपे करणे आणि भारतातील रोजगार व्यवस्थेला अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनवणे. नोव्हेंबर २०२५ पासून श्रम संहिता सरकारने लागू केल्या आहेत. या चार संहिता पुढील प्रमाणे आहेतः

वेतन संहिता, २०१९ (कोड ऑन वेजेस) - कामगारांना किमान वेतन, वेतनाची वेळेवर देयता आणि वेतनाशी संबंधित नियम निश्चित करते.

औद्योगिक संबंध संहिता, २०२० (इंडस्ट्रीयल रिलेशन्स कोड) - नियोक्ता-कर्मचारी संबंध, कामगार संघटना आणि औद्योगिक वाद यासंबंधी नियम स्पष्ट करते.

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या अटी संहिता, २०२० (ओएसएच कोड) -कामगारांचे कार्यस्थळावरील सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी सुधारण्यासाठी नियम ठरवते.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (सोशल सिक्युरिटी कोड) - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ), विमा, पेन्शन आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश करते.

श्रम संहितेमध्ये कर्मचाऱ्यांसंबंधी अनेक बाबींची फेरमांडणी केली आहे. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे पगार व वेतन यांची नव्याने केलेली व्याख्या. खासगी क्षेत्रात पगारातील सर्व घटकांना एकत्र करून येणाऱ्या रकमेला सीटीसी (कॉस्ट टू कंपनी) असे म्हणतात. यामध्ये मासिक पगार, बोनस, परफॉर्मन्स इन्सेंटिव्ह, प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी यांचा समावेश होतो. यातील प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी हे बेसिक वेतन व महागाई भत्त्याच्या कायद्यानुसार विशिष्ट टक्केवारी म्हणून मोजले जातात. या घटकांना अप्रत्यक्ष लाभ असेही म्हणतात. सीटीसीमध्ये बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण जितके जास्त तितक्या प्रमाणात अप्रत्यक्ष लाभ वाढतात. श्रम संहिता लागू होण्याआधी प्रत्येक कंपनीमध्ये सीटीसीमधील बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण वेगवेगळे होते.

श्रम संहितांमध्ये वेतन (वेज) मासिक पगाराच्या (मंथली सॅलरी) कमीत कमी ५० टक्के ठेवण्याचे बंधनकारक केले आहे. वेतनामध्ये समावेश असलेल्या व समावेश नसलेल्या घटकांची यादी दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या रचनेत अधिकाधिक स्पष्टता आणणे हा यामागचा हेतू आहे. आता मासिक पगाराच्या किमान ५० टक्के रकमेवर (वेतनावर) प्रॉव्हिडंट फंड, व ईएसआयसी कापले जाणार आहे. तसेच ही रक्कम ग्रॅच्युईटी मोजण्यासाठी वापरली जाणार आहे. ही रक्कम तुमच्या सध्याच्या पगारातील रकमेपेक्षा जास्त असल्यास तेवढ्या प्रमाणात तुमचे अप्रत्यक्ष लाभ वाढतील. मात्र त्यामुळे तुमच्या हाती येणाऱ्या निव्वळ पगारावर (टेक होम सॅलरीवर) परिणाम होईल.

कंपन्यांना निश्चित मुदतीचे कर्मचारी (फिक्स्ड टर्म एम्प्लॉईज) नेमण्याची तरतूद केली आहे. या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखे सर्व फायदे (रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा) द्यावे लागतील. हे कर्मचारी किमान एक वर्ष नोकरी केल्यानंतर ग्रॅच्युईटीसाठी पात्र ठरतील.



कंपनीतील सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांना (कायमस्वरूपी, निश्चित मुदतीचे, कंत्राटी) नेमणूकपत्र देणे बंधनकारक असेल. या नेमणूकपत्रात कामाचे स्वरूप, कामाचे ठिकाण व वेतनाचे तपशील द्यावे लागतील. महिला कर्मचाऱ्यांना नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची श्रम संहिता परवानगी देते. त्यासाठी कंपनीला महिला कर्मचाऱ्यांची लिखित पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. कर्मचाऱ्याने कंपनी सोडल्यास त्याची देय रक्कम (फायनल सेटलमेंट) कंपनीला दोन दिवसात द्यावी लागेल.

ई-कॉमर्स क्षेत्रात सध्या गिग कामगारांचा वापर होतो. हे कामगार एकाच वेळेस अनेक कंपन्यांबरोबर विशिष्ट काळासाठी किंवा कामासाठी काम करतात. श्रमसंहितेत अशा कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद केलेली आहे. त्यासाठी कंपन्यांना विक्रीचा एक टक्का रक्कम सामाजिक सुरक्षा फंडासाठी द्यावी लागेल.

याविषयी कंपनीतील तज्ज्ञांशी बोलून श्रमसंहितेविषयी तुम्ही अधिक माहिती जाणून घेऊ शकता व त्यातील नियमांचे काटक काटेकोरपणे पालन करू शकता.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत.)

चौकटी-पल्याड
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

# संक्रमणातून जाणारे आयटी क्षेत्रातील शिक्षण

**आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक नियमित कामे स्वयंचलित करेल; परंतु त्याच वेळी नवे तांत्रिक आणि सामाजिक प्रश्नही निर्माण होतील. त्यामुळे भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील.**



**आज जगभरातील** माहिती तंत्रज्ञान (आयटी) शिक्षण एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत संगणकशास्त्रातील पारंपरिक शाखा म्हणजे प्रोग्रॅमिंग, डेटाबेस व्यवस्थापन किंवा नेटवर्किंग यांवर भर दिला जात होता. मात्र आता आयटी शिक्षण अधिक व्यापक आणि बहुआयामी आणी बहुविषयक बनत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये आयटी अभ्यासक्रमांची रचना आणि त्यामधील संशोधनाचे केंद्रबिंदू झपाट्याने बदलत आहेत.

आयटीमधील सध्या सर्वाधिक मागणी असलेली उप-क्षेत्रे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि रोबोटिक्स. आरोग्यसेवा, हवामान बदल, वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक), जैवतंत्रज्ञान आणि शहरी नियोजन अशा विविध क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढत असल्याने या शाखांतील तज्ज्ञांची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर एआय एथिक्स, रिस्पॉन्सिबल टेक्नॉलॉजी आणि ह्युमन-कॉम्प्युटर इंटरॅक्शन यांसारख्या विषयांनाही महत्त्व मिळत आहे.

अमेरिका आणि ब्रिटन ही आयटी शिक्षणाची पारंपरिक केंद्रे असली तरी आज इतर अनेक देशांतील विद्यापीठेही वेगाने पुढे येत आहेत. जर्मनीमधील टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक आणि आरडब्ल्यूटीएच आखेन येथे डेटा इंजिनीअरिंग व रोबोटिक्समध्ये मूलभूत संशोधन सुरू आहे. नेदरलँड्समधील डेल्फ्ट युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि आयंधोव्हन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी येथे स्मार्ट सिस्टीम्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर दिला जातो. कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो आणि युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू ही प्रत्यक्ष उद्योगांशी जोडलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आहेत.

ऑस्ट्रेलियामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न, ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साउथ वेल्स आणि मोनॅश युनिव्हर्सिटी येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटीमध्ये आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. चीनमधील त्सिंगहुआ युनिव्हर्सिटी, पेकिंग युनिव्हर्सिटी आणि शांघाय जिआओ टोंग युनिव्हर्सिटी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन चालते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीही या संधी खुल्या होत आहेत. या अभ्यासक्रमांसाठी केवळ संगणक अभियांत्रिकीचेच नव्हे तर गणित, सांख्यिकी, इलेक्ट्रॉनिक्स किंवा भौतिकशास्त्राची पार्श्वभूमी असलेले विद्यार्थीही अर्ज करू शकतात. विश्लेषण क्षमता, प्रोग्रॅमिंग कौशल्य, संशोधनवृत्ती मुख्यत्वे अपेक्षित असते.

आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील. मराठी विद्यार्थ्यांसाठी ही संधी केवळ करिअरची नाही, तर नव्या ज्ञानविश्वाशी जोडणाऱ्या आणि जागतिक तंत्रज्ञान परिसंस्थेत सहभागी होण्याच्या प्रवासाची सुरुवात ठरू शकते.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## आयटीतील भविष्यवेधी उद्योजक : सुमित मोरे

भारतामधील अनेक आयटी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे हे मोठे स्वप्न असते. परंतु त्या स्वप्नासोबत आर्थिक अडचणी आणि शिक्षणासाठी कर्ज घेण्याची जोखीमही असते. सुमितची कथा मात्र वेगळी आहे. चिकाटी, योग्य नियोजन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव यामुळे त्याचा प्रवास प्रेरणादायी ठरतो.

सुमितने पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), येथून माहिती तंत्रज्ञान शाखेत बी.ई. पदवी पूर्ण केली. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षापासूनच त्याने आपल्या मित्रांप्रमाणे जीआरई आणि टॉफेल या परीक्षांची तयारी सुरू केली होती. मात्र परदेशी शिक्षणासाठी मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन कुटुंबावर आर्थिक ओझे टाकायचे नाही, असा त्याचा स्पष्ट निर्णय होता.

म्हणूनच सुमितने आधी नोकरी करून काही रक्कम साठवण्याचा मार्ग निवडला. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून त्याची निवड आयबीएममध्ये झाली. नोकरी करत असतानाच त्याने जीआरई आणि टॉफेल या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याला इंग्लंडमध्ये एका प्रकल्पासाठी काम करण्याची संधी मिळाली. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला.

यानंतर त्याने अमेरिकेतील पाच विद्यापीठांमध्ये आयटीमधील मास्टर्ससाठी अर्ज केले आणि त्याला युनिवर्सिटी ऑफ मेरीलॅन्ड येथे प्रवेश मिळाला. त्याच्या कामाच्या अनुभवामुळे त्याला शिक्षण शुल्कासाठी संपूर्ण शिष्यवृत्ती मिळाली. पहिल्या वर्षातच त्याला टीचिंग असिस्टंटशिप आणि नंतर रिसर्च असिस्टंटशिप मिळाली. स्टायपेंडही मिळू लागला. शिक्षण शुल्काव्यतिरिक्त असलेल्या खर्चाचाही प्रश्न यातून सुटला. उन्हाळ्यात त्याने सिलिकॉन वॅली मधील एका स्टार्टअपमध्ये तीन महिन्यांची इंटर्नशिप केली. हे सारे करीत असताना सुमितने आपला मास्टर्स अभ्यासक्रम थिसिस पद्धतीने पूर्ण केला.



अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी असूनही सुमित भारतात परतला. प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या पुस्तकाने त्याला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. दरम्यान त्याने हेमलकसाला जाऊन लोकबिरादरीमध्ये एक वर्ष काम केले. तेथे आदिवासी मुलांना मराठी शिकण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्याने 'अक्षर' हे मोबाइल ॲप विकसित केले. या उपक्रमाला नॅसकॉमकडून सन्मान मिळाला. दहा वर्षापूर्वी मित्राच्या मदतीने त्याने 'नॉन स्टॉप आयओ टेक्नॉलॉजीज' ही कंपनी सुरू केली आणि ती आज अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर प्रोडक्ट डेव्हलपमेंटचे काम करते आहे. आज या कंपनीत दीडशे पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

सामाजिक बांधिलकीची प्रेरणा आणि जागतिक शिक्षणाचा अनुभव यांचा संगम घडवत सुमित आज आपल्या कंपनीच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात नवे योगदान देत आहे.

## शब्दकोडे- ३६१



**आडवी विधाने :** (१) जन्मभर, तहहयात (३) 'बाई पण भारी देवा' चित्रपटाचे दिग्दर्शक (फक्त नाव) (५) मित्र, सवंगडी (७) दिवस (८) मत्सर, द्वेष (९) शृंगारिक, रसप्रधान काव्यगायन प्रकार (१०) दाणादाण, फाटाफूट (१२) एक लोकप्रिय बैठा खेळ (१४) गाडीवरचे आच्छादन (१५) रंग, औषध वगैरे उडवण्याची नळी (१७) एक अधिक पाव (१८) घडलेली गोष्ट, प्रसंग (१९) चीर, भेग (२१) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस (२३) कूर्म, कच्छप (२४) खुबी, मर्म (२५) सुट्टी, परवानगी (२७) माकड, कपी (२९) वार्षिक नेमणूक (३१) पाहुणचार, बडदास्त (३४) लोखंडाचा चपटा, अरुंद लांब तुकडा (३५) एक सुगंधी वनस्पती (३६) वार्ताहर

**उभी विधाने :** (१) एखाद्या प्रदेशात मूळचे राहणारे लोक (२) आणीबाणीला विरोध करण्यासाठी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विविध विचारधारांच्या नेत्यांनी एकत्र येऊन हा पक्ष स्थापन केला होता (३) हा कापून वाढदिवस साजरा केला जातो (४) कार्ल मार्क्स यांचा प्रसिद्ध ग्रंथ (५) तालाच्या आरंभीची मुख्य जागा, सारखा (६) वाळलेला खजूर (८) ऊन, सूर्यप्रकाश (९) डौलात चालणे, नखऱ्याने चालणे (११) हेकेखोरपणा, आग्रहीपणा (१३) मांडणी, ठेवण (१६) नियमानुसार, रूढीला धरून (१७) सूर्योदयापासून दुपारपर्यंतचा काळ (२०) खेळाची पाळी, मोठी पळी (२१) गणपतीला वाहिल्या जाणाऱ्या दुर्वांची संख्या (२२) अशुद्ध रक्तवाहिनी (२३) अरण्य, जंगल (२६) मुलीचा नवरा (२७) सोक्षमोक्ष, फैसला (२८) ओटीपोटाच्या खालचा भाग, कटी (३०) मुघल साम्राज्याचा संस्थापक (३२) विदेशी मद्याचा एक प्रकार (३३) कीर, पोपट (३४) हा कंद चिरताना डोळ्यातून पाणी आणतो

- चारू नानल

## सुडोकू - ३६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९ | १ | ५ | |
| ६ | ८ | १ | | | | | ९ | |
| ४ | | | | ८ | | | २ | |
| २ | | | | ७ | | | | |
| | | ३ | ६ | | ८ | २ | | |
| | | | | ४ | | | | ६ |
| | ६ | | | २ | | | | ९ |
| | ९ | | | | | ८ | ७ | २ |
| | २ | ५ | ३ | | | | | |

## सुडोकू - ३६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ४ | ८ | १ | ९ | ५ | २ |
| ५ | १ | ८ | ६ | ९ | २ | ३ | ४ | ७ |
| ९ | ४ | २ | ५ | ३ | ७ | १ | ८ | ६ |
| १ | ८ | ४ | ९ | ६ | ३ | २ | ७ | ५ |
| ७ | ९ | ६ | ८ | २ | ५ | ४ | ३ | १ |
| २ | ५ | ३ | ७ | १ | ४ | ६ | ९ | ८ |
| ८ | २ | ५ | ३ | ४ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ७ | १ | २ | ५ | ९ | ८ | ६ | ३ |
| ३ | ६ | ९ | १ | ७ | ८ | ५ | २ | ४ |

## शब्दकोडे -३६०चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | ज | यं | ती | ■ | का | र्ल | स | न |
| म | सू | र | ■ | न | व | रा | ■ | जा | ■ |
| ला | ल | ■ | कै | वा | र | ■ | स | व | त |
| ■ | दा | स | ■ | र | ■ | त | र | ट | ■ |
| स | र | ब | त | ■ | मा | र | ळ | ■ | हू |
| ह | ■ | ब | ■ | मा | न | स | ■ | रं | क |
| न | भ | ■ | का | ल | व | ■ | जो | ग | ■ |
| ■ | ग | ण | प | ती | ■ | स | र | पं | च |
| दा | दा | ■ | रे | ■ | नि | त्य | ■ | च | ■ |
| म | ड | के | ■ | सं | धी | ■ | स | मी | प |

# वांगणी रुग्णालयातील औषधे अप्रमाणित

## आरोग्यमंत्र्यांची अधिवेशनात माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**बदलापूर :** ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यात असलेल्या वांगणी येथील ग्रामीण रुग्णालयात डिसेंबर महिन्यात काही औषधे बुरशीसदृश्य असल्याची तक्रार एका महिला रुग्णाने केली होती. त्यानंतर या औषधांची तपासणी करण्यात आली. या औषधांमध्ये बुरशीजन्य संक्रमणाची वाढ झाली नसल्याचे मात्र ही औषधे विरघळण्याच्या (डिसॉल्व्हिंग) पातळीवर अप्रमाणित असल्याचे समोर आले. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी याबाबतची माहिती राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिली. याप्रकरणी आता संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकून ही विकत घेणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी केली जाणार आहे.

डिसेंबर महिन्यात वांगणी गावात असलेल्या ग्रामीण रुग्णालयात अशाच प्रकारची एक तक्रार समोर आली होती. येथील एक गरोदर महिला तपासणीसाठी रुग्णालयात गेली होती. त्यावेळी त्या महिलेला देण्यात आलेल्या औषधांमध्ये काही औषधे काळी झाल्याची दिसून आली. त्यामुळे ही औषधे बुरशी लागलेली तर नाही ना, असा संशय आल्याने त्या महिलेने रुग्णालय प्रशासनाला तक्रार दिली होती.

# राष्ट्रीय उद्यानात चार दिवसांत दोनदा वणवे

(पान १वरून) झालेली अतिक्रमणे, तेथील मेजवान्यांमुळे वन्य प्राण्यांच्या अधिवासाची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यात अवघ्या चार दिवसात राष्ट्रीय उद्यानातील उपवन भाग व मानपाडा भागात लागलेल्या वणव्यांमुळे एक हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले.

वणव्यांमुळे वृक्षांना नुकसान झाले नसल्याचा दावा वन विभागाने केला असला तरी अनेक छोट्या वनस्पती आगीच्या भक्ष्यस्थानी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. येथील काही आगींबाबत वन विभागाला देखील पुरेशी माहिती नसते. राष्ट्रीय उद्यानाप्रमाणे मुंब्रा येथील पारसिक डोंगरातही आगी लागत आहेत.

मंगळवारी मुंब्रा येथील डोंगरात लागलेली आग सुमारे तासाभराने वन विभागाच्या नियंत्रणात आली. अपुऱ्या मनुष्यबळ व संसाधनामुळे जंगलातील वणवे रोखणे शक्य होत नसल्याचे पर्यावरणवाद्यांचे म्हणणे आहे.

राष्ट्रीय उद्यानात दोन ठिकाणी वणवे लागून ते एक हेक्टर परिसरात पसरले होते. परंतु वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्यावर नियंत्रण मिळवल्याचे एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे

(पान १वरून) ठाणे जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सुरक्षित तसेच पारदर्शक ठेवण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा महत्त्वपूर्ण आहे. शाळा परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवणे, अनुचित प्रकारांना प्रतिबंध करणे, असे या सीसीटीव्ही बसविण्याचा मुख्य उद्देश आहे. त्यानुसार, जिल्हा नियोजन समितीमार्फत २०२४-२५ मधील उपलब्ध तरतुदीतून पहिल्या टप्प्यात एकूण ५४२ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरू करण्यात आले होते. या अंतर्गत कल्याण तालुक्यात १२०, भिवंडीत ३०८, अंबरनाथ तालुक्यात ९६ तर, १८ शाळेतील कामकाज प्रगतीपथावर आहे, असे ५२४ शाळांमध्ये काम पूर्ण झाले आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये एकूण ६,३८३ कॅमेरे बसविले जाणार आहेत. त्यापैकी कल्याण तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये ७४७, अंबरनाथ तालुक्यातील शाळांमध्ये ४६५ तर भिवंडी तालुक्यातील शाळांमध्ये १,६१४ असे एकूण २,८२६ सीसीटीव्ही कॅमेर बसविण्यात आले आहेत. तर उर्वरित मुरबाड तालुक्यात १,४०३ व शहापूर तालुक्यातील २,१५४ असे एकूण ३,५५७ सीसीटीव्ही कॅमेर बसविण्याचे काम सुरू आहे.

## एप्रिलपर्यंत काम पूर्ण

जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०२५-२६ मधील जिल्हा नियोजन समितीच्या उपलब्ध निधीतून सीसीटीव्ही बसविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार, मुरबाडमधील ३२९ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम नियोजित वेळेत सुरु असून या शाळांमधील सर्व यंत्रणा मार्च २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत. शहापूरमधील ४५७ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम नियोजित वेळेत सुरू असून या शाळांमधील सर्व यंत्रणा एप्रिल २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत.


# नाटक सिनेमा वाद्यवृंद

[Theatre advertisements]

अधिक जाहिराती पुढील पानावर पाहा

## संक्षिप्त

### संवाद कार्यक्रम

**ठाणे :** आचार्य अत्रे कट्टा यांच्या वतीने महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी पशू-पक्षी तसेच निसर्ग याविषयी शर्मिला आपटे आणि नूपुरा भडकमकर यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. हा कार्यक्रम बुधवार, ११ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आचार्य अत्रे कट्टा, जिजाऊ उद्यान, एम. जी. रोड, नौपाडा, ठाणे येथे होणार आहे.

### 'ग - गप्पांचा'

**ठाणे :** 'ग - गप्पांचा' या संस्थेच्या वतीने 'ग - गप्पांचा' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या वेळी लष्करातील कारकीर्द, लेखन, वक्तृत्व आणि लाइफ कोच या विषयावर निवृत्त मेजर मोहिनी गर्गे - कुलकर्णी यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. हा कार्यक्रम सोमवार, १६ मार्च रोजी सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत ज्ञानराज सभागृह, पाचपाखाडी ठाणे (प.) येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ९३२२५९७१३९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### त्रैमासिक योगवर्ग

**ठाणे :** श्री अम्बिका योग कुटीर यांच्या वतीने त्रैमासिक योगवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पुरुषांसाठी गुरुवार, १२ मार्च रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत, तर शनिवार, १४ मार्च रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत योगवर्ग असणार आहेत. तसेच महिलांसाठी बुधवार, ११ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत योगवर्ग असणार आहेत. हे योगवर्ग श्री अम्बिका योग कुटीर, मीनाताई चौक, कॅसल मिल नाका, ठाणे (प.) येथे होणार आहेत. अधिक माहितीसाठी ९८३३२८००५९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### 'श्रमिक'चे अधिवेशन

**ठाणे :** श्रमिक जनता संघ युनियनचे हीरक महोत्सवी राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन रविवार, १५ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत ठाणे महापालिका शाळा क्रमांक ११५, कळवा प्रभाग समिती कार्यालयाजवळ होणार आहे. युनियन अध्यक्ष व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन पार पडेल.

# डोंबिवलीत मनसे गटनेतेपदाविना?

## भाजपला शह देण्याच्या प्रयत्नात स्वतंत्र नोंदणी न केल्याचा फटका

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीनंतर भाजपला शह देण्यासाठी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाशी जवळीक करणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची महापालिकेच्या राजकारणात कोंडी झाली आहे. मनसेच्या नगरसेवकांचा स्वतंत्र गट स्थापन न झाल्याने पालिकेतील गटनेतेपद आणि पक्ष कार्यालय मिळणे अवघड झाले आहे.

महापालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी पार पडताच शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाने मनसेच्या काही अंतर्गत त्रुटी ओळखून त्यांना आपल्या कळपात ओढण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी झटपट पार पाडली. आता पालिकेत महायुतीची सत्ता असली तरी शिवसेनेचा वरचष्मा राहील असा विचार करून मनसेने मोठ्या आनंदाने जुने वैर विसरून शिंदे गटाचे पालिकेतील संख्या बळ वाढविण्यासाठी शिवसेनेला आपला हात दिला. त्यावेळी त्यांनी स्वतंत्र गट म्हणून नोंदणी केली नाही. याचा फटका मनसेला आता बसण्याची शक्यता आहे.

### विषय काय?

मनसेने कोकण विभागीय आयुक्तांकडे पक्ष नोंदणी करताना कल्याण-डोंबिवली शिवशाही आघाडीच्या माध्यमातून नोंदणी केली. या आघाडीत शिंदे गटाचे ५३, मनसेचे ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे एक नगरसेवक अशी एकूण ५९ नगरसेवकांची गट नोंदणी केली. त्यावेळी मनसेने आपल्या पाच नगरसेवकांची स्वतंत्र गट नोंदणी केली असती तर आता पालिकेत मनसेला स्वतंत्र गट म्हणून मान मिळाला असता. दुसरीकडे भाजपने आपल्या ५० नगरसेवकांची भाजप कल्याण-डोंबिवली शहर विकासआघाडी म्हणून नोंदणी केली. तर काँग्रेसचे दोन नगरसेवक, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आठ नगरसेवक यांनी स्वतंत्र गट म्हणून नोंदणी केली आहे. ठाकरे गटातील फुटीर तीन नगरसेवकांचा प्रश्न अद्याप अधांतरी आहे.

### पालिकेचा आदेश

पालिका प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या आदेशानुसार पालिकेत केवळ शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्ष, भाजप, काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे चार गटनेते मान्य असतील. यात मनसेचा स्वतंत्र गट म्हणून विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे मनसेला पालिकेत गटनेते पद नाहीच, पण पालिकेत दालन मिळण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पालिका प्रशासनाबरोबरच्या बैठकीत मनसेने आम्ही स्वतंत्र म्हणून गट नोंदणी केल्याचा दावा केला आहे. मात्र मनसे नगरसेवकांच्या शिवशाही आघाडीतील समावेशामुळे शिवसेनेचा पक्षादेश लागू होण्याची शक्यता आहे. या घडामोडींमुळे मनसे नगरसेवक आता सभागृहात शिंदे गटाच्या भूमिकेविरुद्ध काही मत मांडू शकतील का, असाही प्रश्न निर्माण झाला आहे.



दरम्यान मनसेच्या एका पदाधिकाऱ्याने पालिकेत पक्षाचे दालन आणि स्थान अबाधित आहे, असे सांगितले.

पालिकेतील सर्वोच्च वर्चस्व असलेल्या शिंदे गटाबरोबर असल्याने आपल्या नगरसेवकांच्या प्रभागात झटपट विकास कामे करून घेणे, आवश्यक निधी पदरात पाडून घेणे आणि शिंदे गटाच्या साह्याने पालिकेतील स्थायी समितीसह इतर समित्यांमधील महत्त्वाची मानाची पदे पदरात पाडून घेऊ, असा विचार मनसेच्या काही स्थानिक नेत्यांनी शिंदे गटाला पाठिंबा देताना केला. हा पाठिंबा देताना आपणास नंतर कायद्यातील तरतुदींचा अडसर येईल याचा विचार मनसे नेत्यांनी केला नाही. शिंदे गटाला संख्याबळासाठी पाठबळ देऊन भाजपला कसे चितपट केले, अशी खुशीतील गाजरे मनसेच्या काही नेते, पदाधिकाऱ्यांनी खाल्ली. मात्र स्वतंत्र गट स्थापन न केल्याने आता पालिकेत गटनेतेपद आणि पक्ष कार्यालय मिळणे अवघड झाले आहे.

# ठाणे पालिकेत स्वीकृतांची निवड लांबणीवर पडण्याची शक्यता

## सभेच्या पटलावर विषय नसल्याने इच्छुक नाराज

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे महापालिकेत स्वीकृत नगरसेवक तसेच परिवहन समितीसह पाच विशेष समिती सदस्यांची निवड करण्यासाठी ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा रद्द करण्यात आल्याने इच्छुकांच्या आनंदावर विरजण पडले होते. त्यानंतर आता १८ मार्च रोजी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. मात्र या सभेच्या पटलावर स्वीकृत नगरसेवक, परिवहन समिती आणि पाच विशेष समिती सदस्यांची निवडीचे विषय नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. यामुळे इच्छुकांमध्ये नाराजीचा सूर उमटण्याची शक्यता आहे.

### विकासकामांचेच विषय



ठाणे महापालिका स्वीकृत नगरसेवक, परिवहन समिती आणि पाच विशेष समिती सदस्यांची निवड करण्यासाठी ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा रद्द करण्यात आल्याने इच्छुकांच्या आनंदावर विरजण पडले होते. दरम्यान, १८ मार्च रोजी पालिकेने सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. मात्र, या सभेच्या पटलावर सदस्य निवडीचे कोणतेही विषय नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तसेच शहरातील विविध विकासकामांचेच प्रस्ताव पटलावर असल्याचे समजते. यामुळे इच्छुकांच्या पदरी पुन्हा निराशा येणार आहे.

ठाणे महापालिकेची निवडणूक जानेवारी महिन्यात पार पडली. या निवडणुकीत शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे ७५, भाजपचे २८, राष्ट्रवादी (शरद पवार) १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ९, एमआयएम ५, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष १, अपक्ष १ असे १३१ नगरसेवक निवडून आले. या निवडणुकीनंतर ३ फेब्रुवारी रोजी महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यात शिंदे गटाच्या नगरसेविका शर्मिला पिंपळोलकर यांची महापौर पदी तर, भाजपचे नगरसेवक कृष्णा पाटील यांची उपमहापौर पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यानंतर ५ मार्च रोजी स्वीकृत नगरसेवक, परिवहन समिती आणि पाच विशेष समिती सदस्यांची निवड करण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. दरम्यान, स्थायी समिती सदस्य निवडीचा विषय सभेच्या पटलावर आणण्याची तयारी प्रशासकीय पातळीवर सुरू होती. असे असतानाच, ही सभा अचानकपणे रद्द करून पुढे ढकलण्यात आली. निवड करण्यात येणाऱ्या सदस्यांची नावे अंतिम झालेली नसल्यामुळेच सभा पुढे ढकलण्यात आल्याचे बोलले जात होते. नवी मुंबई महापालिकेत पक्षीय संख्याबळाला वाकुल्या दाखवत भाजपने परिवहन समितीचे १२ सदस्य निवडून आणले होते. या कृतीला प्रतिउत्तर देण्यासाठी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या नेत्यांनी ठाण्यातील प्रक्रिया रद्द केल्याची चर्चा होती.

# कर थकबाकीदारांवर कारवाई

## कल्याण-डोंबिवलीत ५३८ मालमत्तांना टाळे

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**कल्याण :** मालमत्ता तसेच पाणी कर वसुलीच्या दृष्टीने कल्याण-डोंबिवली महापालिकेने कठोर पावले उचलली आहेत. पालिका हद्दीतील ५३८ कर थकबीदारांच्या मालमत्तांना टाळे ठोकण्यात आले असून २५० नळजोडण्या तोडून संबंधितांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

मालमत्ता कराचा ७६० कोटींचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी आता फक्त पंधरा दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. पालिका अर्थसंकल्प येत्या आठवड्यात सादर करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. तत्पूर्वी मालमत्ता कराची पूर्ण क्षमतेने वसुली व्हावी म्हणून आयुक्त अभिनव गोयल, मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त बाळासाहेब चव्हाण यांनी मालमत्ता कर थकबाकीदार आणि पाणी देयक थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून आयुक्त गोयल मालमत्ता कर वसुली, पाणी देयक वसुली पूर्ण क्षमतेने केली जाते की नाही यासाठी आढावा घेत आहेत. तसेच कर वसुलीत हलगर्जी करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. आय प्रभागातील दोन कर्मचाऱ्यांना अशाच पद्धतीने आयुक्तांनी तडकाफडकी निलंबित केले होते.

### सुट्टीच्या दिवशी सुविधा

पालिका हद्दीतील नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरणा करता यावा यासाठी ३१ मार्चपर्यंत पालिकेच्या दहा प्रभाग हद्दीतील सर्व नागरी सुविधा केंद्रे सार्वजनिक सुट्टी, शनिवार आणि रविवारी सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी पावणे सहा यावेळेत सुरू ठेवण्यात येणार आहेत.

# काळू धरणाला निकराचा विरोध

## मुरबाडच्या शेतकरी महिला हक्क मेळाव्यात निर्धार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**बदलापूर :** काळू धरणाला शेवटपर्यंत विरोध करण्याचा निर्धार मुरबाडच्या शेतकरी महिलांनी केला आहे. 'आंतरराष्ट्रीय महिला किसान वर्ष २०२६' आणि जागतिक महिला अधिकार दिनानिमित्त मुरबाड तालुक्यातील चासोळे येथील श्री क्षेत्र हटकेश्वर मंदिर परिसरात 'शेतकरी महिला हक्क मेळावा' आयोजीत करण्यात आला होता. या मेळाव्यात काळू धरणाच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या शेतीक्षेत्रातील महिला शेतकऱ्यांनी हजेरी लावली.

ग्रामीण भागातील शेतकरी महिलांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या मागण्यांचा जाहीरनामा तयार करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

मुरबाड तालुक्यातील चासोळे हे गाव काळू धरणाच्या बुडीत क्षेत्रात आहे. श्रमिक मुक्ती संघटना, ठाणे आणि वन निकेतन संस्था, मुरबाड यांच्यातर्फे तसेच काळू धरण प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील सर्व ग्रामसभांच्या सहकार्याने हा मेळावा पार पडला. महिलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध सामाजिक, आर्थिक आणि शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.



### अनोख्या स्पर्धा

मेळाव्यात महिलांसाठी नाच करत गोफ विणण्याची आणि झाडांची पाने ओळखण्याची स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. यात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या नंदा उघडा, श्रमिक मुक्ती संघटनेच्या ॲड. इंदवी तुळपुळे, साधना वैराळे, ॲड. दिव्या ठाकूर यांनी मार्गदर्शन केले.

# कल्याणमध्ये 'सरस'चा महामेळा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कोकण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्यातर्फे विभागीय, जिल्हास्तरीय मिनी सरस विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन कल्याण येथील यशवंतराव चव्हाण मैदान (मॅक्सी ग्राउंड) येथे १४ मार्चपर्यंत सकाळी १० ते रात्री ११ या वेळेत सुरू राहणार असल्याची माहिती प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली.

प्रदर्शनात ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध वस्तू व खाद्यपदार्थांची विक्री होत आहे. प्रदर्शनासाठी एकूण १०० स्टॉल्स उभारण्यात आले असून २०० हून अधिक महिला आपल्या कौशल्याचे सादरीकरण करत आहेत. ठाणे जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यांतील महिला बचत गटांचाही या प्रदर्शनात सहभाग असल्याने विविध भागांतील नावीन्यपूर्ण आणि पारंपरिक उत्पादने एकाच ठिकाणी पाहण्याची आणि खरेदी करण्याची संधी नागरिकांना मिळत आहे.

ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले आहे.


## नाटक सिनेमा वाद्यवृंद













## टेकचक्र

आसिफ बागवान

# मॅकबुक ७० हजारांत

**ॲपलने १३ इंचाचा लिक्विड रेटिना डिस्प्ले असलेल्या मॅकबुक निओची घोषणा केली असून अद्ययावत वैशिष्ट्ये असलेल्या या लॅपटॉपची किंमत ६९९९९ रुपये इतकी असणार आहे. जगभरातील बाजारात बुधवारपासून दाखल होत असलेला 'निओ' ॲपलच्या लॅपटॉप श्रेणीलाही भारतीय ग्राहकांच्या आवाक्यात आणणारा ठरेल.**

भारतीय मोबाइल ग्राहकाला आयफोनची सवय आणि ओढ लावून बाजारपेठेत मोठा हिस्सा कमावणाऱ्या ॲपलचा मॅकबुक आजवर बहुसंख्य भारतीयांसाठी खर्चीक विषयच राहिला आहे. दर्जेदार वैशिष्ट्ये असलेल्या ॲपलच्या लॅपटॉपबद्दल आकर्षण असले तरी लाखाच्या घरात असलेल्या किमतीमुळे मॅकबुकला भारतीय बाजारात अद्याप भक्कम स्थान मिळवता आले नव्हते. मात्र, हा अडथळा दूर करून मॅकबुकला भारतासह जगभरातील बाजारात मोठा ग्राहकवर्ग मिळवून देणारा 'मॅकबुक निओ' बुधवारपासून बाजारात दाखल होत आहे. सुमारे ७० हजार रुपये किंमत असलेल्या या मॅकबुकमुळे विंडोज आणि क्रोमबुकच्या उच्च श्रेणीतील लॅपटॉपसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

अमेरिकी बाजारात ४९९ डॉलरला असणारा 'मॅकबुक निओ' भारतीय विद्यार्थ्यांसाठी ५९९०० रुपयांत उपलब्ध होणार आहे. मात्र, किंमत हेच फक्त या लॅपटॉपचे वैशिष्ट्य नाही. मॅकबुक निओमध्ये ॲपलने ए१८ प्रो चिपचा प्रोसेसर म्हणून वापर केला आहे. सध्या आयफोन १६ प्रोमध्ये ही चिप वापरली जाते. पहिल्यांदाच ॲपलने आयफोन आणि मॅकबुक यांचा अशाप्रकारे संगम साधला आहे. इंटेल कोअर अल्ट्रा ५ प्रोसेसरपेक्षा ५० टक्के अधिक क्षमतेने ही चिप काम करते, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे हा लॅपटॉप विंडोज आणि क्रोमबुक ऑपरेटिंग सिस्टीम असलेल्या कंपन्यांच्या लॅपटॉपसाठी आव्हानात्मक स्पर्धा ठरेल, असे बोलले जात आहे.



### 'मॅकबुक प्रो'ची घोषणा

ॲपलने एम५ प्रो आणि एम५ मॅक्स प्रोसेसर चिप असलेल्या मॅकबुक प्रोचीही घोषणा केली असून तोदेखील ११ मार्चपासून बाजारात उपलब्ध होणार आहे. यात आतापर्यंतचा अतिजलद जीपीयू असल्याचा कंपनीचा दावा आहे. वायफाय ७, ब्लुटुथ ६, तीन पोर्ट, आठ केपर्यंतचा एचडीएमआय सपोर्ट, लिक्विड रेटिना एक्सडीआर डिस्प्ले, २४ तास चालणारी बॅटरी अशी वैशिष्ट्ये असलेला हा लॅपटॉप १४ आणि १६ इंच आकारात उपलब्ध आहे. १४ इंचाच्या मॅकबुक्र प्रोची किंमत २४९००० इतकी असून १६ इंची मॅकबुक प्रोची किंमत २९९९०० इतकी आहे.

### पूर्णपणे ॲल्युमिनियम सांगाडा

मॅकबुक निओचा पूर्ण सांगाडा हा ॲल्युमिनियममध्ये बनवला असून त्यामुळे हा लॅपटॉप अधिक भक्कम बनला आहे. शिवाय तो वजनानेही हलका ठरतो. सिल्वर, ब्लश, इंडिगो आणि सायट्रस अशा चार रंगांत उपलब्ध असलेल्या या लॅपटॉपच्या कीबोर्डलाही बॉडीच्या रंगाचीच छटा देण्यात आली आहे.

### अन्य वैशिष्ट्ये

- १०८० पिक्सेलचा फेसटाइम एचडी कॅमेरा.
- स्पॅशियल ऑडिओ आणि डॉल्बी ॲटमस तंत्रज्ञान.
- यूएसबी सी पोर्टचा अंतर्भाव
- आयफोनशी संलग्न करून हाताळणी अधिक सुलभ.
- आठ जीबी रॅम, २५६ जीबी एसडीडी
- ॲपल इंटिलिजन्सचा अंतर्भाव (भारतीय भाषांत अद्याप नाही)

### १३ इंची लिक्विड रेटिना डिस्प्ले



मॅकबुक निओला १३ इंचाचा रेटिना डिस्प्ले देण्यात आला असून त्याचे रेझोल्युशन २४०८ बाय १५०६ इतके आहे. याला 'अँटी रिफ्लेक्टीव्ह' अर्थात प्रतिबिंबरोधक 'कोटिंग' पुरवण्यात आल्यामुळे प्रखर प्रकाशातही लॅपटॉपवर व्यवस्थितपणे काम करता येते, असा कंपनीचा दावा आहे.



### मॅजिक कीबोर्ड

मॅकबुक निओमध्ये ॲपलने मॅजिक कीबोर्डचा अंतर्भाव केला आहे. अतिशय पातळ आणि कमी वजनाचा हा कीबोर्ड हाताळताना एक चांगला अनुभव देतो. त्यासोबतच मल्टी टच ट्रॅकपॅड पुरवण्यात आला आहे. याशिवाय या लॅपटॉपमध्ये टच आयडी पुरवण्यात आला आहे. त्यामुळे लॅपटॉप सुरू वा बंद करण्यासाठी किंवा ॲपल पेचा वापर करण्यासाठी सुरक्षित पर्याय उपलब्ध झाला आहे.

### मोबाइलसारखा लॅपटॉप

मॅकबुकमध्ये ए१८ प्रो चिप बसवण्यात आली असल्यामुळे ती आयफोनप्रमाणेच अतिशय सक्षमपणे 'निओ'लाही चालवते. एकाच वेळी व्हॉट्सअप, कॅन्व्हा, एक्सेल, सफारी चालवूनदेखील 'नियो'च्या कार्यक्षमतेत फरक पडत नाही, असा ॲपलचा दावा आहे.

### पूर्ण दिवस चालणारी बॅटरी

मॅकबुक निओच्या बॅटरीसाठी पूर्णपणे पुनर्प्रक्रिया केलेले कोबाल्ट वापरण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणदृष्ट्या ही बॅटरी सक्षम आहेच पण तीची कार्यक्षमताही वाढली आहे. एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर निओ १६ तास सलग चालू शकतो, असे कंपनीचे म्हणणे आहे.

# महिला तिकीट तपासणीसास मारहाण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकात एका तरुणीला तिकीट विचारले असता, तिने मुख्य महिला तिकीट तपासणीसास मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी मारहाण करणाऱ्या तरुणीला ठाणे लोहमार्ग पोलिसांनी ताब्यात घेत तिच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी तसेच मारहाणप्रकरणी गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे रेल्वे स्थानकातील मुंबई दिशेकडील पादचारी पुलावर सोमवारी सकाळी ही घटना घडली. मुख्य महिला तिकीट तपासणीस यांनी केलेल्या तक्रारीच्या आधारे तरुणीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.




बुधवार,
११ मार्च २०२६

# लोकसत्ता वसई विरार

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### प्रस्तावित रुग्णालयाची जागा वादात

**वसई:** वसईच्या नवघर येथील प्रस्तावित उपजिल्हा रुग्णालयासाठी नुकताच आराखडा तयार करण्यात आला आहे. पूर्ण जागा ताब्यात घेऊन आराखडा तयार करण्यात यावा, अशी मागणी होत आहे. **वृत्त...४**

### टंचाईग्रस्त भागात जलवाहिन्यांचा घाट

**वसई:** वसई गावात जुन्या जलवाहिन्या सुस्थितीत असताना महापालिकेकडून सलग चौथ्यांदा जलवाहिन्या अंथरण्याचे काम सुरू असल्याचा आरोप रहिवासी करत आहेत. **वृत्त...४**

## आगीत ३० टॅक्सी जळून खाक

**वसई:** वसई पूर्व येथील ससूनवघर परिसरात सोमवारी दुपारी भीषण आगीची घटना घडली. गवताला लागलेल्या आगीमुळे शेजारीच उभ्या असलेल्या तब्बल २५ ते ३० टॅक्सी जळून खाक झाल्या. टॅक्सी चालकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

वसई पूर्वेतील ससूनवघर येथील एस.एम.एस. टॅक्सी कॅबच्या पार्किंग परिसराजवळील सुक्या गवताला दुपारी ३ च्या सुमारास अचानक आग लागली. वाऱ्यामुळे हा वणवा वेगाने पसरला आणि त्याने जवळच उभ्या असलेल्या टॅक्सींना आपल्या विळख्यात घेतले. अग्निशमन दलाच्या प्राथमिक पाहणीनुसार, या आगीत सुमारे २५ ते ३० टॅक्सींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## गोदामाला भीषण आग

**वसई:** नालासोपारा पूर्वेच्या धानिव बाग तलावाच्या समोरच्या भंगार गल्लीतील ३ ते ४ गोदामांना भीषण आग लागल्याची घटना मंगळवारी पहाटे ४.२० च्या सुमारास घडली. या आगीत गोदामांमधील लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे.

ज्या गोदामांना आग लागली तिथे प्रामुख्याने भंगार आणि चप्पलचा मोठा साठा होता. प्लास्टिक आणि रबरसारख्या ज्वलनशील पदार्थांमुळे आगीने अल्पावधीतच रौद्र रूप धारण केले होते. त्या आगीच्या झळा बाजूला असलेल्या अन्य गोदामांना बसल्या. अग्निशमन दलाच्या तीन गाड्या आणि चार पाण्याचे टँकर तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अरुंद रस्ते आणि आगीची तीव्रता पाहता जवानांना सुरुवातीला अडचणी येत होत्या. मात्र अथक परिश्रमानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या लागलेल्या भीषण आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

# मिरा-भाईंदरमधील नागरी सेवा पारदर्शक

## महापालिकेचा १,४३९ कोटींचा मूळ अर्थसंकल्प सादर, शासन निधी वगळला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेचा सन २०२६-२७ साठीचा एक हजार ४३९ कोटींचा मूळ अर्थसंकल्प मंगळवारी आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी स्थायी समिती सभापती हसमुख गेहलोत यांना सादर केला. नागरी सेवा पारदर्शक करण्यावर भर देणाऱ्या या अर्थसंकल्पातून शासनाचा निधी वगळण्यात आला. त्यामुळे पहिल्यांदाच फुगवलेल्या आकड्यांशिवाय मूळ रकमेचा अर्थसंकल्प महापालिकेकडून सादर करण्यात आल्याची चर्चा आहे.

तीन वर्षे महापालिकेत प्रशासकीय राजवट असताना शासनाकडून जवळपास दोन हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचा दावा स्थानिक आमदारांकडून करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात ३० टक्के निधी प्रशासनाला प्राप्त झाला. खर्चावरून राजकारण पेटू नये म्हणून सरसकट शासन निधी वगळून अर्थसंकल्प सादर करण्याची शक्कल प्रशासनाने लढवली आहे. करवाढ लादण्यात आलेली नाही, मात्र नवीन मालमत्ता धारकांना नव्या दरानुसार करआकारणी करण्याचा ठराव मंजूर करण्यात आल्यामुळे करवाढीसह हा अर्थसंकल्प मंजूर झाल्याचे स्पष्ट झाले. नागरी सेवा पारदर्शक करणे, कार्यालये डिजिटल करणे, पूरमुक्त शहर उभारणे, सूर्या प्रकल्प पाणी योजनेचे काम पूर्ण करणे, घनकचरा प्रकल्पावर सुविधा उभारणे, वैद्यकीय, वृक्ष प्राधिकरण, पर्यटन व शिक्षण विभागात नवी-जुनी कामे पूर्ण करण्यासाठी भरीव तरतूद आहे. अनधिकृत बांधकामाबाबत ठोस पाऊल उचलण्यात आले नसल्याचे दिसून आले.

मिरा-भाईंदर महापालिकेचा अर्थसंकल्प वास्तवता व शिस्त, नागरी पायाभूत सुविधा, भविष्यासाठी तयार शहर आणि शाश्वत स्वच्छतेचा निर्धार या गोष्टी केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पामुळे शहराच्या विकासात मोठी भर पडेल, असा मला विश्वास आहे.
**-राधा बिनोद शर्मा,** आयुक्त (मिरा भाईंदर महापालिका)



| ४९६ कोटी ८७ लाख | २९१ कोटी ३७ लाख | २३४ कोटी ८५ लाख | २९७ कोटी ६२ लाख | १० कोटी |
|---|---|---|---|---|
| वस्तू सेवा कर अनुदान | मालमत्ता कर | पाणीपुरवठा उत्पन्न | विकास शुल्क | भाडेतत्त्वावरील उत्पन्न |

### पर्यावरण संवर्धनासाठी ७ कोटी



मिरा भाईंदरमधील पर्यावरणाचे संवर्धन व्हावे म्हणून महापालिकेने स्वतंत्र पर्यावरण विभागाची स्थापना केली आहे. या विभागाद्वारे पर्यावरणपूरक सण साजरे करण्याची जनजागृती करणे, महापालिकेचा नियमित पर्यावरण अहवाल प्रसिद्ध करणे, विविध उपक्रमातून निर्माण होणाऱ्या कार्बन क्रेडिटचे मूल्यांकन करून आर्थिक उत्पन्न प्राप्त करणे आणि हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यासाठी यंदा ७ कोटी ७० लाखांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

### अपंग व समाजकल्याण योजना



मिरा भाईंदर शहरात समाजकल्याण योजना राबवण्यासाठी व अपंग नागरिकांच्या मदतीसाठी अर्थसंकल्पात यंदा २८ कोटी ४४ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. यामधून दिव्यांगांना पेन्शन योजना, शिष्यवृत्ती, लग्नकार्यासाठी आर्थिक मदत, नवे विरंगुळा केंद्र, महिला रोजगार केंद्र आणि पथविक्रेत्यांना कर्ज देण्यासारख्या योजनांचा समावेश आहे.याशिवाय दुर्बल घटकला मदत करण्यासाठी स्वतंत्र २८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.



### पाणीपुरवठा विभागाला भरीव तरतूद

पाणीटंचाईची समस्या दूर करण्यासाठी सूर्या प्रकल्प योजना राबवली जात आहे. सध्या या योजनेअंतर्गत शहरात केले जाणारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे उर्वरित राहिलेल्या कामांना पूर्ण करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. निधीची एकूण ४५८ कोटी रुपयांची तरतूद पाणीपुरवठा विभागासाठी अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

### घनकचरा प्रकल्पाला अधिक प्राधान्य



शहराच्या दैनंदिन साफसफाईसाठी अर्थसंकल्पात २१४ कोटी २९ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय घनकचरा प्रकल्प येथे साचलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया, लिचेटवरील प्रक्रिया, बायोमायनिंग आणि बायोगॅस प्रकल्पाचे शिल्लक राहिलेले काम पूर्ण करून त्या ठिकाणाचे सौंदर्यीकरण करण्यासाठी ५० कोटींची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

### वैद्यकीय विभागाच्या निधीला कात्री



मिरा भाईंदर शहरात नागरिकांवर प्राथमिक उपचार करता यावेत म्हणून आरोग्य केंद्र, आरोग्य वर्धिनी केंद्र आणि 'आपला दवाखाना' केंद्र उभारण्यात येत आहे. त्यामुळे यावर्षी नवे म्हणून प्रयोगशाळा उभारण्याचा संकल्प प्रशासनाने केला आहे.याशिवाय नवीन पालिका रुग्णालय आणि जुन्या रुग्णालयाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पात ६० कोटी ५३ लाखांची तरतूद वैद्यकीय आरोग्य विभागासाठी करण्यात आली आहे. मात्र मागील वर्षाच्या तुलनेत यात १० कोटींची घट करण्यात आली आहे.

### बांधकामासाठी २४३ कोटींची तरतूद



यंदा अर्थसंकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागासाठी २४३ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. प्रामुख्याने पूरमुक्त शहर यंत्रणा उभारणे, स्मार्ट रोड उभारणे, पर्जन्यजल वाहिन्या, सिमेंट रस्त्यांची उभारणी, मालमत्तेची देखभाल-दुरुस्ती आणि इतर कामे मार्गी लावण्याचा समावेश आहे. मागील वर्षी आठशे कोटी तरतूद असताना यात तीन पट वाढ केली आहे.

### शिक्षण विभागासाठी ३५ कोटी

महापालिका शाळेसाठी सामाजिक दायित्व निधीचा मार्ग मोकळा केला आहे. साहित्य , सकस आहार देणे, नवी शैक्षणिक तंत्रप्रणाली उभारणे आणि विद्यार्थ्यांमधील कलागुणांना प्रोत्साहनासाठी शिक्षण विभागासाठी एकूण ३५ कोटी २८ लाख रुपये खर्चाची तरतूद आहे. मागील वर्षी ५७ कोटी तरतूद असलेल्या निधीत घट करून ३५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.



### आधुनिक डिजिटल यंत्रणा उभारण्यावर भर

मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पात डिजिटल यंत्रणा उभारण्याकडे अधिक लक्ष देण्यात आले आहे. यामध्ये स्मार्ट एंट्री सिस्टीम, स्मार्ट केबिन, स्मार्ट स्ट्रीट फर्निचर, स्मार्ट पेमेंट सिस्टीम, डिजिटल फलक, स्मार्ट सिग्नल यंत्रणा, स्मार्ट पाणी वितरण व्यवस्था, एआय आधारित स्मार्ट कचरा मॉनिटरिंग सिस्टीम आणि इतर आधुनिक डिजिटल यंत्रणा उभारण्याचा विचार अर्थसंकल्पात करण्यात आला आहे.

### पूरमुक्त शहर उभारण्यावर भर



पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होते. त्यामुळे यातून कायमची मुक्तता करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. यात वारंवार पाणी भरणाऱ्या भागात पंपिंग स्टेशन उभारणे, पाण्याचा विसर्ग होण्याच्या ठिकाणी तांत्रिक दरवाजे बसवणे, पाण्याच्या पातळीवर लक्ष ठेवण्यासाठी स्मार्ट सेन्सर बसवणे आणि शहराची भौगोलिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी मॅपिंग करण्यासारख्या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

### जमीन सुधारणा



शहरातील पडीक जमिनी पुन्हा वापरा योग्य करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यामध्ये बायोमायनिंग प्रक्रिया करून जंगल, सोलर पार्क आणि मनोरंजनासाठी हरित क्षेत्र उभे करण्यासाठी तरतूद केली आहे.

### महिला लखपती योजना



मिरा-भाईंदर शहरात आतापर्यंत नऊपैकी सात महापौर महिला निवडून आल्या आहेत. त्यामुळे महिलांचे शहरातील महत्त्व अधोरेखित करण्यासाठी तसेच त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या महिला लखपती योजनेचा विस्तार करून त्याचा लाभ अधिकाधिक महिलांना देण्याच्या दृष्टीने प्रशासनाने योजना आखली आहे.

### उद्यानात बदल



मिरा भाईंदर शहराला उद्यानांचे शहर म्हणून संबोधले जाते. त्यामुळे आगामी काळात उभारण्यात येणारी उद्याने अधिक आकर्षक करण्याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष दिले आहे. यात आता ही उद्याने दिव्यांगांच्या प्रवेशासाठी सुलभ करण्याच्या दृष्टीने रचना केली जाणार आहे. यात ओपन जिम व वेलनेस झोन देखील उभारण्यात येणार असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

# वसई, विरारच्या पर्यटनाला झळाळी; १० कोटींची तरतूद

**कल्पेश भोईर, लोकसत्ता**

**वसई :** वसई-विरार शहराला ऐतिहासिक, नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. या भागातील पर्यटनाचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने आता महापालिका स्तरावरून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. नुकताच सादर केलेल्या अर्थसंकल्पात विविध पर्यटन क्षेत्र विकसित करण्यासाठी १० कोटी रुपयांचे विशेष निधीचे नियोजन करण्यात आले आहे.

महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरी सुविधा जरी केंद्र कमी ठेवण्यात आल्या असल्या तरी शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी नावीन्यपूर्ण संकल्पनांवर आधारित प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून शहरातील पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न पालिकेकडून केला जाणार आहे. **- मनोजकुमार सूर्यवंशी,** आयुक्त, वसई विरार महापालिका

शहराला सांस्कृतिक, साहित्य आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. अथांग समुद्रकिनारे, ऐतिहासिक पर्यटनस्थळे, आणि स्थानिक संस्कृतीचे वेगळेपण यामुळे विविध भागातून येणाऱ्या पर्यटकांचा ओढा येथे असतो. मात्र, गेल्या काही काळात झालेले वाढते शहरीकरण आणि जागोजागी सुरू असणारे काँक्रीटीकरण यामुळे शहराची हरवत असलेली ओळख जपण्याची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिकेकडून स्थायी समितीला सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात शहराच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि शहरातील संस्कृतीचे जतन करण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. नुकताच महापालिकेने अर्थसंकल्प सादर केला आहे. यात विविध प्रकारचे पाच नावीन्य पूर्ण प्रकल्प प्रस्तावित आहेत. या प्रकल्पासाठी एकूण १० कोटींचा खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक व्यवसायांना पाठबळ मिळणार असून पर्यटनाला देखील चालना दिली जाणार आहे. तसेच यातून रोजगार निर्मितीसुद्धा केली जाणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

वसई विरार शहर हे विविध प्रजातीच्या केळींच्या उत्पादनासाठी ओळखले जाते. तर **(पान ३ वर)**

# महापालिका परिवहन सेवेचा पर्यावरणपूरक बससेवेवर भर

## ८३ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई-विरार महापालिकेच्या परिवहन विभागाचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा ८३.५५ कोटींचा अर्थसंकल्प परिवहन विभागाचे व्यवस्थापक धैर्यशील जाधव यांनी स्थायी समितीला सादर केला. अर्थसंकल्पात नागरिकांना चांगली परिवहन सेवा, अपंग, ज्येष्ठ नागरिक, कर्करोग पीडित रुग्ण अशा सर्व सोयीसुविधांच्या योजना अशा विविध तरतुदींचा यात समावेश आहे. तसेच पर्यावरणपूरक सेवेच्या दृष्टीनेही या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.

सोमवारी वसई-विरार महापालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. याचवेळी परिवहन विभागाचा अर्थसंकल्प ही स्थायी समितीकडे करण्यात आला. सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प १ कोटी ५९ लाख शिलकीचा आहे. यात कोणत्याही प्रकारची भाडेवाढ करण्यात आली नाही. याआधीच परिवहन भवनासाठी आणि त्यावर असलेल्या पालिका मुख्यालयासाठी पालिकेने मोठ्या प्रमाणावर खर्च केला असून त्याची इमारत तयार झाली आहे. मात्र आता त्याचे अंतर्गत कार्यालय दुरुस्ती, नूतनीकरणासाठी पाच कोटींची तरतूद केली आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या पी एम ई-बस योजनेतून १०० बस उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी नवघर आणि नालासोपारा येथे आगार उभारणीचे काम सुरू आहे. त्यासाठी ३७.६७ कोटींचा खर्च लागणार आहे. शासनाकडून २७.१७ कोटी निधी प्राप्त होणार आहे. मात्र, उर्वरित खर्च १०.५० कोटीचा खर्च लागणार आहे त्यासाठी तरतूद केली आहे.

अपंग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, कर्करोगग्रस्त, रक्त शुद्धीकरण करून घेणारे नागरिक व महापालिका क्षेत्रातील शालेय विद्यार्थी यांना परिवहन सेवा मोफत बस पास देते. पालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या या मोफत बस पास योजनेसाठी १०.२० कोटींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तर जाहिरातीसाठी १० लाखांची तरतूद आहे. १०० वातानुकूलित ई-बससाठी ९ कोटींची तरतूद केली आहे.

### लवकरच वातानुकूलित बससेवा



वसई विरार महापालिकेला केंद्र शासनाच्या पंतप्रधान अनुदान योजनेतून आणखीन १०० ई-बस मिळणार आहेत. या बस वातानुकूलित स्वरूपाच्या असणार आहेत. एप्रिलच्या अखेरपर्यंत या बस येथील त्यामुळे विविध मार्गावर ही बससेवा पुरविण्यास मदत होणार आहे. नागरिकांना चांगली परिवहन सेवा मिळावी याच अनुषंगाने परिवहन विभागाच्या अर्थसंकल्पात तरतुदी केल्या आहेत, असे परिवहन विभागाचे व्यवस्थापक धैर्यशील जाधव यांनी सांगितले आहे.

### महिला प्रवास सवलत योजनेसाठी केवळ एक लाख

महापालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेस मधून प्रवास करणाऱ्या महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलतीसाठी होणारा खर्च महापालिकेकडून कंत्राटदाराला दिला जातो. मात्र, चालू आर्थिक वर्षात योजनेसाठी लागणाऱ्या निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. पण, शासनाकडून मंजुरी प्राप्त न झाल्यास सदर योजना राबवण्यासाठी येणारा खर्च गृहीत धरून २०२६-२७ या वर्षाकरिता केवळ एक लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

# रमजाननिमित्त मिरा रोड परिसरात खवय्यांची गर्दी

**मयूर ठाकुर, लोकसत्ता**

**भाईंदर :** रमजान महिना सुरू असून या काळात दरवर्षी खवय्यांची मोठी गर्दी मुंबईतील मोहम्मद अली रोड येथे पाहायला मिळते. मात्र यंदा खवय्यांचा मोर्चा मिरा रोडच्या नयानगर परिसराकडे वळताना दिसत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी येथे मोठी गर्दी होत असून मिरा रोडला नव्या खाद्यसंस्कृतीची ओळख मिळू लागली आहे.

मिरारोड येथील नया नगर येथे मोठी जामा मस्जिद तसेच लहान-मोठ्या अनेक मशिदी आहेत. त्यामुळे रमजान महिन्यात या परिसरात विशेष उत्साहाचे वातावरण असते. दिवसभर उपवास केल्यानंतर रात्रीच्या सुमारास ते विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी तसेच खरेदीसाठी नागरिक घराबाहेर पडतात. त्यामुळे या काळात बाजारपेठांमध्ये विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, कपडे, दागिने आणि इतर साहित्याची दुकाने मोठ्या प्रमाणात उभी राहतात.

नागरिकांची वाढती गर्दी पाहता मिरा रोड परिसरात खाद्यपदार्थ विक्रेत्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. येथे मांसाहारी तसेच **(पान ३ वर)**

**रमजाननिमित्त मुंबईतील मोहम्मद अली रोडप्रमाणे यंदा खवय्यांचा मोर्चा मिरा रोडच्या नयानगर परिसराकडे वळताना दिसत आहे . रात्र उशिरापर्यंत येथे गर्दी असते .**



### बाजारपेठा फुलल्या

रमजान महिन्यात मिरा रोड परिसरात अनेक सामाजिक संस्थांकडून विशेष बाजारपेठा भरवण्यात आल्या आहेत. या बाजारपेठांमध्ये प्रामुख्याने मुस्लिम महिलांना केंद्रस्थानी ठेवून खाद्यपदार्थ, दागिने आणि विविध वस्तूंची दुकाने सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे केवळ मुस्लिम नव्हे तर इतर धर्मीय महिलाही येथे खरेदीसाठी येत असल्याचे सामाजिक संस्थांकडून सांगण्यात आले. त्यामुळे या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# करिअर वृत्तांत

शिकण्याची आवड निर्माण कराल, तर तुमचा विकास कधीही थांबणार नाही.
- अँथनी डि'अँजेलो, अमेरिकन व्यावसायिक

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
फारुक नाईकवाडे

### मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन - पेपर तीन

# अर्थव्यवस्था- साधनसंपत्तीचे एकत्रीकरण

**साधनसंपत्तीचे एकत्रीकरण हा अभ्यासक्रमातील शब्द इंग्रजीच्या 'रिसोर्स मोबिलायझेशन' शब्दाचे भाषांतर आहे. यात साधनसंपत्तीची उपलब्धता, तिचा परिणामकारक वापर, नियोजन या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यवस्थापन हा मराठी शब्द ही एकूण संकल्पना समजून घेण्यासाठी जास्त साजेसा आहे.**

**अर्थव्यवस्था घटकाच्या** साधनसंपत्तीचे एकत्रीकरण या उपघटकाच्या तयारीबाबत या लेखामध्ये पाहू.

या उपघटकामध्ये अभ्यासायचे ठळक मुद्दे सोबतच्या चौकटीमध्ये दिलेले आहेत. त्यांच्या आधारे तयारीची रणनीती पाहू. या उपघटकावर प्रत्यक्ष प्रश्न विचारले जाण्याची शक्यता कमी आहे. पण इतर गतिमान मुद्दे, चालू घडामोडींवर आधारित, विश्लेषणात्मक प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी या मुद्द्यांचा मूलभूत आणि संकल्पनात्मक अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात यांवर पारंपरिक प्रश्न कमी दिसणार असले तरी हा मुद्दा परीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

### साधनसंपत्तीचे एकत्रीकरण ठळक मुद्दे

- साधन संपत्तीचे प्रकार
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची संकल्पना
- साधन संपत्तीच्या एकत्रीकरणाची आवश्यकता
- साधन संपत्तीचे स्रोत - सार्वजनिक, खासगी / अंतर्गत, बाह्य गुंतवणूक
- साधन संपत्तीचे वितरण
- वित्त आयोग
- शासकीय उपक्रम
- वित्तीय धोरणांची भूमिका
- आव्हाने



**मुद्देनिहाय तयारी**

■ साधनसंपत्तीचे नैसर्गिक मानवनिर्मिती आणि मानवी असे तीन प्रकार, त्यांचे महत्त्व, त्यांची वैशिष्ट्ये, सर्वसाधारण उपलब्धता, भारतातील उपलब्धता, त्यांचा वापर आणि विकासातील आव्हाने, उपाय समजून घ्यायला हवेत.

■ साधन संपत्तीच्या एकत्रीकरणामध्ये वित्तीय आणि इतर सर्वच संसाधनांचा विचार होत असला तरी तयारी करताना वित्तीय संसाधनांवर भर देणे आवश्यक आहे. वित्तीय संसाधनांच्या एकत्रीकरणाचे महत्व समजून घ्यायला हवे. विशेषतः शासकीय अंदाजपत्रके, अर्थसंकल्प यांचेशी परस्पर संबंध अभ्यासायला हवा.

■ साधनसंपत्तीच्या एकत्रीकरणाची शासनाला आवश्यकता का आहे, हे लक्षात घ्यायला हवे. संसाधनांच्या एकत्रीकरणातून पुढील बाबी कशा साधल्या जातात ते समजून घ्यायला हवे - सर्व प्रकारच्या संसाधनांचा कमाल आणि परिणामकारक वापर, त्यांमध्ये वैविध्य राखणे, स्वतंत्र आणि आत्मनिर्भर अर्थसंकल्प तयार करणे, भारतामध्ये कल्याणाकारी शासन व्यवस्था असल्याने कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या म्हणून सामाजिक उपक्रमासाठी तरतूद करणे.

■ देशांतर्गत स्रोतांमध्ये बचत, गुंतवणूक आणि भांडवल निर्मिती, बाह्य गंतवणूक आणि कर्जे व अन्य स्रोत, सार्वजनीक स्रोतामधील कर, करेतर आणि अन्य उत्पन्न या बाबी विचारात घ्यायला हव्यात. यांची अद्ययावत आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालामधून पहायला हवी. बचतीचे प्रकार, सकल नियत भांडवल निर्मिती (GFCF), हे विश्लेषणात्मक मुद्दे संकल्पनात्मक तयारीसाठी महत्त्वाचे आहेत.

■ शासकीय स्रोतांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, करेतर महसूल, कर्ज आणि गुंतवणूक हे स्रोत व्यवस्थित समजून घ्यायला हवेत. कारण हे अर्थसंकल्पातील - शासकीय अंदाजपत्रकातील उत्पन्नाचे स्रोत आहेत. यांच्या विश्लेषणातून अर्थव्यवस्थेवी वृद्धी आणि विकास यांच्यामधील समतोल समजून घेणे शक्य होणार आहे. कर महसूलामध्ये वस्तू व सेवा कराचे फायदे, आव्हाने, समस्या आणि विश्लेषणात्मक मूल्यमापन आवश्यक आहे.

■ करेतर महसूलामधील निर्गुंतवणुकीची संकल्पना समजून घेऊन तिचे फायदे - तोटे, समस्या, आव्हाने, परिणामकारकता आणि उपाययोजना या मुद्द्यांच्या आधारे विश्लेषण आवश्यक आहे.

■ परकीय गुंतवणुकींचे प्रकार व महत्त्व समजून घ्यावे. आर्थिक पाहणी अहवालामधून त्यांची आकडेवारी आणि ट्रेंड्स - कल लक्षात घ्यायला हवेत. परकीय संस्थांची कर्जे व त्यांचा वापर त्या-त्या वर्षीच्या चालू घडामोडींचा भाग म्हणून विचारात घ्यावेत.

■ वित्तीय संसाधनांच्या उपलब्धतेसाठी त्यांचे योग्य वितरण आवश्यक आहे. केंद्र व राज्यांमध्ये वित्तीय संसाधनांच्या वितरणासाठी वित्त आयोग धोरण व सूत्रे ठरवितो. यासाठीच्या घटनात्मक तरतूदी, वित्त आयोगाची रचना, कार्ये, भूमिका लक्षात घ्याव्यात. १५व्या आणि १६व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या तुलना आणि १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे मूल्यमापन लक्षात घ्यायला हवे. यामध्ये बँका, वित्तीय संस्था, पतसंस्था, सहकारी संस्था, विशेष प्रकारच्या वित्तीय संस्था व स्रोत उदा. इंडिया इनोव्हेशन फंड, आर्थिक विकास महामंडळे, तसेच एंजल गुंतवणूकदार संकल्पना माहीत हव्यात. त्यांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे योगदान, समस्या, कारणे, उपाय आणि महत्त्व हे मुद्दे विचारात घ्यावेत. यामध्ये प्रत्यक्ष लाभ वितरण (DBT), राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइन (NIP), राष्ट्रीय मौद्रीकरण पाइपलाइन (NMP), प्रधानमंत्री जन धन योजना या उपक्रमांची माहिती आवश्यक आहे.

■ वित्तीय धोरणांच्या माध्यमातून साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर कशा प्रकारे होतो ते समजून घ्यायला हावे. उदा. महसूलाचा वापर कल्याणकारी कामांकरीता निधी उभारणीसाठी करणे किंवा कररचनेच्या माध्यमातून समान संसाधन वितरण साधण्याचा प्रयत्न करणे (प्रगतीशील करांच्या माध्यमातून कमी उत्पन्न गटास संरक्षण).

■ साधन संपत्तीचे एकत्रीकरण करण्यातील अडचणी / आव्हाने स्वरूप, कारणे, परिणाम, उपाय अशा मुद्द्यांच्या आधारे विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये महसूलासठीचे नवे स्रोत शोधणे, करेतर महसूलावरील वाढते अवलंबित्व, शासकीय खर्चावरील अवलंबित्व, जागतिक कर सुधारणांमुळे भारतीय करवसूलीवर येणाऱ्या मर्यादा, निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणास मिळणारा अल्प प्रतिसाद अशा मुद्द्यांचा समावेश असला पाहिजे.

■ मूलभूत संकल्पना आणि या क्षेत्रातील बाबींचे परस्परसंबंध लक्षात घेतले तर चालू घडामोडींच्या आधारे चर्चा, वाचन आणि चिंतनातून आपली मते तयार करणे शक्य होते. संसाधनांबाबतची आव्हाने सोडविण्यासाठी अशा विश्लेषणाचा आधार घेऊन मुद्दे तयार करणे आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

चौकटी-पल्याड
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

# संक्रमणातून जाणारे आयटी क्षेत्रातील शिक्षण

**आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक नियमित कामे स्वयंचलित करेल; परंतु त्याच वेळी नवे तांत्रिक आणि सामाजिक प्रश्नही निर्माण होतील. त्यामुळे भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील.**



**आज जगभरातील** माहिती तंत्रज्ञान (आयटी) शिक्षण एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत संगणकशास्त्रातील पारंपरिक शाखा म्हणजे प्रोग्रॅमिंग, डेटाबेस व्यवस्थापन किंवा नेटवर्किंग यांवर भर दिला जात होता. मात्र आता आयटी शिक्षण अधिक व्यापक आणि बहुआयामी आणी बहुविषयक बनत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये आयटी अभ्यासक्रमांची रचना आणि त्यामधील संशोधनाचे केंद्रबिंदू झपाट्याने बदलत आहेत.

आयटीमधील सध्या सर्वाधिक मागणी असलेली उप-क्षेत्रे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि रोबोटिक्स. आरोग्यसेवा, हवामान बदल, वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक), जैवतंत्रज्ञान आणि शहरी नियोजन अशा विविध क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढत असल्याने या शाखांतील तज्ज्ञांची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर एआय एथिक्स, रिस्पॉन्सिबल टेक्नॉलॉजी आणि ह्युमन-कॉम्प्युटर इंटरॅक्शन यांसारख्या विषयांनाही महत्त्व मिळत आहे.

अमेरिका आणि ब्रिटन ही आयटी शिक्षणाची पारंपरिक केंद्रे असली तरी आज इतर अनेक देशांतील विद्यापीठेही वेगाने पुढे येत आहेत. जर्मनीमधील टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक आणि आरडब्ल्यूटीएच आखेन येथे डेटा इंजिनीअरिंग व रोबोटिक्समध्ये मूलभूत संशोधन सुरू आहे. नेदरलँड्समधील डेल्फ्ट युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि आयंधोव्हन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी येथे स्मार्ट सिस्टीम्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर दिला जातो. कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो आणि युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू ही प्रत्यक्ष उद्योगांशी जोडलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आहेत.

ऑस्ट्रेलियामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न, ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साउथ वेल्स आणि मोनॅश युनिव्हर्सिटी येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटीमध्ये आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. चीनमधील त्सिंगहुआ युनिव्हर्सिटी, पेकिंग युनिव्हर्सिटी आणि शांघाय जिआओ टोंग युनिव्हर्सिटी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि रोबोटिक्स या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन चालते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीही या संधी खुल्या होत आहेत. या अभ्यासक्रमांसाठी केवळ संगणक अभियांत्रिकीचेच नव्हे तर गणित, सांख्यिकी, इलेक्ट्रॉनिक्स किंवा भौतिकशास्त्राची पार्श्वभूमी असलेले विद्यार्थीही अर्ज करू शकतात. विश्लेषण क्षमता, प्रोग्रॅमिंग कौशल्य, संशोधनवृत्ती मुख्यत्वे अपेक्षित असते.

आगामी दशकात आयटी क्षेत्र केवळ कोडिंगपुरते मर्यादित राहणार नाही. भविष्यातील आयटी व्यावसायिक हे केवळ तंत्रज्ञ नसून समस्यांचे सर्जनशील समाधान शोधणारे जागतिक नागरिक असतील. मराठी विद्यार्थ्यांसाठी ही संधी केवळ करिअरची नाही, तर नव्या ज्ञानविश्वाशी जोडणाऱ्या आणि जागतिक तंत्रज्ञान परिसंस्थेत सहभागी होण्याच्या प्रवासाची सुरुवात ठरू शकते.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

### आयटीतील भविष्यवेधी उद्योजक : सुमित मोरे

भारतामधील अनेक आयटी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे हे मोठे स्वप्न असते. परंतु त्या स्वप्नासोबत आर्थिक अडचणी आणि शिक्षणासाठी कर्ज घेण्याची जोखीमही असते. सुमितची कथा मात्र वेगळी आहे. चिकाटी, योग्य नियोजन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव यामुळे त्याचा प्रवास प्रेरणादायी ठरतो.

सुमितने पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), येथून माहिती तंत्रज्ञान शाखेत बी.ई. पदवी पूर्ण केली. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षापासूनच त्याने आपल्या मित्रांप्रमाणे जीआरई आणि टॉफेल या परीक्षांची तयारी सुरू केली होती. मात्र परदेशी शिक्षणासाठी मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन कुटुंबावर आर्थिक ओझे टाकायचे नाही, असा त्याचा स्पष्ट निर्णय होता.

म्हणूनच सुमितने आधी नोकरी करून काही रक्कम साठवण्याचा मार्ग निवडला. कॅम्पस इंटरव्ह्यूमधून त्याची निवड आयबीएममध्ये झाली. नोकरी करत असतानाच त्याने जीआरई आणि टॉफेल या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याला इंग्लंडमध्ये एका प्रकल्पासाठी काम करण्याची संधी मिळाली. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला.

यानंतर त्याने अमेरिकेतील पाच विद्यापीठांमध्ये आयटीमधील मास्टर्ससाठी अर्ज केले आणि त्याला युनिवर्सिटी ऑफ मेरीलॅन्ड येथे प्रवेश मिळाला. त्याच्या कामाच्या अनुभवामुळे त्याला शिक्षण शुल्कासाठी संपूर्ण शिष्यवृत्ती मिळाली. पहिल्या वर्षातच त्याला टीचिंग असिस्टंटशिप आणि नंतर रिसर्च असिस्टंटशिप मिळाली. स्टायपेंडही मिळू लागला. शिक्षण शुल्काव्यतिरिक्त असलेल्या खर्चाचाही प्रश्न यातून सुटला. उन्हाळ्यात त्याने सिलिकॉन वॅली मधील एका स्टार्टअपमध्ये तीन महिन्यांची इंटर्नशिप केली. हे सारे करीत असताना सुमितने आपला मास्टर्स अभ्यासक्रम थिसिस पद्धतीने पूर्ण केला.



अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी असूनही सुमित भारतात परतला. प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या पुस्तकाने त्याला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. दरम्यान त्याने हेमलकसाला जाऊन लोकबिरादरीमध्ये एक वर्ष काम केले. तेथे आदिवासी मुलांना मराठी शिकण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्याने 'अक्षर' हे मोबाइल ॲप विकसित केले. या उपक्रमाला नॅसकॉमकडून सन्मान मिळाला. दहा वर्षापूर्वी मित्राच्या मदतीने त्याने 'नॉन स्टॉप आयओ टेक्नॉलॉजीज' ही कंपनी सुरु केली आणि ती आज अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर प्रोडक्ट डेव्हलपमेंटचे काम करते आहे. आज या कंपनीत दीडशे पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

सामाजिक बांधिलकीची प्रेरणा आणि जागतिक शिक्षणाचा अनुभव यांचा संगम घडवत सुमित आज आपल्या कंपनीच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात नवे योगदान देत आहे.

# श्रम संहितेतील महत्त्वाच्या तरतुदी

**नवीन कामगार कायद्यांविषयी कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता व शंका आहेत. या कायद्यांचा आपल्यावर काय परिणाम होईल अशी बरेच जण विचारणा करत आहेत. त्यासंबंधी काही महत्त्वाच्या बाबींवर या लेखात चर्चा करूया.**

कौशल्य तंत्र
सलील चिंचोरे

**भारतामध्ये कामगार** कायदे अधिक सोपे, सुसंगत आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने पूर्वी अस्तित्वात असलेले २९ वेगवेगळे कामगार कायदे एकत्र करून चार नवीन श्रम संहितांची (Labour Codes) निर्मिती केली आहे. या श्रम संहितांचा मुख्य उद्देश म्हणजे कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, उद्योगांना नियमांचे पालन करणे सोपे करणे आणि भारतातील रोजगार व्यवस्थेला अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनवणे. नोव्हेंबर २०२५ पासून श्रम संहिता सरकारने लागू केल्या आहेत. या चार संहिता पुढील प्रमाणे आहेतः

वेतन संहिता, २०१९ (कोड ऑन वेजेस) - कामगारांना किमान वेतन, वेतनाची वेळेवर देयता आणि वेतनाशी संबंधित नियम निश्चित करते.

औद्योगिक संबंध संहिता, २०२० (इंडस्ट्रीयल रिलेशन्स कोड) - नियोक्ता-कर्मचारी संबंध, कामगार संघटना आणि औद्योगिक वाद यासंबंधी नियम स्पष्ट करते.

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या अटी संहिता, २०२० (ओएसएच कोड) -कामगारांचे कार्यस्थळावरील सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी सुधारण्यासाठी नियम ठरवते.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (सोशल सिक्युरिटी कोड) - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ), विमा, पेन्शन आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश करते.

श्रम संहितेमध्ये कर्मचाऱ्यांसंबंधी अनेक बाबींची फेरमांडणी केली आहे. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे पगार व वेतन यांची नव्याने केलेली व्याख्या. खासगी क्षेत्रात पगारातील सर्व घटकांना एकत्र करून येणाऱ्या रकमेला सीटीसी (कॉस्ट टू कंपनी) असे म्हणतात. यामध्ये मासिक पगार, बोनस, परफॉर्मन्स इन्सेंटिव्ह, प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी यांचा समावेश होतो. यातील प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅच्युईटी हे बेसिक वेतन व महागाई भत्त्याच्या कायद्यानुसार विशिष्ट टक्केवारी म्हणून मोजले जातात. या घटकांना अप्रत्यक्ष लाभ असेही म्हणतात. सीटीसीमध्ये बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण जितके जास्त तितक्या प्रमाणात अप्रत्यक्ष लाभ वाढतात. श्रम संहिता लागू होण्याआधी प्रत्येक कंपनीमध्ये सीटीसीमधील बेसिक वेतन व महागाई भत्ता यांचे प्रमाण वेगवेगळे होते.

श्रम संहितांमध्ये वेतन (वेज) मासिक पगाराच्या (मंथली सॅलरी) कमीत कमी ५० टक्के ठेवण्याचे बंधनकारक केले आहे. वेतनामध्ये समावेश असलेल्या व समावेश नसलेल्या घटकांची यादी दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या रचनेत अधिकाधिक स्पष्टता आणणे हा यामागचा हेतू आहे. आता मासिक पगाराच्या किमान ५० टक्के रकमेवर (वेतनावर) प्रॉव्हिडंट फंड, व ईएसआयसी कापले जाणार आहे. तसेच ही रक्कम ग्रॅच्युईटी मोजण्यासाठी वापरली जाणार आहे. ही रक्कम तुमच्या सध्याच्या पगारातील रकमेपेक्षा जास्त असल्यास तेवढ्या प्रमाणात तुमचे अप्रत्यक्ष लाभ वाढतील. मात्र त्यामुळे तुमच्या हाती येणाऱ्या निव्वळ पगारावर (टेक होम सॅलरीवर) परिणाम होईल.

कंपन्यांना निश्चित मुदतीचे कर्मचारी (फिक्स्ड टर्म एम्प्लॉईज) नेमण्याची तरतूद केली आहे. या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखे सर्व फायदे (रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा) द्यावे लागतील. हे कर्मचारी किमान एक वर्ष नोकरी केल्यानंतर ग्रॅच्युईटीसाठी पात्र ठरतील.



कंपनीतील सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांना (कायमस्वरूपी, निश्चित मुदतीचे, कंत्राटी) नेमणूकपत्र देणे बंधनकारक असेल. या नेमणूकपत्रात कामाचे स्वरूप, कामाचे ठिकाण व वेतनाचे तपशील द्यावे लागतील. महिला कर्मचाऱ्यांना नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची श्रम संहिता परवानगी देते. त्यासाठी कंपनीला महिला कर्मचाऱ्यांची लिखित पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. कर्मचाऱ्याने कंपनी सोडल्यास त्याची देय रक्कम (फायनल सेटलमेंट) कंपनीला दोन दिवसात द्यावी लागेल.

ई-कॉमर्स क्षेत्रात सध्या गिग कामगारांचा वापर होतो. हे कामगार एकाच वेळेस अनेक कंपन्यांबरोबर विशिष्ट काळासाठी किंवा कामासाठी काम करतात. श्रमसंहितेत अशा कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद केलेली आहे. त्यासाठी कंपन्यांना विक्रीचा एक टक्का रक्कम सामाजिक सुरक्षा फंडासाठी द्यावी लागेल.

याविषयी कंपनीतील तज्ज्ञांशी बोलून श्रमसंहितेविषयी तुम्ही अधिक माहिती जाणून घेऊ शकता व त्यातील नियमांचे काटक काटेकोरपणे पालन करू शकता.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत.)

## शब्दकोडे- ३६१



**आडवी विधाने :** (१) जन्मभर, तहहयात (३) 'बाई पण भारी देवा' चित्रपटाचे दिग्दर्शक (फक्त नाव) (५) मित्र, सवंगडी (७) दिवस (८) मत्सर, द्वेष (९) शृंगारिक, रसप्रधान काव्यगायन प्रकार (१०) दाणादाण, फाटाफूट (१२) एक लोकप्रिय बैठा खेळ (१४) गाडीवरचे आच्छादन (१५) रंग, औषध वगैरे उडवण्याची नळी (१७) एक अधिक पाव (१८) घडलेली गोष्ट, प्रसंग (१९) चीर, भेग (२१) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस (२३) कूर्म, कच्छप (२४) खुबी, मर्म (२५) सुट्टी, परवानगी (२७) माकड, कपी (२९) वार्षिक नेमणूक (३१) पाहुणचार, बडदास्त (३४) लोखंडाचा चपटा, अरुंद लांब तुकडा (३५) एक सुगंधी वनस्पती (३६) वार्ताहर

**उभी विधाने :** (१) एखाद्या प्रदेशात मूळचे राहणारे लोक (२) आणीबाणीला विरोध करण्यासाठी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विविध विचारधारांच्या नेत्यांनी एकत्र येऊन हा पक्ष स्थापन केला होता (३) हा कापून वाढदिवस साजरा केला जातो (४) कार्ल मार्क्स यांचा प्रसिद्ध ग्रंथ (५) तालाच्या आरंभीची मुख्य जागा, सारखा (६) वाळलेला खजूर (८) ऊन, सूर्यप्रकाश (९) डौलात चालणे, नखऱ्याने चालणे (११) हेकेखोरपणा, आग्रहीपणा (१३) मांडणी, ठेवण (१६) नियमानुसार, रूढीला धरून (१७) सूर्योदयापासून दुपारपर्यंतचा काळ (२०) खेळाची पाळी, मोठी पळी (२१) गणपतीला वाहिल्या जाणाऱ्या दुर्वांची संख्या (२२) अशुद्ध रक्तवाहिनी (२३) अरण्य, जंगल (२६) मुलीचा नवरा (२७) सोक्षमोक्ष, फैसला (२८) ओटीपोटाच्या खालचा भाग, कटी (३०) मुघल साम्राज्याचा संस्थापक (३२) विदेशी मद्याचा एक प्रकार (३३) कीर, पोपट (३४) हा कंद चिरताना डोळ्यातून पाणी आणतो

– चारू नानल

## सुडोकू - ३६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९ | १ | ५ | |
| ६ | ८ | १ | | | | | ९ | |
| ४ | | | | ८ | | | २ | |
| २ | | | | ७ | | | | |
| | | ३ | ६ | | ८ | २ | | |
| | | | | ४ | | | | ६ |
| | ६ | | | २ | | | | ९ |
| | ९ | | | | | ८ | ७ | २ |
| | २ | ५ | ३ | | | | | |

## सुडोकू - ३६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ४ | ८ | १ | ९ | ५ | २ |
| ५ | १ | ८ | ६ | ९ | २ | ३ | ४ | ७ |
| ९ | ४ | २ | ५ | ३ | ७ | १ | ८ | ६ |
| १ | ८ | ४ | ९ | ६ | ३ | २ | ७ | ५ |
| ७ | ९ | ६ | ८ | २ | ५ | ४ | ३ | १ |
| २ | ५ | ३ | ७ | १ | ४ | ६ | ९ | ८ |
| ८ | २ | ५ | ३ | ४ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ७ | १ | २ | ५ | ९ | ८ | ६ | ३ |
| ३ | ६ | ९ | १ | ७ | ८ | ५ | २ | ४ |

## शब्दकोडे - ३६०चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | ज | यं | ती | ■ | का | र्ल | स | न |
| म | सू | र | ■ | न | व | रा | ■ | जा | ■ |
| ला | ल | ■ | कै | वा | र | ■ | स | व | त |
| ■ | दा | स | ■ | र | ■ | त | र | ट | ■ |
| स | र | ब | त | ■ | मा | र | ळ | ■ | हू |
| ह | ■ | ब | ■ | मा | न | स | ■ | रं | क |
| न | भ | ■ | का | ल | व | ■ | जो | ग | ■ |
| ■ | ग | ण | प | ती | ■ | स | र | पं | च |
| दा | दा | ■ | रे | ■ | नि | त्य | ■ | च | ■ |
| म | ड | के | ■ | सं | धी | ■ | स | मी | प |

# वसई, विरारच्या पर्यटनाला झळाळी

(पान १ वरून) वसईच्या प्रसिद्ध राजेळी केळ्यांपासून तयार केली जाणारी सुकेळी यांची ख्याती देखील सर्वदूर पसरलेली आहे. व्यवसायाला चालना देण्यासाठी विरार येथील नंदाखालमध्ये केळीचे गाव हा कृषी व पर्यटन विकास उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत केळी प्रक्रिया, प्रशिक्षण, प्रदर्शन व विक्रीसाठी सुविधा विकसित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वसईतील सांडोर येथे मच्छीमारांचे गाव या संकल्पनेवर आधारित उपक्रम विकसित करण्यात येणार आहे या अंतर्गत पारंपारिक नाव जाळी सांस्कृतिक कलाकृती व स्थानिक जीवनशैलीचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. स्थानिक उत्पादनासाठी विक्री केंद्र ही उपलब्ध करून दिले जाणार आहे.

जूचंद्र गाव हे रांगोळीचे गाव म्हणून ओळखले जाते. पारंपारिक रांगोळीचा वारसा जपण्यासाठी महापालिकेकडून रांगोळीचे गाव या संकल्पनेवर आधारित उपक्रम राबवून येथील स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, रांगोळी प्रदर्शन, प्रशिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमातून जपण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शहरातील सोनचाफा, गुलाब, मोगरा, ऑर्किड यासह अन्य प्रजातीच्या फुलांना मोठी मागणी असते.

त्यामुळे येथील फुलशेती अधिक बहरावी व येथील कृषीपर्यटन विकसित करण्याच्या दृष्टीने फुलांचे गाव नाविन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित उपक्रम राबविले जाणार आहेत.

## संविधान पार्कची निर्मिती करणार

महापालिकेने संविधान पार्क विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. वसईतील भुईगाव येथे ६२.६६ गुंठ्यामध्ये उभारण्यात येणार आहे. यासाठी अंदाजपत्रकात ४.४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसद भवनाची प्रतिकृती, संविधानातील प्रमुख अधिकार व कर्तव्य दर्शविणारे म्युरल वॉल, संविधानाचे महत्त्वपूर्ण स्तंभ दर्शविणारे डिस्प्ले एरिया, ओपन एअर एम्पीथिएटर तसेच लँडस्केप गार्डन विकसित करण्यात येणार आहे. याशिवाय म्युझियम रूम, होलोग्राफी रूम, वाचनालय आणि शैक्षणिक प्रदर्शनासाठी स्वतंत्र जागा निर्माण करण्यात येणार आहे. त्यामुळे हा उपक्रम शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा दावा पालिकेकडून करण्यात आला.

## तरतूद अशी

- केळीचे गाव- नंदाखाल - १.५ कोटी
- मच्छिमारांचे गाव - २.५० कोटी
- रांगोळीचे गाव जूचंद्र - १.५ कोटी
- फुलांचे गाव - १ कोटी
- संविधान पार्क - ४.४० कोटी

# कमकुवत पुलांवर अवजड वाहने

**लोकसत्ता वार्ताहर**

**वाडा:** वाडा येथून कांबारे-वाशिंद मार्गावरून अती अवजड वाहनांची बेकायदेशीर वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. तालुक्यातील आमगाव येथील एका कंपनीतून कारखान्याचा सुमारे १६५ टन वजनाचा अजस्त्र लोखंडी भाग वाहून नेणारे वाहन सध्या वाडा शहरात थांबले असून ते लवकरच तानसा वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीतील कांबारे-वाशिंद मार्गाने पुढे जाणार आहे. या मार्गावरील पाली, गांधरे आणि सावरोली गावांच्या नदीवरील पूल आधीच कमकुवत असल्याने हे अवजड वाहन पुलासाठी संकट ठरण्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

कांबारे- वाशिंद मार्ग तानसा वन्यजीव अभयारण्याच्या संवेदनशील क्षेत्रातून जातो. या मार्गावरून यापूर्वीही अती अवजड टाकी वाहून नेणाऱ्या वाहनामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षांचे नुकसान झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. आता पुन्हा अशाच वाहनाच्या हालचाली सुरू झाल्या आहे. दरम्यान, पिंजाळ व वैतरणा नदीवरील पुलांवर २५ टनांपेक्षा अधिक वजनाच्या वाहनांना प्रवेशबंदी असतानाही १६५ टन वजनाचे वाहन मार्गस्थ होईल. या मार्गावर अनेक ठिकाणी एकेरी रस्ता असल्याने वाहतूक कोंडीची शक्यता आहे.

# मिरा रोड परिसरात खवय्यांची गर्दी

**(पान १ वरून)** शाकाहारी विविध पदार्थ उपलब्ध होत आहेत. त्यामुळे विविध शहरांतील खवय्येही येथे मोठ्या संख्येने येऊ लागले आहेत.

अंड्यापासून तयार होणारे मालपोये, जलेबी, गुलाबजाम, फिरणी, अफलातून, शीरखुर्मा, सेवई आणि फालुदा यांसारख्या पदार्थांना मोठी मागणी आहे. तसेच शोरमा, कबाब, बिर्याणी आणि इतर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठीही खवय्यांची गर्दी होत आहे. मुंबई, ठाणे, पुणे, वसई-विरार, पालघर आणि नवी मुंबई येथूनही अनेक जण येथे येत असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.


## नाटक सिनेमा वाद्यवृंद






## संक्षिप्त

### चक्रभेदी सोशल फाउंडेशनकडून निवेदन

**रत्नागिरी :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने चक्रभेदी सोशल फाउंडेशन, देवरुख (ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) या संस्थेने महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांची भेट घेऊन विधवा व एकल महिलांच्या समस्या तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी निधी मिळावा याबाबत निवेदन सादर केले. चक्रभेदी सोशल फाउंडेशन ही संस्था विधवा व एकल महिलांच्या सन्मानासाठी तसेच पर्यावरण विषयावर कार्य करत आहे. संस्थेमार्फत विधवा महिलांचे हळदी-कुंकू, शिव्या मुक्त समाज अभियान, जीवन कौशल्य कार्यशाळा, तसेच मायेचं हक्काचं घर या निवारा केंद्राच्या संकल्पनेवर काम सुरू आहे.

# रत्नागिरीत महायुतीचा दबदबा

## पंचायत समित्यांवर शिवसेना-भाजप-राष्ट्रवादीची सत्ता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या नऊही पंचायत समित्यांमध्ये सभापती व उपसभापती निवडीची प्रक्रिया उत्साहात पार पडली. या निवडींमध्ये शिवसेना (शिंदे गट), भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या महायुतीने जिल्ह्यावर आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. नऊपैकी आठ पंचायत समित्यांवर शिवसेनेचे सभापती विराजमान झाले असून चिपळूणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला सभापतीपद मिळाले. तर गुहागर आणि राजापूर येथे भाजपला उपसभापतीपद देत युतीधर्म पाळण्यात आला. या निवडींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महिलांना मिळालेले मोठे प्रतिनिधित्व.

### महिलांची भूमिका अधिक बळकट

मंडणगड पंचायत समितीत शिवसेनेची एकहाती सत्ता असल्यामुळे प्रणाली चिले सभापती तर दीपक मालुसरे उपसभापती म्हणून निवडून आले. रत्नागिरी जिल्ह्यातील पंचायत समित्यांवर महायुतीचा ठसा उमटला असून शिवसेना सर्वाधिक प्रभावी ठरली आहे. तसेच महिलांना मिळालेल्या मोठ्या प्रतिनिधित्वामुळे स्थानिक राजकारणात महिलांची भूमिका अधिक बळकट होत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

नऊपैकी पाच पंचायत समित्यांमध्ये महिलांनी सभापतीपदाची धुरा सांभाळली आहे.

जिल्ह्यातील सर्वांचे लक्ष चिपळूण पंचायत समितीच्या निर्णयाकडे लागले होते. राष्ट्रवादी काँग्रेसने येथे स्वबळावर निवडणूक लढवत आपली ताकद दाखवून दिली होती. त्यामुळे सत्तासमीकरणाबाबत उत्सुकता होती. अखेर महायुतीच्या शिष्टाईत पहिल्या अडीच वर्षांसाठी सभापतीपद राष्ट्रवादीला देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार सूर्यकांत खेतले सभापती, तर शिवसेनेचे संदेश आयरे उपसभापती झाले. ठाकरे गटाची शिवसेना येथे विरोधात बसली आहे.

रत्नागिरी व लांजा पंचायत समित्यांमध्ये शिवसेना-भाजपची स्पष्ट बहुमताची सत्ता असल्यामुळे निवड प्रक्रिया सुरळीत पार पडली.

रत्नागिरी पंचायत समितीसाठी प्रवीण पांचाळ सभापती, गजानन धनावडे उपसभापती तर लांजा समितीसाठी मानसी आंबेकर यांची सभापती, आदेश आंबोळकर उपसभापती, संगमेश्वरसाठी शर्वरी वेल्ये (सभापती), प्रफुल्ल बाईत (उपसभापती राष्ट्रवादी), दापोली पंचायत समितीसाठी उन्मेष राजे (सभापती), नम्रता तोडणकर (उपसभापती) तसेच खेड पंचायत समितीसाठी डॉ. अफिया पालेकर (सभापती), सुनील मोरे (उपसभापती) निवड करण्यात आली आहे. राजापूर व गुहागर पंचायत समित्यांमध्ये भाजपला उपसभापतीपदे देत युतीचा फॉर्म्युला राबवण्यात आला. राजापूर पंचायत समितीच्या नंदिनी नितीन कदम (सभापती - शिवसेना) व अभिजित गुरव (उपसभापती भाजप) तसेच गुहागर समितीसाठी प्रणव पोळेकर (सभापती शिवसेना), नीलेश सुर्वे (उपसभापती भाजप) यांची निवड करण्यात आली आहे.

# बांदा परिसरात ६ माकडे मृतावस्थेत

## आरोग्य, वन विभाग सतर्क

**लोकसत्ता वार्ताहर**

**सावंतवाडी :** सावंतवाडी तालुक्यातील बांदा शहरालगत असलेल्या निशाण परिसरातील काजू बागायतींमध्ये गेल्या चार दिवसांत सहा माकडे मृतावस्थेत आढळल्याने शेतकरी आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या परिसरात यापूर्वी माकडतापाची (केएफडी) साथ उद्भवली असल्याने, प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली असून आरोग्य आणि वन विभागाने तातडीने सर्वेक्षण सुरू केले आहे.

**बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण**

बांदा-डिंगणे मार्गावरील निशाण परिसरात काजूच्या मोठ्या बागायती आहेत. सध्या काजूचा हंगाम ऐन भरात असल्याने शेतकरी दररोज बागेत कामासाठी जात आहेत. मात्र, एकामागून एक माकडे मृतावस्थेत आढळत असल्याने संभाव्य संसर्गाची धास्ती शेतकऱ्यांनी घेतली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून स्थानिकांनी काही मृत माकडांची जाळून विल्हेवाट लावली असून, याची माहिती वन विभाग व आरोग्य यंत्रणेला दिली आहे.

**वन विभागाकडून पाहणी, आवाहन**

घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

जलद बचाव पथकाचे प्रमुख बबन रेडकर आणि एस. व्ही. कळसुलकर यांनी स्थानिक बागायतदारांसोबत बागायतींची पाहणी केली. या भागात माकडांचा वावर मोठा असल्याने शेतकऱ्यांनी बागेत काम करताना पूर्ण सतर्कता बाळगावी, तसेच कोणतेही माकड आजारी किंवा मृतावस्थेत दिसल्यास स्वतः त्याच्या संपर्कात न जाता तात्काळ वन विभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आरोग्य विभागाचे सर्वेक्षण आणि उपाययोजना

बांदा प्राथमिक आरोग्य केंद्राने या परिसरात आरोग्य सर्वेक्षण सुरू केले आहे. माकडताप हा प्रामुख्याने गोचिडीच्या माध्यमातून पसरत असल्याने, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शेतकऱ्यांना लवकरच ह्यडीएमपी ऑइलह्णचे वाटप करण्यात येणार आहे. परिसरात कोणालाही तापाची लक्षणे जाणवल्यास त्यांनी विलंब न करता प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# मद्यपीचा पत्नीवर हल्ला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**रत्नागिरी :** कामावरून घरी परतणाऱ्या पत्नीवर तिच्याच दारुड्या पतीने झुडपात लपून बसून लाकडी दांडक्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खानू बौद्धवाडी परिसरात घडली. या प्रकरणी जखमी महिलेच्या तक्रारीवरून पतीविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिव्या दीपक सुतार (वय ३९) या ८ मार्च रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजता तावडे खान फार्म येथील काम आटोपून नेहमीच्या मार्गाने घरी परतत होत्या.

त्यावेळी त्यांचे पती दीपक कृष्णा सुतार हे वाटेतील झाडाझुडपांत आधीच लपून बसले होते.

आरोपी दीपक सुतार याने अचानक पाठीमागून येत त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात दिव्या सुतार यांना गंभीर दुखापत झाली.

**शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी**

मारहाणीनंतरही आरोपी थांबला नाही. त्याने पत्नीला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत दमदाटी केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपीला दारूचे व्यसन असून कौटुंबिक वादातून त्याने हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

या घटनेनंतर जखमी दिव्या सुतार यांनी तत्काळ रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# कणकवलीत ‘हिंदू नववर्ष स्वागतयात्रा’

## नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**लोकसत्ता वार्ताहर**



**सावंतवाडी :** गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी कणकवली शहरात ह्यहिंदू नववर्ष स्वागत यात्रा समितीह्णच्या वतीने भव्य स्वागतयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा गुरुवार, १९ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता सांस्कृतिक सोहळ्याने सुरू होणार असल्याची माहिती समितीच्या वतीने प्रसाद ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली. येथील उत्कर्ष हॉलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ठाकूर बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत नंदू आरोलकर आणि प्रतिभा करंबेळकर उपस्थित होत्या.

स्वागत यात्रेचे स्वरूप आणि मार्ग

कणकवलीत आयोजित केली जाणारी ही स्वागत यात्रा यंदाचे ५ वे वर्ष आहे. यात्रेची सुरुवात शहराचे मुख्य केंद्र असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून होईल. तेथून ही यात्रा पटवर्धन चौक मार्गे विद्यामंदिर मैदानावर पोहोचेल. यात्रेचा भव्य समारोप विद्यामंदिर मैदानासमोरील शिवारा मंदिर येथे होणार आहे. यंदाच्या स्वागतयात्रेचे स्वरूप अत्यंत व्यापक आणि आकर्षक असणार आहे.

पारंपारिक वेशभूषेतील देखावे आणि ओम चिन्ह अंकित असलेले भगवे झेंडे फडकतील. शिस्तबद्ध ध्वजपथक, वारकरी दिंडी, ढोल-ताशा पथक आणि लेझीम पथके असतील.

युवकांच्या वतीने काढण्यात येणारी विशेष दुचाकी रॅली हे या यात्रेचे आकर्षण ठरेल. या मंगलमय सोहळ्यासाठी लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्व स्तरातील नागरिकांनी पारंपारिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. कणकवलीतील जास्तीत जास्त नागरिकांनी एकत्र येऊन हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत करावे, असे आवाहन हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती, कणकवलीच्या वतीने करण्यात आले आहे.

# संतापाच्या भरात मुलाकडून आईवर प्राणघातक हल्ला

**रत्नागिरी :** किरकोळ कारणावरून आई-मुलामध्ये झालेला वाद इतका विकोपाला गेला की संतापाच्या भरात मुलाने आईवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना लांजा तालुक्यातील घावणेवाडी येथे घडली.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष गणपत दिवाळे (३५, रा. धावणेवाडी, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी) हा रात्रीच्या जेवणासाठी कोळंबी घेऊन घरी आला होता. त्यानंतर त्याची आई सुनिता गणपत दिवाळे (७०) यांनी कोळंबी साफ करून झाल्यानंतर ती करण्यासाठी संतोषला मसाला वाटून देण्यास सांगितले.

या कारणावरून आई-मुलामध्ये वाद निर्माण झाला. वाद चिघळत गेल्याने संतोष दिवाळे याने संतापाच्या भरात आईच्या डोक्यात दगडी वरवंटा मारला. एवढ्यावरच न थांबता त्याने शर्टाने गळा आवळून तिला ठार मारण्याचाही प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. या मारहाणीत सुनिता दिवाळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने लांजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर अधिक उपचारासाठी त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

संतोष गणपत दिवाळे याच्याविरुद्ध लांजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देवकन्या मैंदाड करीत आहेत.

# डॉ. प्रतीक नाटेकर यांचे उपकरण डिझाइन पेटंट प्रकाशित

## औषधी वनस्पतींतील सक्रिय घटक ओळखण्याची प्रक्रिया अधिक सुलभ

**लोकसत्ता वार्ताहर**



**राजापूर :** औषधी वनस्पतींमधील सक्रिय घटक ओळखण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक करण्यासाठी उपयुक्त ठरणारे उपकरणाचे डिझाइन राजापूरचे सुपूत्र डॉ. प्रतिक दिलीप नाटेकर यांनी विकसित केले आहे. त्यांच्या या संशोधनात्मक उपकरणाच्या डिझाइनचे पेटंट नुकतेच भारत सरकारमार्फत प्रकाशित झाले आहे. त्यांच्या या संशोधनामुळे वनस्पतीशास्त्र तसेच औषधनिर्मिती संशोधन क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या तालुक्यातील विखारेगोठणे येथील आबासाहेब मराठे महाविद्यालयात डॉ. नाटेकर हे वनस्पतीशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वीही विविध विषयांवर नाविन्यपूर्ण संशोधन केले असून संशोधन क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. औषधी वनस्पतींमधील सक्रिय घटक ओळखण्याची प्रक्रिया अधिक सोपी व प्रभावी करण्यासाठी त्यांनी हे उपकरणाचे डिझाइन विकसित केले आहे.

या संशोधनासाठी त्यांना वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. गणेश पवार, डॉ. बाबू सोनार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. अतुल भावे तसेच प्रा. अतुल टिके यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन विक्रांत पाटील, सदस्या संगिता पाटील आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम राठोड यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनामुळे या संशोधनाला भक्कम पाठबळ मिळाले. डॉ. नाटेकर यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधन परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या तंत्रज्ञानामुळे औषधी वनस्पती संशोधनात वेग आणि अचूकता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

### वैशिष्ट्यपूर्ण उपकरण डिझाइन

डॉ. प्रतिक नाटेकर यांनी विकसित केलेल्या उपकरणाच्या डिझाईनमुळे औषधी वनस्पतींमधील जैवसक्रिय घटक अचूकपणे ओळखणे आणि त्यांचे विश्लेषण करणे शक्य होते. या प्रणालीमध्ये विश्लेषणासाठी संवेदक तंत्र आणि बुद्धिमान डेटा प्रक्रिया यांचा समावेश असून त्यामुळे अल्कलॉइड्स, फ्लॅव्होनॉइड्स, टर्पेनॉइड्स आणि फिनॉलिक संयुगे यांसारखे सक्रिय घटक जलद, विश्वासार्ह आणि नॉन-डिस्ट्रक्टिव्ह पद्धतीने ओळखता येतात.

# ज्योत्स्ना कुळये यांना ‘सुपर मॉम’ पुरस्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**रत्नागिरी :** आईच्या अथक जिद्दीपुढे कोणतीही अडचण मोठी नसते, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे ज्योत्स्ना अजित कुळये. ८५ टक्के बहुदिव्यांग असलेल्या मुलाला स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांनी दिलेल्या संघर्षमय लढ्याची दखल घेत ‘आस्था सोशल फाउंडेशन’तर्फे दिला जाणारा यंदाचा ‘सुपर मॉम’ पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पाच हजार रुपयांच्या धनादेशासह त्यांचा गौरव करण्यात आला.

मूळच्या गुहागर तालुक्यातील उमराड येथील माहेरवाशीण आणि लांजा तालुक्यातील गोविळ येथील सासरवाशीण असलेल्या ज्योत्स्ना कुळये यांच्या आयुष्यातील संघर्षाची सुरुवात २००७ मध्ये मुलगा देवेशच्या जन्मानंतर झाली. मणक्याच्या गंभीर आजारामुळे देवेशवर तब्बल १४ शस्त्रक्रिया करण्यात आल्या; मात्र तो स्वतःच्या पायावर उभा राहू शकला नाही.

अशा कठीण परिस्थितीतही न डगमगता त्यांनी मुलाला सामान्य शाळेत प्रवेश मिळवून दिला. देवेशला दररोज उचलून शाळेत नेणे, व्हीलचेअरजवळ दिवसभर थांबणे आणि पुन्हा घरी आणणे, असा त्यांचा रोजचा संघर्षमय दिनक्रम होता.त्यांच्या या समर्पणाची दखल घेत शाळेच्या मुख्याध्यापिकांनी दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या ज्योत्स्ना कुळये यांना बालवर्गाला शिकवण्याची संधीही दिली होती.

लॉकडाऊनच्या काळात लांजा तालुक्यातील बेणी येथे स्थलांतरित झाल्यानंतरही त्यांनी मुलाचे शिक्षण खंडित होऊ दिले नाही. न्यू इंग्लिश स्कूल, लांजा येथे प्रवेश घेतलेल्या देवेशने दहावीच्या परीक्षेत ७४ टक्के गुण मिळवत यश संपादन केले.ऐकण्याचा त्रास असतानाही देवेशने जिद्दीने कॉमर्स शाखेत प्रवेश घेतला असून त्याला ‘उडान’ दिव्यांग शिष्यवृत्तीही मिळाली आहे. यंदा त्याने बारावीची परीक्षा दिली आहे.

अपंग मुलाला सक्षम नागरिक म्हणून घडवण्यासाठी आईने केलेल्या अथक प्रयत्नांची दखल घेत ‘आस्था सोशल फाउंडेशन’ने ज्योत्स्ना कुळये यांना ‘सुपर मॉम’ पुरस्काराने सन्मानित केले. या प्रसंगी मंदाकिनी कुळये, संस्थेच्या सचिव सुरेखा पाथरे, संकेत चाळके, हसना नेवरेकर आणि आल्हाद पाथरे उपस्थित होते.

# मूकबधिर दाम्पत्यांसाठी समुपदेशन आवश्यक - वैदेही रानडे

**रत्नागिरी :** बालकांमध्ये जन्मजात श्रवणदोष टाळण्यासाठी समाजाने सजग राहणे आवश्यक आहे. विशेषतः मूकबधिर दाम्पत्यांनी मूल जन्माला घालण्यापूर्वी जेनेटिक कौन्सिलिंग करून घेणे गरजेचे असल्याचे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी केले.

तसेच जिल्ह्यातील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये नवजात बालकांच्या श्रवणदोष तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. शामराव पेजे सांस्कृतिक भवन, जिल्हा परिषद येथे जागतिक श्रवण दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त दिलेल्या संदेशात रानडे यांनी शासकीय तसेच खासगी रुग्णालयात जन्मणाऱ्या प्रत्येक बाळाची श्रवण तपासणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले. यासाठी अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या आणि पालकांनीही सजग राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी सुनीता शिरभाते यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सामान्य रुग्णालयातील कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. वैभवी व्यास, वाचा उपचार तज्ज्ञ अभिषेक गांधी, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या प्रकल्प संचालक सुरेखा पाथरे, विशेष शिक्षिका मयेकर, मुख्याध्यापक गजानन राजपूत तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या व्यवस्थापक आरती कदम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत सुनीता शिरभाते यांनी यंदाच्या ‘समाजातून शाळेकडे प्रत्येक मुलासाठी श्रवण आरोग्य’ या जागतिक संकल्पनेची माहिती दिली. विविध सेवा व योजनांविषयी आरती कदम यांनी मार्गदर्शन केले.

# ‘वडाला प्रदक्षिणा घालणारी नव्हे तर वडाचे रोपण करणारी स्त्री हवी’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**समाजकल्याण कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात रत्नागिरीचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांचे प्रतिपादन.**

**रत्नागिरी :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या स्त्री शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा वारसा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. रस्त्यावर दगड फोडणारी, ऊस भरून बैलगाडी हाकणारी महिला आणि सर्वसामान्य स्त्रीपर्यंत हा विचार पोहोचला पाहिजे. वडाला प्रदक्षिणा घालणारी नव्हे, तर वडाचे रोपण करणारी स्त्री समाजाला हवी, असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी केले.

जिल्हा समाजकल्याण कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी सहायक आयुक्त दीपक घाटे, सायबर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक स्मिता सुतार, इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक उदयसिंह गायकवाड, अधिकारी अपूर्वा कारंडे उपस्थित होते.

अर्धे जग महिलांचे आहे, असे म्हटले जाते; परंतु उर्वरित अर्धे जगही महिलांमुळेच आहे. ‘ती’ हीच प्रत्येक गोष्टीची सुरुवात आणि सार आहे. स्त्रीला सन्मान द्यावा अशी मागणी करण्यापेक्षा तिला सन्मान मिळतो आहे, असे वास्तव समाजात निर्माण झाले पाहिजे, असे सातपुते यांनी सांगितले.

साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचा उल्लेख करत त्यांनी स्त्रीच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. कवी जगदीश खेबुडकर यांच्या उदाहरणाचा दाखला देत ‘बाईपासून आईपर्यंतचा स्त्रीचा प्रवास’ त्यांनी मांडला. यावेळी त्यांनी स्त्रीच्या संघर्षाचे चित्रण करणारी कविता सादर केली.

### ‘अनोळखी व्हिडिओ कॉल घेताना सावधानता बाळगावी’



सायबर पोलीस ठाण्याच्या निरीक्षक स्मिता सुतार यांनी सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. २सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडिओ अपलोड करताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून छायाचित्रांचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. लोन ॲप्सच्या फसवणुकीपासून सावध राहण्याचाही त्यांनी इशारा दिला. सेक्स्टॉर्शनच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अनोळखी व्हिडिओ कॉल स्वीकारताना कॅमेरा बंद ठेवावा आणि समोरची व्यक्ती ओळखीची नसल्यास त्वरित कॉल बंद करावा, असे त्यांनी सांगितले. सहायक आयुक्त दीपक घाटे, अधिकारी अपूर्वा कारंडे , उदयसिंह गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. गृहपाल कौमुदी खेडेकर आणि कनिष्ठ सहायक श्रुती मिणचे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विजया मोरे यांनी केले

# ‘आठवणींच्या हिंदोळ्यावर’ पुस्तक प्रकाशित

**लोकसत्ता वार्ताहर**

**सावंतवाडी :** कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) मालवण शाखेच्या आजीव सदस्या उज्वला चंद्रशेखर धानजी यांच्या ‘आठवणींच्या हिंदोळ्यावर’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच कणकवली येथे संपन्न झाला. हे पुस्तक कणकवलीतील विघ्नेश पुस्तक भांडाराने प्रकाशित केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूर झोनचे ए.आय.बी.ई.ए. अध्यक्ष संतोष रानडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसाद घाणेकर, भारतीय स्टेट बँकेचे निवृत्त अधिकारी एकनाथ वायंगणकर, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी रामचंद्र आंगणे आणि सिंधुदुर्ग जिल्हा बँकेच्या संचालिका प्रज्ञा ढवण उपस्थित होत्या. प्रसाद घाणेकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बोलताना घाणेकर म्हणाले की, हे पुस्तक केवळ आठवणींचा संग्रह नसून एक देखणे आत्मचरित्र आहे. लेखिकेचा जीवनप्रवास पाहता हे पुस्तक व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शक ठरेल. रामचंद्र आंगणे यांनी लेखिकेच्या बँकिंग सेवेबरोबरच साहित्य क्षेत्रातील सक्रियतेचे कौतुक केले, तर एकनाथ वायंगणकर यांनी लेखिकेच्या जिद्दीचे फळ म्हणजे हे पुस्तक असल्याचे सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# पंचायत समिती सभापती पदासाठी आज निवडणूक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती पदांसाठी उद्या (दि. ११) निवडणूक होत आहे. जिल्हाधिकारी यांनी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून पंचायत समित्यांवर कुणाचा झेंडा फडकतो आणि कुणाला संधी मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

रायगडमधील १५ पंचायत समित्यांची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली. त्यानंतर लगेचच ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी झाली. निकालामध्ये प्रामुख्याने महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात काट्याची टक्कर पाहायला मिळाली, तर भाजपचेही ठराविक ठिकाणी वर्चस्व राहिले.

शिवसेना (शिंदे गट) महाड, माणगाव, पोलादपूर, अलिबाग, मुरूडमध्ये आघाडीवर आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) रोहा, तळा, म्हसळा, श्रीवर्धन आणि कर्जतमध्ये सरस ठरला आहे. तसेच, भाजपने पनवेल, पेण, खालापूरमध्ये आपले वर्चस्व कायम राखले आहे. एकूणच, रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीतील घटक पक्षांनी (शिवसेना व राष्ट्रवादी) आपले वर्चस्व सिद्ध केले आहे, तर भाजपने महत्त्वाची पकड मिळवली आहे.

बुधवारी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केले जातील. दुपरी २ वाजता सभापती व उपसभापती पदाच्या निवडणूमीसाठी बैठक होईल. बैठक सुरू झाल्यानंतर उमेदवारी अर्जांची छाननी होईल. त्यानंतर १० मिनीटांनी उमेउवारी अर्ज वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे जाहीर केली जातील. उमेदवारी आर्ज मागे घेण्यसाठी १० मिनिटांचा कालावधी दिला जाईल. त्यानंतर आवश्यकता भासल्यास सभापती व उपसभापती पदांसाठी मतदान होईल.

### सभापतीपदाचे आरक्षण

अनुसूचित जाती - म्हसळा (महिला), अनुसूचित जमाती - तळा (खुला), श्रीवर्धन (महिला), नागरिकांचा मागास प्रवर्ग - महाड (महिला), कर्जत (खुला), माणगाव (खुला), अलिबाग (महिला), सर्वसाधारण प्रवर्ग- पनवेल (महिला), खालापूर (खुला), उरण (खुला), पेण (महिला), मुरुड (खुला), रोहा (महिला), सुधागड (महिला), पोलादपूर (खुला).

# नकारात्मक व्यक्तींमुळे वृद्धत्वाला वेग

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** माणूस किती वेगाने वृद्ध होत जाणार, हे त्याच्या जवळच्या लोकांवर अवलंबून असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. आपल्याजवळ त्रासदायक किंवा सतत तणाव निर्माण करणाऱ्या व्यक्ती असल्यास आपल्या जैविक वृद्धत्वाचा वेग वाढू शकतो, असे एका नव्या अभ्यासातून आढळून आले आहे.

अशा नकारात्मक मानसिकता निर्माण करणाऱ्या व्यक्तीमुळे वृद्धत्वाचा वेग सुमारे १.५ टक्क्यांनी वाढतो आणि संबंधित व्यक्तीचे जैविक वय नेहमीपेक्षा नऊ महिन्यांनी अधिक असते. त्यातही ही व्यक्ती कुटुंबातील असल्यास त्याचा परिणाम प्रकर्षाने दिसून येत असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे. 'प्रोसीडिंग्स ऑफ द नॅशनल अॅकॅडमी ऑफ सायन्सेस' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या या शोधनिबंधानुसार, अभ्यासात सहभागी झालेल्या ३० टक्के व्यक्तींच्या आयुष्यात किमान एक तरी अशा प्रकारची त्रासदायक व्यक्ती असल्याचे नोंदवण्यात आले. अमेरिकेतील इंडियाना प्रांतातील २,३४५ नागरिकांच्या लाळेच्या नमुन्यांवर आधारित या अभ्यासात डीएनए मिथाइलेशन या प्रक्रियेचे विश्लेषण करण्यात आले. दीर्घकाळ टिकणारा मानसिक ताण जैविक वृद्धत्वाला गती देऊ शकतो, त्यामुळे निरोगी वृद्धत्वासाठी हानीकारक संबंध कमी करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.





केस, त्वचा व सर्व आरोग्य तक्रारींवर
डॉ. मानसी Tanvi HERBALS क्लिनिक
डॉ. मानसी तन्वी हर्बल क्लिनिक
डॉ पुष्कराज 9833683021
रोज फ्री चेकअप (ठाणे)
स्पिरुलिनी+ कॅप्सूल्स, केशकलरा लेप, कुमकुमादी शतधौत घृत, मंत्रचिकित्सानुभव पुस्तक व तन्वी हर्बल प्रॉडक्ट्स उपलब्ध...


# सौभाग्यलेण्याच्या आठवणींशी जोडून घेणारी 'तनिष्क'ची अनोखी स्पर्धा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** सौभाग्यलेणे म्हणून ओळखले जाणारे मंगळसूत्र प्रत्येक स्त्रीसाठी अनेकविध अर्थाने महत्त्वाचे असते. सोन्याचा दागिना यापलीकडे मंगळसूत्राशी असलेले स्त्रीचे नाते ओळखून 'तनिष्क' या टाटा समूहाच्या प्रतिष्ठित दागिन्यांच्या ब्रँडने 'माझ्या मंगळसूत्राची गोष्ट' या अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्त्रियांना भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे.

मंगळसूत्र हा स्त्रीच्या आयुष्यातला फक्त महत्वाचा दागिना नाही, तर तो घडवण्यामागे प्रत्येकीची एक वेगळी आठवण असते.

कधी वाढले म्हणून नवीन मंगळसूत्र घेण्याची लगबग, कधी नवऱ्याच्या मागे लागून आवडीने आपल्याला हवे त्या डिझाईनचे करून घेतलेले मंगळसूत्र, कधी सासरच्या पारंपरिक पद्धतीचे मंगळसूत्र, कधी नवऱ्याने न सांगता दिलेली भेट तर कधी आयुष्यभर पै पै जोडत फार कष्टाने घडवलेला दागिना, अशा कित्येक आठवणी मंगळसूत्राशी जोडलेल्या असतात. तुमच्या मंगळसूत्राची तुमची अशी आठवण 'माझ्या मंगळसूत्राची गोष्ट' या तनिष्कच्या स्पर्धेसाठी पाठवायची आहे. तुमची मंगळसूत्राची गोष्ट response.mmg@gmail.com या ईमेलवर किंवा ९९२००९९९४३ या क्रमांकावर व्हॉट्स ॲपवर २०० ते २५० शब्दांत पाठवायची आहे. त्याबरोबरच स्वतःचे नाव, वय, पत्ता, संपर्क क्रमांक आणि तुमचा ईमेल आयडी आदी तपशीलही लिहून पाठवायचे आहेत.

या स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख १६ मार्च २०२६ आहे. या स्पर्धेत विजेता ठरणाऱ्यांना 'तनिष्क'कडून प्रत्येकी १०,००० रुपयांचे २० व्हाउचर्स जिंकण्याची संधी मिळणार आहे.

# गॅस पुरवठा बंद झाल्याने हॉटेल व्यवसाय संकटात



**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अलिबाग :** इराण-इस्त्रायल युद्धाचा फटका आता थेट देशातील हॉटेल व्यवसायाला बसत असल्याचे दिसत आहे. व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद झाल्यामुळे रायगड जिल्ह्यातील हॉटेल व्यवसाय संकटात आला आहे. दुसरीकडे गॅस तुटवडयाच्या भीतीने घरगुती गॅस सिलेडरचे बुकींग दुपटीहून अधिक वाढले आहे.

गॅस पुरवठा सुरळीत न झाल्यास मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडर उपलब्ध नसल्याने हॉटेल व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ग्राहकांनाही याचा फटका सहन करावा लागत आहे. आगामी काही दिवसांत परिस्थिती सुधारली नाही, तर जिल्ह्यातील हॉटेल व्यवसाय पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

हॉटेल व्यवसायासाठी लागणारे व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा थांबवण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. मात्र तरीही काही दिवस व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सुरूच होता. परंतु आता तो बंद झाल्याने पुढील काही दिवसात हॉटेल बंद ठेवावे लागणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. दुसरीकडे घरगुती गॅस सिलेंडरच्या बुकींगमध्ये भरमसाठ वाढ झाली आहे. ज्या ठिकाणी दिवसाला ७०० ते ८०० बुकींग होत असे तेथे दीड तें दोन हजारांपर्यंत बुकींग पोहोचले आहे.

सध्या साखरपुडा, लग्न समारंभ, सुरू आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जेवणावळी झडताहेत. कॅटरींगच्या व्यवसायाला सुगीचे दिवस आहेत. परंतु व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद झाल्याने हा व्यवसायदेखील संकटात आला आहे. कार्यक्रमाच्या आगावू घेतलेल्या बुकींग कशा पूर्ण करायच्या असा प्रश्न कॅटरींग व्यावसायिकांना पडला आहे. जर गॅस सिलेंडर उपलब्ध झाले नाहीत तर लाकूडफाटा आणून चुली पेटवाव्या लागतील असे एका व्यावसायिकाने सांगितले.

### घरगुती सिलिंडरची मागणी वाढली

आमच्याकडे जेमतेम आठवडाभर पुरेल इतकेच गॅस सिलेंडर उपलब्ध आहेत. त्यानंतर काय करावे असा प्रश्न आहे. गॅस सिलेंडर उपलब्ध झाले नाही तर हॉटेल बंद करावे लागणार आहे. सध्या परीक्षांचा काळ असल्याने हॉटेलमध्ये गर्दी कमी आहे. पर्यटकांची संख्या वाढल्यास परीस्थिती बिकट होणार आहे.

– **यशवंत हरेर**, हॉटेल व्यावसायिक

आम्ही दिवसाकाठी १०० व्यावसायिक गॅस सिलेंडर वितरीत करतो. परंतु दोन दिवस झाले व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा झालेला नाही. घरगुती गॅसचा तुटवडा भासण्याच्या भीतीने ग्राहकांमध्ये चलबिचल असून बुकींग मोठया प्रमाणात वाढले आहे.

–**कैलास जगे**, भारत गॅस वितरक

# थकबाकीविरोधात महावितरणची मोहीम

**अलिबाग :** वीजबील वेळेत भरले नाहीत तर तुमच्यावर अंधारात राहण्याची वेळ येवू शकते. वीज सेवा सुरळीतपणे पुरवूनही अनेक ग्राहकांकडून वेळेवर वीजबिलाचा भरणा होत नसल्याने महावितरण कंपनीच्या महसुलावर ताण येत आहे. थकीत बिलांची वाढती रक्कम लक्षात घेता महावितरणने कडक कारवाई करीत गेल्या चार महिन्यांत ३० हजार ३७१ ग्राहकांच्या वीजजोडण्या खंडित केल्या आहेत. रायगड सर्कल अंतर्गत अलिबाग, पनवेल, रोहा आणि गोरेगाव हे चार विभाग असून, त्याअंतर्गत १७ उपविभाग कार्यरत आहेत. दर महिन्यातील वापरानुसार ग्राहकांना बिल वितरित केले जाते. दरम्यान, काही ग्राहकांकडून सातत्याने बिल भरण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे दिसून आले आहे.

महावितरणचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हेंबरमध्ये ९ हजार ९६५ डिसेंबरमध्ये ६ हजार २८६, जानेवारीमध्ये ६ हजार ६५० आणि फेब्रुवारीमध्ये ७ हजार ५८० अशा एकूण ३० हजार ३७१ ग्राहकांच्या वीजजोडण्या बंद करण्यात आल्या. नागरिकांनी वेळेवर बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन बिक्कड यांनी केले.

विशेष मोहीम राबवून ३२४ प्रकरणे उघडकीस आणली. यामध्ये ९९ लाख रुपयांचा दंड आकारला आहे. त्यापैकी ७२ जणांनी ४३ लाखांचा भरणा केला असून, उर्वरित २५२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. कडक कारवाईचा इशारा भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी दिला. चेक बाउन्स झाल्यास पुढील महिन्याच्या बिलामध्ये समाविष्ट करण्यात येते.


Maharashtra Airport Development Company Ltd.
(CIN U45203MH2002SGC136979)
Corrigendum - MADC RECRUITMENT - 2026
MADC RECRUITMENT NOTICE 2026 PUBLISHED ON MADC OFFICIAL WEBSITE ON 07/03/2026
With reference to the MADC Recruitment Notice 2026 published in the newspaper dated 07/03/2026, it is hereby informed that, the last date for submission of applications is hereby extended to 27/03/2026 and there are few other changes in advertisement.
For the details visit www.madcindia.org. Details will be available on the website from 11/03/2026 from 13.00 hours.
Sd/-
Vice Chairman and Managing Director



सिद्ध KALCIYOG कॅल्सीयोग
आयुर्वेदिक कॅल्शियम टॅब्लेटस्
• हाडांचे आणि सांध्यांचे टॉनिक. • हात, पाय, कंबर, गुडघे, पाठ, सांधे दुखणे यासाठी उत्तम. • केस गळणे कमी होते. • स्नायू, लिगामेंट दुखापतीवर प्रभावी.
Amazon वर कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध
डॉ. अभिजीत 9422011723
धौतीयोग चे प्रभावी उत्पादन


# भटक्या श्वानाचा लहान मुलावर हल्ला

**अलिबाग :** श्रीवर्धन शहरात दिवसेंदिवस भटक्या श्वानांची संख्या वाढली असून, हे श्वान स्थानिकांना त्रासदायक ठरत आहेत.काही दिवसांपूर्वी महिलेच्या अंगावर श्वानांच्या टोळक्याने उडी घेत चावा घेतल्याची घटना ताजी असतानाच एका लहान मुलाला श्वानाने हल्ला केल्याची घटना नुकतीच घडली आहे.

श्वानांची पैदास दर सहा ते सात महिन्यांनी होत असून , गेल्या काही वर्षांत शहरात असंख्य मोकाट श्वान भटकताना आढळतात.प्रत्येक पाखाडी , आळीत टोळक्याने बसलेले श्वान हे अनेक वेळा नागरिक , विद्यार्थी , ज्येष्ठ नागरिकांच्या मागे जात हातातील वस्तू ओढणे तसेच चावा घेण्याचा प्रयत्न करणे या प्रकाराने नागरिक त्रस्त झाले आहेत.त्यातही रस्त्याने एकट्या दुकट्या व्यक्तीच्या अंगावर उडी घेत चावा घेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.श्रीवर्धन तालुक्यात दिवसेंदिवस मोकाट श्वानांचा उपद्रव वाढला आहे. वर्षभरात १८७ जणांना श्वान दंश झाल्याने नागरिकांमधे दहशतीमुळे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीवर्धन नगर परिषदेकडून मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण , शस्त्रक्रिया करण्याची मोहीम अनेक वर्षांपासून रखडल्याने दरवर्षी श्वानांची संख्या वाढती आहे.नगरपरिषद हद्दीत प्रत्येक नाका, चौकात श्वानांचे टोळके दिसून येते.श्रीवर्धन नगर परिषदेमार्फत भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे व शस्त्रक्रिया करणे याबाबतीत जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती; परंतु कुठलीही प्राणिमित्र संघटना अथवा ॲनिमल वेल्फेअर एजन्सीने याबाबतीत पुढाकार घेतला नाही.

मोकाट श्वान पकडण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी , त्यांना रेबीज लसीकरण करणे , निर्बिजीकरण करणे यासाठी निविदा काढण्यात येणार आहेत.लवकर अंमलबजावणी होईल असे श्रीवर्धन चे उपनगराध्यक्ष अनंत गुरव यांनी सांगितले.

# मुंबईच्या प्रादेशिक पारपत्र अधिकारीपदी स्वप्नील थोरात

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** मुंबईचे प्रादेशिक पारपत्र अधिकारी म्हणून स्वप्नील थोरात यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला. डॉ अर्जुन देवरा यांच्या जागी थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. थोरात हे २०१७ च्या तुकडीचे भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

स्वप्नील थोरात यांनी याआधी त्यांनी दक्षिण कोरियातील भारतीय दूतावास येथे व्यापार आणि गुंतवणूक तसेच मुसद्देगिरी विभागाचे प्रभारी म्हणून २०१८ ते २३ या दरम्यान काम पाहिले आहे. त्यानंतर ते नवी दिल्ली येथील परराष्ट्र मंत्रालयाच्या वित्त विभागात अडीच वर्षे कार्यरत होते. तसेच मागील तीन महिन्यांपासून मुंबई येथील परराष्ट्र मंत्रालयाच्या शाखा सचिवालयाचे प्रमुख म्हणूनही अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. थोरात हे मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असून जैवतंत्रज्ञान विषयात त्यांनी पदव्युतर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी नवी मुंबई येथील 'ॲडव्हान्स्ड कॅन्सर ट्रीटमेंट रिसर्च अँड एज्युकेशन सेंटर' येथे कर्करोगावरील संशोधन क्षेत्रातही काम केले आहे.

# कार खड्ड्यात पडून ठाण्यात तिघे जखमी

**ठाणे :** पाचपाखाडी भागात मंगळवारी शो-रुममधील नवीन कार चाचणीसाठी नेणाऱ्या चालकाचे त्यावरील नियंत्रण सुटल्याने कार २० फूट खोल खड्ड्यात पडून तीन जण जखमी झाले. यात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यावेळी कारची इतर तीन वाहनांनाही धडक बसल्याने त्यांचेही नुकसान झाले आहे. कुमारी प्रिया (३६), मिथिलेश पासवाण (४८) आणि चेतन देशमुख (३०) अशी जखमींची नावे आहेत. मिथिलेश आणि कुमारी यांनी मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजता नवीन कारची चाचणी घेण्याची मागणी केली होती. बांधकामासाठी खणलेल्या २० फूट खड्ड्यात जाऊन कार पडली.


Bank of Maharashtra

**कॉर्पोरेट कार्यालय :** 134/1, 'मॉन्ट क्लेयर', बाणेर–पाषाण लिंक रोड, पाषाण–411021.
**मुख्य कार्यालय :** 'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे 411005. **टेली.:** 020–71658139
**ई–मेल:** investor_services@bankofmaharashtra.bank.in, **वेबसाईट :** www.bankofmaharashtra.bank.in

**बँकेच्या भागधारकांना सूचना**
**वैध नामांकनांची यादी**

वरील विषयासंदर्भात दि. 24.02.2026 रोजी वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आलेली सूचना आणि त्यानंतर दिनांक 23.02.2026 रोजीच्या सूचनेनुसार, बँकेची विशेष सर्वसाधारण सभा केंद्र सरकार व्यतिरिक्त, बँकेच्या एका भागधारक संचालकाची निवड करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे, त्या विषयात, बँकेकडे पुढे नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांकडून नामांकने प्राप्त झाली आहेत, जी वैध आहेत, जे उमेदवारी अर्ज बँकेच्या संचालक मंडळास पात्र आणि योग्य आहेत असे वाटत आहे.

| अ. क्र. | नाव आणि पत्ते | वय | शैक्षणिक पात्रता | विशेष ज्ञान आणि अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1. | **रीना झा त्रिपाठी** 43, ब्ल्यू हेवन, 4 था मजला, भाऊसाहेब हिरे मार्ग, वर्षा बंगल्यासमोर, मलाबार हिल, मुंबई – 400006 | 61 वर्ष | एक्झिक्युटिव्ह एमबीए–आयआयएम बँगलोर अँण्ड सायराक्यूज युनिव्हर्सिटी, यूएसए, बॅचलर ऑफ लॉ – मुंबई युनिव्हर्सिटी, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन – युनिव्हर्सिटी ऑफ हल, युनायटेड किंग्डम, मास्टर्स इन ह्युमन राईटस् – पॉंडिचेरी युनिव्हर्सिटी सोबत टीआयएसएस, मुंबई, मास्टर्स ऑफ आर्ट्स – दिल्ली युनिव्हर्सिटी. | कर आकारणी, कायदा आणि वित्त |
| 2. | **आलोक जैन** एस–147, स्कूल ब्लॉक, शाकारपूर, दिल्ली – 110092 | 55 वर्ष | बॅचलर ऑफ कॉमर्स, चार्टर्ड अकाउंटंट, एसएपी सर्टिफिकेशन, नोंदणीकृत व्हॅल्यूअर (आयबीबीआय) | लेखापरीक्षण, करआकारणी, वित्तीय सल्लागार, मूल्यांकन, बँकिंग, एनबीएफसीज् आणि सल्लागार सेवा. |
| 3. | **रुमा डे** फ्लॅट नं. 1602, ट्रायसिटी नटराज, डॉ. सी गिडवानी मार्ग, चेंबूर पूर्व, मुंबई – 400071 | 60 वर्ष | कलकत्ता युनिव्हर्सिटीमधून बॅचलर ऑफ सायन्स (ऑनर्स), सीएआयआयबी, अन्टी मनी लॉंडरिंग स्पेशलिष्ट | बँकिंग आणि वित्त |
| 4. | **प्रसेनजीत श्रीकृष्ण फडणवीस** 31/34, रजनीगंधा हौसिंग सोसायटी, तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर नं. 2, पुणे – 411009 | 52 वर्ष | बॅचलर इन कॉम्प्युटर सायन्स, एल.एल.बी., डिप्लोमा इन सायबर लॉ | माहिती तंत्रज्ञान, सायबर लॉ, कायदा |

जसे की, निवडणूकीत एका रिक्त पदासाठी एकूण चार उमेदवार वैध असल्याने आणि बँक ऑफ महाराष्ट्र (शेअर्स अँड मिटींग्ज्) रेग्युलेशन, 2004 चे रेग्युलेशन 66 अनुसार 23 मार्च, 2026 रोजी सकाळी 11.00 वा. आयोजित करण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत (ईजीएम) निवडणूक प्रक्रिया करण्यात येईल. निवडणुकीसाठी रिमोट ई वोटिंग बुधवार, 18 मार्च, 2026 रोजी सकाळी 9.00, पासून रविवार, 22 मार्च, 2026 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत, त्याचप्रमाणे ईजीएम च्या वेळी करण्यात येईल.

बहुसंख्य मत प्राप्त करणाऱ्या उमेदवारास, बँकेचे भागधारक संचालक म्हणून निवडून आले आहे असे मानले जाईल.

दिनांक : 10.03.2026
ठिकाण : पुणे

बँक ऑफ महाराष्ट्र करीता,
विशाल सेठिया
कंपनी सचिव


